

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक निर्णय अधिकारी व इतर अधिकारी यांच्यासाठी सर्वसाधारण सूचना व आदेशांचा सारसंग्रह

(महानगरपालिका निवडणुकांकरीता)

डिसेंबर, २०२५

पहिला मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

अनुक्रमणिका

प्रकरण क्रमांक	विषय	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	१-४
२	मतदार यादी व मतदान केंद्र निश्चिती	५-१२
३	नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी	१३-२६
४	छाननी	२७-३१
५	उमेदवारी मागे घेणे	३२
६	चिन्ह वाटप-सर्वसाधारण सूचना	३३-३८
७	मतदान कर्मचारी वृंद	३९-४८
८	उमेदवार व विविध प्रतिनिधी यांना ओळखपत्र देण्याची कार्यपध्दती	४९
९	आचारसंहिता-सर्वसाधारण सूचना	५०-६०
१०	अनामत रक्कम जप्त करणे	६१
११	राज्य निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागण्यात येते असे इतर मुद्दे	६२-६३
	इतर महत्त्वाचे आदेश व सूचना	
१२	मतदार यादी, मतदान केंद्र निश्चिती, सर्व्हिस वोटर्स व मतदारांच्या ओळखीचे पुरावे इ. संदर्भातील आदेश व सूचना	६५-१२८
१३	नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी व मतपत्रिकेचा नमुना इ. संदर्भातील आदेश व सूचना	१२९-२१४
१४	राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्ह वाटप संदर्भातील आदेश व सूचना	२१५-३६८
१५	आचारसंहिता संदर्भातील आदेश व सूचना	३६९-५८०
१६	इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र संदर्भातील आदेश व सूचना	५८१-६७०
१७	निवडणुकीसाठी लागणारे नमुने व इतर साहित्य	६७१-६९८
१८	राज्य निवडणूक आयोगाकडे माहिती पाठविण्याचे विविध नमुने	६९९-७२६
१९	इतर अनुषंगिक महत्त्वाचे आदेश व सूचना	७२७-९९२

इतर महत्त्वाचे आदेश व सूचना

अनुक्रमणिका

अ. क्र.	विषय	आदेश क्रमांक	दिनांक	पृष्ठ क्रमांक
	प्रकरण-१२			
	मतदार यादी, मतदान केंद्र निश्चिति व मतदारांच्या ओळखीचे पुरावे इ. संदर्भातील आदेश व सूचना			
१	मतदार यादी अधिप्रमाणित करणे व ती सुरक्षित ठेवणे संदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश.	No.SEC.1096/CR-6/96/D-3	३१.०१.१९९६	६७-६८
२	मतदार नोंदणी अधिकारी यांनी अद्ययावत यादी पुरविणेबाबत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दि. ०८.१२.२००४ रोजी दिलेल्या सूचना.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३३/का-५	२३.१२.२००४	६९-७२
३	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी वापरावयाच्या मतदार यादीबाबत. *(मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या सहमतीने निर्गमित केलेले).*	क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष	१७.०४.२०१५	७३-७६
४	मतदार यादीचा अचूक डाटा मिळण्याबाबतचे धोरण.	क्रमांक-रानिआ-२०१७/प्र.क्र.१९/संगणक कक्ष	२६.१०.२०१७	७७-८०
५	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदान केंद्र निश्चिती व पुरवावयाच्या सोयी सुविधा.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५	२६.०६.२०२५	८१-९२
६	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरीता मतदान केंद्र निश्चितीच्या निकषांमधील सुधारणा.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५	२९.०८.२०२५	९३-९५
७	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना सादर करावयाच्या पुराव्याबाबतचे सुधारीत आदेश-२०२५.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५	१४.०७.२०२५	९७-९९
८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश.	क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८	१६.०७.२०२५	१०१-११२
९	मतदार यादीचे विभाजन करून मतदार यादी अधिप्रमाणित करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नेमण्याबाबत आदेश. (फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता).	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.७५/का-५	१२.११.२०२५	११३
१०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश - मतदार यादीत संभाव्य दुबार नावांबाबत करावयाची उपाययोजना.	क्रमांक:रानिआ-२०२५/ग्रापंनि/प्र.क्र.०३/का.८	२९.१०.२०२५	११५-१२२
११	महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५. मतदार यादीबाबत-आदेश.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.०३/का-५	२५.११.२०२५	१२३-१२४

१२	महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५. मतदार यादीबाबत-पत्र.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.०३/का-५	२५.११.२०२५	१२५-१२६
१३	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता यादीची प्रत शुल्क आकारुन देण्याबाबत.	क्र.रानिआ/जिपपंस २०२५/प्र.क्र.३३/का.७	०८.१०.२०२५	१२७

प्रकरण-१३

नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी व मतपत्रिकेचा नमुना इ. संदर्भातील आदेश व सूचना

१	विशेष मागासप्रवर्ग संदर्भातील राज्य निवडणूक आयोगाचे पत्र या संदर्भातील शासनाचे पत्र.	क्रमांक-सीबीसी-१०९६/सी-१२५८/प्र.क्र.२३८/मावक-५	०५.१०.१९९६	१३१
		क्रमांक एसईसी/एमएमसी-११९६/प्र.क्र.१९६/का-३	०७.१०.१९९६	१३३
२	नामनिर्देशन पत्राचा सुधारीत नमुना. *(मात्र शपथपत्राचा नमुना दि.१३.०८.२०१८ नुसार सुधारीत). (दि. १२.१२.२०२५ नुसार पुन्हा सुधारीत)*	क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का-५	०५.१०.२०१५	१३५-१४०
३	गुन्हेगारी पार्श्वभीमी व स्थावर,जंगम मालमत्ता तपशिल देणारे शपथपत्राबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश व त्याबाबतची सुधारणा.	क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या-०५	१५.०३.२००४	१४१-१४२
४	नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाच्या शपथपत्राचा सुधारीत नमुना. *(दि. १२.१२.२०२५ नुसार पुन्हा सुधारीत)*	क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का.५	१३.०८.२०१८	१४३-१६०
५	जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्याबाबत - शासन अध्यादेश.	सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.	०३.११.२०२५	१६१-१६५
६	स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्यासाठी दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या व्यक्तींना अनर्ह ठरविण्याबाबत.	क्रमांक:-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०	३१.०३.२००९	१६७-१७८
७	सूचक, अनुमोदक व उमेदवार यांचे मतदार यादीतील अनुक्रमांक चुकीचे असल्यासंदर्भातील न्यायालयाचा निर्णय नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याबाबत आयोगाचे पत्र.	क्रमांक रानिआ/मनपा२००८/प्र.क्र.१२/का.०५	२३.०६.२००८	१७९
८	निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी मराठी अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेतून विहित नमुन्यात शपथपत्र/घोषणापत्र सादर करण्याची मुभा.	क्रमांक-रानिआ/मनपा/२०१२/ प्र.क्र.१२/का.५	२८.०१.२०१२	१८१-१८२
९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शपथपत्र/घोषणापत्र स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नसल्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का.५	०८.०१.२०१५	१८३-१८४

१०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशन पत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रामध्ये कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.	क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का-६	२७.०३.२०१५	१८५-१९०
११	नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाच्या शौचालय वापराबाबतच्या प्रमाणपत्र/स्वयंप्रमाणपत्राबाबत.	क्र.रानिआ/जिपपंस-२०२४/प्र.क्र.०४/का.७	१६.०७.२०२४	१९१-१९४
१२	बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने मतपत्रिकेचा नमुना व एका जागेवरून एकच नामनिर्देशन पत्र दाखल करणे.	क्रमांक:रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.०८/का.५	०३.०१.२०१७	१९५-२००
१३	प्राथमिक तपासणीच्यावेळी नामनिर्देशन पत्रातील त्रुटी दूर करण्याची उमेदवारांना संधी देण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का.५	०१.०४.२०१७	२०१-२०४
१४	तृतियपंथी व्यक्तीने स्वत: घोषित केलेल्या लिंगाच्या पर्यायानुसार निवडणूक लढविण्याचा हक्क देणेबाबत.	क्रमांक-रानिआ/ग्रापनि-२०२१/प्र.क्र.०७/का.८	२७.०८.२०२१	२०५-२०७
१५	नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाच्या शपथपत्राच्या सुधारीत नमुन्यातील मुद्दा क्र. १६.५ मध्ये सुधारणा करण्याबाबत - आदेश. *(अनधिकृत बांधकाम).*	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का.५	२६.०९.२०२३	२०९-२११
१६	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये विवाहित महिला उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्र व मतपत्रिकेवरील नावाबाबत.	क्रमांक:रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०१/का-६	१३.०३.२०२५	२१३-२१४
प्रकरण-१४				
राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हवाटप संदर्भातील आदेश व सूचना				
१	राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्षांची नावे व चिन्हांची यादी.	क्रमांक रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र.५४/का.११	०८.११.२०२५	२१७-३०३
२	मान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रामध्ये केवळ पक्षाच्या चिन्हाचा उल्लेख करण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.१४/का.५	०२.०२.२०१७	३०५-३०६
३	महाराष्ट्र राज्य रायकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५.	क्रमांक:रानिआ/रापनों/२०२४/प्र.क्र.२४/का.११	०५.०५.२०२५	३०७-३५५
४	नामनिर्देशन पत्रासोबतच्या नमुना २-अ आणि जोडपत्र १ स्वीकारण्यासंदर्भात.	क्रमांक:रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११	०७.११.२०२५	३५७-३५८
५	प्रमुख प्रचारक (Star Campaigner) च्या संख्या २० वरुन ४० करण्याबाबत.	क्रमांक:रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.१२	०७.११.२०२५	३५९

६	वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी नमुना-४ मध्ये प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्याबाबत.	शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना. (असाधारण क्रमांक ८२ व ८३)	०५.१२.२०२५	३६१-३६७
प्रकरण - १५				
आचारसंहिता संदर्भातील आदेश व सूचना				
१	मालमत्ता विद्रुपीकरण या संदर्भातील आदेश.	No. SEC.1095/CR-25/95/PR.	२१.०१.१९९५	३७१-३७२
२	मद्य विक्री वरील बंदीबाबत -राज्य निवडणूक आयोगाचे निदेश.	No. SEC.1095/CR-1/95/Desk-3	०७.०३.१९९५	३७३-३७४
३	ध्वनीपेक्षकाच्या वापराबाबत - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश.	No. SEC.1095/CR-9/95/Desk-3	१८.०३.१९९५	३७५-३७६
४	पोस्टर्स व पॅम्प्लेटची छपाई व प्रसिद्धीवर निर्बंध.	No. SEC.1095/CR-77/95/Desk-3	२८.०८.१९९५	३७७-३७८
५	उमेदवारास मतदानाच्या दिवशी वाहन वापराबाबत दयावयाच्या परवानगी बाबतचे आदेश.	क्रमांक एसईसी/जीईएन-१११९८/प्र.क्र.१/का-३	०६.०१.१९९८	३७९-३८०
६	आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत.	No. SEC./GEN/2002/CR-10/D-10	२५.०१.२००२	३८१-३८२
७	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील प्रचार.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४/का-५	०९.०४.२०१०	३८३
८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करण्यास प्रतिबंध करणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.२६/का.५	२३.१२.२०११	३८५
९	आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत - महापौर, जिल्हापरिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती व ग्रामपंचायतीचे सरपंच.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५	११.०१.२०१२	३८७
१०	आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत - जिल्हयाचे पालकमंत्री.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५	११.०१.२०१२	३८९
११	निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्र व आजूबाजूच्या परिसरात उमेदवारांचा प्रवेश व निवडणूक काळात उमेदवारांनी उघडावयाची प्रचार कार्यालये - आदेश.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का.५	०४.०२.२०१२	३९१-३९२
१२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांची आचारसंहिता लागू असल्याच्या कालावधीत जिल्हा नियोजन समितीची बैठक घेणेबाबत.	क्रमांक-रानिआ/ग्रापनि/२०१२/प्र.क्र.६/का.८	२१.०८.२०१२	३९३-३९४
१३	स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक आचार संहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करण्याबाबत.	क्रमांक:रानिआ/ग्रापंनि/२०१३/प्र.क्र.५/का-८	०४.०३.२०१३	३९५
१४	निवडणूक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून शस्त्रे जमा करण्यासंबंधात मार्गदर्शक सूचना.	क्र.रानिआ/मनपा २०१५/सं.क्र.२७९/का.०५	०९.०४.२०१५	३९७-४१२

१५	बुलेटप्रुफ वाहन वापरण्याची परवानगी असलेल्यांकडून त्या वाहनाचा वापर अशासकीय कारणासाठी झाल्यास त्यावर झालेला खर्च वसूल करणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२३/का.५	१९.०५.२०१६	४१३-४१४
१६	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकापूर्वी लोकप्रतिनिधिंना स्वेच्छा निधीतून (Discretionary Grant)खर्च करण्यावर निर्बंध.	क्रमांक:रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क.	०५.१०.२०१६	४१५-४१९
१७	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५. आदर्श आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश.	क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७	०४.११.२०२५	४२१-४६४
१८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका-प्रभाग रचनेपासून (i) निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे हाताळण्याबाबत व (ii) प्रतिबंधात्मक व इतर उपाययोजना करण्याबाबतचे आदेश सन-२०२५.	क्रमांक:रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.६/का-५	१६.०७.२०२५	४६५-४७०
१९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५. कायदा व सुव्यवस्थेबाबत एकत्रित आदेश.	क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४१/का.७	०४.११.२०२५	४७१-४८१
२०	सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या व्यक्तीस तसेच लोक प्रतिनिधीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी या मतमोजणी प्रतिनिधी न नेमणेबाबत.	क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२३/का.७	१९.१०.२०१६	४८३-४८४
२१	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचारादरम्यान वपरावयाच्या वाहन संख्येबाबत.	क्रमांक:रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र.३१/का-७	१९.११.२०१६	४८५-४८६
२२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या आचारसंहिता कालावधीत उमेदवार/ राजकीय पक्ष यांना लभा/प्रचाराकरीता विविध परवानग्या देण्याकरीता "एक खिडकी योजना " राबविण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.३०/का.७	२३.११.२०१६	४८७-४९४
२३	निवडणूक संनियंत्रण समितीने जप्त केलेल्या रोकड रकमा परत करण्यापूर्वी आयोगाची मान्यता घेण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.४२/का.६	२४.११.२०१६	४९५-४९६
२४	आचारसंहीता लागू असलेल्या क्षेत्रामधील शासनाच्या जाहीरातींबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.५/का.५	१६.०१.२०१७	४९७
२५	प्रचार साहित्याच्या छपाई व प्रसिध्दीवर आयोगाच्या आदेशान्वये घालण्यात आलेल्या निर्बंधाबाबत स्पष्टीकरण.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२०/का.५	१३.०२.२०१७	४९९-५००
२६	आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांविरुध्द करावयाची कारवाई.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१९/प्र.क्र.४/का-५	२४.०७.२०१९	५०१-५०४
२७	आचारसंहितेच्या कालावधीमध्ये विकास कामांचे नामफलक / जाहिराती काढून टाकणे शक्य नसल्यास झाकून ठेवण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.१५/का.५	२०.०९.२०२१	५०५

२८	प्रतिज्ञापत्र/शपथपत्र/घोषणापत्रामध्ये चुकीची माहिती देणाऱ्या उमेदवाराविरोधात कारवाई / गुन्हा दाखल करण्याची कार्यपध्दती.	क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०२/का-८	२४.०१.२०२३	५०७-५१०
२९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोअ सादर करणे तसेच तदनुषंगिक कार्यवाही करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.	आदेश क्रमांक:रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब)	१५.०२.२०२४	५११-५२७
३०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५. उमेदवाराने निवडणुकांमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४५/का-५	२९.१०.२०२५	५२९-५३२
३१	निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५.	क्रमांक रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का.१०	०९.१०.२०२५	५३३-५८०
प्रकरण-१६				
इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) संदर्भातील आदेश व सूचना				
१	महानगरपालिका क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे आदेश, २००५.	क्रमांक रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५	०७.०१.२००५	५८३-६०५
२	महानगरपालिका क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे सुधारणा आदेश, २०१०.	क्रमांक रानिआ./मनपा.२००४/प्र.क्र.१३/का-५	१५.०४.२०१०	६०७
३	मतदान संपल्यानंतर बॅटरी सुरु राहून मतमोजणीच्या वेळी बॅटरी संपून निकाल दिसत नसल्यास करावयाची कार्यवाही.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१८/ का-५	१३.०६.२००५	६०९-६११
४	मतदान यंत्र व त्यांच्याशी संबधित साहित्याची नोंद जडवस्तू संग्रह नोंदवहीत घेणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.७/का-५	०५.०७.२००७	६१३
५	मतदान यंत्राची मेमरी ३ महिन्याच्या कालावधीनंतर कोषागरातून काढण्यास सक्षम अधिकारी.	क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र.६/का-५	०८.१०.२००७	६१५-६१६
६	इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा सुरक्षित साठा करणे व त्यांच्या संख्येचा हिशोब ठेवणे.	क्रमांक:-रानिआ/मनपा २०१०/प्र.क्र.६/का.५	०३.०१.२०११	६१७-६१८
७	मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणाऱ्या शाईच्या बाटलीऐवजी मार्करपेनच्या वापराबाबत.	क्र.रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५	१९.११.२०११	६१९-६२०
८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका - मतदान यंत्र सेट व सील करणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१८/का.५	१२.०३.२०१२	६२१-६२४
९	मतदाराच्या बोटाला शाई लावण्याबाबत.	क्र.रानिआ/मनपा २०१२/प्र.क्र.२४/का.०५	०९.१०.२०१२	६२५
१०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता ईव्हीएममध्ये पांढऱ्या रंगाच्या मेमरीचा वापर करण्याबाबत.	क्र.रानिआ२०१३/जुमेमा/प्र.क्र.२/का.१२	१८.०६.२०१३	६२७-६२८

११	इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मतदान करण्याबाबतचा (सुधारणा) आदेश - २०१३.	क्रमांक-रानिआ २०१३/प्र.क्र.८/का.१२	२८.१०.२०१३	६२९-६३४
१२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावर " None of the Above" (NOTA) बटनाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत.	क्रमांक-रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का-१२	१२.११.२०१३	६३५-६४५
१३	स्थानिक पातळीवर मतपत्रिका छापून घेणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२०/का.५	१७.११.२०१४	६४७
१४	मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीचा सुधारीत नमुना.	क्रमांक:-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.५/का.५	१५.०४.२०१५	६४९-६५३
१५	मतपत्रिकेवरील उमेदवारांच्या नावाचा फॉन्ट व आकाराबाबत एकसुत्रता.	क्रमांक:-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.१३/का.७	०३.०२.२०१७	६५५-६५७
१६	निवडणूकीपूर्वी मतदान यंत्र तयार करणे व मॉक पोल बाबत.	क्र.रानिआ२०१७/मॉपो/प्र.क्र.११/संगणकीकरण कक्ष	२२.०५.२०१७	६५९-६६०
१७	क्लॉक एरर असलेल्या कंट्रोल युनिटच्या वापराबाबत.	क्रमांक:-रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.६०/का-५	०७.१२.२०१८	६६१-६६३
१८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५. बॅलेट युनिटवरील END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद ठेवण्याबाबत.	क्रमांक-रानिआ-२०२५/प्र.क्र.११/का.१४	२७.११.२०२५	६६५-६६८
१९	मतदान यंत्रावरील CLOSE बटनाच्या वापराबाबत.	क्रमांक-रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२	२९.१२.२०२२	६६९-६७०
	प्रकरण-१७			
	निवडणुकीसाठी लागणारे नमुने व इतर साहित्य			
१	नमुना-१ - निवडणुकीची अधिसूचना			६७३
२	नमुना-२ - प्राप्त नामनिर्देशन पत्राची सूचना			६७४-६७५
३	नमुना-३ - पडताळणी सूची			६७६-६७७
४	नमुना-४ - वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी			६७८
५	नमुना-५ - उमेदवारी मागे घेण्यासंबंधी सूचना			६७९
६	नमुना-६ - उमेदवारी मागे घेण्यासंबंधी सूचना (निवडणूक निर्णय अधिकारी)			६८०
७	नमुना-७ - निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी			६८१
८	नमुना-८ - निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक			६८२
९	नमुना-९ - निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणेबाबत			६८३
१०	नमुना-१० - मतदान प्रतिनिधीची नेमणूक			६८४
११	नमुना-११ - मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणेबाबत			६८५
१२	नमुना-१२ - मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक			६८६
१३	नमुना-१३ - मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणे			६८७

१४	नमुना-१४ - मतमोजणी प्रतिनिधींचे प्रतिज्ञापत्र (निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमक्ष यावर सही करावी)			६८८
१५	नमुना-१५ - मतपत्रिकेवर नाव छापणेबाबत			६८९
१६	नमुना-१६ - मतदान केंद्रासाठी लागणाऱ्या साहित्याची यादी			६९०-६९३
१७	नमुना-१७ - उमेदवार, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, मतदान व मतमोजणीसाठी वापरणेत येणाऱ्या छपाई साहित्याची यादी			६९४-६९६
१८	नमुना-१८ - मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पाठवावयाचा अहवाल			६९७-६९८

प्रकरण-१८

राज्य निवडणूक आयोगाकडे माहिती पाठविण्याचे विविध नमुने

१	निवडणूक प्रक्रियेपुर्वी तसेच दरम्यान सादर करावयाच्या अहवालाचे नमुने.	क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२०/का.७	२४.१०.२०१६	७०१-७०२
२	अंतिम प्रभाग रचनेनंतर व निवडणूक कार्यक्रम जाहिर होण्यापूर्वी सादर करावयाची माहिती.	विवरणपत्र - १		७०३
३	निवडणुकीसाठी आवश्यक असलेले साहित्य.	विवरणपत्र - २		७०५
४	निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची माहिती.	विवरणपत्र - ३		७०७
५	नामनिर्देशन पत्रांबाबत दैनंदिन तपशिल.	विवरणपत्र - ४		७०९
६	वैध नामनिर्देशन पत्रे व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या इत्यादी.	विवरणपत्र - ५		७११
७	मतदानाच्या दिवशी पाठवावयाची मतदानाची टक्केवारी.	विवरणपत्र - ६		७१३
८	झालेले मतदान तसेच वैध व अवैध मतांची संख्या	विवरणपत्र - ७		७१५
९	पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाची मते मिळालेल्या उमेदवारांची माहिती.	विवरणपत्र - ८		७१७
१०	पक्षनिहाय झालेले मतदान.	विवरणपत्र - ९		७१९
११	पक्षनिहाय झालेल्या जागांची संख्या.	विवरणपत्र - १०		७२१
१२	निवडणुकीचा संकलित तक्ता.	विवरणपत्र - ११		७२३-७२६

प्रकरण-१९

इतर अनुषंगिक महत्त्वाचे आदेश व सूचना

१	Requisition of Staff and Vehicles.	No.SEC. 1095/306/Desk-3	०२.०३.१९९५	७२९-७३३
२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा अधिग्रहीत करण्याबाबत-शुध्दीपत्रक.	क्रमांक:-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.४४/का.७	२१.०७.२०१८	७३५-७३८
३	महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२३/प्र.क्र.२/का.५	२६.०४.२०२३	७३९-७४१

४	Restrictions on transfer of staff.	No. SEC. 1095/CR- 5/95/Desk-3	१५.०३.१९९५	७४३-७४४
५	निवडून आलेल्या उमेदवारांना दयावयाचे प्रमाणपत्र.	No. SEC. 1095/CR-11/Desk-3	१०.०४.१९९५	७४५-७४६
		No. SEC. 1095/CR-11/Desk-3	०८.०६.१९९५	७४७
६	महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांना द्यावयाचे प्रमाणपत्र.	क्रमांक:-रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.१५/का.०५	०८.०४.२००५	७४९-७५१
७	पोस्टल बॅलट ऑर्डर-२००१ व दि.१७ जानेवारी २००२ चे पत्र.	क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.५/ का-१०	१६.०१.२००१	७५३-७६२
		क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.५/ का-१०	२६.०४.२००१	७६३
		क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.५/ का-१०	१७.०१.२००२	७६५
८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवजणूकीच्या प्रत्येक टप्प्यावरील माहिती राज्य निवडणूक आयोगास कळविण्याबाबत.	क्रमांक:-एसईसी/एमसी-२००३/ प्र.क्र.७०/का-१०	२०.०९.२००३	७६७-७६९
९	निवडणूकीत झालेल्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याबाबत.	क्रमांक-मनपा-२००४/प्र.क्र.३५/का-०५	०१.१२.२००४	७७१
१०	नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या तारखेनंतर एकच उमेदवार शिल्लक असल्यास त्याचा अहवाल आयोगास पाठविण्याबाबत व आयोगाच्या मान्यतेनंतर त्या उमेदवारास विजयी घोषित करणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३७/का-५	२३.१२.२००४	७७३
११	निवडणूकीसंबधी गुन्हयात तातडीने आरोपपत्र दाखल करणेबाबत.	परिपत्रक क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.१४/का.०५	१२.०४.२००५	७७५-७७६
१२	स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.२५/का-५	११.०८.२००५	७७७
१३	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघाची पुर्नरचना- कामकाज गोपनियरित्या हाताळण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/ का-५	२४.१०.२००५	७७९-७८०
		क्र.:-रानिआ/मनपा२००५/प्र.क्र.१७/का.०५	०२.०७.२०१३	७८१-७८२
१४	निवडणुकीमध्ये काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई.	क्रमांक-रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५	०२.०८.२००६	७८३-७८५
१५	निवडणुकविषयक गुन्हे मागे घेताना आयोगाची परवानगी घेणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.१०/का-५	१४.०३.२००७	७८७-७८८
१६	व्हिडिओ कॅसेटची विल्हेवाट लावण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र.३६/का-५	२०.१२.२००५	७८९
१७	निवडणुकविषयक कार्यवाहीच्या व्हिडिओ चित्रीकरणाच्या सीडी उपलब्ध करून देणेबाबत.	क्रमांक-मनप-२००७/प्र.क्र.१८/का-७	०७.०४.२००७	७९१-७९२
१८	प्रभाग रचना संदर्भात आदेश - स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावास बळी न पडण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र.६/का-५	१०.०४.२००७	७९३

१९	महानगरपालिका/नगरपरिषदा सार्वत्रिक पोटनिवडणूकांमध्ये काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना मानधनाबाबत.	न.वि.वि.शा.नि. क्रमांक:-संकीर्ण-२००६/५१२/प्र.क्र.८९/२००६/नवि-२०	१६.०७.२००७	७९५-७९६
२०	मतदानाच्या कामाकरीता शिक्षकांची नेमणूक केल्यास करावयाची कार्यवाही.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.९/का-५	११.११.२००८	७९७-७९८
२१	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतमोजणी करावयाची पध्दत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५	२१.१२.२००९	७९९-८००
		क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५	२९.०३.२०१०	८०१
		क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२५/का.५	१८.०२.२०१७	८०३-८०४
२२	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा अधिगृहीत करण्याबाबत.	आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२३/का.५	११.१२.२०११	८०५-८०६
२३	राज्य निवडणूक आयोगाचा लोगो छापणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.२४/का.५	१७.१२.२०११	८०७-८०९
२४	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर क्षेत्रिय अधिकाऱ्याचे (झोनल ऑफीसर) काम सोपविण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१८/का.५	२३.०१.२०१२	८११-८१२
२५	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्यावेळी मतदान/मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याना तसेच पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना द्यावयाच्या निवडणूक भत्ता/ आहार भत्त्याबाबतचे आदेश व शुध्दीपत्रक.	क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.०३/का.५	३१.०१.२०१२	८१३-८१४
		क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५	११.०२.२०१२	८१५-८१६
२६	स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही.	क्रमांक:रानिआ/मनपा २००७/प्र.क्र.३/का-५	२०.०२.२०१३	८१७-८१९
२७	महानगरपालिका, नगर परिषद/नगरपंचायत निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करणेबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४(१)/का.५	०६.०२.२०१५	८२१-८२३
२८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रीय स्तरावरील निवडणूकविषयक कामकाजाची जबाबदारी निश्चित करण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.६/का-५	१०.०२.२०१५	८२५-८२९
२९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासप्रवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने निहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.	शासन परिपत्रक क्रमांक:एमसीओ-२०१६/प्र.क्र.४६/नवि-१४	२८.०३.२०१६	८३१-८३३
३०	स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक-अनपेक्षित परिस्थिती हाताळण्याबाबत कायद्याचे अग्रक्रम.	क्र.-रानिआ-२०२६/अहाका/प्र.क्र.१०/सं.क.	०४.१०.२०१६	८३५-८३८

३१	सुरक्षारक्षक पुरविण्यात आलेल्या व्यक्तीस तसेच लोकप्रतिनिधीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी या मतमोजणी प्रतिनिधी न नेमणेबाबत.	क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०२६/प्र.क्र.२३/का.७	१९.१०.२०१६	८३९-८४०
३२	निवडणूक प्रक्रिया पार पाडल्यानंतर सादर करावयाची प्रमाणपत्र.	क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२६/का.७	०९.११.२०१६	८४१-८५१
३३	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासप्रवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने निहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.१/का.५	१६.१२.२०१६	८५३-८५४
३४	बहुसदस्सीय प्रभाग पध्दतीनुसार मतदानपध्दतीची माहीती मतदारांना देण्याबाबत रिट याचिका क्र. ३५४/२०१७.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.६/का.५	१८.०१.२०१७	८५५-८५८
३५	मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिव्यांग मतदारांकरीता मतदान केंद्रावर पुरविण्याच्या सुविधांबाबत.	क्रमांक:रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का-७	२५.०१.२०१७	८५९-८६०
३६	बहुसदस्सीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदान प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२३/का.५	१६.०२.२०१७	८६१
३७	दिव्यांग मतदारांकरीता मतदान केंद्रावर पुरविण्याच्या सुविधांबाबत.	क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का.७	१८.०२.२०१७	८६३-८६६
३८	मतदान केंद्राच्या ठिकाणी जमा झालेला कचरा उचलण्याबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२९/का.५	२९.०३.२०१७	८६७-८६८
३९	निवडणूकीचे काम करणाऱ्यांना मानधन / अतिकालिक भत्ता देण्याबाबत.	क्र.रानिआ/नप-२०१७/प्र.क्र.२/का.६	१२.०६.२०१७	८६९-८७३
४०	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांकरीता क्रीडा संकुलांच्या वापराबाबत..	क्र.-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.१२/का.५	०५.०७.२०१७	८७५-८७८
४१	दिव्यांग व्यक्तींकरिता मतदान केंद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर इ. सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.	क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का.७	२८.११.२०१७	८७९-८८६
४२	आदर्श मतदान केंद्र - त्रयस्थ संस्थेद्वारे सर्व मतदान केंद्रांची तपासणी.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.२५/का.५	२७.०७.२०१८	८८७-८९१
४३	न्यायालयीन प्रकरणाचा योग्य व मुदतीत निपटारा होण्याबाबत करावयाची कार्यवाही.	क्रमांक-रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.७/का-६	२०.०६.२०२२	८९३-८९४
४४	महानगरपालिका,नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निडणूकीच्या कर्तव्यांवर असताना जखमी झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.	क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.०९/का.८	०२.०१.२०२३	८९५-८९७

४५	विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४. निवडणूक संबंधित राज्य, जिल्हा व तहसिल स्तरावरील राजपत्रित अधिकाऱ्यांना पारिश्रमिक/मानधन देण्याबाबत.	शासन निर्णय क्रमांक:सीईएल-२०२४-प्र.क्र.४५/२४/३३(नि.३)(१). *(सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन)*	१६.०१.२०२५	८९९-९०२
४६	विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांच्या कामासाठी नियुक्त केलेल्या विभागीय, जिल्हा व तहसिल पातळीवरील अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी केलेल्या जादा कामासाठी अतिकालिक भत्ता देणेबाबत.	शासन निर्णय क्रमांक:सीईएल-२०२४-प्र.क्र.४५/२४/३३(नि.३)(२). *(सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन)*	१६.०१.२०२५	९०३-९०६
४७	विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४. निवडणुकी कामासाठी नियुक्त केलेल्या सहायक खर्च निरिक्षक/क्षेत्रिय अधिकारी/क्षेत्रिय पोलिस अधिकारी यांना मानधन देणेबाबत.	शासन निर्णय क्रमांक:सीईएल-२०२४-प्र.क्र.४५/२४/३३(नि.३)(३). *(सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन)*	१६.०१.२०२५	९०७-९०९
४८	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकीच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या छपाई/खरेदीसंदर्भात अवलंब करावयाच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शक सूचना.	क्र.रानिआ-२०२५/सा.ख.छ./प्र.क्र.६/का-१४	२१.०८.२०२५	९११-९४१
४९	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दरम्यान मतदान केंद्रावर वेब कास्टींगची (Webcasting) सुविधा उपलब्ध करणेबाबत.	क्र.रानिआ-२०२५/Webcasting/प्र.क्र.०९/का.१२	०९.१०.२०२५	९४३-९५३
५०	महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे इत्यादीबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.५/का.५	०६.०८.२०२५	९५५-९५९
५१	महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे इत्यादीबाबत.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५	२८.०८.२०२५	९६१-९६२
५२	लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक / पोटनिवडणुकीसंबंधी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना पारिश्रमिक /अतिकालिक भत्ता / निवडणूक भत्ता इ. देणेबाबत सुधारित दर.	शासन निर्णय क्रमांक:बीयुडी-२०२५/प्र.क्र.१४०/२५/का.-३३नि.-३),	२४.११.२०२५	९६३-९६७
५३	महानगरपालिका निवडणूक विषयक नामनिर्देशन पत्र व शपथपत्रामध्ये सुधारणा करण्याबाबतचे आदेश.	क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का-५	१२.१२.२०२५	९६९-९९१

प्रकरण - १

प्रस्तावना

१) निवडणूक विषयक कायदेशीर तरतुदी व अंमलबजावणी :

भारतीय संविधानाच्या **अनुच्छेद २४३ झेडए** अन्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण हे राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आले असून, **मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि त्या अंतर्गत असणारे, निवडणूक नियम** यामधील तरतुदीनुसार निवडणुकांबाबत कार्यवाही केली जाते.

राज्य निवडणूक आयोगाकडील **आदेश क्र.रानिआ - २०१६/ अहाका / प्र.क्र.१०/ सं.क्र., दि.०४/१०/२०१६** रोजीच्या आदेशानुसार निवडणुकीशी निगडित सर्व अधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये अनपेक्षित परिस्थिती हाताळतेवेळी खालील अग्रक्रमाप्रमाणे असणाऱ्या तरतुदींचा विचार करावा.

- संविधानातील तरतुदी
- संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता अधिनियम व नियमातील तरतुदी,
- मा. सर्वोच्च / उच्च न्यायालयाचे निर्णय
- राज्य निवडणूक आयोगाने पारित केलेले आदेश, सूचना, इ.

उपरोक्त तरतुदींनुसार देखील एखादी परिस्थिती हाताळणे शक्य नसल्यास आयोगाकडे अभिप्रायासह अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तरी या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करावा.

२) निवडणूक निर्णय अधिकारी यांची भूमिका / कार्यपध्दती :

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत व रितसरपणे पार पाडणे हे मुख्यत्वे करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे. लहानशी चूक किंवा चुकीची कार्यपध्दती अथवा अपूर्ण माहिती / गैरसमजूत / चुकीचा अन्वयार्थ यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया रद्दबादल होऊ शकते याची नोंद घ्यावी.

ही मार्गदर्शक पुस्तिका केवळ माहितीकरीता व मार्गदर्शनाकरीता तयार करण्यात आली असून ती सर्वसमावेशक किंवा अधिनियम व नियमाला पर्याय नाही, हे लक्षात घ्यावे व त्यामुळे आवश्यकतेनुसार अधिनियम व नियमातील तरतुदी मुळात वाचणे व संदर्भासाठी तपासणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश, सूचना, परिपत्रके इत्यादी देखील संदर्भासाठी पहाणे आवश्यक आहे, त्यामुळे सदर पुस्तकात प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी त्यांचा समावेश केलेला आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये राज्य निवडणूक आयोगाकडून त्यात काही बदल केल्यास त्याच्या प्रती आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध होतील. तरी, त्याचे वेळोवेळी अवलोकन

करणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीच्या कामाकरीता विहित केलेले नमुने, प्रपत्रे इ. आवश्यकतेनुसार पुरेशा प्रमाणात तयार करुन ठेवणे आवश्यक आहे.

३) कर्तव्याची रुपरेषा :

- निवडणुकीची व्यवस्था आणि कामाची आखणी निवडणूक कार्यक्रमास सुरुवात होण्यापूर्वीच करणे जसे आवश्यक कर्मचारीवृंद अधिग्रहित करणे, मतदान केंद्राची पाहणी करणे, पोलिसांच्या सहाय्याने संवेदनशील अतिसंवेदनशील मतदान केंद्र निश्चिती करणे, कमजोर सामाजिक घटकांचा (Vulnerable Mapping) शोध घेणे, मतमोजणी आराखडा तयार करणे, आयोगास सादर करावयाच्या अहवालांच्या नमुन्यांचे, तसेच आवश्यक नोटीसा, नमुने संगणकीकृत करून ठेवणे इ.
- महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांची आवश्यक ती सर्व माहिती असणारी तसेच निवडणुकीची तयारी (वाहतूक आराखडा, मतदान साहित्य, कर्मचारीवृंद इ.) दर्शविणारी माहिती पुस्तिका निवडणूक निरीक्षकांसाठी तयार ठेवणे
- पुरेशा प्रमाणात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व इतर साहित्य उपलब्ध करुन घेणे.
- निवडणुकीची अधिसूचना व जाहीर नोटीस देणे, नामनिर्देशनपत्रे व अनामत रक्कम स्वीकारणे, उमेदवाराकडून शपथपत्र /घोषणापत्र / हमीपत्र स्वीकारणे.
- उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रातील व शपथपत्रातील माहिती प्रसिध्द करणे.
- नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे, नामनिर्देशनपत्र नाकारण्याची कारणे संक्षिप्तपणे नमूद करणे.
- उमेदवारी मागे घेण्याच्या नोटीसांची पोहोच पावती देणे.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटप करणे.
- नामनिर्देशनांची नोटीस, वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे व प्रसिध्द करणे.
- मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करणे.
- मतपत्रिकांची (पोस्टल बॅलट पेपर व मतपत्रिका इत्यादीसह) संख्या निश्चित करणे व छपाई व पुरवठ्याची /वितरणाची व्यवस्था करणे.
- स्वच्छ, निर्भय व नि:पक्षपाती रितसर निवडणुकांकरीता उमेदवार व राजकीय पक्षांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे, नियमांतील तरतुदी वा अन्य सूचना देवून अद्ययावत ठेवणे.
- निवडणुका व्यवस्थित पार पाडण्याकरीता कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती यांचा आढावा घेणे व आचारसंहिता पालन /अंमलबजावणी याकरीता आवश्यक उपाययोजना करणे.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरासाठी मतदानाच्या किमान एक आठवडा (मतपत्रिका तयार झालेबरोबर लगेच) अगोदर ईव्हीएम तयार (Set & Seal) करणे.
- मतदान यंत्र तयार करण्यापूर्वी (Set & Seal) त्याची सूचना संबंधित उमेदवार व राजकीय पक्ष यांना देऊन त्यांना उपस्थित राहण्यास कळवावे.
- राज्य निवडणूक आयोगाने दि.२७.११.२०२५ रोजी सर्व बॅलेट युनिटवरील END बटन पांढऱ्या मास्कींग टॅबने बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार ईव्हीएम तयार (Set & Seal) करताना कार्यवाही करावी.

- मतदान व मतमोजणी प्रक्रियेमध्ये नेमण्यात येणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना मतदान यंत्रांच्या कार्यपध्दतीची नीट माहिती करुन देणे व त्यांना आत्मविश्वास जोपर्यंत येत नाही तोपर्यंत त्याचे प्रशिक्षण घेणे.
- मतदान पथके, मतपत्रिका, ईव्हीएम, मतदानाचे इतर साहित्य इ. मतदान केंद्रावर पोहचविणे व परत आणण्यासाठी वाहतूक आराखडा तयार करणे व त्याप्रमाणे व्यवस्था करणे.
- मतदानानंतर ईव्हीएम सुरक्षितपणे ठेवण्याची व्यवस्था करणे.
- मतमोजणी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.
- निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे मतमोजणी ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व वेळेस करणे.
- निकाल जाहीर करणे.
- मतमोजणीचा निकाल जाहीर झाल्यानंतर / ईव्हीएम व सर्व मतदान साहित्य सांविधानिक व असांविधानिक लिफाफे इत्यादींचे जतन करणे व मतदान यंत्रांच्या मेमरी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कोषागारात किंवा उपकोषागारात ठेवणे.
- परिणामकारक नियंत्रण.
- सर्वसाधारण पर्यवेक्षण.

४) महानगरपालिका आयुक्त हे निवडणूक अधिकारी असून यांनी करावयाची काही महत्वपूर्ण व्यवस्था.

• निवडणुकांच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व विभागांचे सहाय्य घेणे.
• आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्तांकडून, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी उपलब्ध करून घेणे व प्रत्येक मतदान केंद्राकरीता केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी तसेच इतर कर्मचारी उपलब्ध करून देणे.
• मतदान कर्मचाऱ्यांना (राखीव कर्मचाऱ्यांसह) सखोल व पूर्ण प्रशिक्षण देणे .
• सांविधानिक तरतुदी, कायद्यातील, नियमातील तरतुदी, आयोगाच्या विशेष सूचना, आदेश व परिपत्रके निवडणूक निर्णय अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे.
• महत्वाच्या बाबींची तपासणी सूची तयार करणे व ती देणे.
• मतपत्रिका/ मतदान यंत्रे व कार्यपध्दती याबाबत सर्वसाधारण जनता, राजकीय पक्ष, उमेदवार व जनसंपर्क माध्यमे यांना अवगत करणे.
• आवश्यक साहित्य जसे मतपत्रिका, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, न पुसणारी शाई, मार्कर पेन, सिलिंग साहित्य, निवडणूक साहित्य, विभेदक चिन्ह, पितळी सील इ. उपलब्ध करुन देणे .
• मतपत्रिकांची तसेच निवडणूक कर्मचारी व पोलीस मतदारांसाठी टपाली मतपत्रिका छपाईची व्यवस्था करणे.
• निवडणुका पूर्ण झाल्यानंतर ईव्हीएम व निवडणूक कागदपत्रे व साहित्य सुरक्षित ठेवणेसाठी गोदामांची व्यवस्था करणे.

या सर्व प्रकारच्या कार्यवाहीकरीता व निवडणुका सुव्यस्थितपणे पार पाडण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याशी नियमित संपर्कात रहाणे आवश्यक आहे.

प्रकरण - २

मतदार यादी व मतदान केंद्र निश्चिती

राज्य निवडणूक आयोगाने दि. १६ जुलै, २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. तसेच मतदार यादीतील दुबार नावांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत दि. २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी सविस्तर कार्यपध्दती विहित केली आहे. त्यानुसार महानगरपालिका निवडणुकांकरीता मतदार यादी तयार करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

१. **विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरणे-**

राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास महानगरपालिका क्षेत्राकरीता अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी महानगरपालिकेच्या प्रभागांमध्ये विभागून ती निवडणुकीसाठी छापून घेणे व प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे. असे करताना संबंधित क्षेत्राची विधानसभेची मतदार यादी जशी असेल तशी संबंधित प्रभागांमध्ये विभागावयाची आहे. त्यामध्ये कोणतीही नावे समाविष्ट करणे, कमी करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे इत्यादींची अनुमती देण्यात आलेली नाही. मतदार यादी विभागताना प्रभागाच्या हद्दीवर राहणाऱ्या मतदारांच्या संदर्भात विशेष दक्षता घेणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यकतेनुसार स्थळ निरिक्षण करणे आवश्यक आहे. जेणेकरुन निवडणूक प्रभागाच्या हद्दीतील मतदारांची नावे अन्य निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत. यासोबतच विधानसभा मतदार यादीमध्ये नमूद असलेले कोणतेही मतदार वगळले जाणार नाहीत तसेच यथास्थिती विधानसभा मतदार संघातील महानगरपालिकेच्या संबंधित निवडणूक प्रभागाच्या क्षेत्राबाहेरील मतदार चुकीने मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

२. **मतदार यादीचे विभाजन करताना घ्यावयाची दक्षता -**

महानगरपालिकेच्या निवडणुकीकरीता मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करताना विधानसभेच्या मतदार यादीतील सेक्शन ॲड्रेसचा वापर केला जातो. मात्र बऱ्याचदा सेक्शन ॲड्रेस हे मोघम, अपूर्ण किंवा चुकीचे असल्यास, एखादी इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था ही सेक्शन ॲड्रेसनुसार ज्या प्रभागात समाविष्ट दिसते, प्रत्यक्षात मात्र सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था त्या प्रभागात नसून इतर प्रभागाच्या भौगोलिक हद्दीत असते. त्यामुळे सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशी मतदारांची नावे ही मूळ प्रभागाऐवजी अन्य प्रभागात समाविष्ट होतात. सदर परिस्थिती ही विशेषत: लगतच्या प्रभागांच्या सीमांवर आढळते. अशावेळी केवळ सेक्शन ॲड्रेस लक्षात घेता, सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील मतदारांची नावे ही ती इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्यक्षात ज्या प्रभागात स्थित आहे, त्याच प्रभागात समाविष्ट करणेबाबत काळजी घेण्यात यावी.

३. **मतदार यादी अधिप्रमाणित करणे व त्याची अभिरक्षा -**

महानगरपालिकेच्या निवडणुकांकरीता मतदार यादीचे विभाजन करुन ती अधिप्रमाणित करण्यासाठी उपायुक्त दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत करावे. तसेच संबंधित मतदार यादीची अभिरक्षा करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांनी सहायक आयुक्त दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास सोपवावी.

मात्र बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाच्या दि. १२ नोव्हेंबर, २०२५ च्या सुधारीत आदेशानुसार मतदार यादीचे विभाजन करुन ती अधिप्रमाणित करणे तसेच मतदार यादीची अभिरक्षा करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांनी सहायक आयुक्त दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास सोपवावी असे निर्देशित करण्यात आले आहे.

४. **प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे-(आयोगाचे आदेश दि. १६/०७/२०२५)**

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादी कार्यक्रमानुसार नेमून दिलेल्या दिनांकास प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करुन त्यावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. अधिकाअधिक मतदारांना मतदार यादीची प्रसिध्दीची माहिती होण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिल्यानूसार तसेच उपलब्ध अन्य मार्गाने मतदार यादी प्रसिध्द करावी. आवश्यक असल्यास मतदार जागृती मोहिम राबविण्यात यावी.

४-अ. **मतदार यादीमध्ये स्वत:हून (Suo-moto) दुरुस्त्या करण्याबाबत- (आयोगाचे आदेश दि. २५/११/२०२५)**

राज्य निवडणूक आयोगाने सदर बाब विचारात घेऊन अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर चुका दुरूस्त करण्याची तरतुद दि. १६ जुलै, २०२५ च्या आदेशाच्या परिच्छेद - ८ मध्ये केली आहे. त्यामुळे, प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर सुध्दा त्यात कोणत्याही चुका राहिल्याची बाब महानगरपालिका आयुक्तांच्या निदर्शनास आल्यास अशा चुकांची दुरूस्ती अंतिम मतदार यादी तयार करताना स्वत:हून (Suo-moto) करावी. सदर चुकांची दुरूस्ती करण्याकरीता कोणत्याही हरकती प्राप्त होण्याची आवश्यकता नाही.

मतदार योग्य प्रभागात समाविष्ट झाले आहेत किंवा कसे याची तपासणी करण्यात यावी आणि जर असे मतदार चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाले असतील तर त्या मतदारांना योग्य प्रभागात समाविष्ट करुन अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात.

५. **दुबार नावांबाबत -(आयोगाचे आदेश दि. १६/०७/२०२५ व दि. २९/१०/२०२५) -**

विधानसभेच्या मतदार यादीतून दुबार नावे वगळण्याची कार्यवाही संबंधित मतदार नोंदणी अधिकारी मार्फत करण्यात येते. तरी देखील अपवादात्मक परिस्थितीत प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करताना, जर काही मतदारांची नावे एकापेक्षा जास्त वेळा आली असल्याचे कळल्यास व प्राथमिक चौकशी नंतर ती दुबार नावे एकाच व्यक्तीची असल्याचे निदर्शनास आल्यास तो मतदार एकच आहे याची खात्री करुन घ्यावी. जर त्या मतदाराचे नाव एकापेक्षा जास्त प्रभागात आले असल्यास अशा मतदारांची नावांची यादी सूचना फलकावर/वेबसाईटवर प्रसिध्द करावी व त्यांना ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत याबाबत लेखी अर्ज करण्याचे आवाहन करावे. जे मतदार सदर आवाहनाला प्रतिसाद देऊन ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत हे कळवतील, त्यानुसार अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादीमध्ये नोंद घ्यावी. मात्र सदर आवाहनास अशा मतदारांनी प्रतिसाद न दिल्यास सर्व मतदार यादीमधील त्यांचे नांवासमोर "दुबार नाव" अशी नोंद करावी व असे मतदार मतदानासाठी आल्यास मतदान केंद्राध्यक्षांमार्फत त्यांच्या ओळखपत्रावरुन त्यांच्या खरेपणाविषयी खातरजमा करावी. अशी खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु द्यावे.

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २९ ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशान्वये मतदार यादीतील संभाव्य दुबार नावांबाबत करावयाची उपाययोजना नमूद केली आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करुन दिलेल्या मतदार यादीच्या संगणक प्रणालीमधील दुबार रिपोर्ट मधून संभाव्य दुबार नावांची यादी मिळू शकते. सदर यादीची तपासणी करुन ती व्यक्ती एकच आहे किंवा कसे याबाबत माहिती मिळवण्यात यावी. एकापेक्षा जास्त नाव असलेला मतदार एकच व्यक्ती असल्यास त्याच्याकडून सदर आदेशाच्या परिशिष्ट-एक मधील अर्ज भरून घ्यावा. जर अशा मतदारांकडून प्रतिसाद न आल्यास व जर अशी व्यक्ती मतदानास आल्यास त्या व्यक्तीकडून सदर आदेशाच्या परिशिष्ट-दोन मधील हमीपत्र घेऊन त्याला मतदान करु द्यावे.

६. **मतदार यादीवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नोंदविणे -**

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये खालील नमूद बाबींच्या अनुषंगाने हरकती व सूचना नोंदविता येतील. यामध्ये (i) स्वत: मतदाराने केलेला अर्ज आणि (ii) इतर मतदाराने एक किंवा अनेक विशिष्ट मतदाराबाबत हरकती/आक्षेप/सूचना प्राप्त होण्याची शक्यता आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येत असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीत खालील नमूद हरकती व सूचना प्राप्त होतील:-

(अ) १) मतदारांची नावे असूनही महानगरपालिकेच्या कोणत्याही निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीमध्ये त्यांची नावे समाविष्ट करण्यात आली नसल्यास

किंवा

२) चुकीच्या निवडणूक प्रभागात नावे समाविष्ट करण्यात आली असल्यास,

अशा मतदारांची नावे अनुक्रमे मतदार यादीत व योग्य निवडणूक प्रभागात समाविष्ट करणे, अशी परिस्थिती असल्यास मतदाराने स्वत: विहित मुदतीत, वास्तव्याच्या पुराव्यासह **नमुना "अ"** मध्ये अर्ज दाखल करणे आवश्यक राहील.

एकाच सहकारी गृहनिर्माण संस्थेत राहणाऱ्या एकापेक्षा अधिक मतदारांचे नमुना "अ" मधील अर्ज त्या संस्थेच्या अध्यक्ष/सचिव यांच्यामार्फत त्या, संस्थेच्या लेटर हेडवर संबंधित सचिव किंवा अध्यक्षाच्या स्वाक्षरीने एकत्रितपणे सादर करता येतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पध्दतीने किंवा एकत्रित यादीच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेणे आवश्यक असणार नाहीत.

(आ) महानगरपालिका क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे नसूनही महानगरपालिकेच्या प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे समाविष्ट करण्यात आली असल्यास, अशा मतदारांची नावे वगळावयाची असल्यास, विहित मुदतीत तक्रारदाराने नमूना "ब" मध्ये अर्ज सादर करणे आवश्यक आहे. मात्र सदर तक्रारदार हा संबंधित निवडणूक प्रभागातील मतदार असावा.

(इ) लेखनिकांच्या चुका (नाव, लिंग, चुकीचे टंकलेखन इ.) याबाबत मतदाराने विहित नमुन्यातील (नमूना "अ") अर्जासोबत राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटविण्यासाठी विहित केलेल्या व मतदाराचे स्वत:चे छायाचित्र असलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र (ज्यामध्ये मतदाराचे नाव योग्यरित्या नमूद केलेले आहे.) सादर करणे आवश्यक असेल.

७. प्रारुप मतदार यादीसंदर्भात आलेल्या हरकती व सूचनांवर निर्णय घेणे -

७.१ मतदाराने स्वत: अर्ज करुन वरील परिच्छेद ६ (अ) नुसार मतदार यादीत दुरुस्ती करण्याची विनंती केल्यास, सदर अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी व स्थळ पाहणी करुन निर्णय घेण्यात यावा .

७.२ मात्र कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने एक किंवा अनेक मतदारांबाबत नमुना "ब " मध्ये हरकत/आक्षेप सादर केल्यास, ज्या मतदाराबाबत हरकत/आक्षेप घेण्यात आले आहे त्या मतदाराला नोटीस काढून त्याचे म्हणणे मांडण्यासाठी वाजवी संधी दिल्याशिवाय हरकत/आक्षेप अर्जावर निर्णय घेण्यात येऊ नये.

७.३ आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदाराचे अथवा मतदारांची नावे महानगरपालिका क्षेत्राशी संबंधित विधानसभा मतदार यादीत नसतील, अशा मतदारांची नावे महानगरपालिकेच्या मतदार यादीत समाविष्ट करता येणार नाहीत.

८. मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे :

८.१ राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यात याव्यात व त्याबद्दलची सूचनाही प्रसिध्द करण्यात यावी.

८.२ अंतिम मतदार यादी अधिप्रमाणित करीत असताना मतदार यादीच्या मुखपृष्ठावर महानगरपालिकेचे नाव, प्रभाग क्रमांक व नाव, मतदार यादी प्रसिद्ध केल्याचा दिनांक, त्या यादीमध्ये समाविष्ट यादी भागातील विभागाचा (section) तपशिल, मतदार यादीचा गोषवारा (मतदार क्रमांक, स्त्री-पुरूष-इतर व एकूण मतदार) छापावा. यादीच्या प्रत्येक पानावर पान क्रमांक, महानगरपालिका कार्यालय यांचा गोल शिक्का व ती तयार करावयास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची सही असावी. शेवटच्या पानावरील प्रमाणपत्रावर अधिप्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्याची सही व शिक्का असावा.

i) मतदार यादीच्या वरच्या बाजूस आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकाचा (Cut Off Date) म्हणजेच विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याच्या दिनांकाचा स्पष्ट उल्लेख असावा.

ii) मतदार यादीच्या प्रत्येक पानावर यथास्थिती प्रारूप / अंतिम मतदार यादी असे स्पष्ट नमूद करण्यात यावे अथवा शिक्का मारावा.

८.३ महानगरपालिकेची अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर कोणतेही अर्ज/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अंतिम मतदार यादीत साधारणत: कोणत्याही कारणास्तव दुरुस्ती करता येणार नाही.

९. अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात दुरुस्ती करणे -

अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात फक्त पुढीलप्रमाणे दुरुस्त्या करता येतील :-

आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदारांची नावे संबंधित निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत असून देखील ती नावे निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत छापावयाचे राहून गेल्यास किंवा ज्या निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे, त्याऐवजी दुसऱ्याच निवडणूक प्रभागाच्या मतदार यादीत चुकीने छापण्यात आली असल्यास मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास संबंधित प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने त्याची खात्री करुन आणि सकारण आदेश पारित करुन त्याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात. मात्र अशा दुरुस्त्या संबंधित महानगरपालिकेच्या निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करता येतील. या पुरवणी यादीला व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी व ती संबंधित महानगरपालिकेच्या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करावी.

१०. मतदार यादी पुरविणे -

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाची मतदार यादी वापरत असून ती प्रथम प्रभागनिहाय व त्यानंतर मतदान केंद्रनिहाय विभाजित करण्यात येते. अशी मतदार यादी विनामूल्य पुरविण्याची कायद्यात तरतूद नाही.

राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्र. रानिआ/जिपपंस २०२५/प्र.क्र.३३/का.७, दि. ८ ऑक्टोबर, २०२५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदार यादीची प्रत (प्रारुप व अंतिम मतदार यादी) प्रतिपृष्ठ रु.२/- इतका दर आकारुन उपलब्ध करुन द्यावी. अशा प्रकारे मतदार यादीची प्रत देताना फोटो असलेली छापील मतदार यादी देण्यात यावी. मात्र वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या मतदार यादीत तसेच सॉफ्टकॉपीमध्ये (PDF फॉरमॅट) मतदार यादी देताना त्यात मतदारांचे फोटो असणार नाहीत.

११. राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांनुसार मतदार विभाजनाविपयक कार्यपद्धती अवलंबावी. जसे Computerised Voterlist Bifurcation चे सॉफ्टवेअर वापरून मतदार यादीचे विभाजन करणे.

१२. मतदार यादीचे विभाजन करताना ते राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करुन दिलेल्या संगणकीय प्रणालीचा वापर करुन करण्यात यावे. संगणक प्रणालीचा वापर करुन मतदार यादीचे विभाजन करताना खालील महत्वाचे टप्पे अनुसरण्यात यावेत.

i) संगणक प्रणालीमध्ये महानगरपालिका क्षेत्राशी संबंधित विधानसभा तसेच त्याचे यादी भाग निवडणे.

ii) विधानसभेची मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरुन डाऊनलोड करणे.

iii) वॉर्ड मास्टर तयार करणे.

iv) डाऊनलोड केलेल्या यादीचे विभाजन करुन कंट्रोल चार्ट तयार करणे.

v) विधानसभा क्रमांकनिहाय कंट्रोल चार्ट अपलोड करणे.

vi) प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रोसेस करणे.

vii) प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादीचे पिडीएफ डाऊनलोड करणे.

viii) अंतिम मतदार यादी तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांपैकी ज्या हरकती मान्य करण्यात आल्या आहेत व त्यानुसार जे मतदार एका प्रभागातून

दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करणे आवश्यक आहे, त्यांचा ऑब्जेक्शन कंट्रोल चार्ट तयार करणे.

ix) प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रोसेस करणे.

x) प्रभाग निहाय अंतिम मतदार यादीचे पिडीएफ डाऊनलोड करणे.

xi) मतदान केंद्रांची माहिती मास्टर्समध्ये भरणे.

xii) मतदान केंद्रनिहाय कंट्रोल चार्ट तयार करणे.

xiii) मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रोसेस करणे.

xiv) मतदान केंद्रनिहाय मतदार यादीचे पिडीएफ डाऊनलोड करणे. या पिडीएफमध्ये मतदारांना द्यावयाच्या मतदार चिठ्ठयांचा देखील समावेश असेल.

१३. मतदारांची ओळख पटविण्याकरीता ग्राह्य धरण्यात येणारे पुरावे :-

मतदारांची ओळख पटविण्याकरीता ग्राह्य धरण्यात येणारे पुरावे कोणते राहतील याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी सुधारीत आदेश काढले आहेत. सदर आदेशामध्ये नमूद केलेल्या पुराव्यांपैकी कोणताही पुरावा मतदाराची ओळख पटवण्याकरिता ग्राह्य धरण्यात यावेत. या सदंर्भात मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणादरम्यान योग्य त्या सुचना देण्यात याव्यात.

१४. मतदान केंद्र निश्चिती :-

राज्य निवडणूक आयोगाच्या दि.२६ जून, २०२५ आदेशान्वये खालील बाबींच्या अनुषंगाने सविस्तर आदेश दिले आहेत :-

१) **मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या** - यामध्ये दि.२९ ऑगस्ट, २०२५ च्या आदेशान्वये सुधारणा केली आहे.

२) **मतदान केंद्राचे ठिकाण निवडणे**

३) **मतदान केंद्राच्या ठिकाणात अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करणे**

४) **निवडणुकांकरीता कर्मचारी, जागा आणि वाहने अधिग्रहीत करणे -**

५) **मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयी सुविधा**

६) **आदर्श मतदान केंद्राची निर्मिती**

७) महिला मतदान केंद्र

८) मतदान केंद्राच्या बाहेर पक्षाचे मतदार सहाय्य केंद्र उभारणे

९) मतदान केंद्रात मोबाईल / कॉर्डलेस फोन / वायरलेस फोन वापरण्यास प्रतिबंध

१०) मतदान केंद्राच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना व सुरक्षा व्यवस्था इत्यादी

११) मतदान केंद्रांची यादी अंतिम करणे

प्रकरण - ३

नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी

१. **निवडणूक सूचना :**

१.१ मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २५ तसेच यथास्थिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील निवडणूक नियम क्र. ८ मधील तरतुदी अन्वये राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास महानगरपालिका आयुक्त हे सार्वत्रिक वा पोट निवडणूक कार्यक्रम जाहीर करतील.

१.२ उपरोक्त तरतुदीनुसार महानगरपालिका आयुक्त राज्य निवडणूक आयोगाने दिलेला कार्यक्रम व नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचे ठिकाण व इतर तपशील विहित नमुन्यात प्रसिद्ध करतील (प्रकरण- १७, नमुना- १)

२. **नामनिर्देशन पत्र :**

२.१ राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नामनिर्देशन पत्राच्या नमुन्यात उमेदवार आपले नामनिर्देशन पत्र दाखल करेल. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशान्वये नामनिर्देशन पत्राचा नमूना विहित केला आहे, तो विचारात घेण्यात यावा. (सोबतचे अनुसूची-२ मधील शपथपत्र विचारात घेण्यात येऊ नये.) राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १५ मार्च, २००४ च्या आदेशान्वये नामनिर्देशन पत्रासोबत गुन्हेगारी पार्श्वभूमी, शैक्षणिक अर्हता, स्थावर व जंगम मालमत्ता इत्यादी तपशील दर्शविणारे शपथपत्र सादर करण्याची तरतूद केली आहे. मात्र, उपरोक्त दि. १५ मार्च, २००४ च्या आदेशासोबतचे सहपत्र दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ व दि. १२/१२/२०२५ च्या आदेशान्वये सुधारित केले आहेत, ते विचारात घेऊन अद्ययावत केलेला नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचा नमूना विचारात घ्यावा.

२.२ राज्य निवडणूक आयोगाने नामनिर्देशनपत्र उमेदवारांना सहजरितीने भरता यावे यासाठी महाआयटीच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरणे आवश्यक आहे. या संगणक प्रणालीद्वारे सर्व उमेदवारांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरावे. त्याची प्रिंट आऊट घेऊन त्यावर स्वाक्षरी करावी. असे स्वाक्षरी केलेले नामनिर्देशनपत्र व सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन केलेले शपथपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने सादर करावयाचे आहे. असा भरलेला नामनिर्देशनपत्राचा व शपथपत्राचा नमुना नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. (यासाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमातील सूचना पहाव्यात.)

नामनिर्देशन पत्रासोबत देण्यात येणारी **शपथपत्रे देखील संगणक प्रणालीवर भरण्यात यावीत व त्याचेही प्रिंट आउट्स साक्षांकीत करून** नामनिर्देशन पत्राच्या स्वाक्षरी केलेल्या संगणकीय प्रिंट आऊटसोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करावे.

संगणक प्रणालीद्वारे नामनिर्देशन प्रक्रिया राबविण्याकरिता प्रथम वॉर्ड मास्टर व आरओ मास्टर भरणे आवश्यक आहे. सदर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय उमेदवारांना प्रभागातील आरक्षित जागा इत्यादी तपशिल दिसणार नाही. त्यामुळे ही माहिती नामनिर्देशनपत्र सुरु होण्यापूर्वी संगणक प्रणालीमध्ये अद्ययावत करणे आवश्यक आहे.

मात्र जर राज्य निवडणूक आयोगाने पारंपारीक पध्दतीने (ऑफलाईन) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली असल्यास त्यानुसार कार्यवाही करावी.

३ सूचक :

३.१ मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील निवडणूक नियम क्र. ९ नुसार उमेदवाराचे नामनिर्देशन करण्याकरिता सूचक / प्रस्तावक व अनुमोदक कोण राहू शकेल याबाबत तरतूदी आहेत. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. जी व्यक्ती मतदार म्हणून अपात्र नसेल व ज्या प्रभागात उमेदवारास नामनिर्देशित करावयाचे आहे, अशा संबधित प्रभागाच्या मतदार यादीत ज्याचे नाव समाविष्ट केले आहे अशी कोणतीही व्यक्ती सूचक / प्रस्तावक व अनुमोदक म्हणून पात्र राहील. यासंदर्भातील सविस्तर महितीकरीता उपरोक्त तरतुदींचे संपूर्ण वाचन करावे.

३.२ राज्य निवडणूक आयोगाकडील मान्यता प्राप्त राजकीय पक्ष, नोंदणीकृत राजकीय पक्ष तसेच अपक्ष अशा सर्व उमेदवारांच्याबाबतीत एक सूचक / प्रस्तावक व एक अनुमोदक राहील.

४ नामनिर्देशन पत्र दाखल करणे /वेळ / ठिकाण :

४.१ उपरोक्त २.१.२ मध्ये नमूद केलेल्या नोटिशीत नमूद दिवशी, निश्चित केलेल्या वेळेत व जाहीर केलेल्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशन पत्र स्विकारतील.

४.२ नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या दालनात उमेदवारांची गर्दी होण्याची शक्यता असते व त्यामुळे विहित वेळेमध्ये, सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण नामनिर्देशन पत्र घेऊन दाखल होणाऱ्या सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे दाखल करून घेण्यास अडचण होऊ शकते. सबब, आयोगाने दिलेल्या

कार्यक्रमानुसार शेवटच्या दिवशी दुपारी ठिक ३.०० वा (कार्यक्रमात नमूद वेळेस) **(बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत दुपारी ५.०० वाजता)** निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचे दरवाजे बंद करावेत. तत्पूर्वी १० मिनिटे पुकारा करून ठिक ३.०० वा (कार्यक्रमात नमूद वेळेस) दरवाजे **(बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत दुपारी ५.०० वाजता)** बंद करत असल्याची ताकीद द्यावी व नंतर सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण नामनिर्देशन पत्र घेऊन दालनात उपस्थित उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे विहित पद्धतीने स्विकारावीत. अशी सर्व नामनिर्देशन पत्रे विहित वेळेत प्राप्त झाल्याचे मानले जाईल. परंतु कोणत्याही उमेदवारास विहित वेळेनंतर बाहेरुन कागदपत्र आणून सादर करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

४.३ आयोगाचे निरीक्षक कार्यालयात उपस्थित असल्यास त्यांनी या सर्व कार्यपद्धतीचे निरीक्षण करावे व आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.

४.४ नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या व छाननी तसेच चिन्ह वाटपाच्या सर्व प्रकियेचे डिजीटल कॅमेऱ्याने (तारीख व वेळ दर्शविणाऱ्या) छायाचित्रण करावे.

५ नामनिर्देशन पत्र सादर करतेवेळी उपस्थित राहू शकणाऱ्या व्यक्ती व गाड्यांची संख्या :

५.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात जास्तीत जास्त २ वाहनांना परवानगी देण्यात येईल. उमेदवार मिरवणुकीने येत असल्यास १०० मीटर अगोदर मिरवणूक थांबवावी, त्यासाठी योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवावा.

५.२ सदरचे नामनिर्देशन पत्र उमेदवार स्वतः किंवा सुचकामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करतील. त्यावेळी त्यांचे सोबत जास्तीत जास्त २ व्यक्तींना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रवेश मिळेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानी अनावश्यक गर्दी रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने, योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवावा.

६ नामनिर्देशन पत्रांची संख्या :

६.१ उमेदवार एकापेक्षा जास्त निवडणूक प्रभागात नामनिर्देशनपत्रे भरु शकतात.

६.२ एका निवडणूक प्रभागातील एका जागेसाठी एका उमेदवाराला जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात.

६.३ एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षातर्फे आणि अपक्ष अथवा इतर पक्षातर्फे उमेदवारी अर्ज दाखल करावयाचा असल्यास तो प्रत्येक पक्षासाठी किंवा अपक्ष म्हणून स्वतंत्र नामनिर्देशन पत्र भरुन दाखल करता येईल.

७ अनामत रक्कम :

महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशन पत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे.

उमेदवाराचा प्रवर्ग	महानगरपालिका निवडणुकांकरीता अनामत रक्कम
सर्वसाधारण*	रु.५०००/
अनुसूचित जाती	रु.२५००/
अनुसूचित जमाती	रु.२५००/
नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग	रु.२५००/
सर्व प्रवर्गातील महिला	रु.२५००/

*सर्वसाधारण जागेवर जरी अनुसूचित जाती/जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांनी अर्ज केला तर त्यास अर्धीच अनामत रक्कम देय राहील. परंतु अशी सूट देण्यास तो पात्र आहे याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवाराने जात प्रमाणपत्रासंबंधी नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेली कागदपत्रे तपासून स्वतःची खात्री करतील. उमेदवाराकडून अनामत रक्कम स्वीकारणे व त्याबाबत पोहोच पावती देणे यासंदर्भात योग्य व्यवस्था करावी.

एकाच निवडणूक प्रभागातील एका जागेसाठी एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्रे भरली तरी अनामत रक्कम एकदाच स्वीकारण्यात यावी. परंतु वेगवेगळया प्रभागांमधील अथवा जागांकरीता स्वतंत्र अनामत रक्कम भरावी लागेल.

८ **प्रभागातील एकाच जागेची निवडणूक लढविता येते :**

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.८/का.५, दि.०३/०१/२०१७ अन्वये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने **एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे.** या आदेशांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसारच्या मतपत्रिकेचे नमुने देखील विहित करण्यात आले आहेत.

९ **उमेदवाराचे मतपत्रिकेवरील नाव छापण्याबाबत :**

एखादा उमेदवार आपले नाव मतपत्रिकेवर कशा प्रकारे छापण्यात यावे, याबाबत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटची तारीख व वेळ यापूर्वी विहित नमून्यात (प्रकरण-१७, नमुना-१५) कळवू शकतो. उमेदवाराचे नाव मतपत्रिकेवर त्यानुसार छापण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेऊ शकतात. मात्र, त्यानुसार नावे छापताना त्याचा मतपत्रिकेवरील अनुक्रम नगर विकास विभागाने दि.०५ डिसेंबर, २०२५ रोजी नियमात दुरूस्ती केल्यानुसार त्याचा मतपत्रिकेवरील क्रम गटनिहाय त्याचे मराठी वर्णानुक्रमे आडनाव, नाव व पत्ता विचारात घेऊन त्यानुसार राहील.

१० **प्राप्त नामनिर्देशनपत्रांना अनुक्रमांक देणे :**

१०.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशन पत्रांना अनुक्रमांक देणे आवश्यक आहे, उदा.मनपा----/सा.नि. २०--/प्रभाग.क्र.---/जागा क्र.-----अ.क्र.----- तसेच न चुकता प्राप्तीची वेळ, तारीख टाकून सही करावी. सोयीकरिता एक स्वतंत्र रजिस्टर ठेवावे, जेणेकरून दररोज प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशन पत्रांना सलग क्रमांक देताना गोंधळ होणार नाही.

१०.२ एका उमेदवारास जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात व ती तो एकाचवेळी वा वेगवेगळी आणून देऊ शकतो. जर उमेदवार एकाच वेळी ती आणून देत असेल तर त्या सर्वांना एकामागे एक क्रमांक द्यावेत.

११ **नामनिर्देशन पत्राची प्राथमिक तपासणी :**

११.१ नामनिर्देशन पत्राची प्राथमिक तपासणी म्हणजे छाननी नव्हे, या तपासणीचा उद्देश केवळ टाळल्या जाऊ शकल्या जाणाऱ्या छोट्याशा तांत्रिक वा टंकलेखनाच्या चुकांमुळे नामनिर्देशन पत्र फेटाळले जाऊ नये हा आहे, याकरिता पुढील नमूद केलेल्या बाबी तपासाव्यात:-

i. **राखीव जागा असल्यास उमेदवाराचा प्रवर्ग :**

जी जागा ज्या प्रवर्गासाठी राखीव आहे, त्याच प्रवर्गातील उमेदवारांना सदर जागेची निवडणूक लढविता येईल. सबब, सादर करण्यात आलेले नामनिर्देशन पत्र हे त्याच प्रवर्गासाठी आहे याची खात्री करावी.

ii. **विशेष मागास प्रवर्गात कोणाचा समावेश होतो :**

शासनाने विशेष मागासप्रवर्गात ज्या प्रवर्गाचा समावेश केला आहे त्यांना नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधून निवडणूक लढविता येईल. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.एसईसी/एमएमसी ११९६/प्र.क्र.१९६/का-

३,दि.७/१०/१९९६ व शासनाचे पत्र क्र. सीबीसी-१०९६/सी-१२५८/ प्र.क्र.२३८/ मावक-५, दि.५/१०/१९९६ पत्र पहावे.

iii. **नामनिर्देशन पत्रावर उमेदवार, सूचक/प्रस्तावक व अनुमोदक यांची सही आहे.**

iv. **उमेदवार, सूचक व अनुमोदक यांचे मतदार यादीतील अनुक्रमांक :**

नामनिर्देशन पत्रात नमूद उमेदवारांचा / सूचकाचा मतदार यादीतील अनुक्रमांक व नाव हे मतदार यादीतील अनुक्रमांक व नावाशी जुळते आहे वा कसे हे तपासावे. कधी कधी मतदार यादीतील अनुक्रमांक लिहिताना चुका होऊ शकतात. तरी त्या तात्काळ दुरूस्त करून घेता येतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अंतर्गत निवडणूक नियमाच्या नियम क्रमांक ९(९)(ड) मधील तरतुदीनुसार उमेदवाराची ओळख मतदार यादीतील अनुक्रमांकानुसार पटणे आवश्यक आहे. तथापि, यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-३६३८/२००८ व अन्य ८ मध्ये दिनांक १७ जून, २००८ रोजी दिलेल्या एकत्रित निर्णयानुसार उमेदवार, सूचक, अनुमोदक यांचे क्रमांक चुकीचे असतील पण त्यांचे नाव संबंधित मतदार यादीत असेल तर नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात यावे. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र.रानिआ/मनपा २००८/प्र.क्र.१२/का.५, दि. २३ जून, २००८ अन्वये सूचना दिल्या आहेत. मूळ मतदार यादीतच नाव वा फोटोबाबत खात्रीलायक टंकलेखनीय चूक दिसून येत असेल तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्याबाबत स्वत: खात्री करावी व योग्य तो निर्णय घ्यावा.

v. **विवाहित महिलेचे मतपत्रिकेवरील नाव :**

विवाहित महिला उमेदवारास, मतदार यादीमध्ये व नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद असलेल्या नावाखेरीज त्यांना मतपत्रिकेवर इतर नावाचा उल्लेख करण्याची इच्छा असेल तर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित उमेदवाराने तसा विनंती अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर केला असल्यास व त्यासोबत त्या पृष्ठर्थ आवश्यक पुरावे उदा. विवाह नोंदणी प्रमाणपत्र , राजपत्रात प्रसिध्द केलेले विवाहनंतरचे नाव इ., सादर केले आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी. मात्र सदरचे कागदपत्र उपलब्ध नसल्यास मतदाराने मतदान करण्यापूर्वी आपली ओळख पटविण्यासाठी आयोगाचे क्र.रानि-आ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दि.१४/०७/२०२५ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या १२ पुराव्यांपैकी उमेदवारास हव्या असलेल्या नावासहीत छायाचित्र असलेला कोणताही एक पुरावा जोडला आहे का ते तपासावे.

vi. **मतदार यादीचा उतारा (उमेदवार अन्य प्रभागातील मतदार असल्यास) :**

उमेदवार हा दुसऱ्या प्रभागातील मतदार असेल त्या बाबतीत, त्या प्रभागातील मतदार यादी किंवा तिचा संबंधीत भाग किंवा त्या मतदार यादीतील संबधीत नोंदीची एक प्रमाणित प्रत ही नामनिर्देशन पत्रासोबत घ्यावी.

vii. **जात प्रमाणपत्र/जातवैधता प्रमाणपत्र अथवा पुरावा :**

राखीव जागेसाठी (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग) निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच नामनिर्देशन पत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

मात्र शासनाने दि. ०३ नोव्हेंबर, २०२५ च्या अध्यादेशान्वये जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यास निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांची मुभा दिली आहे. त्यामुळे नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवारास जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत अथवा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत देता येईल. तसेच त्याने निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्र नामनिर्देशनपत्रासोबत देणे आवश्यक आहे.

viii. **हमीपत्र :**

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा सादर करावा. तसेच निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील असे हमीपत्र घेणे आवश्यक आहे. छाननीच्यावेळी पडताळणीसाठी उमेदवाराने उपरोक्त नमूद कागदपत्रे सादर न केल्यास नामनिर्देशन पत्र नाकारण्यात येईल याची कल्पना उमेदवारांस द्यावी.

ix. **शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र :**

शासनाने सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य होण्याकरीता शौचालयाच्या वापराबाबतची सुधारणा केली आहे. त्यानुसार पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा स्वयंप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/जिपंस-

२०२४/प्र.क्र.०४/का.७, दि.१६ जुलै, २०२४ अन्वये विहित केलेले प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्र घेण्यात यावे.

x. **तृतीयपंथी उमेदवार :**

सर्व तृतीयपंथी यांना त्यांनी स्वसमजानुसार केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याच्या अधिकार असून अशा निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने इतर सर्व हेतूंसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर केलेला असावा व अशी निवडणूक लढविणारी व्यक्ती इतर सर्व कारणांसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर करेल आणि तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम २०१९ मध्ये दिलेल्या योग्य प्रक्रियेचे पालन केल्याशिवाय केवळ संधी आहे म्हणून लिंगाची ओळख बदलणार नाही असे शपथपत्र घेण्यात यावे. (याबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ग्रापनि-२०२१/प्र.क्र.७ /का.८,दि.२७/०८/२०२१ पहावे.)

xi. **राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना :**

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ अन्वये विहित केलेल्या जोडपत्र - १ व २ नुसार नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३.०० वाजेपर्यंत **(बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)** निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

जोडपत्र - २ वर राजकीय पक्षाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिची पेनाने केलेली मूळ सही (शाई मधील) असणे आवश्यक राहील. फॅक्स, झेरॉक्स, ई-मेल, Whats App वरील चालणार नाही.

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/रापनो-२०२४/प्र.क्र. २४/का.११, दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ नुसार महानगरपालिका आयुक्त यांनी जोडपत्र - १ च्या लेखी सूचनांच्या प्रती प्रमाणीत करुन संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठवाव्यात.

xii. **परिपूर्ण शपथपत्र :**

उमेदवाराने सादर केलेली, गुन्हेगारी पार्श्वभूमी व स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील देणारे शपथपत्र राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०८/०१/२०१५ च्या आदेशानुसार स्टॅम्प पेपरवर करण्याची आवश्यकता नाही. परंतु संबधित शपथपत्रातील कोणताही रकाना / माहिती कोरी ठेवू नये. माहिती निरंक/संबंधीत नसल्यास / वा माहित नसल्यास (Nil / Not applicable or Not Known) तसे शेरे असणे आवश्यक आहे. रकाने कोरे ठेवल्यास नामनिर्देशनपत्र नाकारले जाऊ शकते. (आयोगाच्या क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/ का.६, दि.२७/०३/२०१५ च्या

पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.५७६/३/२०१३-एसडीआर, दि. ३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचना तपासाव्यात.)

परंतु शपथपत्रातील गुन्हेगारी पार्श्वभूमी व मालमत्तेचा तपशील इत्यादीबाबतच्या माहितीची छाननी अथवा सत्यता निवडणूक निर्णय अधिकारी पडताळून पाहणार नाही अथवा या कारणासाठी नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही.

११.२ पडताळणी सूची :

उमेदवारांनी दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रांमध्ये सर्व तपशील भरलेला आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता पडताळणी सूची वापरण्यात यावी. पडताळणी सूचीच्या दिलेल्या नमुन्यात आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करुन वापरण्यात यावा. (प्रकरण-१७, नमुना-३)

११.३ प्राथमिक तपासणीतील त्रूटी उमेदवारास कळविणे :

प्राथमिक तपासणीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास त्रुटी आढळल्यास, संबंधित उमेदवारास ती पडताळणी सूचीद्वारे (Check list) लक्षात आणून द्यावी. सदरची चेक लिस्ट २ प्रतीत ठेवावी व त्यावर सही करून एक प्रत उमेदवारास द्यावी. स्थळ प्रतीवर उमेदवाराची सही घेऊन नामनिर्देशन पत्रास लावून ठेवावी.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास प्राथमिक तपासणीत लक्षात आलेल्या त्रुटी उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व त्रुटी दूर करण्याची त्यांना संधी देण्यात यावी; जेणेकरुन नामनिर्देशन पत्रावर उमेदवार अथवा सूचक / अनुमोदक यांची स्वाक्षरी राहिली असल्यास अथवा अन्य काही त्रुटी असल्यास त्यांना त्या दुरूस्त करण्याची संधी मिळू शकेल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आल्यानंतर त्यामध्ये दुरूस्ती करता येणार नाही. त्यासाठी उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांक व वेळेपर्यंत नव्याने नामनिर्देशन पत्र दाखल करावे लागेल. (राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का-५, दि.०१ एप्रिल, २०१७.)

१२. अपवादात्मक परिस्थितीत ऑनलाईन मधील प्रिंटआउट मध्ये दुरूस्ती :

उमेदवाराने नामनिर्देशन पत्र ऑनलाईन पध्दतीने भरले असल्यास संगणक प्रणालीमध्ये माहिती भरुन त्याचे प्रिंट आऊट घेतल्यानंतर त्यामध्ये काही दुरुस्ती करणे उमेदवारास आवश्यक वाटल्यास त्यांना त्यामध्ये हाताने दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी दुरूस्ती ज्या ठिकाणी केली जाईल त्या ठिकाणी उमेदवारांनी दिनांकासह स्वाक्षरी करणे आवश्यक राहिल. उमेदवाराने अशारितीने हाताने दुरूस्ती

केली असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यानुसार संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

उमेदवारांना वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची संधी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या अंतिम वेळेपर्यंतच देण्यात यावी. (राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का-५, दि.०१ एप्रिल, २०१७.)

१३. अखेरच्या दिवशी वेबसाईट हँग झाल्यास :

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी वेबसाईट हँग झाल्यामुळे उमेदवार संगणकीय प्रणालीमध्ये नामनिर्देशन पत्र तसेच शपथपत्रातील माहिती भरुन त्याची प्रिंट घेऊ शकणार नाहीत अशी परिस्थिती उद्भवल्यास व याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची खात्री झाल्यास त्यांनी राज्य निवडणूक आयोगाशी संपर्क साधून आयोगाचे निर्देश प्राप्त करुन घ्यावेत.

१४. विवाहित स्त्रिच्या जात प्रमाणपत्रातील नावाबाबत :

राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या विवाहीत स्त्री उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत विवाहपूर्वीच्या नावाने मिळविलेले जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र तिच्या नावात बदल झाल्याचा पुराव्यासह अथवा नावात बदल झाला असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केल्यास ते स्वीकारण्यात यावे. (राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का-५, दि.०१ एप्रिल, २०१७.)

१५. नामनिर्देशन पत्राची पोहोच :

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांना नामनिर्देशन पत्राची प्राथमिक चाचणी करून चेकलिस्ट दिल्यानंतर नामनिर्देशन पत्राच्या "भाग चार" मध्ये असणारी पोहोच, छाननीचे ठिकाण व वेळ नमूद करून स्वतच्या: सहीने दयावी.

१६. नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचा प्रसार :

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, उमेदवारांनी सादर केलेली प्राप्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्राच्या प्रती, सूचना फलकावर चिकटवून व वेबसाईटवर टाकून त्याचा प्रसार करावयाचा आहे . प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत निवडणूक लढविणारा उमेदवार तसेच प्रसिध्दी माध्यमे यांना योग्य ते शुल्क आकारुन त्याच्या प्रती देता येतील. कोणत्याही प्रतिस्पर्धी

उमेदवाराने स्वतः शपथपत्राद्वारे परस्परविरोधी माहिती सादर केली असली तरी त्या माहितीचा देखील वरीलप्रमाणेच प्रसार करावयाचा आहे.

तसेच दररोज प्राप्त नामनिर्देशन पत्राची माहिती, प्रभागनिहाय तयार करुन सूचना (प्रकरण-१७, नमुना-२) फलकावर व वेबसाईटवर प्रसिध्द करावयाची आहे.

१७ खर्चाची मर्यादा व विहीत मुदतीत खर्च सादर करणे :

१७.१ खर्चाची मर्यादा :

आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४५/का-५, दि. २९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे:-

अ.क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	सुधारीत खर्चाची मर्यादा (रुपये)
	महानगरपालिका सदस्य	
१	बृहन्मुंबई	१५,००,०००
२	अ वर्ग (पुणे व नागपूर)	१५,००,०००
३	ब वर्ग (पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे)	१३,००,०००
४	क वर्ग (कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व वसई-विरार)	११,००,०००
५	ड वर्ग (उर्वरित १९ महानगरपालिका)	९,००,०००

उमेदवाराने उक्त नमूद मर्यादेतच निवडणूक खर्च करावयाचा आहे.

१७.२ निवडणूक खर्चाकरीता बँक अकाउंट :

आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२०२३ / उनिख/प्र.क्र.१३ / संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे तसेच त्याअनुषंगाने करावयाची कार्यपध्दती निश्चित केली आहे. त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड/ सहकारी बँकेत एक स्वतंत्र खाते (बचत किंवा चालू) उघडावे व त्या खात्याचा तपशील नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे.

उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत अशा बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पृष्ठाची प्रत आणि अद्ययावत अकाऊंट स्टेंटमेंटची स्वसाक्षांकित प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

१७.३ **निवडणूक खर्चाचा हिशोब ३० दिवसात सादर करण्याबाबत हमीपत्र :**

उमेदवाराने विहित नमुन्यात निवडणूक खर्चाचा तपशील निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर न केल्यास तो अनर्ह ठरू शकतो याबाबतची कल्पना उमेदवारास दयावी व त्यांचेकडून तसे हमीपत्र नामनिर्देशन पत्रासोबत घ्यावे.

१८ **एका उमेदवारावी सर्व नामनिर्देशनपत्रे छाननीकरीता एकत्र ठेवणे :**

नामनिर्देशन पत्र व त्यासोबतची सर्व कागदपत्रे चेक लिस्टसह, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील. छाननीवेळी एका उमेदवाराची सर्व नामनिर्देशन पत्रे एकत्र तपासावयाची असल्याने नामनिर्देशन पत्रे व त्यासोबतची कागदपत्रे सोयीकरिता, उमेदवारनिहाय एका प्लॅस्टीक फोल्डरमध्ये ठेवावीत.

१९ **सर्व नामनिर्देशित उमेदवारांची यादी :**

१९.१ नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवशी, शक्य तितक्या लवकर नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्या सर्व उमेदवारांची यादी, निवडणूक प्रभागनिहाय व जागानिहाय तयार करुन सूचना फलकावर व वेबसाईटवर प्रदर्शित करावयाची आहे. (प्रकरण-१७, नमुना-२)

२०. **निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक:-**

१) निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक करण्याकरीता उमेदवार विहित नमुन्यात (प्रकरण-१७, नमुना-८) नेमणुकीची सूचना दोन प्रतीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे देतील. निवडणूक निर्णय अधिकारी त्यातील एकप्रत उमेदवारांच्या प्रतिनिधींना सदर नेमणुकीस मान्यता असल्याबाबतची पोचपावती आपल्या सही शिक्क्यानिशी देतील. निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी "फोटो ओळखपत्रे" जारी करतील.

२) निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक रद्द केल्याची किंवा निवडणूक प्रतिनिधीचे निधन झाल्यास सदरची सूचना (प्रकरण-१७, नमुना-९) देतील.

२१. **मतदान प्रतिनिधींची नेमणूक:-**

१) उमेदवारास प्रत्येक मतदान केंद्राकरीता किंवा जेथे मतदान घेण्यासाठी ठिकाण नक्की केले आहे त्यासाठी एक मतदान प्रतिनिधी व एक बदली मतदान प्रतिनिधींची नेमणूक करता येईल.

२) अशी प्रत्येक नेमणूक उमेदवार किंवा त्यांचा निवडणूक प्रतिनिधी मतदान केंद्रावर किंवा मतदान घेण्यासाठी नक्की केलेल्या स्थळी विहित नमुन्यात (प्रकरण-१७, नमुना-१०) तपशील भरून सादर करतील. मतदान केंद्राध्यक्ष त्यांना बिल्ले पुरवितील.

३) विहित नमुन्यात (प्रकरण-१७, नमुना-१०) नेमणुकीचे पत्र, पूर्ण भरलेले व घोषणापत्र मतदान केंद्राध्यक्षांसमोर सही केल्याशिवाय मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रामध्ये मतदानाच्या दिवशी प्रवेश मिळणार नाही.

२२. **मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणे किंवा मतदान प्रतिनिधींचे निधन:-**

१) मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करण्याबाबत विहित नमुन्यामध्ये (प्रकरण-१७, नमुना-११) उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांचे सहीने मतदान केंद्र अध्यक्षाना (अर्ज) सादर करतील. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास ज्या दिवशी असा अर्ज प्राप्त होईल त्या दिवसापासून सदर नेमणूक रद्द झाल्याचे मानण्यात येईल. तरी सदर घोषणापत्राची रितसर पोहोच द्यावी.

२) उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी मतदान बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळी तात्काळ सूचना देऊन दुसऱ्या निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक करतील.

२३. **प्रतिनिधी म्हणून कोणास नेमता येणार नाही :**

प्रतिनिधींच्या नेमणूका करताना ज्या व्यक्तीस मतदान करण्यास किंवा निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात आले असेल अशी व्यक्ती निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमता येणार नाही. तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/जिपपंस/२०१६/ प्र.क्र.२३/का.७, दि.१९/१०/२०१६ अन्वये राज्य विधानमंडळ सदस्य (विधान सभा / विधान परिषद), संसद सदस्य (लोकसभा / राज्य सभा), केंद्र शासन वा राज्य शासनाचा मंत्री तसेच कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा आजी सदस्य तसेच सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

२४ **ओळखपत्र :**

उमेदवारांप्रमाणे निवडणूक प्रतिनिधींना देखील छायाचित्र असलेले ओळखपत्र देण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने २ प्रतीत विहीत नमुन्यात (प्रकरण- ८ मधील विहीत नमुना) सादर करावे. त्याने सादर केलेल्या नमुन्यावरच उजव्या कोपऱ्यात निवडणूक प्रतिनिधीचा फोटो लावावा व सदर फोटो निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने साक्षांकीत करावा व तेच ओळखपत्र म्हणून वापरावे.

२५ आचारसंहिता व इतर निर्बंध

२५.१ नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्या प्रत्येक उमेदवारास आयोगाकडून निर्गमित केलेल्या आचारसंहिता व इतर निर्बंध विषयक आदेशांचा संच देण्यात यावा. उदा.

१. आचारसंहितेचे एकत्रित आदेश क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७, दि. ०४ नोव्हेंबर, २०२५

२. पोस्टर्स, पॅम्प्लेटस् छपाई वरील निर्बंध (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.-एसईसी १०९५/सीआर-७७/९५/ डेस्क-३, दि.२८/०८/१९९५)

३. निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि. ०९ ऑक्टोबर, २०२५.

२५.२ उपरोक्त सर्व निर्बंधांचे काटेकोर पालन केले जाईल याबाबतची दक्षता निवडणूक निर्णय अधिकारी घेईल तसेच आपल्या क्षेत्रातील स्थानिक छपाई कारखाने व इतर वृत्तपत्रे यांनादेखील या निर्बंधाची कल्पना देईल.

प्रकरण - ४
छाननी

१ **छाननी कोणास करता येईल :**

नामनिर्देशन पत्राची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: करील. कोणत्याही परिस्थितीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सदर काम सोपवू नये. परंतु छाननीचे काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी हे अपरिहार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ असतील तर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी हे छाननीचे काम करु शकतात. त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांना लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

२ **छाननी-अर्ध-न्यायीक जबाबदारी (Quasi- Judicial Duty)**

२.१ छाननी करतेवेळी आपण अर्ध-न्यायीक जबाबदारी पार पाडत आहोत याची जाणीव असावी. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता आपण ठामपणे आपला निर्णय देणे अपेक्षित आहे. आपली भूमिका नि:पक्ष, पारदर्शक व सर्व उमेदवारांसाठी समान राहील याची काळजी घ्यावी. बऱ्याच वेळा उमेदवार वा त्यांचे प्रतिनिधी आरोप/प्रत्यारोप करू शकतात, तरी आपण आपला तोल ढळू न देता आपला निर्णय ठामपणे व योग्य त्या कारणमिमांसेसह नोंदवावा.

२.२ आपला निर्णय देताना आपण आपले वरिष्ठ, आयोग, आयोगाच्या प्रतिनिधी / निरीक्षक यांचेकडूनही कोणतेही तोंडी वा लेखी आदेश घेणे अपेक्षित नाही. सबब अधिनियम / नियमातील तरतुदी, आयोगाचे व शासनाचे तत्कालीन आदेश यांचे आधारे आपला निर्णय द्यावा.

३ **छाननी साठी उपस्थित राहण्यास कोण पात्र आहे?**

३.१ **बृहन्मुंबई महानगरपालिका** - निवडणूक नियमावली २००६ च्या नियम ९(१) अन्वये छाननीच्या तारखेस व वेळेस उमेदवार, त्याचे निवडणूक प्रतिनिधी, प्रस्तावक किंवा अनुमोदक अथवा उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेली एक व्यक्ती यांचे व्यतिरिक्त अन्य कोणालाही छाननीच्या ठिकाणी उपस्थित राहाता येणार नाही.

इतर महानगरपालिका - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील निवडणूक नियम ९(८) अन्वये छाननीच्या तारखेस व वेळेस उमेदवार, प्रत्येकी एक प्रस्तावक आणि उमेदवाराने रितसर प्राधिकृत केलेली अन्य एक व्यक्ती यांचे व्यतिरिक्त अन्य कोणालाही छाननीच्या ठिकाणी उपस्थित राहाता येणार नाही.

३.२ छाननीच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार टाळणेकामी व अनावश्यक गर्दी रोखणे कामी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा.

३.३ एखाद्या उमेदवाराने वा सूचक / निवडणूक प्रतिनिधी / प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने अन्य उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र /शपथपत्र वा दाखल केलेली कागदपत्रे तपासणीस मागितल्यास ती दाखवण्याची व्यवस्था करावी.

४ सर्व नामनिर्देशन पत्राची छाननी करणे :

४.१ प्राप्त सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे आवश्यक आहे.

४.२ एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्र दाखल केली असल्यास ती सर्व एका मागोमाग एक अशारितीने छाननी केली जातील. उमेदवाराचे एक नामनिर्देशन पत्र स्विकृत झाले म्हणून अन्य नामनिर्देशन पत्र छाननी न करता ठेवले जाणार नाही.

४.३ भविष्यात होऊ शकणारी न्यायप्रविष्ठ प्रकरणे लक्षात घेऊन, सर्व छाननी प्रक्रियेचे छायाचित्रण करावे.

५ एका प्रभागातील एकाच जागेची निवडणूक लढविता येते :

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.८/का.५, दि.०३/०१/२०१७ अन्वये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे.

६ आक्षेप व संक्षिप्त चौकशी:

६.१ प्राप्त सर्व नामनिर्देशनपत्राच्या वैधतेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: खात्री करेल. केवळ आक्षेप आले नाहीत म्हणून खातरजमा न करता कोणतेही नामनिर्देशनपत्र स्विकारले वा नाकारले जाणार नाही.

६.२ कोणत्याही नामनिर्देशन पत्रासंबधी घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत निर्णय देईल. आक्षेप नसेल तरीही एखादे नामनिर्देशन पत्र नाकारण्यास पात्र असेल तर त्याबाबतही योग्य तो खुलासा करून नाकारेल.

६.३ मुंबई महानगरपालिका अधिनिमय, १८८८ च्या कलम ११, १४, १६ व २६ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमयाच्या कलम ८, ९, १० आणि त्याअंतर्गत निवडणूक नियम क्र. ९ नमूद इतर अनर्हतेबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कोणताही आक्षेप आल्यास वा असा

आक्षेप दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने घेतला असेल तर, त्याबाबतीत अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी संबंधित उमेदवाराला वाजवी संधी देण्यात येईल व उमेदवार आवश्यक ते पुरावे सादर करील.

६.४ आक्षेपावरून वा स्वत:हून एखाद्या गोष्टीची खातरजमा करणेकामी निवडणूक निर्णय अधिकारी संक्षिप्त चौकशी करू शकतो. चौकशीअंती देण्यात येणाऱ्या निर्णयाची नोंद योग्य त्या खुलाशासह तो नामनिर्देशन पत्रावर करेल. आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस तसेच मागेल त्यास निर्णयाची प्रत दयावी.

६.५ एखादे नामनिर्देशन पत्र स्विकारले वा नाकारले याची विधीग्राह्यता याबाबतचा निर्णय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामनिर्देशन पत्रावर स्वत:च्या स्वाक्षरीने नोंदविल्याशिवाय पूर्ण होत नाही, तरी प्रत्येक नामनिर्देशन पत्रावर सदर नोंद घेतली जाईल याची खात्री करावी.

७ अहर्ता / अनर्हता ग्राह्य धरण्याचा दिवस

उमेदवार निवडणूक लढविण्यास पात्र आहे वा कसे हे ठरविण्यासाठी कोणता दिवस ग्राह्य धरण्यात यावा याबाबत वाद होऊ शकतो. अधिनियमातील तरतुदीनुसार वयाच्या बाबतची अर्हता (२१ वर्षे पूर्ण असणे) यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरिता निश्चित करण्यात आलेला अंतिम दिनांक ग्राह्य धरावा. अधिनियम/नियमामध्ये स्पष्ट तरतूद नसल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १० किंवा मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ नुसार अनर्हता आहे वा कसे हे ठरविण्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा दिवस ग्राह्य धरावा. इतर अनर्हतेबाबत छाननीचा दिवस ग्राह्य धरावा.

इतर कारणांसाठी अपात्र नसेल त्यावेळी संबंधित महानगरपालिकेच्या कोणत्याही प्रभागातील मतदारांच्या यादीमध्ये केलेल्या नोंदीची प्रमाणित प्रत ही त्या नोंदीमध्ये नाव असलेल्या कोणत्याही मतदाराच्या, निवडणुकीसाठी उभे राहण्याच्या अधिकाराबाबत निर्णायक पुरावा असेल.

८ नामनिर्देशन पत्र नामंजूर करण्याचे सबळ कारण असल्याशिवाय कोणतेही नामनिर्देशन पत्र नामंजूर करु नये,

सबळ कारणे उदा. :

i) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १० किंवा मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ नुसार किंवा त्याअंतर्गत नियमातील तरतुदीनुसार निवडणूक लढविण्यास उमेदवार म्हणून अपात्र ठरविण्यात आले आहे;

ii) उमेदवाराला नामनिर्देशित करण्यासाठी प्रस्तावक किंवा अनुमोदक योग्यरितीने अर्ह नसेल.

iii) उमेदवार, सूचक / प्रस्तावक किंवा अनुमोदक यांची स्वाक्षरी नाही.

iv) योग्य अनामत रक्कम भरलेली नाही.

v) राखीव जागेवरुन नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास आवश्यक कागदपत्रे नाहीत.

एखाद्या उमेदवारास त्यांनी सादर केलेल्या नामनिर्देशन पत्रांपैकी एका नामनिर्देशन पत्राद्वारे योग्यरित्या नामनिर्दिष्ट केले असेल तर इतर नामनिर्देशन पत्रातील दोष / अपूर्णतेच्या कारणास्तव त्याची उमेदवारी नामंजूर करण्यात आली असे धरले जाणार नाही.

९ छाननी पुढे ढकलणे :

९.१ निवडणूक निर्णय अधिकारी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निवडणूक कार्यक्रमामध्ये विहित केलेल्या दिवशी व वेळेसच छाननी करण्याचे काम करील. परंतु दंगल, वा नैसर्गिक आपत्ती या सारख्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे त्यात बदल करावयाचे झाल्यास राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या विशेष वा सर्वसामान्य सुचनांच्या अधिन राहून निर्णय घेईल व त्या बाबतीत आयोगास अहवाल देईल.

९.२ छाननी करतेवेळी एखादया उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रावर आक्षेप प्राप्त झाला असेल वा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वतः आक्षेप घेतला असेल तर सदर आक्षेपांचे खंडन करण्यासाठी संबधीत उमेदवारास पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवसापर्यंत वेळ देता येईल आणि ज्या तारखेपर्यंत असे कामकाज पुढे ढकलण्यात आले असेल त्या तारखेस निर्वाचन अधिकारी आपल्या निर्णयाची नोंद करील.

१० छाननीचा निर्णय नोंदविणे :

निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक नामनिर्देशन पत्रावर ते स्विकारल्याबद्दल वा नाकारल्याबद्दल निर्णय लिहून ठेवील व नामंजूर करण्यात येणाऱ्या नामनिर्देशन पत्रावर नामंजूर केल्याबद्दलचे संक्षिप्त निवेदन लेखी नोंदवतील.

११ वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी :

वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची विहित नमुन्यात (प्रकरण-१७, नमुना-४) मधील यादी, तारीख व वेळ नमूद करून निवडणूक निर्णय अधिकारी आपल्या सूचना फलकावर लावतील.

नगरविकास विभागाने अधिसुचना दि.०५ डिसेंबर,२०२५ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच अन्य महानगरपालिकांच्या निवडणूक नियमात सुधारणा केली असून त्यानुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे:-

पहिला गट - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यतप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार .

दुसरा गट - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार.

तिसरा गट -राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे उमेदवार.

चौथा गट - अपक्ष उमेदवार.

वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात यावा. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनाव, (आडनाव नसल्यास नाव) व त्यानंतर पत्ता विचारात घ्यावा.

निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची यादी देखील वरील सुधारित तरतुदीनुसार करण्यात यावी. पर्यायाने मतपत्रिकेवरील उमेदवारांचा क्रम देखील वरील तरतुदीनुसार राहील.

प्रकरण-५

उमेदवारी मागे घेणे

१ उमेदवारी मागे घेणे संबधीची नोटीस

१.१ कोणत्याही उमेदवारास-

मुंबई महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र. १० व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र. ९-अ अन्वये वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर ते राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत त्याने सही केलेल्या व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलेल्या लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल. विहित नमुन्यात (प्रकरण-१७, नमुना-५)

१.२ उपरोक्त तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग, निवडणूक कार्यक्रमात ठरवून देईल, अशा निश्चित केलेल्या कालावधीत मात्र कोणत्याही परिस्थितीत शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजण्यापूर्वी उमेदवारी मागे घेण्यासंबंधिची नोटीस, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल. तद्नंतर प्राप्त नोटिशींना कायदेशीर अर्थ नसून अशा नोटिसा स्विकारण्यात येवू नयेत.

१.३ अशी नोटीस उमेदवार स्वत: किंवा आपल्या सुचकामार्फत वा आपल्या लेखी प्राधिकृत केलेल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत देईल.

१.४ उमेदवारी मागे घेण्याच्या नोटिशीच्या खरेपणाबाबत तसेच ती सादर करणाऱ्या व्यक्तीच्या खरेपणाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: खात्री करेल व अशा प्राप्त नोटिशीबाबत रितसर पोच देईल.

१.५ अशी खात्री केलेली नोटीस प्राप्त झाल्यानंतर ती मागे घेण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२ उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची यादी :

विहीत मुदतीत, विहित पद्धतीने खात्री करण्यात आलेल्या सर्व उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी विहित नमुन्यात (प्रकरण-१७, नमुना-६) तयार करेल व सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करेल.

प्रकरण - ६

चिन्ह वाटप

सर्वसाधारण सूचना

राज्य निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप आदेश, दि. २० नोव्हेंबर, २००४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता पक्षांची नोंदणी प्रथम आवश्यक केली. त्यानंतर दि.३१ मार्च २००९ च्या आदेशानुसार याबाबत नव्याने एकत्रित आदेश दिले होते. आता राज्य निवडणूक आयोगाने सदर आदेश अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ०५ मे, २०२५ रोजी प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार जे पक्ष राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करतील, केवळ त्याच पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लढविताना चिन्ह राखून ठेवता येते किंवा प्राधान्याने चिन्ह वाटप करता येते.

ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांची यादी राज्य निवडणूक आयोग वेळोवळी प्रसिध्द करते. त्या यादीनुसारच चिन्ह वाटप करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत केवळ भारत निवडणूक आयोगाच्या पक्षांच्या यादीतील नावांच्या आधारे चिन्ह वाटप करण्यात येऊ नये.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र. ५४/का-११, दि. ०८ नोव्हेंबर, २०२५ अन्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या पक्षांची यादी व चिन्हे अधिसूचित केली आहेत. या यादीमध्ये वेळोवळी सुधारणा करण्यात येते. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी अद्ययावत यादी तसेच मुक्त चिन्हांचा तक्ता, राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त करुन घ्यावा.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी :- उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या दिनांकानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा अंतर्गत निवडणूक नियम क्र. ११ (३) (सुधारित तरतुद विचारात घ्यावी) तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियमावली, २००६ चा नियम क्र. ११ व १३ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी (प्रकरण-१७, नमुना-७) तयार करणे आवश्यक आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करताना महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवारांची नावे मतपत्रिकेवर कशाप्रकारे येतील यासंदर्भात नगरविकास विभागाने अधिसुचना दि.०५ डिसेंबर,२०२५ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच अन्य महानगरपालिकांच्या निवडणूक नियमात सुधारणा केली असून त्यानुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे:-

पहिला गट - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यतप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार .

दुसरा गट - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार.

तिसरा गट -राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे उमेदवार .

चौथा गट - अपक्ष उमेदवार.

वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात यावा. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनाव, (आडनाव नसल्यास नाव) व त्यानंतर पत्ता विचारात घ्यावा.

निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची यादी देखील वरील सुधारित तरतुदीनुसार करण्यात यावी. पर्यायाने मतपत्रिकेवरील उमेदवारांचा क्रम देखील वरील तरतुदीनुसार राहील.

मतपत्रिकेवरील नाव कसे राहिल :- एखादा उमेदवार आपले नाव मतपत्रिकेवर कशा प्रकारे छापण्यात यावे, याबाबत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटची तारीख व वेळ यापूर्वी कळवू शकतो. उमेदवाराचे नाव मतपत्रिकेवर त्यानुसार छापण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेऊ शकतात. मात्र, त्यानुसार नावे छापताना त्याचा मतपत्रिकेवरील अनुक्रम वर नमुद केलेल्या तरतुदीनुसार राहील.

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप कशाप्रकारे करावे याबाबत अधिसूचित केले आहे. या अधिसूचनेच्या **भाग चार** मध्ये नमूद केलेल्या तरतूदींच्या आधारे **निवडणूक चिन्ह वाटप करण्यात यावे.**

१. उपरोक्त आदेशानुसार चिन्ह वाटपाच्या संदर्भातील तरतुदी थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत:-

i. उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामध्ये तो ज्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे त्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

ii. संबंधित राजकीय पक्षाने विहित कालावधीमध्ये उमेदवाराचे सुचनापत्र व ते सही करण्यास सक्षम असलेला अधिकारी कोण याबाबतची जोडपत्र-१ व जोडपत्र-२, महानगरपालिका आयुक्त आणि संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निश्चित केलेल्या वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

iii राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेले राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पक्ष तसेच इतर पक्ष यांनी उभे केलेले उमेदवार महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २० मधील अटी पूर्ण करीत असल्यास त्यांना त्यानुसार त्या पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह वाटप करता येईल किंवा चिन्ह वाटपामध्ये प्राधान्य मिळेल.

iv. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाद्वारे उभे करण्यात येणारे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवार यांना मुक्त चिन्ह वाटप करण्याबाबतची कार्यपध्दती सदर आदेशाच्या परिच्छेद क्र. १५ अन्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार उदा. एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाच्या "अ" जागेवरील उमेदवारास वाटप झालेले मुक्त चिन्ह त्याच पक्षाच्या त्या प्रभागातील अन्य जागांवरील उमेदवारांना देता येईल. तसेच प्रभागात निवडणूक लढविणाऱ्या सर्व अपक्ष उमेदवारांना वेगवेगळ्या मुक्त चिन्हांचे वाटप होईल, यादृष्टीने या परिच्छेदात तरतुदी आहेत.

v. जर एखाद्या राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणूकीत किमान ५ टक्के जागा जिंकल्या असतील तर त्या पक्षास उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्र. १७ मधील तरतूदीनुसार मुक्त चिन्हांपैकी एक मुक्त चिन्ह त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करता येईल.

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त असलेल्या इतर पक्षांना मुक्त चिन्हांमधील त्यांनी मागणी केलेले एक मुक्त चिन्ह प्राधान्याने देता येईल. (ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांना राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न केलेले पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्यावर प्राधान्याने चिन्ह वाटप करण्यात येते.) याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी:-

(अ) जेथे एखाद्या मुक्त चिन्हाची मागणी केवळ एकाच नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवाराने केली असेल तेथे ते चिन्ह त्या उमेदवारास देण्यात येईल.

(ब) जेथे एखाद्या मुक्त चिन्हाची मागणी दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

vi. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न झालेल्या राजकीय पक्षाच्या उमेदवारांना अपक्ष उमेदवार असल्याचे मानण्यात येईल. या अपक्ष उमेदवार यांना खालीलप्रमाणे मुक्त चिन्ह वाटप करण्यात येईल :-

(अ) जेथे एकापेक्षा जास्त उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची मागणी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

२. पर्यायी उमेदवार -

जर नमुन्यांमध्ये एका उमेदवारास मूळ उमेदवार व दुसऱ्या उमेदवारास पर्यायी उमेदवार असल्याचा उल्लेख **असेल** व पक्षाच्या जोडपत्र-२ वर सही करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तीने दिले **असेल** अशा वेळी त्या मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र वैध ठरल्यास त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार गृहित धरावे. अशा परिस्थितीत पर्यायी उमेदवारास त्याने माघार न घेतल्यास व इतर बाबींसंदर्भात पात्र असल्यास अपक्ष उमेदवार समजण्यात येईल. मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र

अवैध ठरल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास पर्यायी उमेदवार हा इतर बाबींसंदर्भात पात्र असल्यास पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल.

३. उपरोक्त दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २१ अन्वये एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांची नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास करावयाची कार्यवाही विहित केली आहे. त्यानुसार उचित कार्यवाही करावी.

४. राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना नामनिर्देशनपत्र भरावयाच्या शेवटच्या दिवशी त्यासाठी विहित वेळेपर्यंत किंवा त्यापूर्वी प्राप्त झाली पाहिजे. पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना जोडपत्र-२ मधील लेखी सूचनापत्र दिले असल्यास उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्र. २२ नुसार कार्यवाही करावी. त्यानुसार जर पक्षातर्फे मूळ उमेदवार म्हणून दोघांना विहित नमुने देण्यात आले असतील व त्यापैकी कोणता उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार राहील याबाबत नामनिर्देशनपत्र भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत निश्चित केलेल्या वेळेत पक्षाकडून कोणतेही सूचनापत्र देण्यात आले नसेल तर ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन प्रथम प्राप्त झाले असेल त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून गृहीत धरण्यात यावे.

५. उमेदवारी मागे घेणे- वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवार आपली उमेदवारी मागे घेण्याबाबतची लेखी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांना नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत देऊ शकतात अशी सूचना उमेदवार स्वत: अथवा त्याचे सूचक/अनुमोदक अथवा उमेदवाराने प्राधिकृत केलेली व्यक्ती आणून देऊ शकते, निवडणूक निर्णय अधिकारी अशी लेखी सूचना मिळाल्यानंतर त्याचा खरेपणा पडताळून व अशी सूचना आणून देणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवून त्याची प्रत सूचना फलकावर लावतील.

६. चिन्ह वाटप अत्यंत काळजीपूर्वक करावे, चुकीचे चिन्ह देणे वा एकच चिन्ह दोन उमेदवारास देणे (अपवाद - बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एकाच प्रभागातील वेगवेगळया जागांवरील त्याच पक्षाच्या उमेदवारांना एकच चिन्ह देता येते) यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया फोल ठरू शकते. तरी चिन्ह वाटप करताना सर्व सुचनांचा अभ्यास करावा.

अशी चूक झाल्यास व ती संबधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या मतदानापूर्वी लक्षात आल्यास, तो योग्य त्या खुलाशासह आयोगास अहवाल सादर करेल, आयोगाकडून परवानगी प्राप्त झाल्यावर आयोग देईल त्या कार्यक्रमाप्रमाणे चिन्ह वाटप प्रक्रियेपासूनची कार्यवाही पुन्हा करेल.

७. चिन्ह वाटपाच्या प्रक्रियेचे छायाचित्रण करावे तसेच सविस्तर इतिवृत्त लिहिण्यात यावे.

८. निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवारास वाटून देण्यात आलेल्या चिन्हाबद्दल त्या प्रत्येक उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस माहिती देईल. तसेच चिन्हांचा एक नमुना त्यास पुरविल.

प्रकरण - ७

मतदान कर्मचारी वृंद

१. **कायद्यातील तरतुदी :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र.१४, बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम निवडणूक नियमावली, २००६ च्या नियम क्र. ३२ नुसार मतदान केंद्रावर नेमण्यात येणारा कर्मचारीवृंद हा निर्वाचक अधिकारी नेमेल. परंतु असा कर्मचारीवृंद पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक ३-डेस्क/३०६/१०९५.एसईसी-, दि१९९५/०३/०२. व शुध्दीपत्रक क्रमांक -एसईसी७-डी/४४.आर.सी/२०१७/झेडपीपीएस/, दि२०१८/०७/१८. नुसार सदरचा कर्मचारीवृंद संबंधित महानगरपालिका आयुक्त अधिग्रहीत करतील.

२. **नियंत्रण :**

निवडणूक कामासाठी नेमण्यात येणारे सर्व अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाच्या अधिक्षण, नियंत्रण व संचालनाखाली काम करतील. निवडणुकीमध्ये काम करताना निष्काळजीपणा वा कसूर करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यास राज्य निवडणूक आयोग सक्षम आहे याची संपूर्ण कल्पना निर्वाचन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणामध्ये संबंधीतांना दयावी. (आयोगाच्या आदेश क्रमांक रानिआ५.का/१४.क्र.प्र/२००६-, दि(२००६-०८-०२.

३. **सर्वसाधारण सूचना :**

भारत निवडणूक आयोगाच्या सर्वसाधारण सूचना व राज्य निवडणूक आयोगाच्या विशेष सूचना लक्षात घ्याव्यात जसे-

- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक -एसईसी.१०९५/३०६/डेस्क-३ , दि.०२/०३/१९९५ व शुध्दीपत्रक क्रमांक- एसईसी / झेडपीपीएस / २०१७ / सी.आर.४४ / डी-७, दि.१८/०७/२०१८ नुसार राज्य व केंद्र शासनाचे विभाग/कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था वा राज्य शासनाच्या अखत्यारितील महामंडळे / उपक्रम (शासनाचे किमान २५% भांडवलात वाटा असणारे) इ. यामधील अधिकारी / कर्मचारी निवडणूक कामासाठी अधिग्रहित करता येतील.
- कोणत्याही निवडणुकीसाठी अधिकारी/कर्मचारीवृंद अधिग्रहीत करताना आवश्यक कर्मचाऱ्यांची संख्या व कर्मचारी अधिग्रहीत करता येतील अशा उपलब्ध संस्था व त्यामधील उपलब्ध कर्मचारीवृंदांची संख्या लक्षात घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत एकाच संस्थेचे कर्मचारी नेमण्यात येऊ नयेत. तसेच एखाद्या संस्थेचे सर्वच्या सर्व कर्मचारी / अधिकारी काढून घेऊ नयेत.

- अधिकारी /कर्मचारी नेमताना व त्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविताना त्यांचे संबंधित संस्थेतील पद, जेष्ठता लक्षात घ्यावी. केवळ वेतनश्रेणी लक्षात घेऊ नये कारण विविध संस्थांमध्ये वेतनबँड वेगवेगळा असू शकतो. कोणत्याही जेष्ठ अधिकाऱ्यास त्याच्यापेक्षा कनिष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्याच्या हाताखाली काम करावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी.
- राज्य शासनाच्या विविध महसूल वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नेमताना त्यांच्या वरिष्ठांची पूर्वपरवानगी असावी जेणेकरून संबंधित विभागाचे अनावश्यक नुकसान होणार नाही.
- आयुर्विमा व बँका यासारख्या यंत्रणेचा कर्मचारी वृंद हा अपवादात्मक परिस्थीतीत नेमला जावा.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये संबंधित संस्थेच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शक्यतोवर नेमण्यात येऊ नयेत. अपवादात्मक परिस्थितीत नेमावयाचे झाल्यास मतदान केंद्रांवर मतदान केंद्राध्यक्ष वा पहिला मतदान अधिकारी म्हणून नेमण्यात येऊ नये.
- उमेदवार किंवा उमेदवाराच्या वतीने काम पाहणाऱ्या व्यक्तींची नेमणूक मतदान केंद्राध्यक्ष/ अधिकारी / कर्मचारी म्हणून मतदान केंद्रांवर होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह /आश्रम असल्यास व त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असल्यास त्यामध्ये काम करणारे अधिकारी/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे.
- क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५, दि. २६ जून, २०२५ रोजीच्या आदेशान्वये मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयीसुविधाबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

४. **कर्मचारीवृंद नेमताना भारत निवडणूक आयोगाच्या निर्वाचक अधिकाऱ्यांसाठी असणाऱ्या मार्गदर्शक पुस्तिकांमधील सुचनांचा देखील विचार करावा जसे -**

अ) अत्यावश्यक सेवांमधील पुढील विभागांना निवडणूक कामांतून सूट देण्यात यावी.

- भारतीय वन सेवा
- पशुवैद्यकिय दवाखान्यातील डॉक्टर / कंपाउंडर
- पशुवैद्यकिय दवाखान्यातील वर्ग-व चे अधिकारी जसे (Cattle Extention Officer)
- वैद्यकिय क्षेत्रातील डॉक्टर, नर्स वगैरे
- प्रादेशिक वन विभागातील कर्मचारीवृंद
- दूरदर्शन, आकाशवाणी यांचे कर्मचारी
- अन्न महामंडळाचे अधिकारी
- आयुष विभागाचे आयुर्वेदिक, युनानी, होमीओपथी विभागाचे मेडिकल ऑफीसर

ब) BSNL, MTNL चा तांत्रिक विभाग, UPSC व MPSC यांचे कर्मचारी यांना अपवादात्मक परिस्थितीत नेमण्यात यावे.

क) ग्रामीण भागात जेथे एकच बँक असते तेथे अशा बँकेचा कर्मचारी नेमू नये.

ड) ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्या निवृत्तीस ६ महिने वा त्यापेक्षा कमी कालावधी राहिला असेल वा एखादा अधिकारी/कर्मचारी निवृत्त झाला आहे परंतु सेवावाढ मिळाली असेल वा पुन्हा सेवेत घेण्यात आले असेल तर अशा कर्मचाऱ्यास नेमू नये.

५. महिला अधिकारी/कर्मचारी नेमताना घ्यावयाची काळजी:-

- जिथे ज्या मतदान केंद्रावर परदानशीन स्त्री मतदार आहेत किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळते. त्या मतदान केंद्रावरील मतदान अधिकाऱ्यांच्या पथकामध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल.
- गर्भवती स्त्रिया वा स्तनदा माता (प्रसुती रजेवर नसेल तरी) तसेच ज्यांना आरोग्याच्या दृष्टीने अशा कामापासून दूर ठेवण्याचा सल्ला देण्यात आला असेल अशा स्त्रियांना निवडणुकीचे काम देऊ नये.
- महिला अधिकारी/कर्मचारी यांची राहण्याची व्यवस्था योग्यरित्या करण्यात येईल तसेच त्यांची सुरक्षितता याची काळजी घ्यावी.

६. न्यायिक अधिकारी नेमतानाच्या अटी :

- मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय न्यायालयातील कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करू नये.
- दिवाणी न्यायालय, जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश व अधिकारी यांची नेमणूक करू
  नये.
- कार्यकारी दंडाधिकारी यांना कायदा व सुव्यवस्थेसंबंधी कामे देण्यास हरकत नाही. परंतु त्यांची नेमणूक करताना देखील कार्यकारी दंडाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडणेकामी आवश्यक तेवढा पुरेसा अधिकारीवृंद वगळून नेमणूक करावी.

७. दिव्यांग कर्मचारी नेमताना घ्यावयाची काळजी :

- कोणत्याही दिव्यांग व्यक्तीची मतदान केंद्रावर नेमणूक करणेपूर्वी सदर व्यक्ती मतदान केंद्रावर काम करण्यास सक्षम आहे वा कसे याची खात्री निर्वाचक अधिकारी

स्वत: करतील व अशा कर्मचाऱ्यास नेमावयाचे झाल्यास जाण्या-येण्याच्या दृष्टीने सोयीस्कर अशा केंद्रावरच त्यांची नेमणूक करतील.

- निवडणुकीच्या कामाकरीता दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींची नेमणूक करणे आवश्यक असल्यास दिव्यांगांकरीता असलेल्या प्रचलित कायद्यांतर्गत नमुद ज्या पध्दतीच्या कामाकरीता त्याच्या वर्गवारीनुसार संबंधित दिव्यांग कर्मचारी पात्र आहे तत्सम काम त्यास देता येईल.

८. **पूर्वतयारी : प्रत्यक्ष मतदान केंद्रावर नेमणूक करताना -**

आयोगाने क्र. रानिआ/मनपा-२०२३/प्र.क्र.२/का-५, दि.२६.०४.२०२३ अन्वये, निवडणुकांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणुका करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर आदेश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी.

कर्मचारीवृंद अधिग्रहीत करताना त्यांचा ऑफिसचा पत्ता, घरचा पत्ता, मोबाईल नंबर, वेतनश्रेणी, निवृत्तीचा दिनांक या सर्वांची माहिती घ्यावी जेणेकरून मतदान केंद्रासाठी पथक निर्मिती करताना अडचण येणार नाही.

i) एका मतदान केंद्रास १ मतदान केंद्राध्यक्ष, किमान ३ मतदान अधिकारी व १ चतुर्थ श्रेणी कर्मचारी याप्रमाणे मतदान केंद्रांच्या संख्येनुसार (+१०%राखीव(अधिग्रहीत करावयाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करावी. डाटाबेस तयार करताना सर्व संस्थांचा डाटा घ्यावा.

ii) एकाच कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी एकाच मतदान केंद्रावर शक्यतोवर नेमू नयेत.

iii) स्थानिक स्वराज्य संस्थातील रहिवाशी असणाऱ्या कर्मचाऱ्यास त्याचे मतदान ज्या प्रभागात आहे त्या प्रभागातील कोणत्याही मतदान केंद्रावर नेमण्यात येऊ नये.

iv) तसेच मतदान अधिकारी/कर्मचारी नेमताना ते काम करीत असलेली संस्था ज्या प्रभागात येते त्या प्रभागात त्यांची नेमणूक करणे टाळावे. उदा. एखाद्या शिक्षकास तो काम करीत असलेली शाळा ज्या प्रभागात येते त्या प्रभागात नेमण्यात येऊ नये.

v) **पोलीस व्यवस्था :** प्रत्येक मतदान पथकासोबत आवश्यक तो पोलीस बंदोबस्त मतपेटी/ मतदान यंत्र, मतपत्रिका व इतर साहित्य याच्या सुरक्षिततेकरिता सतत असणे आवश्यक आहे. असे पोलीस कर्मचारी मतदान पथक रवाना होण्याच्या वेळेपासून मतपेटी / मतदान यंत्र सुरक्षा कक्षात (स्ट्रॉंगरुम) सुपूर्द करण्यात येईपर्यंत मतदान केंद्राध्यक्षाच्या नियंत्रणाखाली व आदेशानुसार काम करतील. सबब, आवश्यक पोलिस बंदोबस्ताबाबत संबंधित यंत्रणेला कळवावे.

vi) प्रशिक्षणाच्यावेळी तसेच EVM तयार करतेवेळी तसेच EVMs जिथे सुरक्षित ठेवण्यात येतील तिथे आवश्यक असणारा पोलीस बंदोबस्ताबाबत संबंधित यंत्रणेला कळवावे.

९. नेमणूक :

सर्व मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांची नेमणूक ही प्रमाण नमुन्यात करावयाची आहे. नेमणुकीचे आदेश २ प्रतीत करावेत, (ज्यावर निर्वाचन अधिकाऱ्याची सही व शिक्का असेल) जेणेकरून टपाली मतपत्रिकेच्या अर्जासोबत १ प्रत जोडता येईल.

नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना नेमणूक नाकारता येणार नाही.

११. ओळखपत्र :

नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना छायाचित्र असणारे खालील प्रमाणे ओळखपत्र देण्यात यावे. परंतु, संबंधित कर्मचाऱ्यांना कोणत्या मतदान केंद्रावर नेमण्यात येणार आहे हे मतदानाच्या आदल्या दिवशी मतदान पथक निर्गमित करण्याच्या दिवशीच कळेल याची काळजी घ्यावी. खालील ओळखपत्राच्या नमुन्यात आवश्यतेनुसार बदल करता येईल.

----------महानगरपालिका सार्वत्रिक/पोट निवडणूक - २०....

ओळखपत्र

मतदान केंद्राध्यक्षाचे नाव :

वय :

मूळ कार्यालयाचे नाव :

मूळ कार्यालयातील हुद्दा :

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही व शिक्का

----------महानगरपालिका सार्वत्रिक/पोट निवडणूक - २०....

ओळखपत्र

मतदान अधिकाऱ्याचे नाव :

वय :

मूळ कार्यालयाचे नाव :

मूळ कार्यालयातील हुद्दा :

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही व शिक्का

१२. टपाली मतदान सुविधा :

१२.१ मतदान केंद्रावर नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी हा त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा रहिवासी असेल तर त्यास टपाली मतपत्रिकेचा अर्ज (PB- १) पहिल्या प्रशिक्षणाच्या

वेळी देण्यात यावा व त्याची नोंद विशेष रजिष्टरमध्ये ठेवावी. दुसऱ्या प्रशिक्षणाच्या वेळी संबंधित कर्मचाऱ्यांकडून सदरचे अर्ज गोळा करावेत, सदरचा अर्ज योग्यरित्या भरण्यात आला आहे याची खात्री करून घेण्यात येईल. तसेच संबंधितांचे नाव, मतदार यादी क्रमांक, ओळखीचा छायाचित्र असणारा पुरावा तसेच EPIC तपासून घ्यावा व त्यानुसार त्यांना टपाली मतपत्रिकेचे वाटप करावे. वाटप करण्यात आलेल्या टपाली मतपत्रिकेची नोंद मतदार यादीत घेणे आवश्यक आहे.

१२.२ टपाली मतपत्रिका तात्काळ भरू इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी ट्रेनिंग सेंटरवर टपाली मतपत्रिका सुविधा केंद्र (PB Facilitation Centre) ठेवावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्यावी. सदर मत नोंदविण्यासाठी आवश्यक ती सुरक्षा व गोपनियता राखली जाईल याची देखील दक्षता घ्यावी. तसेच टपाली मतपत्रिकेचे घोषणापत्र (PB-४) प्रमाणित करणेसाठी सक्षम शासकीय अधिकाऱ्याचीही नेमणूक करावी.

१३. प्रशिक्षण :

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक- रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.९/का-५, दिनांक ११/११/२००८ नुसार ज्यावेळी शाळा-कॉलेज मधील शिक्षकांना ज्यावेळी मतदान केंद्रावरील कर्मचारी म्हणून नेमण्यात येते त्यावेळी जर मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस नसल्यास त्या दिवशी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात सुट्टी द्यावी, तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी ज्या दिवशी मतदान साहित्य व मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या दिवशी सुद्धा शाळांना सुट्टी द्यावी. शिक्षकांचे शाळेचे नुकसान होऊ नये म्हणून मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शक्यतो सुट्टीच्या दिवशी आयोजित करावे. प्रशिक्षणावेळी पुढील गोष्टींची काळजी घ्यावी:

- प्रशिक्षणाच्या तारखा, वेळ व जागा निवडणूक कार्यक्रमाच्या सुरवातीलाच निश्चित कराव्यात.
- किमान ३ प्रशिक्षण द्यावेत, त्यापैकी दुसरे प्रशिक्षण टपाली मतपत्रिका छापल्यावर असेल.
- प्रशिक्षणासाठी आवश्यक मतदान साहित्याचीही व्यवस्था करावी.
- प्रशिक्षणाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, प्राथमिक उपचार साहित्य वगैरेची सोय असावी.
- प्रशिक्षण हे मेळाव्यांसारखे आयोजित न करता छोट्या छोट्या गटात विभागावे व नियम, अधिकार, कर्तव्य याचसोबत EVMs साठी Hands On Training वर भर द्यावा प्रशिक्षणासाठी पुरेशा EVMs उपलब्ध करून घेऊन प्रशिक्षण देण्यासाठी खास

कर्मचारीवृंद तयार ठेवावा. प्रशिक्षणार्थीच्या सर्व शंकांचे समाधन होवून त्यांच्यात आत्मविश्वास येईल यासाठी प्रयत्न करावा.

- सांविधानिक- असांविधानिक लिफाफे/ अहवाल याबाबत योग्य ते प्रशिक्षण द्यावे.
- मॉक पोलचे महत्व व बंधन विषद करावे, मॉक पोल केल्याचे प्रमाणपत्र बंधनकारक करावे.
- ज्या ठिकाणी बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एकापेक्षा अधिक मते द्यावयाची असतात त्याठिकाणी मतदान अधिकाऱ्यांना, मतदाराची ओळख पटल्यानंतर चिन्हांकित मतदार यादीत मतदाराच्या नावासमोर खूण करण्याआधी मतदाराला एकूण किती मते द्यावयाची आहेत, याबाबत कल्पना देण्याचे सांगण्यात यावे.
- मतदान केंद्राबाबत ज्या सूचना (दि. २६/०६/२०२५ चे आदेश) तपासून त्यातील गर्भवती महिला, जेष्ठ नागरिक, वा अंध-दिव्यांग मतदार यांची काळजी कशी घ्यावी याबाबत सुचना दयाव्यात. मतदान केंद्रात बसण्याची व्यवस्था, Voting Compartments कुठे असावे याचे व्यवस्थीत प्रशिक्षण दयावे.
- मतदान प्रक्रिया, मतदार यांचे बाबतचे महत्वाचे आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावेत.
- प्रशिक्षणाच्या हजेरीवर लक्ष ठेवावे, हजेरीपट ठेवावा, गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दुय्यम लेखून प्रशिक्षणाला कमी महत्व दिले जाते वा ते टाळण्याकडे कल राहतो व त्यामुळे चुका घडतात. तरी राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ०२/०८/२००६ च्या आदेशाची जाणीव संबंधितांना करून द्यावी.

१४. मतदान केंद्रांवर पथक पाठविण्याच्या दिवशी प्रशिक्षणाची सोय ठेवणे :

ज्या दिवशी पथके मतदान केंद्रांवर रवाना करण्यात येतील त्या दिवशी देखील Hands On Training ची मध्यवर्ती निवडणूक कार्यालय (Dispatch Centre) वर सोय करावी.

१५. मानधन :

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.३/का.५, दि. ३१/१/२०१२ व दि.११/२/२०१२ नुसार मतदान / मतमोजणी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे निवडणूक व आहार भत्याचे दर हे लोकसभा / विधानसभा निवडणूकीसाठी सामान्य प्रशासन विभागाने ठरविलेल्या दरांप्रमाणे असतील. तसेच पोलिस अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठीचे दर हे गृहविभाग ठरवेल. याबाबत कोणतीही थकबाकी राहणार नाही याची दक्षता महानगरपालिका आयुक्त यांनी घ्यावयाची आहे व तसे प्रमाणित करावयाचे आहे. (आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२६/का.७, दि.९/११/२०१६

चे आदेश) मतदान कर्मचाऱ्यांना शक्यतोवर मतदान केंद्रावरच मानधन देण्याची तयारी ठेवावी.

सन २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी मतदान/मतमोजणी कामासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या निवडणूक भत्त्याचे शासन निर्णय सुलभ संदर्भासाठी खालीलप्रमाणे आहेत:-

१. सा.प्र.वि. चे शा. नि. क्र. सीईएल-२०२४/प्र.क्र.४५/२४/३३(नि.३)(२), दि. १६.०१.२०२५
२. सा.प्र.वि. चे शा. नि. क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१४०/२५/का-३३(नि-३), दि. २४.११.२०२५

१६. **मतदान केंद्र पथक :** प्रत्येक मतदान केंद्र पथकात १ मतदान केंद्राध्यक्ष (Presiding Officer), ३ मतदान अधिकारी (Polling Officer) व १ चतुर्थ श्रेणी कर्मचारी व पोलीस असेल.

- प्रत्येक मतदान पथकातील सदस्य स्वत:चा मोबाईल नंबर इतर सदस्यांबरोबर तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्याबरोबर शेअर करेल.
- सर्व पथक पूर्ण झाल्याशिवाय मतदान केंद्रावर रवाना करू नये.

१७. **मतदान केंद्राध्यक्ष (Presiding Officer):**

- मतदान केंद्रात सुव्यवस्था राखणे आणि मतदानाचे काम सुरळीतपणे चालू ठेवणे हे सर्वसाधारण कर्तव्य राहील.
- मतदान केंद्र ताब्यात घेण्यापासून मतदान प्रकिया पार पाडल्यानंतर मतदान पेटी निर्वाचन अधिकाऱ्याच्या ताब्यात देईस्तोवर सर्व जबाबदारी व्यक्तीश: पार पाडेल.
- त्यासाठी तो आपल्या हाताखालील मतदान अधिकाऱ्यांकडे योग्यरित्या कामाचे वाटप करेल.
- अनिवार्य कारणास्तव मतदान केंद्राध्यक्ष अनुपस्थित राहिल्यास पहिला मतदान अधिकारी मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये पार पाडेल. सबब, पहिला मतदान अधिकारी हा देखील तेवढाच सक्षम नेमावा. याकरीता मतदान पथक निश्चित करतानाच एका मतदान अधिकाऱ्याचे नाव निश्चित करण्यात यावे. शक्यतो प्रथम मतदान अधिकारी / सहायक मतदान केंद्राध्यक्ष (First Poling Officer/Assistant Presiding Officer) या कर्तव्याकरीता नामनिर्देशित करण्यात यावा.

- एखादा मतदान अधिकारी निवडणुकीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास कोणत्याही सामान्य व्यक्तीची (उमेदवार वा उमेदवाराच्या वतीने काम न करणाऱ्या) नेमणूक मतदान अधिकारी म्हणून करण्यास मतदान केंद्राध्यक्ष सक्षम राहील.

१८. **मतदान अधिकारी (Polling Officer)**

- प्रथम मतदान अधिकाऱ्याकडे चिन्हांकित मतदार यादी असेल, मतदाराची ओळख पटविण्यासाठी हा जबाबदार राहील.
- दुसरा मतदान अधिकारी मतदाराने यापूर्वी मतदान केले नाही याची खात्री करून त्याच्याकडे असणाऱ्या मतदार नोंदवहीत (व्हीएम-१) तो मतदाराच्या ओळखीच्या पुराव्याची नोंद घेईल तसेच सही/ अंगठा घेईल व मतदारास व्होटर स्लिप / मतदान चिठ्ठी देईल.
- तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट असेल. व्होटर स्लिप पाहून तो मतदानासाठी नियंत्रण युनिटचे बटण दाबेल.
- ज्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची उपलब्धता नसल्याने दोनच मतदान अधिकारी असतील तिथे मतदान अधिकारी २ व ३ चे काम एकच व्यक्ती पाहील.

१९. **राखीव कर्मचारी :**

मतदान केंद्र पथकातील प्रत्येक श्रेणीतील म्हणजेच मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्यातील १०% राखीव कर्मचारीवृंद ठेवावा. त्यांना देखील संपूर्ण प्रशिक्षित करावे. आवश्यकतेनुसार मतदान केंद्रांवर त्यांना वापरता येईल.

२०. **क्षेत्रीय अधिकारी (Zonal Officer) :**

मतदान केंद्र निश्चितीनंतर मतदान केंद्रांच्या वाहतूक आरखड्यानुसार एकाच मार्गावर असणाऱ्या केंद्रासाठी एक झोन याप्रमाणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे जास्तीत जास्त १० ते १२ केंद्र ठेवावीत. जेणेकरून त्यांना सदर केंद्र तपासणे, मतदान केंद्र पथकांवर नियंत्रण ठेवणे, मतदानाच्या दिवशी अहवाल सादर करणे इत्यादी गोष्टी व्यवस्थित करता येतील.

- क्षेत्रीय अधिकाऱ्याची नेमणूक करताना ज्यास स्थानिक माहिती आहे असा निर्णय क्षमता असणारा अधिकारी असावा.

२१. **प्रत्येक मतदान पथकांची वाहन व्यवस्था :**

मतदान पथक हे मतदान केंद्रावर मतदानाच्या आदल्या दिवशी सायंकाळी पोहचतील अशाप्रकारे निर्गमित करण्यात यावे.

मतदान पथकासोबत मतपत्रिका व मतपेटी / मतदान यंत्र, मतदार यादी इत्यादी साहित्य मतदान केंद्रावर पाठवावयाचे असल्याने योग्य ते वाहन व संरक्षणार्थ पोलीस कर्मचारी पुरविण्यात यावे.

मतदान पथकाचा मध्यवर्ती निवडणूक कार्यालयातून (Dispatch Centre) मतदान केंद्रापर्यंत व मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्रातून मध्यवर्ती निवडणूक कार्यालयापर्यंतचा (Receiving Centre)/मतपेटी जमा करण्याच्या सुरक्षा कक्षापर्यंतचा मार्ग सुनिश्चित असावा व त्याच मार्गाने मतदान पथकाची वाहतूक करण्यात यावी व त्याचा मार्गदर्शक नकाशा निर्वाचन अधिकाऱ्याकडे / तहसिल कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

प्रकरण - ८

उमेदवार व विविध प्रतिनिधी यांना ओळखपत्र देण्याची कार्यपध्दती

१. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ओळखपत्र देणे :-

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी तयार झाल्याबरोबर खालील नमुन्यात, उमेदवाराचे छायाचित्र असणारे ओळखपत्र देण्यात यावे. सदर ओळखपत्र हिरव्या रंगाच्या जाड कागदावर छपाई करुन पुरविण्यात यावे.

ओळखपत्र देण्याकरीता उमेदवाराकडून २ फोटो घेण्यात यावेत व खालीलप्रमाणे ओळखपत्र तयार करून, १ फोटो ओळखपत्रावर लावण्यात यावा व सदर ओळखपत्र उमेदवारास देण्यात यावे. तसेच कार्यालयीन अभिलेखासाठी प्रभागनिहाय १ रजिस्टर (वा एका रजिस्टरमध्ये विभाग करून) तयार करून त्यात उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव / अपक्ष, हा तपशील नोंदवून त्याच रजिस्टरवर फोटो लावावा व उमेदवाराची ओळखपत्र मिळाल्याची पोहच घ्यावी.

उमेदवाराचे ओळखपत्र

----------महानगरपालिका सार्वत्रिक/ पोट निवडणूक २०...

प्रभाग क्र.---------- मधील जागा क्र.----------

उमेदवाराचे नाव ----------

उमेदवाराचा फोटो

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही व शिक्का

प्रकरण - ९

आचारसंहिता
सर्वसाधारण सूचना

१. **मार्गदर्शक तत्वे :**

आचारसंहिता हि मार्गदर्शक तत्वे असून ती निवडणूक प्रक्रिया जास्तीत जास्त आदर्श होण्याकरीता राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिते संदर्भात वेळोवळी आदेश / निदेश / सूचना जारी केल्या आहेत. त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करुन आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

२. **आयोगाचे आदेश :**

राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहितेसंदर्भात, आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये सर्वसाधारण सूचना जारी केल्या आहेत. त्याचप्रमाणे यासंदर्भातील इतर महत्वाच्या बाबी **(परिशिष्ट-१ ते ३)** प्रमाणे आहेत, कृपया त्या तपासाव्यात.

३. **आचारसंहितेची व्याप्ती** : - महानगरपालिका निवडणुकीच्यावेळी आचारसंहिता संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात लागू राहील. पोटनिवडणुकीची आचारसंहिता संबंधित निवडणूक प्रभागापुरतीच लागू असेल. निवडणूक क्षेत्राबाहेरील जिल्ह्यातील निवडणूक नसलेल्या क्षेत्रात नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु महानगरपालिकेच्या मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

४. **आचारसंहितेचा कालावधी** : राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या वेळ व दिनांकांपासून ते निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.

५. **जाहीर प्रचाराचा कालावधी :**

अधिनियमातील तरतुदी व त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाचे आदेश यानुसार जाहीर प्रचाराचा कालावधी मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस मतदान असल्यास ८ तारखेला संध्याकाळी ५.३० वाजता प्रचार बंद होईल. म्हणजेच या कालावधीमध्ये कोणतीही प्रचार सभा घेता येणार नाही. तसेच कोणत्याही दिवशी रात्री १०.०० नंतर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही तसेच मोर्चे, सभा इ. घेता येणार नाहीत.

५.१ जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर उमेदवार मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून तसेच घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील. मात्र माईकचा वापर करता येणार नाही आणि समूहाने फिरता येणार नाही.

६. शासनाच्या जाहिराती :

आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासन खर्चाने कोणत्याही जाहिराती देण्यावर बंदी असल्यामुळे अशा जाहिरातीमधून पक्षांच्या नेत्यांचे फोटो देखील छापण्यावर बंदी आहे. त्यामुळे निवडणूक आचारसंहिता लागू असणाऱ्या क्षेत्रामध्ये असलेले पेट्रोलपंप व इतर ठिकाणी जर केंद्र व राज्य शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये मा. पंतप्रधान, मा. मुख्यमंत्री अथवा अन्य नेत्यांचे फोटो असल्यास, अशा जाहिराती काढून टाकाव्यात अथवा काढून टाकणे शक्य नसल्यास त्या झाकून ठेवण्यात याव्यात. (आयोगाचे पत्र क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.५/का.५, दि.१६/०१/२०१७)

लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात आलेल्या विकास कामांच्या नामफलकांना/ जाहिरातींना कलर फासून त्याचे विद्रुपीकरण न करता त्या काढून ठेवणे शक्य नसल्यास त्या झाकून ठेवण्यात याव्यात. (आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.१५/का.५, दि. २०/०९/२०२१)

७. जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी :

जाहीर प्रचार करण्याचा कालावधी संपल्यानंतर मतदान समाप्तीच्या पुढील एक तासापर्यंतच्या कालावधीत जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी (Exit Poll) घेणे व त्याचे निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर बंदी राहील. सदर कालावधीमध्ये वर्तमानपत्रे, नियतकालिके, माहितीपत्रके, फलक किंवा तत्सम प्रसिध्दी, खाजगी किंवा सरकारी रेडीओ, टि.व्ही. केबल, डीटीएच, प्रादेशिक किंवा स्थानिक केबल टि.व्ही., सॅटलाईट, एसएमएस, इंटरनेट, फेसबुक आणि तत्सम उपलब्ध सोशल मिडीया याद्वारे जनमत चाचणी व मतदानोत्तर चाचणी यांचे असे कुठलेही निष्कर्ष प्रसिध्द करता येणार नाहीत. (आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का.१०, दि.०९ /१०/२०२५)

८. नकली (डमी) मतपत्रिका:

उमेदवारांनी नकली (डमी) मतपत्रिका आपल्या मतदारांना माहिती देण्यासाठी छापण्यास हरकत नाही. तथापि, सदर मतपत्रिकेवर त्यांनी स्वतःचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह, इतकीच माहिती त्यावर छापावी. अन्य कोणत्याही उमेदवाराचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह, नकली मतपत्रिकेवर छापण्यात येऊ नये. दुसऱ्या उमेदवाराचे नाव छापलेली

मतपत्रिका आढळून आल्यास त्या जप्त करुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. तसेच ज्या रंगाची मतपत्रिका संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे त्याऐवजी दुसऱ्या रंगाची नकली मतपत्रिका छापण्याची परवानगी द्यावी. तसेच सदर मतपत्रिका मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिकेपेक्षा वेगळ्या आकाराची असावी, जेणेकरुन त्यामधील फरक त्वरित लक्षात येईल.

९. **नकली (डमी) बॅलेट युनिट :**

उमेदवार तसेच राजकीय पक्षांनी नकली (डमी) बॅलेट युनिट तयार करुन घेण्यास हरकत नाही. त्याद्वारे मतदारांना त्याची माहिती देणे सुलभ होईल. मात्र, अशी नकली बॅलेट युनिट लाकडी, प्लास्टिक अथवा प्लायवूडची असावीत व ती अधिकृत बॅलेट युनिटच्या अर्ध्या आकाराची असावीत व त्यास अधिकृत बॅलेट युनिटला असलेला रंग वगळून अन्य रंगामध्ये ती तयार करण्याची अनुमती द्यावी.

१०. **अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी :**

राजकीय पक्ष तथा उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्र तसेच त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक सापडणे सुलभ व्हावे यासाठी अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी देण्यास हरकत नाही. त्यावर मतदाराचे नाव, प्रभाग क्रमांक व जागा क्रमांक, मतदान केंद्राचा क्रमांक, मतदाराचा अनुक्रमांक इत्यादी माहिती छापण्यास हरकत नाही. सदरची चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी, मात्र त्यावर कोणत्याही राजकीय पक्ष, उमेदवार अथवा त्याचे निवडणूक चिन्ह तसेच त्यावर कोणतीही घोषणा अथवा कोणत्या उमेदवारास मत देण्याबाबतचे आवाहन छापता कामा नये.

उमेदवाराचे / पक्षाचे निवडणूक चिन्ह यांची छपाई केलेली अशी ओळखचिठ्ठी मतदान केंद्रापासन १०० मीटर अंतराच्या आत कोणतीही व्यक्ती वाटताना आढळून आल्यास सदर व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

११. **प्रचारासाठी आवश्यक परवानग्या:**

प्रचारासाठी सर्वसाधारणपणे खालील परवानग्या मागितल्या जातात व त्यासाठी खालीलप्रमाणे व्यवस्था करता येईल.

निवडणुकी दरम्यान लागणारे विविध परवाने

अ. क्र.	परवानगीचा तपशील	परवानगी देणारे अधिकारी/ विभाग	परवानगीसाठी करावयाची पूर्तता
१	चौक सभा व सर्व प्रकारच्या जाहीर सभा	पोलीस विभाग	१. अर्ज २. जागा मालकाचे संमतीपत्र ३. स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना हरकत-दाखला
२	पोस्टर्स/ झेंडे सभेच्या ठिकाणी लावणे	संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था	१. अर्ज २. खाजगी जागा असल्यास मालकाचे संमतीपत्र ३. स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना हरकत-दाखला
३	खाजगी जागेवर जाहिरात फलक (कटआऊट वगळून)	संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था	१. अर्ज २. खाजगी जागेच्या मालकाचे संमतीपत्र ३. फलक लावल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांना देणे आवश्यक आहे.
	प्रचार / वाहन परवानगी		
४	फक्त उमेदवाराच्या मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रापर्यंत	निवडणूक निर्णय अधिकारी	१. अर्ज २. वाहन मालकाचे संमतीपत्र ३. वाहन नोंदणीपत्र ४. वाहनचालक परवाना
५	उमेदवाराचे तात्पुरते प्रचार कार्यालय	पोलीस विभाग व निवडणूक निर्णय अधिकारी	१. अर्ज २. जागा मालकाचे संमीपत्र ३. स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत-परवाना
६	हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरविणे	संचालक, नागरी विमान सेवा	१. अर्ज २. जिल्हाधिकारीपोलीस आयुक्त नाहरकत / ३. स्थानिक स्वराज्य संस्थेने आकारलेले शुल्क भरलेची पावती तसेच त्याचा ना हरकत-दाखला ४. P.W.D., Fire, Ambulance ची एनओसी
७	ध्वनिक्षेपकाची परवानगी	पोलीस विभाग	१. अर्ज पोलीस ना-हरकत/ परवानगी

निवडणुकीदरम्यान लागणारे विविध परवाने

अ. क्र.	परवानगीचा तपशील	परवानगी देणारे अधिकारी/ विभाग	परवानगीसाठी करावयाची पूर्तता
८	मिरवणूक/ रोड शो	पोलीस विभाग	१. अर्ज २.पोलीस ना-हरकत/ परवानगी
९	प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या जाहीरातींच पूर्वप्रमाणन	प्रसार माध्यम संनियंत्रण समिती १.राज्यस्तरीय समिती - संपूर्ण राज्यात जाहीरात देणे. २.जिल्हास्तरीय समिती - नगरपरिषद/ नगरपंचायत तसेच ग्रामीण स्था.स्व. सं. ३.महानगरपालिकास्तरीय समिती - महानगरपालिका निवडणुकांकरिता	राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०९/१०/२०२५ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार विहित नमुन्यात यथास्थिती राज्यस्तरीय/ जिल्हास्तरीय/ महानगरपालिका स्तरीय समितीकडे अर्ज करणे आवश्यक.

१२. विविध परवानगी देणेकामी एक खिडकी योजना :

विविध परवानगी देणेकामी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात एक खिडकी योजना राबवावी. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/ जिपपंस-२०१६/प्र.क्र.३०/का.७, दि.२३/११/२०१६ पहा) यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करणेकामी संबंधित महानगरपालिका आयुक्त व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी योग्य ती उपाययोजना करावी, यासाठी भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/INST/२०१४-EPS, दि. २० मार्च, २०१४ पहावेत. उदा. :-

- परवानगी देणेसंदर्भात पोलीस विभाग तसेच आवश्यक त्या सर्व संबधित विभागांशी संपर्क साधून त्यांच्या प्रतिनिधींची नियुक्ती तात्काळ करून घ्यावी. सदर अधिकारी हा परवानगी कक्षामध्ये त्या विभागाचा प्रतिनिधी असेल व तो सदर विभागाच्या वतीने ना-हरकत दाखला देण्यास जबाबदार असेल. सबब, अशा दर्जाचा सक्षम अधिकारी नेमण्याची विनंती संबधित विभागास करावी.
- आवश्यकतेनुसार वर्ग-३ व ४ चे कर्मचारी देखील नेमावेत.
- एक खिडकी कार्यालयात आवश्यक मुलभूत साधनसामुग्री असावी.
- प्रत्येक उमेदवार / राजकीय पक्ष आवश्यक परवानगीसाठी परवानगी कक्षाकडे किमान ४८ तास आधी अर्ज करतील.

- उमेदवार / राजकीय पक्ष जास्तीत जास्त ७ दिवस आधी (अर्जाचा दिवस वगळून) पुढे आयोजित करावयाच्या मिरवणुका, सभा, इतर कार्यक्रमासाठी अर्ज करू शकतील.
- एकाच दिवशी होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.
- दोन किंवा अधिक प्रभागांमध्ये विभागल्या गेलेल्या वा समाविष्ट होणाऱ्या जागांवर एखादा कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास संबंधित परवानगी कक्षाकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल.
- परवानगी कक्षाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची नोंद ठेवणेकामी एक रजिस्टर ठेवावे, ज्यामध्ये प्राप्त अर्ज सर्व विभागांच्या प्रतिनिधींकडे पाठविण्यापासून, अंतिम निर्णय घेवून परवानगी देणे वा नाकारण्यापर्यंतच्या सर्व नोंदी (दिनांक व वेळ) घेण्यात येतील.
- वाहतूक नियंत्रण कक्षाशी संबंधित सर्व परवानगी ह्या परवानगी कक्ष प्रमुख संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेईल. अर्जदाराला त्यासाठी वाहतूक विभागाकडे जाण्याची आवश्यकता भासणार नाही.
- या व्यतिरिक्त आवश्यक असणाऱ्या अग्निशामक दल व इतर स्थानिक प्राधिकरणाकडील परवानग्या प्राप्त करुन घेवून कोणत्याही परिस्थितीत अर्ज प्राप्त झाल्यापासून ३६ तासात परवानगी दिली जाईल वा नाकारली जाईल.
- ३६ तासापेक्षा अधिक कालावधीसाठी प्रलंबित असणारे अर्जाबाबत योग्य ती कारणमिमांसा नमूद करुन तसा अहवाल महानगरपालिका आयुक्तांकडे पाठविला जाईल.

३६ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी एक खिडकी योजनेमध्ये प्रलंबित असणारे अर्ज

अ.क्र.	प्रभाग क्र. व नाव	परवानगी कक्षाच्या प्रमुखाचे नाव व पद	परवानगी कक्षाच्या प्रमुखाचे भ्रमणध्वनी	३६ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित अर्जांची संख्या	प्रकरणनिहाय प्रलंबित राहण्याचे कारण
१	२	३	४	५	६

- एक खिडकीमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जावर प्राप्त होण्याच्या क्रमानुसार (First Come First Served) कारवाई करण्यात येईल.
- एक खिडकीमधून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक परवानगीची प्रत ही निर्वाचक अधिकाऱ्यांना एक तासाच्या आत दिली जाईल. निर्वाचक अधिकारी सदरची प्रत त्यांच्या आचारसंहिता पथकाला व्हिडीओ शुटिंग वा इतर कार्यवाहीसाठी पाठवतील. या सर्वांची रजिस्टरमध्ये नोंद ठेवली जाईल.
- राजकीय पक्ष वा उमेदवार यांचेकडून शासकीय हेलिपॅड, विमानतळ इ. च्या वापराची परवानगी महानगरपालिका आयुक्त तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचेकडे किमान २४ तास अगोदर घेणे आवश्यक राहील. सदर परवानगी घेतेवेळी संपूर्ण प्रवासाचा आराखडा, वेळ, प्रवासी यांच्या नावासह तपशिल देणे आवश्यक राहील.

- सदर एक खिडकी योजनेमध्ये विविध विभागाच्या ना-हरकत परवानगी देण्याकामी खालीलप्रमाणे अधिकारी सहभागी होतील.

    (i) पोलीस विभागाचा अधिकारी

    (ii) स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी,

    (iii) अग्निशमक दलाचा अधिकारी

    (iv) विद्युत महामंडळाचा अधिकारी

    (v) वाहतूक नियंत्रण कक्षाचा अधिकारी

- उपरोक्त अधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या एक खिडकी कार्यालयात उपस्थित राहतील. प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची छायांकीत प्रत घेऊन त्यावर ना-हरकत देणे/ निर्णय घेणे यासारखी आवश्यक ती कार्यवाही त्याच दिवशी तातडीने करतील. यावेळी देखिल First Come First Served तत्वावर कार्यवाही करण्यात येईल.
- एक खिडकी योजने संदर्भात सर्व उमेदवार / राजकीय पक्ष यांना माहिती द्यावी.

१३. **राजकीय पक्ष अथवा उमेदवारांनी करावयाच्या जाहिरातीवरील निर्बंध :**

(i) राजकीय पक्ष अथवा उमेदवारांनी सादर केलेल्या रेडिओ वा टेलिव्हिजन यासारख्या माधमातून करावयाच्या जाहिरातीची ध्वनीफित / चित्रफीत / सीडी इत्यादी साहित्याची तपासणी करण्यासाठी तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी महानगरपालिका निवडणूकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करणेबाबत आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि.०९/१०/२०२५ प्रमाणे कार्यवाही करावी.

(ii) तसेच सदर समितीने छापील प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या बातम्यांमध्ये राजकीय पक्ष किंवा उमेदवारांकडून छुपी जाहिरात म्हणजे **"पेड न्यूज"** बाबत आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि.०९/१०/२०२५ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

१४. स्थानिक **स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून (Discretionary Grant) खर्च करण्यावर निर्बंध:**

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ-२०१६/लोस्वेनि/ प्र.क्र.१२/ सं.क., दि. ५ ऑक्टोबर, २०१६ व पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का-६, दिनांक २०/१२/२०१६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने आधीपासून

किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापासून त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर लोकप्रतिनिधीनी (जसे- खासदार, मंत्री, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, सदस्य इ.) स्वेच्छानिधीतून खर्च करता येणार नाही. याबाबतचे आदेश महानगरपालिका आयुक्त काढतील. तरी वरील निर्बंध न पाळल्यास, ते काम मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे गृहित धरुन अशा कामांना स्थगिती देण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निदेश देण्यात आले आहेत.

१५. उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा :

१५.१ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा/२०२५/प्र.क्र.४५/का-५, दि. २९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे विहीत केली आहे :-

महानगरपालिका		
अ.क्र.	सदस्य संख्या	निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा
१	बृहन्मुंबई	१५,००,०००
२	अ वर्ग (पुणे व नागपूर)	१५,००,०००
३	ब वर्ग (पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे)	१३,००,०००
४	क वर्ग (कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार)	११,००,०००
५	ड वर्ग (उर्वरित १९ महानगरपालिका)	९,००,०००

१५.२ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४ नुसार "निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराने सुध्दा) नामनिर्देशन पत्र दाखल केल्यापासून निकाल राजपत्रात प्रसिध्द होईपर्यंत दैनंदिन जमा व खर्चाचा हिशोबाची नोंद करावयाची आहे तसेच निवडणुकीचा दैनंदिन खर्च ऑनलाईन दररोज भरावयाचा आहे. मात्र निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर संपूर्ण जमा खर्चाचा हिशोब शपथपत्रासह ३० दिवसांच्या आत संबंधित कार्यालयात प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक आहे. मात्र नामनिर्देशन पत्र मागे घेणाऱ्या उमेदवारांना खर्चाचा हिशोब सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केलेल्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार हे महानगरपालिकेच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

१५.३ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४ अन्वये उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची कालमर्यादा व रित विहित केली आहे.

निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने राष्ट्रीयकृत बँक / शेड्युल/ सहकारी बँकेत एक स्वतंत्र खाते (बचत अथवा चालू खाते) उघडून त्या खात्याचा तपशिल नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करावा.

उमेदवाराने निवडणुकीदरम्यान केलेल्या खर्चाबाबत सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपतत्रे यांचे नमुने देखील सदर आदेशात विहित करण्यात आले आहेत.

ज्या व्यक्तींना झेडप्लस सुरक्षा पुरविण्यात आली आहे अशा व्यक्तींना आचारसंहितेच्या कालावधीत बुलेटप्रुफ वाहनांचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल. मात्र बुलेटप्रुफ वाहनांचा वापर अशासकीय कारणांसाठी करण्यात आल्यास सदर वाहन वापरावरील खर्च त्या विशिष्ट व्यक्तीला सोसावा लागेल.

१६. निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केल्यास येणारी अनर्हता :

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१ई) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १० (१ई) नुसार संबधित निवडणुकांमध्ये उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीमध्ये आणि आवश्यक केलेल्या रितीने सादर करण्यात कसूर केली तर तो पाच वर्षाच्या कालावधीकरीता निवडणूक लढविण्यास अनर्ह ठरतो.

महानगरपालिकेच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त यांना निवडणुकांमधील खर्च सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. अशी अनर्हता त्यांनी आदेशित केल्यास, कलम १६ (१फ) व १० (१फ) नुसार, अशी कोणतीही निरर्हता दूर करण्याचे किंवा कमी करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित आहेत. अशा प्रकरणात सक्षम प्राधिकाऱ्याने उमेदवाराला अनर्ह ठरविल्याबाबत पारित केलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या उमेदवाराने विनंती अर्ज करता येईल. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४).

सबब, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अनर्हतेबाबतच्या उपरोक्त तरतुदींची पूर्वकल्पना निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना दयावी व निवडणूक खर्च सादर करणेबाबतचे विहित हमीपत्र त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावे. खर्चाचा हिशोब प्राप्त करून घेणेकामी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी / महानगरपालिकेने एक स्वतंत्र टिम नेमावी; जेणेकरुन उमेदवारांना आवश्यक बाबी समजावून सांगणे, निवडणूक खर्च वेळीच सादर न केल्यास संबंधीत उमेदवारास आठवण करुन देणेकामी नोटीस काढणे, काही त्रुटी असल्यास तात्काळ पूर्तता करुन घेणे इ. बाबी वेळोवेळी झाल्याने अनावश्यक विलंब व अडचणी टाळता येतील.

१७. प्रचार फेरी व मिरवणुकीमध्ये किती वाहने :

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र.३१/का.७, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ अन्वये प्रचार फेरी व मिरवणुकीमध्ये किती वाहने वापरावीत इत्यादी बाबत आदेश अद्ययावत करण्यात आले आहेत. त्यानुसार महानगरपालिका निवडणुकांसाठी जास्तीत जास्त १० वाहनांची परवानगी देण्यात आली आहे. यामध्ये जास्तीत जास्त ३ वाहने चारचाकी वा तीनचाकी असतील व इतर वाहने दुचाकी असू शकतील अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच परवानगीशिवाय प्रचारासाठी वाहन वापरावर देखील निर्बंध घालण्यात आले आहेत, तरी सदर बाब तपासावी.

१८. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील तरतुदी :

आदर्श आचारसंहिता जरी केवळ मार्गदर्शक तत्वे असली तरी ज्या वर्तणुकीमुळे निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पडण्यास बाधा निर्माण होईल अशा गोष्टी निवडणूक प्रक्रियेत निषिद्ध राहतील व त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील खालील कलमांच्या आधारे कारवाई करेल.

भारतीय न्याय संहिता २०२३ मधील तरतुदी		
अ.क्र.	कलम	कलमाची अनुषंगिक माहिती
१	कलम १७०	मते मागण्यासाठी लाच देणे या अपराधासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते.
२	कलम १७१	निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे.
३	कलम १७२	निवडणुकांमध्ये तोतयेगिरी करणे.
४	कलम १७४	निवडणुकीत अनुचित प्रभाव पाडल्याबाबत किंवा व्यक्तीरेखेबद्दल
५	कलम १७५	निवडणुकीच्या संबंधात खोटे कथन करणे.
६	कलम १७६	निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे.
७	कलम १७७	निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे.
८	कलम १७०	मते मागण्यासाठी लाच देणे या अपराधासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते.
९	कलम १९७	राष्ट्रीय एकात्मकतेला बाधा आणणारे वक्तव्य करणे, लिखाण करणे, अथवा कृती करणे यासाठी ५ वर्षासाठी शिक्षा व दंड होऊ शकतो.
१०	कलम २१२	कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यास खोटी माहिती देणे
११	कलम २१६	शपथेवर खोटी माहिती देणे
१२	कलम २२३	सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास.

१९. अन्य कारवाई :

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीत ज्या राजकीय नेत्यांनी भाषणात प्रतिस्पर्धी उमेदवाराबाबत अपशब्द वापरले, जाती अथवा धार्मिक तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केले इ. बाबत संबंधितांना नोटीस देऊन त्यांच्यावर कारवाई केली असून त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येसुध्दा वरील अनुचित प्रकार घडल्यावर त्याचप्रकारे नोटीस देऊन त्यांच्याविरुध्द कारवाई करावी. (आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१९/ प्र.क्र.४/का.५, दि.२४/०७/२०१९)

२०. कायदा व सुव्यस्था :

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४१/का.७, दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता महानगरपालिका क्षेत्रात संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्याशी समन्वय साधून उचित कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने विविध मुद्यांबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

प्रकरण - १०

अनामत रक्कम जप्त करणे

१. महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशनपत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे.

उमेदवाराचा प्रवर्ग	महानगरपालिका निवडणुकांकरीता अनामत रक्कम
सर्वसाधारण*	रु.५०००/
अनुसूचित जाती	रु.२५००/
अनुसूचित जमाती	रु.२५००/
नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग	रु.२५००/
सर्व प्रवर्गातील महिला	रु.२५००/

२. **कायदेशीर तरतूद :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र.१० व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६अ मधील तरतुदीनुसार नामनिर्देशन पत्रासोबत जमा करण्यात आलेली अनामत रक्कम ही निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर, उक्त रक्कम ठेवणाऱ्यास किंवा त्याच्या वैध प्रतिनिधीस परत करण्यात आली पाहिजे किंवा महानगरपालिकेच्या खाती जमा करण्यात आली पाहिजे.

३. **अनामत रक्कम परत करण्यासंदर्भातील अटी :**

३.१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र. १०(२) व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६ए (२) व (३) मधील तरतुदीनुसार अनामत रक्कम परत करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

३.२ सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येमध्ये NOTA ला मिळालेल्या मतांचा समावेश होणार नाही याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ जिपपंस-२०१६/प्र.क्र.१२/का-७, दि.१९/५/२०१६ विचारात घ्यावेत.

४. **एकापेक्षा अधिक जागांवर निवडून येणे :**

४.१ एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडून आली तर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र.१२(ह) व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६के मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये आपली पसंती लेखी कळविली पाहिजे. सदर बाबीची पूर्ण कल्पना उमेदवारास द्यावी.

प्रकरण - ११

राज्य निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागण्यात येते असे इतर मुद्दे

१. मतपत्रिका सर्वसाधारणपणे शासकीय मुद्रणालयातून छापून घेण्यात याव्यात. परंतु त्यामध्ये आपणास काही अडचण असल्यास सुरक्षितता, गोपनीयता आणि चिन्हांची योग्य रित्या छपाई करण्याची दक्षता घेऊन खाजगी मुद्रणालयातून छापून घेता येतील. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा २०१४/प्र.क्र.२०/का.०५, दि.१७.११.२०१४

२. उमेदवाराचा पती किंवा पत्नी यांच्या नावावर महानगरपालिकेचे देणे असल्यास उमेदवार निवडणुकीस अपात्र ठरणार नाही.

३. जर शासकीय, निमशासकीय सरकारी संस्थेच्या इमारती मिळत / उपलब्ध नसल्यास मतदान केंद्रे खाजगी विनाअनुदानित शाळेत करता येते.

४. मतदान केंद्रांची प्रसिध्दी करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

५. बिनविरोध निवडणूक वगळता अन्य बाबतीत उमेदवारांचा निकाल जाहीर करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेणे आवश्यक नाही. दोन उमेदवारांना समान मते मिळाल्यास सोडत पध्दतीने विजयी उमेदवार घोषित करता येईल.

६. मतदान / मतमोजणी केंद्रावरील कर्मचाऱ्यांना तसेच निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांना भत्ता भारत निवडणूक आयोगाच्या प्रचलित दराप्रमाणे देण्यात यावा. निवडणुकांमध्ये काम करणारे निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच इतर अधिकारी (यामध्ये प्रभाग रचना तसेच मतदार यादी तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांचा समावेश करता येईल.) यांना मानधन/पारिश्रमिक/अतिकालिक भत्ता नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००६/५१२/ प्र.क्र.८९/ २००६/ नवि-२०, दिनांक १६ जुलै, २००७ अनुसार देता येईल.

७. आठवडी बाजाराच्या दिवसासंबंधी आदेश काढण्यासंबंधीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत.

८. मतमोजणी कक्षात बॅलेट युनिट नेणे आवश्यक नाही.

९. मतदानाच्या दिवशी मतदान यंत्रात बिघाड झाल्यास दुसरे मतदान यंत्र बसविण्यासाठी लागणारा कालावधी त्या केंद्रास वाढवून देता येणार नाही. मात्र, संध्याकाळी ५.३० वाजता जे मतदार रांगेत असतील त्या सर्वांना उलट्या क्रमांकाने चिठ्ठ्या वाटून मतदान करु दयावे.

१०. एखादया मतदान केंद्रावर फेरमतदान घ्यावयाचे असल्यास त्यासंबंधीचा प्रस्ताव पत्राने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा. त्या पत्रामध्ये का फेरमतदान घ्यावे लागत आहे याची कारणे नमूद केलेली असावीत.

११. अधिस्विकृतीधारक वृत्तपत्र प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांना मतदान केंद्रात प्रवेश देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र, मतमोजणीच्या ठिकाणी सुव्यवस्था रहावी व गोंधळ होऊ नये यादृष्टीने दक्षता घेण्यात यावी.

प्रकरण — १२

मतदार यादी, मतदान केंद्र निश्चिती व मतदारांच्या ओळखीचे पुरावे इ. संदर्भातील आदेश व सूचना

असा. क्र. ८ रजिस्टर्ड नं. एमएच/वाय-साजय/२०



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जानेवारी ३१, १९९६/माघ ११, शके १९१७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Opp. Mantralaya, Madame Cama Road,
Mumbai 400 032, dated the 31st January 1996.

Order

CONSTITUTION OF INDIA.

No. SEC. 1096/CR-6/96/D-3.—WHEREAS the superintendence, direction and control of all elections to the Municipalities in the State vest in the State Election Commission, Maharashtra, by virtue of the provisions of Article 243-ZA of the Constitution of India and corresponding provisions made to that effect in the respective Municipal Act;

AND WHEREAS, by the Maharashtra Municipal Corporations, Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial townships (Third Amendment) Act, 1995 (Mah. XI of 1996) the sections of the relevant Municipal Act providing for adapting the Maharashtra Legislative Assembly electoral roll for the purpose of preparing Municipal ward electoral roll and other incidental and elaborate provisions with regard to maintenance, correction, etc. of such ward roll have been substituted by a new section;

AND WHEREAS, although the new section as substituted in each of the Municipal Acts provides for adaptation of the Maharashtra Legislative Assembly electoral roll for preparation of Municipal ward electoral roll, it does not provide for the incidental and elaborate provisions with regard to the maintenance, correction, etc. of such ward roll;

AND WHEREAS, it is expedient to make such provisions with regard to Municipal ward rolls;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by Article 243-ZA of the Constitution of India, read with sub-section (4) of section 18A of the Bombay Municipal Corporation Act (Bom. III of 1888), sub-section (4) of section 9-B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C. P. and Berar II of 1950), sub-section (4) of section 14 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949), sub-section (4) of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), and of all other powers enabling me in this behalf, and in relation to the preparation of electoral rolls for the purpose of municipal elections under the superintendence, direction and control of the State Election Commission, I, D. N. Chaudhari, State Election Commissioner, Maharashtra, hereby direct as follows :—

1. The authenticated ward roll or voters' list shall be kept in the chest or safe under the lock and key by such officer not below the rank of an Assistance Commissioner or the Chief Officer as—

(*a*) in the case of a Municipal corporation, the Municipal commissioner ; and

(*b*) in the case of a Municipal Council, the Collector, may designate and the officer so designated shall be responsible for the safe custody of such ward roll or voters' list.

2. (*a*) At the time of every election, the Municipal Commissioner or the Chief Officer of the Municipal Council, as the case may be, shall issue a public notice informing the date on and from which and the place at which the ward roll or the voters' list shall be kept open for public inspection. Such public notice shall be displayed on the notice board of the office of Municipal Corporation or the Municipal Council, as the case may be, and on such conspicuous place or places in the ward as the Municipal Commissioner or the Municipal Chief Officer may direct and also in one of the local newspapers widely circulated in the municipal area.

(*b*) Before issue of such public notice, the officer designated by the Municipal Commissioner, or, as the case may be, the Collector under clause 1 shall carry out in the authenticated copy of the ward roll or the voters' list of each ward all corrections which might have been made in the Maharashtra Legislative Assembly electoral roll till the date notified by State Election Commissioner for preparation of ward roll or voters' list under the respective provision of the relevant municipal law; and each such correction so made shall be initialed with date by such officer.

D. N. CHAUDHARI,
State Election Commissioner, Maharashtra.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३३/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय समोर,
मादाम कामा रोड, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक- २३ डिसेंबर, २००४.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील मतदार यादी

महोदय

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार मतदार यादी तयार करणे व पुरवणी यादी तयार करणे ही निरंतर प्रक्रिया आहे. असे असताना देखील सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग जी तारीख अधिसूचित करील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी उपलब्ध करुन देण्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी विधानसभा मतदार संघ मतदार यादी ही ज्या दिनांकास अंतिम करण्यात प्रसिध्द झाली असेल तीच उपलब्ध करुन देतात व यानंतर कोणतीही पुरवणी यादी प्रसिध्द झाली नाही, असे प्रमाणपत्र देतात.

२. राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे यासंबंधी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० अनुसार कार्यवाही करावी व राज्य निवडणूक आयोग जी तारीख निश्चित करील त्या तारखेपर्यंत अद्ययावत केलेली यादी उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे याबाबतचा पाठपुरावा सातत्याने केला असून, उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सर्व जिल्हाधिकारी व सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांना पत्र क्रमांक-इलेक्शन-१००४/प्र.क्र.५६५/०४/३३, दिनांक- ८ डिसेंबर, २००४ अन्वये योग्य त्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या पत्राची एक प्रत आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे. यापुढे या पत्रात नमूद केल्याप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेपर्यंतची अद्ययावत मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्राप्त करुन घ्यावी, ही विनंती.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला.

(महेन्द्र ब. वारभुवन)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

M:\mane\Documents and Settings\PATIL\My Documents\rnb23.doc

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,

*सर्व विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी

*सर्व विधानसभा मतदार संघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी

(* जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे मार्फत)

क्रमांक: ईएलआर–१००४/प्र.क्र. ५६५/०४/३३, सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८ डिसेंबर २००४

विषय :– स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी मतदार यादी

महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार राज्य निवडणूक आयोग जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीवरुन स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी प्रभाग निहाय मतदार यादी तयार करावी लागते. तथापि, या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, सर्वसाधारणपणे विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी ही ज्या दिनांकास अंतिमरित्या प्रसिध्द् झालेली असेल तीच मतदारयादी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन दिली जाते व " यानंतर कोणतीही पुरवणी यादी प्रसिध्द् झाली नाही" असे प्रमाणपत्र देण्यात येते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी विधानसभा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून अद्ययावत मतदार याद्या उपलब्ध करुन देण्यात येत नसल्यामुळे मतदार यादी प्रसिध्द् झाल्याच्या दिनांकापासून ते राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रयोजनासाठी ज्या दिनांकास अस्तित्वात असलेली मतदार यादी उपयोगात आणावयाचे अधिसूचित करेल त्या दिनांकापर्यंत मतदार यादीमध्ये पात्र मतदारांची नांवे मतदार यादीमध्ये अंतर्भूत न केल्यामुळे असे मतदार हे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीमध्ये मतदानापासून वंचित राहतात.

२. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील तरतूदीनुसार विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी ही भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या अर्हता दिनांक धरुन तयार केली जाते व त्यामध्ये सुधारणा केल्या जातात. भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादी तयार करुन ती अंतिमरित्या प्रसिध्द् केल्यानंतर अशी मतदार यादी ही

उपरोक्त अधिनियमाच्या कलम २१(१) मधील तरतूदीनुसार अंमलात येते. अंतिमरित्या प्रसिध्द् झालेल्या मतदार यादीमध्ये जर एखाद्या पात्र मतदाराचे नांव अंतर्भूत करावयाचे राहून गेले असल्यास किंवा मतदार यादीतील एखादी नोंद ही चुकीची किंवा सदोष असल्यामुळे दुरुस्त करावयाची असल्यास, मतदार संघातील एखाद्या संबंधीत व्यक्तीने मतदार संघातील तिचे सर्वसाधारण वास्तव्याचे ठिकाण स्थलांतरण केल्यामुळे तिच्या नांवाची नोंद ही मतदार यादीमध्ये स्थानांतर करावयाची असल्यास आणि एखादा मतदार हा मृत्यु पावल्यामुळे अथवा मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी राहिला नसल्यामुळे अशा मतदारांच्या नांवाच्या नोंदी वगळणे आवश्यक असल्यास तर संबंधीत मतदार नोंदणी अधिकारी हा उक्त अधिनियमातील कलम २२ व २३ मधील तरतूदीनुसार मतदार यादीमध्ये यथास्थित नवीन नांव नोंदवणे, वगळणे अथवा त्यामध्ये सुधारणा करणे या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करु शकतो. मात्र अशी कार्यवाही ही त्या मतदार संघासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणूकांसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करावयाच्या शेवटच्या दिनांकापासून ते निवडणूकीची प्रक्रिया संपेपर्यंतच्या कालावधीत करता येत नाही.

३. अधिनियमातील ही तरतूद लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी अंतिमरित्या प्रसिध्द् केलेल्या मतदार यादीबरोबरच मतदार नोंदणी अधिकाऱ्याने मतदार यादी अंतिमरित्या प्रसिध्द् केल्यानंतर प्राप्त झालेले दावे व हरकती निकाली काढल्यानंतर निरंतर पुनरिक्षण प्रक्रिये अंतर्गत तयार करण्यात आलेली व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मागणी केलेल्या दिनांकापर्यंत अद्ययावत केलेली पुरवणी यादी ही उपलब्ध करुन देण्यात यावी अशा सूचना सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात याव्यात, ही विनंती.

४. कृपया या पत्राची पोच द्यावी.

(के. व्ही. कुरुंदकर)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
निवडणुकांच्यावेळी वापरावयाच्या
मतदार यादीबाबत.

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-२०१५/प्र.क्र.३ /प्रकल्प कक्ष
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/०४/२०१५

आदेश

ज्याअर्थी,भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकाचे आयोजन करण्याची अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १९ (ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७-अ महाराष्ट्र नगरपालिका, नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा.५) च्या कलम १३, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १२ अन्वये लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या तरतुदीअन्वये महाराष्ट्र विधानसभेसाठी तयार केलेली आणि राज्य निवडणूक आयुक्त यांनी अधिसूचित केलेल्या दिनांकाची असलेली मतदार यादी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता विभागून व अधिप्रमाणित करुन वापरण्याबाबत तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे राज्यामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी वापरावयाची मतदार यादी तयार करण्याची सर्व कार्यवाही जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांकडून करण्यात येते.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी (मुदत संपणाऱ्या) जाहीर केलेला विशिष्ट दिनांक ग्राह्य धरुन विधानसभेसाठी तयार करण्यात आलेली मतदार यादी जशीच्या तशी त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते.

श्री. कुलाने
महत्त्वाचे आदेश.
आजचा
३/५

आणि ज्याअर्थी, मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्याबाबतची प्रक्रिया लोकसभा / विधानसभेच्या निवडणुकांपूर्वी ज्या गांभीर्याने केली जाते, त्याच गांभीर्याने ती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी सुध्दा करण्याची गरज आहे.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जाहीर केलेला विशिष्ट दिनांक लक्षात घेता भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी यांनी तयार केलेली मतदार यादी अद्ययावत करण्यात आली आहे किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा. ५) च्या कलम ९ए(४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता <u>मतदार यादी बिनचूक, त्रुटीविरहीत तयार करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे</u> :-

<u>१) नवीन मतदारांची नोंदणी करणे-</u>

i) सर्व जिल्हाधिकारी यांनी मुदत संपणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वर्षनिहाय व महिनानिहाय कॅलेंडर तयार करावे.

ii) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सार्वत्रिक निवडणुका असतील त्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ग्राह्य धरण्यात येणारी विशिष्ट दिनांकाच्या कमीत कमी ६ महिने अगोदरपासून त्यांनी मतदार जागृती कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवावा. त्यामध्ये १८ वर्षांच्यावरील सर्व पात्र व्यक्तींची नावे मतदार यादीमध्ये नोंदविली जातील या दृष्टीने जनजागृती करावी. यासाठी जिल्हाधिकारी यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. प्रसंगी त्याकरीता शासनाच्या निरनिराळे विभाग, स्वयंसेवी संस्था, खाजगी कंपन्या इ. यांची मदत घ्यावी. १८ वर्षावरील एकही पात्र व्यक्ती विशिष्ट दिनांकास नोंदणीशिवाय राहणार नाही याकडे जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक राहील.

iii) राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, सूचना व अर्ज संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास त्यावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी वेळेवर भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

२) मतदार याद्या त्रुटी / चूका विरहीत होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे -

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या ग्राह्य धरण्यात येणारी विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी जशीच्या तशी त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रभाग, मतदार विभाग, निर्वाचक गण इत्यादी प्रमाणे या मतदार यादीचे विभाजन करुन प्रारुप यादी प्रसिध्द करण्यात येते व त्यावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात येतात.

आलेल्या हरकतींपैकी १) मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ठ झाली असतील २) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या बाहेर असलेल्या मतदारांची नावे समाविष्ठ झाली असतील किंवा ३) विधानसभा मतदार यादीत नाव असून सुध्दा ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीत समाविष्ठ करण्याचे राहून गेले आहे, अशा हरकती व सूचनांचा फक्त विचार करुन, अधिनियमातील तरतूदींच्या अनुषंगाने या दुरुस्त्या करण्यात येतात.

विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इ. अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नाहीत.

ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी प्रारुप मतदार यादीवर असलेल्या हरकती अंतिम करताना मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (Booth Level Officer) प्रत्येक मतदाराच्या निवासस्थानी / पत्त्यावर भेट देणे क्रमप्राप्त आहे.

यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सर्व चुका / त्रुटींसंदर्भात माहिती व्यवस्थित गोळा करावी. उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद ३ प्रकारच्या हरकती / सूचनांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थेची मतदार यादी अधिप्रमाणित

करणाऱ्या अधिकाऱ्याने दुरुस्ती करावी, उर्वरित त्रुटी / चुकांसंदर्भात प्राप्त झालेली माहिती भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठवावी. मतदार नोंदणी अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे त्यांची दखल घेऊन मतदार यादी दुरुस्ती करावी.

३) भारत निवडणूक आयोगाने नुकताच राष्ट्रीय मतदार याद्या शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम "NERPAP-National Electoral Electoral Rolls Purification and Authentication Programme" हाती घेतला आहे. यात मतदाराचा आधार कार्ड नंबर हा मतदार ओळखपत्राशी (EPIC DATA) लिंक करण्याचे प्रस्तावित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) यांनी मतदाराच्या निवासस्थानाच्या भेटीच्यावेळी मतदार ओळखपत्राशी आधारकार्डाची सांगड घालण्याबाबत सुध्दा आवश्यक ती खबरदारी घ्यावी. या कार्यक्रमाअंतर्गत संबंधित जिल्हाधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, मुख्याधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका आयुक्त यांची असेल.

४) राज्य निवडणूक आयोग जिल्हाधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत नियमितपणे आढावा घेईल.

हे आदेश मुख्य निवडणूक अधिकारी यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.
राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

Pradeep V
(प्रदीप व्यास) 4/2015
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत
प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त, (सर्व)
जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायती (सर्व)

मतदार यादीचा अचूक डाटा मिळण्याबाबत धोरण

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ- २०१७/प्र.क्र.९८/संगणक कक्ष
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६/१०/२०१७.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४ व २४३ के/२४३ झेडए अन्वये "superintendence, direction and control of the preparation of electoral rolls" याची संपूर्ण जबाबदारी स्वतंत्रपणे भारत निवडणूक आयोग व संबंधित राज्य निवडणूक आयोगाची आहे. या तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग या दोन्हींना मतदार यादी स्वतंत्रपणे तयार करता येते. मात्र, या दोन्ही याद्यांमध्ये तफावत राहू नये व गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी राज्य शासनाने जाणीवपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमात स्वतंत्रपणे मतदार यादी तयार न करता भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादी वापरण्याची तरतूद केली आहे. ह्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी "विशिष्ट दिनांकास (cut off date)" भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली व अस्तित्वात असणारी विधानसभा मतदार यादी वापरण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता "विशिष्ट दिनांकास" अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्यात येते.

२. मतदार यादी तयार करण्याच्या नियमानुसार मतदारांनी दिलेल्या अर्जावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा मतदार नोंदणी अधिकारी यांचा असतो. मतदार यादी अद्ययावत व बिनचूक करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून निर्गमित झालेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रत्येक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी एक कालबध्द पध्दतीने काम करणे अपेक्षित आहे. जर त्यांनी कालबध्द पध्दतीने कार्यवाही केली नसेल तर त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करता येते.

३. राज्य निवडणूक आयोगाने २०१५ पासून विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन संगणकाच्या सहाय्याने करण्यास सुरुवात केली असून, अशा प्रकारचे विभाजन अत्यंत उपयुक्त ठरलेले आहे. यामुळे वेळेचा अपव्यय तसेच होणाऱ्या चुका कमी झालेल्या आहेत. मात्र, त्यामध्ये अजूनही काही अडचणी येत आहेत. उदा :-

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश देण्यात आले आहेत. सदर आदेशाच्या परिच्छेद-३ (मतदार यादी अधिप्रमाणित करणे व त्याची अभिरक्षा) मध्ये मतदार यादीचे विभाजन करुन मतदार यादी अधिप्रमाणित करण्याची जबाबदारी कोणावर राहील हे नमूद केलेले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत "महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी" याऐवजी **"महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला सहायक आयुक्त दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी"** असे वाचण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) १२.११.२०२५

सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत - १. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
२. विभागीय आयुक्त, कोकण विभाग
३. जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर
४. निवड नस्ती

D:\Pradip\Corporation Note.docx

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश –

मतदार यादीत संभाव्य दुबार नावांबाबत करावयाची उपाययोजना

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ-२०२५/ग्रापंनि/प्र.क्र.०३/का.८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ ऑक्टोबर, २०२५

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का.८, दिनांक १६ जुलै २०२५ चे आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे अधीक्षण, संचलन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १९(ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम १३, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम१२ अन्वये,राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात

असलेली विधानसभेची मतदार यादी (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या तरतुदीन्वये तयार केलेली) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता संबंधित महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत, ग्रामपंचायत यांचे प्रभाग तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती निर्वाचक गणात विभागून व अधिप्रमाणित करुन वापरण्याबाबत तरतूद आहे;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी संबंधित महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत, ग्रामपंचायत यांचे प्रभागामध्ये; तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती निर्वाचक गणात विभागून वापरण्यात येते, मात्र असे करीत असताना सदर मतदार यादीमध्ये मूळ विधानसभा मतदार यादीत नसलेली कोणतीही नवीन नावे समाविष्ट करण्याचे अथवा मूळ विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे; तसेच त्यामध्ये कोणत्याही दुरुस्त्या करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास किंवा राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी तयार करण्याकरिता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत;

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी मतदार यादी बिनचूक असणे आवश्यक आहे; या तत्वाचे पालन करण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीत संभाव्य दुबार नावे आढळल्यास त्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपध्दती स्पष्ट करणे गरजेचे आहे, असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, भारतीय संविधानातील उपरोक्त नमूद तरतुदी व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिनियमांतील तरतुदींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देत आहे :

१. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येते. सदर मतदार यादी महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत, ग्रामपंचायत यांमध्ये प्रभागनिहाय; तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय विभागणी करुन प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येते. या यादीवर जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात येऊन, प्राप्त हरकती व सूचनांवर योग्य तो निर्णय घेऊन, ती प्रभागनिहाय, जिल्हा परिषद निवडणूक विभागनिहाय/पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय अंतिम मतदार यादी म्हणून प्रसिद्ध करण्यात येते. सदरची कार्यवाही राज्यामधील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नेमण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून करण्यात येते.

२. या दरम्यान, विविध माध्यमातून राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रारुप अथवा अंतिम मतदार यादीत काही नावे एकापेक्षा अधिक वेळा (दुबार, तिबार, ..., ...) आली आहेत. सदर बाबींची दखल घेऊन; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये वापरण्यात येणारी मतदार यादी ही शक्य तितकी अचूक असावी, या दृष्टिकोनातून संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी :-

(१) राज्य निवडणूक आयोगाने त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मतदार यादी डाऊनलोड करून व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी संकेतस्थळावर Access मिळावा म्हणून लॉगिन आयडी व पासवर्ड उपलब्ध करून दिला जातो, त्याचा वापर करून त्या अधिकाऱ्यांनी लॉगिन करावे.

(२) सदर लॉगिन आयडी व पासवर्डचा वापर करून Access केल्यानंतर "Report" या मुख्य टॅबखाली "दुबार रिपोर्ट" असा सबमेन्यू देण्यात आलेला आहे. या सबमेन्यूवर Click केल्यावर आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीमध्ये किती मतदारांची नावे एकापेक्षा अधिक वेळा आलेली आहेत, त्यांची यादी सविस्तर तपशिलासह दिसून येते. या मतदार यादीमध्ये संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर(**) असे चिन्ह दिलेले आहे. या यादीतील संभाव्य दुबार मतदारांबाबत स्थानिकरित्या तपासणी करून ती खरोखरच एकाच व्यक्तीची आहे किंवा वेगळ्या व्यक्तींची आहे, याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. यासाठी मतदाराचे नाव, लिंग, पत्ता व छायाचित्र याची प्राथमिक तपासणी करून त्यांत साम्य आढळून आल्यास संबंधित मतदाराशी संपर्क साधून त्याच्याकडून आवश्यक माहिती मिळवावी.

(३) त्यानुसार एकापेक्षा जास्त नाव असलेला मतदार हा प्रत्यक्षात एकच व्यक्ती आहे, याची खात्री झाल्यानंतर त्या मतदाराकडून तो नेमका कोणत्या प्रभागातील, जिल्हा परिषद निवडणूक

विभागातील/पंचायत समितीच्या गणातील मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबतचा अर्ज **(परिशिष्ट एक)** सोबत जोडलेल्या नमुन्यात घेण्यात यावा. त्यानुसार प्राधिकृत अधिकाऱ्याची खात्री पटल्यानंतर संबंधित मतदारास त्याच्या इच्छेप्रमाणे मतदान करण्यासाठी प्रभाग/जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती गण यांतील मतदान केंद्र निश्चित करावे. संबंधित मतदारांस त्याने निवडलेल्या प्रभागातील / जिल्हा परिषद निवडणूक विभागातील/पंचायत समिती गणातील मतदान केंद्रातच मतदान करण्याचा अधिकार असेल व इतर प्रभागात/ जिल्हा परिषद निवडणूक विभाग/ पंचायत समिती गणात देखील नाव असलेल्या अशा मतदाराच्या नावासमोर "दुबार मतदार, प्रभाग / जिल्हा परिषद निवडणूक विभाग/ पंचायत समिती गण क्रमांक ..... मतदार क्रमांक ...." अशी नोंद करून संबंधित मतदार ज्या प्रभागात/ जिल्हा परिषद निवडणूक विभागात/ पंचायत समिती गणात मतदान करणार आहे त्याचा क्रमांक व मतदाराचा अनुक्रमांक नमूद करेल. अशी नोंद झालेल्या मतदारास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही.

(४) जर एकापेक्षा अधिक नावे असलेल्या **मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीमध्ये अशा मतदाराच्या नावासमोर "दुबार मतदार" अशी नोंद घेण्यात यावी. अशी नोंद असलेला **मतदार मतदान केंद्रावर मतदान करण्यास**

आल्यास त्या मतदाराकडून त्याचे नाव असलेल्या **इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत सोबतच्या नमुन्यातील हमीपत्र (परिशिष्ट दोन) लिहून घेण्यात यावे** व अशा मतदाराची काटेकोरपणे ओळख पटवून त्यास मतदान करू देण्याची मुभा द्यावी.

(५) अशा पध्दतीने प्राप्त झालेली हमीपत्रे चिन्हांकित मतदार यादीसाठी असलेल्या लिफाफ्यामध्ये ठेवण्यात यावीत.

३. ही कार्यवाही करताना मतदारांची ओळख पटण्यासाठी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू असलेले अधिनियम, नियम व आदेशांमध्ये नमूद तरतुदींचे मतदान केंद्राध्यक्षांनी काटेकोरपणे पालन करावे.

सदर आदेश राज्यातील सर्व ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागू राहतील.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) २८.१०.२०१५

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-

१. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र, मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त (सर्व)
३. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
४. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
५. मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगर पंचायती (सर्व)
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.

परिशिष्ट-एक

प्रति,
मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी,
---------- जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पंचायत समिती गण
---------- महानगरपालिका प्रभाग
---------- नगरपरिषद प्रभाग/नगरपंचायत प्रभाग
----------ग्रामपंचायत प्रभाग

मी, ---------- ---------राहणार ----------

---------- याद्वारे कळवितो / कळविते की, माझे नाव उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीत खालील प्रभागात /जिल्हा परिषद निवडणूक विभागात / पंचायत समिती गणात समाविष्ट करण्यात आले आहे.

१.

२.

३.

४.

उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मी ---------- प्रभागात / जिल्हा परिषद निवडणूक विभागात/ पंचायत समिती गणातील मतदान केंद्र क्र.-----वर मतदान करू इच्छितो. तरी मला यानुसार मतदान करण्याची परवानगी देण्यात यावी. मला नेमून दिलेल्या मतदान केंद्राशिवाय मी इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करणार नाही.

उपरोक्त नमूद बाबीचा माझ्याकडून भंग झाल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वात असलेल्या निवडणूकविषयक अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार शिक्षेस मी पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक :

मतदाराची स्वाक्षरी

ठिकाण

परिशिष्ट-दोन

मतदाराकडून घ्यावयाचे हमीपत्र (मतदानाच्या दिवशी)

मी, _____,

या द्वारे हमी देतो/देते की, माझे नाव ---------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या -------(प्रभागाचे नाव किंवा क्रमांक / जिल्हा परिषद निवडणूक विभाग /पंचायत समिती गण) या प्रभागातील/ जिल्हा परिषद निवडणूक विभागातील/ पंचायत समिती गणातील मतदार यादीत असून, मी दिनांक ---------- रोजी मतदान असलेल्या ---------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकीत मतदान केंद्र क्रमांक ---------- या मतदान केंद्रावरच मतदान करणार आहे.

मी अशीही हमी देतो/देते की, मी दिनांक ---------- रोजी मतदान असलेल्या ---------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक / पोटनिवडणुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीत कोणत्याही पद्धतीने माझ्या नावाची एक किंवा अनेक ठिकाणी जरी दुबार पध्दतीने नोंद झाली असली तरीही वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मतदान केंद्राशिवाय इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मी मतदान केले नाही व करणार नाही.

मी, हमी देतो/देते की, उपरोक्त परिच्छेदामधील नमूद बाबीचा माझ्याकडून भंग झाल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वात असलेल्या निवडणूकविषयक अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक :

_____

(स्वाक्षरी)

ठिकाण :

(मतदाराचे नाव)

8/8

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.०३/का-५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- २५ नोव्हेंबर, २०२५.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५
मतदार यादीबाबत.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि. १६ जुलै, २०२५ व दि. २९ ऑक्टोबर, २०२५

महोदय,

संदर्भाधिन दि. १६ जुलै, २०२५ च्या आदेशान्वये मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश देण्यात आले आहेत. तसेच दि. २९ ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशान्वये संभाव्य दुबार मतदारांबाबत करावयाची उपाययोजना विहित केली आहे. सदर आदेशांमध्ये अधिक स्पष्टता आणण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सदर आदेशाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे :-

आदेश

विधानसभा मतदार यादीचे महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागात योग्य प्रकारे विभाजन करणे ही संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर जर त्यात काही चुका, उदा. १) लेखनीकांच्या चुका, २) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले, आणि ३) दि. ०१ जुलै, २०२५ च्या विधानसभा मतदार यादीत नावे असूनही संबधित प्रभागात नाव समाविष्ट झाली नाहीत, अशा बाबी स्वत:हून निदर्शनास आल्यास अथवा अन्य मार्गाने निदर्शनास आणण्यात आल्यास त्याची तात्काळ दखल घेऊन अंतिम मतदार यादी तयार करताना त्या चुकांची दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाने सदर बाब विचारात घेऊन अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर चुका दुरूस्त करण्याची तरतुद संदर्भाधिन दि. १६ जुलै, २०२५ च्या आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये केली आहे. त्यामुळे, प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर सुध्दा त्यात कोणत्याही चुका राहिल्याची बाब महानगरपालिका आयुक्तांच्या निदर्शनास आल्यास अशा चुकांची दुरूस्ती अंतिम मतदार यादी तयार करताना स्वत:हून (Suo-moto) करावी. सदर चुकांची दुरूस्ती करण्याकरीता कोणत्याही हरकती प्राप्त होण्याची आवश्यकता नाही.

काही महानगरपालिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याच्या तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे आल्या आहेत. महानगरपालिकेकडे देखील अशा तक्रारी येऊ शकतात. सदर तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित मतदार योग्य प्रभागात समाविष्ट झाले आहेत किंवा कसे याची तपासणी करण्यात यावी आणि जर असे मतदार चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाले असतील तर त्या मतदारांना योग्य प्रभागात समाविष्ट करुन अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात.

मात्र असे करताना केवळ बी.एल.ओ. अथवा तत्सम कर्मचाऱ्यांनी केलेल्या अहवालावर विसंबून न रहाता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याची खातरजमा करुन मतदार यादी सुधारीत करण्याची कार्यवाही करावी. दररोज प्राप्त होणाऱ्या हरकतींची तात्काळ तपासणी करुन शक्यतो त्याच अथवा दुसऱ्याच दिवशी त्याचा निपटारा होईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शेवटच्या दिवशी ताण येणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(सुरेश काकाणी) २५.११.२०२५

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.०३/का-५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- २५ नोव्हेंबर, २०२५.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५
मतदार यादीबाबत.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि. १६ जुलै, २०२५ व दि. २९ ऑक्टोबर, २०२५

महोदय,

मतदार यादीबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारी विचारात घेता मतदार यादीच्या अनुषंगाने खालील बाबी कराव्यात.

१. मतदारांकरीता नाव शोधण्याची (Voters Search) सुविधा :-

राज्य निवडणूक आयोगाच्या https://mahasecvoterlist.in/ वेबसाईटवर Search name in voters list या टॅबमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव शोधण्याची सुविधा देण्यात आली आहे. सर्व महानगरपालिकांना त्यांच्या वेबसाईटवर सदर सुविधेची लिंक उपलब्ध करुन मतदारांच्या सोयीकरीता देता येईल. जेणेकरुन महानगरपालिकेच्या मतदारांना प्रारुप मतदार यादीत आपले नाव योग्य प्रभागात आले आहे किंवा कसे हे तपासणे सोपे होईल.

२. दुबार मतदारांबाबत कार्यवाही मतदान केंद्रनिहाय मतदार यादी करण्यापूर्वी पूर्ण करणे :-

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन दि. २९ ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशान्वये संभाव्य दुबार मतदारांबाबत कोणती कार्यवाही करावी. याबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत. त्यानुसार मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करताना त्यावर दुबार नावांची नोंद होणे आवश्यक

आहे. त्यामुळे दुबार मतदारांबाबत विहित केलेली कार्यवाही मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करण्यापूर्वी निश्चितपणे पूर्ण करावी.

३. मतदार सहाय्यता केंद्र (Help Desk) :-

महानगरपालिकांनी मतदारांना त्यांचे मतदार यादीतील नाव शोधणे सोयीस्कर व्हावे या दृष्टीने महानगरपालिका मुख्यालय अथवा प्रभाग कार्यालयांमध्ये मतदार सहाय्यता केंद्र (Help Desk) सुरू करावे. जेणेकरुन जे नागरिक वेबसाईट अथवा अन्य मार्गाने त्यांचे मतदार यादीतील नाव शोधू शकत नसतील त्यांना आपले नाव शोधणे शक्य होईल. तसेच या ठिकाणी दुबार मतदारांची यादी उपलब्ध ठेवून, दुबार मतदाराना देखील अर्ज भरुन देण्याची सोय ठेवावी.

मतदार यादी विभाजनाची कार्यवाही अचूक होण्याकरीता तसेच त्यामध्ये पारदर्शकता येऊन अधिकाधिक मतदारांना आपले नाव शोधण्याची संधी उपलब्ध करुन देण्याकरीता वरील उपाययोजनांचा महानगरपालिकांनी तात्काळ अवलंब करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Pradip\Corporation Note.docx

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/जिपपंस २०२५/प्र.क्र.३३/का.७,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०००३२
दिनांक:- ०८/१०/२०२५

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद व नगरपंचायत

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादीची प्रत शुल्क आकारुन देण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादीची प्रत (प्रारुप व अंतिम मतदार यादी) प्रतिपृष्ठ रु.२/- (रुपये दोन फक्त) इतका दर आकारुन उपलब्ध करुन द्यावी.

आपला,
शै.सू.वराडे
08/10/2025
(शैलेंद्र वराडे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रकरण — १३

नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी व मतपत्रिकेचा नमुना इ. संदर्भातील आदेश व सूचना

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA

क्रमांक सीबीसी-१०९६/सी-१२५८/प्र.क्र. २३८/मावक-५
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
Social Welfare, Cultural Affairs and
Sports Department.
Mantralaya Annexe, Mumbai 400 032.
दिनांक ५ ऑक्टोबर १९९६.

प्रति,

सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

विषय.—दिनांक १३ जून १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे काही जातींचा विशेष प्रवर्गात समावेश करून त्यांना सवलती देणेबाबत.

संदर्भ.—आपले पत्र क्र. एसईसी/एमएनसी-११९६/प्र. क्र. १९६/का-३, दिनांक २४ सप्टेंबर १९९६.

महोदय,

आपण दिनांक १३ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या जातींच्या संदर्भात जी विचारणा केलेली आहे त्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, विशेष मागास प्रवर्गात समावेश असलेल्या जातीचा समावेश " नागरिकाचा मागास प्रवर्ग " या प्रवर्गामध्ये समावेश होत आहे. केवळ त्यांना विशेष सवलती शासनाने जाहिर केलेल्या आहेत. विशेष मागास प्रवर्गातील काही जाती यापूर्वी इतर मागासप्रवर्गामध्ये समाविष्ट होत्या त्यांचा समावेश विशेष मागास प्रवर्गात झाल्यामुळे इतर मागास प्रवर्गाच्या याद्रीतून त्या वगळण्यात आल्या. (शासन निर्णयाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत) काही जाती प्रथमच विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या आहेत. असे जरी असले तरी त्यांचा समावेश नागरिकाचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी ज्यांचा समावेश करण्यात आलेला आहे त्यामध्ये विशेष मागास प्रवर्गाचा समावेश अंतर्भूत राहील.

आपला,

सही/-
(स. नु. गावीत)
शासनाचे अवर सचिव.

फॅक्स

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक एसईसी/एमएमसी-१९९६/प्र. क्र. १९६/का-३,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ७ ऑक्टोबर १९९६.

प्रति,

आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)

विषय.—महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुका १९९६-९७.
नागरिकांच्या मागासवर्गात विशेष मागासवर्गाचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम २ (१ए) मध्ये नागरिकांचा मागासवर्ग (BACKWARD CLASS OF CITIZENS) या प्रवर्गाची व्याख्या देण्यात आली असून त्यामध्ये राज्य शासनाने वेळोवेळी इतर मागासवर्ग, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती म्हणून जाहीर केलेल्या जातींचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. शासनाच्या समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या दिनांक १३ जून १९९५ च्या शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५ अन्वये इतर मागासवर्गातील काही जाती व काही अन्य जाती यांचा समावेश करून विशेष मागास प्रवर्ग निर्माण करण्यात आला असून सदर वर्गास काही अधिक सवलती जाहीर करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५, दिनांक २४ ऑगस्ट १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या जाती इतर मागासवर्गीयांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गात विशेष मागास प्रवर्गातील जातींचा समावेश होतो किंवा कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे, व त्याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय तसेच अन्य नागरिकांकडून व मागासवर्गीयांच्या काही संघटनांकडून स्पष्टीकरण करण्याची मागणी राज्य निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी समाजकल्याण विभागाकडून त्यांच्या दिनांक ५ ऑक्टोबर १९९६ च्या पत्राद्वारे खुलासा प्राप्त झाला असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :—

२. विषयाधीन निवडणुकांच्या संदर्भात नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गामध्ये राज्य शासनाने इतर मागासवर्ग म्हणून जाहीर केलेल्या जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचेसह विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या जातींचाही समावेश होत असून सदर प्रवर्गातील नागरिक विषयाधीन निवडणुकीच्या प्रयोजनासाठी नागरिकांच्या मागासवर्गातून निवडणूक लढवू शकतील.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

सु. ग. नागवेकर,
विशेष कार्य अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक २१(२) गुरुवार, एप्रिल २१, २०१६/वैशाख १, शके १९३८

असाधारण क्रमांक २७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०१५

आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का-५.— ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(१) अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिकांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र. १८/का. ५, दिनांक १७ नोव्हेंबर २००६ अन्वये तर राज्यातील इतर महानगरपालिका निवडणुकांसाठी एकसदस्यीय पद्धतीनुसार निवडणुकीसाठी आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र. १८/का. ५, दिनांक २९ सप्टेंबर २००६ अन्वये तर बहुसदस्यीय पद्धतीनुसार निवडणुकीसाठी आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र. ८/का.५, दिनांक २० सप्टेंबर २०११ अन्वये नामनिर्देशनपत्राचे नमुने विहित केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र. ८५/कार्या.५, दिनांक १५ मार्च २००४ व दिनांक ७ जुलै २००८ च्या आदेशान्वये उमेदवाराने गुन्हेगारी पार्श्वभूमी, मत्ता व दायित्वे व शैक्षणिक अर्हता इ. संदर्भात नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे शपथपत्र विहित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र. २९/का. १०, दिनांक ३१ मार्च २००९ अन्वये उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत अपत्यांसंदर्भात द्यावयाचे शपथपत्र विहित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का.६, दिनांक १० ऑगस्ट २०१५ च्या आदेशान्वये निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर करण्याबाबत उमेदवाराने द्यावयाचे हमीपत्र विहित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.५/का.५, दिनांक ९ एप्रिल २०१५ च्या पत्रान्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग या राखीव जागांवरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल याची त्याला जाणीव असल्याबाबत द्यावयाचे हमीपत्र विहित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, नामनिर्देशनाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने नामनिर्देशनपत्राचा नमुना सुधारणे तसेच राज्य निवडणूक आयोगाने विविध बाबींसाठी विहित केलेले शपथपत्रांचे तसेच हमीपत्रांचे नमुने एकत्रित करून शपथपत्रांचा सर्वसमावेशक असा एकच नमुना विहित करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती.

आणि त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४) अन्वये मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

१. राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दिनांक २९ सप्टेंबर २००६, १७ नोव्हेंबर २००६, २० सप्टेंबर २०११, १५ मार्च २००४, ७ जुलै २००८, ३१ मार्च २००९, १० ऑगस्ट २०१५ व ९ एप्रिल २०१५ च्या आदेशांन्वये विहित केलेले यथास्थिती नामनिर्देशनपत्र/शपथपत्र/हमीपत्र यांचे नमुने याद्वारे सुधारित करण्यात येत आहेत.

२. महानगरपालिका निवडणुकांकरिता नामनिर्देशनपत्राचा नमुना अनुसूची-१ मध्ये दर्शविल्यानुसार राहील.

३. महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने सादर करावयाच्या एकत्रित शपथपत्राचा नमुना अनुसूची-२ मध्ये दर्शविल्यानुसार राहील.

महानगरपालिका निवडणूक

(अ) नामनिर्देशनपत्र भरण्याकरिता सूचना—

(१) नामनिर्देशनपत्रातील कोणत्याही रकान्यातील माहिती निरंक ठेऊ नये. निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. नामनिर्देशनपत्रासोबतच्या शपथपत्रामधील कोणत्याही रकान्यातील माहिती न भरल्यास अथवा रिक्त ठेवल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. ५/का-६, दिनांक २७ मार्च २०१५ अनुसार नामनिर्देशनपत्र नाकारण्यास पात्र होऊ शकते.

(२) ज्या प्रभागातून निवडणूक लढवावयाची आहे त्या प्रभागाचा क्रमांक व जागा क्रमांक स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

(३) उमेदवार, प्रस्तावक व अनुमोदक यांचे नाव ज्या प्रभागाच्या मतदार यादीमध्ये आहे त्या प्रभागाचा अनुक्रमांक व मतदार यादीचा भाग क्रमांक व अनुक्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

(४) सर्व उमेदवारांनी, मग तो अपक्ष उमेदवार असो अथवा पक्षाचा पुरस्कृत उमेदवार असो, तीन चिन्हांची निवड करणे आवश्यक आहे.

(५) जंगम व स्थावर मालमत्तेचा तपशील देताना प्रत्येक बाबींचा तपशील स्वतंत्रपणे द्यावा.

(६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १६ मधील तरतुदींचे वाचन करण्यात यावे.

(ब) नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे—

(१) उमेदवार राखीव जागेवरून निवडणूक लढवित असल्यास–

(*i*) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत सोबत जोडावी. तसेच,

(*ii*) नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

(*iii*) उपरोक्त अधिनियमास अनुसरून दिलेले जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास जातीची वैधता तपासणीकरिता जातवैधता पडताळणी समितीकडे अर्ज केल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.

(२) उमेदवार दुसऱ्या प्रभागातील मतदार असल्यास त्याबाबतचा उतारा सोबत जोडणे आवश्यक आहे.

(क) शपथपत्र (नामनिर्देशनपत्रासोबतचे) भरण्याबाबतच्या सूचना—

(१) बंधपत्रे/कर्जरोखे/भाग यांचे मूल्य सूचीतील कंपन्यांच्या बाबतीत शेअर बाजारमधील सध्याच्या बाजारातील मूल्यानुसार व सूचीबाह्य कंपन्यांच्या बाबतीत पुस्तकी मूल्यानुसार देण्यात यावे.

(२) जंगम व स्थावर मालमत्तेचा तपशील देताना प्रत्येक बाबींचा तपशील स्वतंत्रपणे द्यावा.

(३) अवलंबित व्यक्ती म्हणजे उमेदवार, त्याची/तिचा पत्नी/पती व स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नसलेली व पूर्णतः उमेदवारावर अवलंबून असलेली मुले व मुली.

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र. २४/का-५, दिनांक ५ ऑक्टोबर २०१५ सोबतचे सहपत्र)

अनुसूची-१

नामनिर्देशनपत्र (महानगरपालिका)

(प्रस्तावक व अनुमोदनकर्ता आणि उमेदवार अथवा संबंधित अधिकारी यांनी भरावयाचे)

भाग एक

आम्ही, याद्वारे ;

महानगरपालिका : _____

प्रभाग क्रमांक : _____ जागा क्रमांक : _____

प्रभागाचे नाव (असल्यास) _____ मधून निवडणुकीकरिता _____

_____ यांना उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहोत.

(१) उमेदवाराचे नाव : _____

(२) वडिलांचे/पतीचे नाव : _____

(३) लिंग : पुरुष/स्त्री/इतर

(४) जन्मतारीख व वय : _____ / _____ / _____ , _____ वर्षे _____ महिने

(५) व्यवसाय/धंदा : _____

(६) संपूर्ण पत्ता (पोस्टाचा पत्ता) : _____

_____

_____

(७) उमेदवाराचा मतदार यादीतील तपशील—

(अ) नाव : _____

(ब) प्रभाग क्रमांक : _____

(क) अनुक्रमांक : _____

(८) उमेदवाराचा प्रवर्ग : (राखीव जागेची निवडणूक असल्यास)

अनुसूचित जाती	☐	प्रवर्ग _____
अनुसूचित जमाती	☐	प्रवर्ग _____
नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग	☐	प्रवर्ग _____

(९) महिलांकरिता राखीव असलेल्या जागेकरिता निवडणूक आहे काय? : _____

(१०) मतदार यादीमधील प्रस्तावकाचा तपशील—

(अ) प्रस्तावकाचे नाव : _____

(ब) प्रभाग क्रमांक : _____

(क) अनुक्रमांक : _____

दिनांक :

१३७

(प्रस्तावकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

११) मतदार यादीमधील अनुमोदकाचा तपशील -

अ) अनुमोदकाचे नाव : ----------

ब) प्रभाग क्रमांक : ----------

क) अनुक्रमांक: ----------

दिनांक : (अनुमोदकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

मी, याद्वारे सूचित करतो की, निवडून आल्यास महानगरपालिका सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र

मी, याद्वारे असे घोषित करतो की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, मी असेही घोषित करतो की,

(अ) माझ्या वयाची --------वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदीनुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही

(क) मी महानगरपालिकेचा ठेकेदार नाही.

(ड) मी महानगरपालिकेस नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

दिनांक :

उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

नाव----------

प्रभाग क्र.---------- जागा क्र.---------- व प्रभागाचे नाव (असल्यास)----------

कोणताही रकाना रिक्त ठेवू नये. लागू नसल्यास अथवा निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

भाग दोन

(निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र)

मी, याद्वारे आणखी असे घोषित करतो की,—

(अ) मी, या निवडणुकीमध्ये ———————————— *पक्ष (राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडे नोंदणी झालेल्या पक्षाचे नाव) यांच्यातर्फे उभा आहे/मी अपक्ष उमेदवार म्हणून उभा आहे. (लागू नसेल ते खोडावे.)

(ब) मी निवडलेली निवडणूक चिन्हे ही पसंतीक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत :—

(१)

(२)

(३)

दिनांक :

उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

भाग तीन

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ———————

हे नामनिर्देशनपत्र, *उमेदवाराने/उमेदवाराच्या प्रस्तावकाने/अनुमोदनकर्त्याने ..... रोजी (दिनांक) ..... वाजता (वेळ) माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द केले.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

नामनिर्देशनपत्र स्वीकारल्याबद्दल किंवा नाकारल्याबद्दल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय

मी, ... अधिनियमाच्या कलम ..... नुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून, पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे :—

.....

.....

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

* लागू नसेल ते खोडावे.

भाग चार

(नामनिर्देशनपत्र व छाननीची नोटीस याची पोहोच)

(नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीकडे द्यावयाची)

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ..... महानगरपालिका प्रभाग क्रमांक ..... व जागा क्रमांक ..... प्रभागाचे नाव (असल्यास) मधील निवडणूक उमेदवार ..... यांचे नामनिर्देशनपत्र ..... (दिनांक) रोजी ..... (वेळ) वाजता * उमेदवाराकडून/उमेदवाराच्या प्रस्तावकाकडून/अनुमोदनकर्त्याकडून माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द करण्यात आले आहे.

सर्व नामनिर्देशनपत्रांची ..... (ठिकाण) येथे ..... (दिनांक) रोजी ..... (वेळ) वाजता छाननी करण्यात येईल.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

* लागू नसेल ते खोडावे.

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मार्च १५, २००४/फाल्गुन २५, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च २००४

आदेश

क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.-८५/कार्या-०५.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

२. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/सीआर-३९/डी-१०, दिनांक ३ जुलै २००२ अन्वये प्रतिज्ञापत्र (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकांकरिता) आणि घोषणापत्र (ग्रामपंचायती निवडणुकांकरिता) विहित करण्यात आले आहे.

३. आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकांसंदर्भात दाखल करावयाच्या प्रतिज्ञापत्रासंदर्भात काही सूचना व निरीक्षण विचार प्रकट केले आहेत, त्या दृष्टिकोनातून यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ३ जुलै २००२ रोजी दिलेले आदेश सुधारित करणे आवश्यक आहे.

४. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २) च्या कलम ९-बी (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम

१०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा. ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करून राज्य निवडणूक आयोगाने यासंदर्भात यापूर्वी दिलेल्या आदेशांचे अधिक्रमण करून खालीलप्रमाणे सुधारित आदेश देत आहे :—

(१) प्रत्येक उमेदवार जिल्हा परिषदा किंवा पंचायत समित्या किंवा महानगरपालिका किंवा नगरपरिषदा किंवा नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक अथवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करताना शपथपत्रात विनिर्दिष्ट केलेली संपूर्ण माहिती सादर करेल; या आदेशासोबतच्या जोडपत्र-एक मध्ये विहित नमुन्यातील शपथपत्राचे प्रपत्र जोडले आहे. परंतु, ग्रामीण भागात शपथपत्र दाखल करण्याकरिता येणाऱ्या अडचणी विचारात घेता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार ग्रामपंचायत निवडणुकांकरिता निवडणूक लढविणारा उमेदवार शपथपत्राऐवजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर घोषणापत्र दाखल करेल. या आदेशासोबत जोडपत्र-दोन मध्ये विहित नमुन्यातील प्रपत्र जोडले आहे.

(२) प्रत्येक उमेदवाराने उपरोक्त शपथपत्र प्रथमवर्ग दंडाधिकारी, लेख प्रमाणक (नोटरी पब्लिक), उच्च न्यायालयाने नेमलेले ओथ कमिशनर अथवा शपथपत्र देण्यासाठी सक्षम असलेला अधिकारी (यामध्ये जिल्हा दंडाधिकारी/उपविभागीय दंडाधिकारी/तालुका दंडाधिकारी यांचा समावेश होतो) यांच्यासमोर करण्यात यावे.

(३) उमेदवाराने शपथपत्र अथवा घोषणापत्र सादर न करणे हे या आदेशाचे उल्लंघन असल्याचे मानण्यात येईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी शपथपत्र/घेषणापत्र सादर न केल्यामुळे नाकारू शकेल.

(४) अशाप्रकारे उमेदवाराने सादर केलेल्या यथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्रातील माहितीचा संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी सथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्राची प्रत त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर चिटकवून त्याचा प्रसार करेल आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निश्चित केल्यानुसार प्रती काढण्याकरिता येणारे शुल्क आकारून त्याच्या प्रती प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत पुढे नमूद केलेल्यांना उपलब्ध करून देण्यात येतील :—

(एक) संबंधित निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार ;

(दोन) कोणताही मुद्रण/इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाचा प्रतिनिधी ;

(तीन) कोणताही लोक प्रतिनिधी.

(५) कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वतः केलेल्या शपथपत्राद्वारे किंवा घोषणापत्राद्वारे परस्पर विरोधी माहिती सादर केली असली तरी ; ती माहिती संबंधित उमेदवाराच्या शपथपत्र किंवा घोषणापत्रासोबत वर नमूद केल्यानुसारच प्रसारित करण्यात येईल.

(६) निवडणूक निर्णय अधिकारी शपथपत्रात/घोषणापत्रात दिलेल्या माहितीची सारांशाने छाननी करून अथवा अन्यप्रकारे त्याची सत्यता पडताळून पहाणार नाही आणि त्याच्या/तिच्या मते माहिती चुकीची आढळली याच्या आधारे नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही.

५. नामनिर्देशनपत्रासोबत सर्व उमेदवारांना आयोगाने याद्वारे विहित केलेल्या यथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्राच्या प्रती देण्यात येतील, याची सर्व निवडणूक निर्णय अधिकारी खात्री करतील.

६. हे आदेश दिनांक १ एप्रिल २००४ पासून अंमलात येतील आणि राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निदेशानुसार घेण्यात येणाऱ्या निवडणुकांना लागू रहातील.

य. ल. राजवाडे,
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र.

RNI No. MAHBIL/2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष ४, अंक ३८(३)] सोमवार, ऑगस्ट १३, २०१८/श्रावण २२, शके १९४० [पृष्ठे १८, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ७७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त)
आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ ऑगस्ट, २०१८.

आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र. २४/का. ५.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४ अन्वये राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणामध्ये घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. त्या अनुषंगाने मतदारांना योग्य उमेदवाराची निवड करता येणे शक्य व्हावे यासाठी त्यांना साक्षर (educate) / प्रशिक्षित करणे आवश्यक आहे.

२. मा. उच्च व सर्वोच्च न्यायालय यांनी खालीलप्रमाणे भाष्य करुन उमेदवारांनी शपथपत्रामध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी, मत्ता व दायित्वे तसेच शैक्षणिक अर्हता याबाबतची माहिती देणे बंधनकारक केले आहे.

The Hon'ble High Court (WP 7257/1999, dt. 2/11/2000)

"For making a right choice by electors in regard to the candidate at the election, it was essential that the past of the candidate should not be kept in the dark as it was not in the interest of the democracy and well-being of the country."

The Hon'ble Supreme Court (Civil Appeal No. 7178/2001, dt. 02/05/2002)

" Information about the candidate to be selected is must. Voter's (little man-citizen's) right to know antecedents including criminal past of his candidate contesting election for MP or MLA is much more fundamental and basic for survival of democracy. The little man may think over before making his choice of electing law breakers as law makers "

" The Election Commission is directed to call for information on affidavit by issuing necessary order in exercise of its power under Art 324 of the Constitution of India from each candidate seeking election to Parliament or a state legislature as a necessary part of his nomination paper, furnishing therein, information on the following aspects relation to his/her candidature "

३. मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील आदेश लक्षात घेता, राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. जीईएन/ २००२/ सीआर ३९/ डी-१०, दिनांक ३ जुलै, २००२ अन्वये सर्व उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करताना खालील बाबी दर्शविलेले शपथपत्र सादर करणे बंधनकारक केलेले आहे. मात्र या शपथपत्रामध्ये, भारत निवडणूक आयोगाने लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी विहित केलेल्या विस्तृत बाबींचा समावेश असलेल्या शपथपत्राप्रमाणे, सर्व बाबींचा समावेश करण्यात आलेला नाही.

(1) Whether the candidate is convicted / acquitted / discharged of any criminal offence in the past ; it any whether he is punished with imprisonment or fine ?

(2) Prior to six months of filing of nomination, whether the candidate is accused in any pending case, of any offence punishable with imprisonment for two years or more, and in which charge is framed or cognizance is taken by the court of law. If so, the details thereof.

(3) The assets (immovable, movable, bank balances etc.) of a candidate and of his / her spouse and that of dependents.

(4) Liabilities, if any, particularly whether there are any over dues of any public financial institution or government dues.

(5) The educational qualifications of the candidate"

ही प्रथा सन २००२ पासून राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषद / नगरपंचायती तसेच जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी वापरण्यात येत आहे.

४. वरीलप्रमाणे विहित करण्यात आलेल्या शपथपत्रामध्ये सन २०१५ मध्ये काही दुरुस्ती करण्यात येऊन राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०१५/प्र. क्र. २४/का. ५, दिनांक ५ ऑक्टोबर २०१५ व दिनांक १९ जानेवारी २०१७ च्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाच्या शपथपत्राचा सर्वसमावेश असा एकच नमुना विहित करण्यात आला.

५. मा. सर्वोच्च न्यायालयाने आता लोकप्रहरी विरुद्ध केंद्र शासन रिट याचिका (civil) क्र. ७८४/२०१५ या प्रकरणामध्ये दिनांक १६ फेब्रुवारी २०१८ रोजी खालीलप्रमाणे भाष्य करुन शपथपत्रामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

"UNDUE ACCRETION OF ASSETS of LEGISLATORS and their ASSOCIATES is certainly a matter which should alarm the citizens and voters of any truly democratic society. Such phenomenon is a sure indicator of the beginning of a failing democracy. If left unattended it would inevitably lead to the destruction of democracy and pave the way for the rule of mafia. "

"INFORMATION TO THE VOTER:

The information regarding the sources of income of the CANDIDATES and their ASSOCIATES, would in our opinion, certainly help the voter to make an informed choice of the candidate to represent the constituency in the LEGISLATURE. It is, therefore, a part of the fundamental right under Article 19(1)(a) as explained by this Court in ADR case."

आता शपथपत्रामध्ये उमेदवाराची मत्ता व दायित्वे, गुन्हेगारी पार्श्वभूमी व शैक्षणिक अर्हता या व्यतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोत व कराराचा तपशील याबाबतची माहिती देखील घेण्याचे निर्देश दिलेले आहेत.

६. मा. सर्वोच्च न्यायालयाने लोकप्रहरी विरुध्द केंद्र शासन रिट याचिका (civil) क्र. ७८४/२०१५ मध्ये दि. १६/२/२०१८ रोजी दिलेल्या निर्णयातील निर्देश तसेच भारत निवडणूक आयोगाने लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी विहित केलेले शपथपत्र लक्षात घेता नामनिर्देशनाच्यावेळी उमेदवाराने सादर करावयाच्या शपथपत्रामध्ये सुधारणा करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :—

आदेश

(i) राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी विहित केलेला उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाचा शपथपत्राचा नमुना रद्द करण्यात येत आहे.

(ii) महानगरपालिकेची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत, सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे शपथपत्र दाखल करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

(iii) हा आदेश निर्गमित होण्याच्या तारखेनंतर होणाऱ्या सर्व महानगरपालिका सार्वत्रिक/पोटनिवडणुकीच्या कार्यक्रमात याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

नि. ज. वागळे,
प्रभारी उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

अनुसूची -१

महानगरपालिका

नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाचे शपथपत्र

मी ----------वय-------

खालील प्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते की,

(१) **वैयक्तीक माहिती-**

(अ) नाव :----------

(ब) लिंग :----------

(क) वडिलांचे/पतीचे नाव :----------

(ड) जन्मतारीख :----------

(इ) वय :----------

(फ) व्यवसाय/धंदा :----------

(ग) संपुर्ण पत्ता (पोस्टाचा पत्ता) :----------

(ह) दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :----------

(य) ई-मेल आयडी :----------

(२) **निवडणूक लढवू इच्छितो त्या जागेचा तपशील-**

महानगरपालिकेचे नाव :----------

प्रभाग क्रमांक :----------

प्रभागाचे नाव :----------

(३) **जातीबाबतचा तपशील-**

(अ) जातीचा प्रवर्ग :----------

(अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती

नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग)

(ब) जात :----------

(क) जात प्रमाणपत्र देणारा अधिकारी : क्र.----------दिनांक ----------

(ड) जात वैधता प्रमाणपत्र देणारा अधिकारी क्र.----------दिनांक ----------

(इ) जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर उमेदवाराने

जात वैधता प्रमाणपत्रासाठी पडताळणी समितीकडे

सादर केलेल्या अर्जाच्या पोचपावतीचा तपशील :----------

(४) मतदार यादीतील माझा तपशील-

(अ) नाव :----------

(ब) प्रभाग क्रमांक :----------

(क) अनुक्रमांक :----------

(५) माझी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे

अ. क्र.	शिक्षण	विद्यालय/विश्वविद्यालयाचे नाव	उतीर्ण होण्याचे वर्ष
कमाल शैक्षणिक अर्हता नमूद करावी. धारण केलेल्या पदवी/पदविका/प्रमाणपत्र याचे संपूर्ण नाव नमूद करावे.			

(६) अपत्यांची संख्या-

(अ) आज रोजी असलेल्या अपत्यांची संख्या :----------

(ब) त्यापैकी दिनांक १२ सप्टेंबर २००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या व त्यांच्या जन्मतारखा. :----------

(७) गुन्हेगारी पार्श्वभूमी-

(अ) मला दोषसिध्दीनंतर दोन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरीता कैद होऊ शकेल अशा अपराधांचा माझ्यावर आरोप आहे/नाही त्याबाबत आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :–

(जिथे दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांचा तपशील येथे दयावा.)

अ. क्र.	ज्या न्यायालयाने दखल घेतली आहे त्या न्यायालयाचे नाव	दावा क्रमांक	न्यायालयाने दखल घेतलेल्या आदेशाचा दिनांक	कायदयाचे कलम व दखल घेण्यात आलेल्या गुन्हयांचा तपशील

(ब) मला खालील अपराधांसाठी दोषी ठरविण्यात आले आहे. (ज्या अपराधांच्या अपराध सिध्दीमुळे आणि शिक्षेमुळे मला निवडणूक लढविण्याकरिता अपात्र ठरवता येईल अशा अपराधांव्यतिरीक्त) आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	न्यायालयाचे नाव	दावा क्रमांक	न्यायालयीन आदेशाचा दिनांक	कायद्याचे कलम व दोषी ठरविण्यात आलेल्या गुन्हयाचा तपशील	दखल घेतलेल्या उपरोक्त आदेशाच्या विरोधात केलेल्या अपील (ले)/ पुनरिक्षण(णे) इत्यादीबाबतचा तपशील

(८) व्यवसाय किंवा कामधंदा याचा तपशील (लागू असेल तिथे ✓ अशी खुण करावी)

अ. क्र.	तपशिल	१) शेती	२) नोकरी	३) व्यापार	४) उदयोग	५) इतर
१	स्वत:					
२	पती/पत्नी					
३	अवलंबित १					
४	अवलंबित २					

(९) वार्षिक उत्पन्नाबाबतचा तपशील -

अ)

अ. क्र.	तपशील	पॅन क्रमांक	आयकर रिटर्न भरणा केलेले मागील वर्ष	रकाना ४ मधील आयकर रिटर्न मध्ये दर्शविलेले एकूण वार्षिक उत्पन्न
१	२	३	४	५
१	स्वत:			
२	पती/पत्नी			
३	अवलंबित १			
४	अवलंबित २			

(ब) उमेदवाराचे मागील ३ वर्षाचे उत्पन्नाबाबतचा तपशील (रुपये हजारात)

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, इमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

(क) उमेदवाराचे पती/पत्नीचे मागील ३ वर्षाचे उत्पन्नाबाबतचा तपशील

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, ईमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

ड) उमेदवाराचे अवलंबित १ चे मागील ३ वर्षाचे उत्पनन्नाबाबतचा तपशील

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, ईमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

(इ) उमेदवाराचे अवलंबित क्र २ चे मागील ३ वर्षाचे उत्पन्नाबाबतचा तपशील

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, ईमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

(१०) मत्ता व दायित्व याचा तपशील -

१. जंगम मालमत्तेचा तपशील

(संयुक्त नावावर असलेल्या मालमत्तेत संयुक्त मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

अ. क्र.	वर्णन	स्वत: नाव	पती /पत्नीचे नाव	अवलंबित १ चे नाव	अवलंबित २ चे नाव	अवलंबित ३ चे नाव
१	रोख रक्कम					
२	बँक वित्तीय संस्था व बँकेव्यतिरीक्त वित्तीय कंपन्या, सहकारी संस्था यातील ठेवी (बचतखाते, मुदत ठेवी, व इतर सर्व प्रकारच्या ठेवींचा तपशील)					
३	कंपन्या/म्युच्युअल फंडस आणि इतर संस्था यातील बंधपत्र, कर्जरोखे, भाग (शेअर्स) युनिट्स इ. गुंतवणुकीचा तपशील. (बंधपत्रे/कर्जरोखे, भाग यांचे मुल्यसुचीतील कंपन्याच्या बाबतीत शेअर बाजारामधील सध्याच्या बाजारातील मुल्यानुसार व					

	सुचिबाहय कंपन्याच्या बाबतीत पुस्तकी मुल्यानुसार देण्यात यावे)					
४	इतर वित्तीय दस्तऐवज, राष्ट्रीय बचत पत्रातील गुंतवणुक, पोस्ट ऑफिस मधील ठेवी, एल.आय.सी व इतर कंपन्याच्या विमा पॉलिसी					
५	जेसीबी, पोकलॅन, रोलर, हार्वेस्टर इत्यादी यंत्र सामुग्रीची रक्कम					
६	मोटार वाहने/विमाने/जहाजे/बोटी इत्यादी (बनावटीचा तपशील इत्यादी) नोंदणी क्रमांक खरेदी वर्ष व रक्कम					
७	जडजवाहीरे, मौल्यवान वस्तु (वजन व मुल्य यांचा तपशिल)					
८	फर्म, कंपनी, ट्रस्ट आणि इतर व्यक्ती यांना दिलेली वैयक्तीक कर्जे, अग्रीम रक्कम तसेच ऋणकोकडून येणे असलेली इतर रक्कम					
९	दाव्यांचे/ व्याजांचे मुल्य यासारखी इतर मालमत्ता					
१०	भागिदारी फर्म, कंपनी वा इतर संस्था यातील गुंतवणूक					
११	कोणत्याही जंगम मालमत्तेमधील हक्क (उदा. संयुक्त मालकी), हातउसने किंवा उधारीने दिलेली रक्कम					
१२	राजकीय पक्ष/आघाडी, युती, मोर्चा व तत्सम कडून प्राप्त रक्कम/निधी/मुल्यवान मदत					
१३	इतर सर्व प्रकारची जंगम मालमत्ता					

२. **स्थावर मालमत्तेचा तपशील**

(संयुक्त नावावर असलेल्या मालमत्तेत संयुक्त मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

अ. क्र.	वर्णन	स्वतः नाव	पती/पत्नीचे नाव	अवलंबित १ चे नाव	अवलंबित २ चे नाव	अवलंबित ३ चे नाव
१	अ) कृषी जमीन					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					
	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय (होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत (जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकुन, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्तेचे मूल्य					
२	ब) अकृषिक जमीन					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक/प्लॉट क्र./मालमत्ता क्र.					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					

	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय (होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत (जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकुन, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्तेचे मूल्य					
३	**क) <u>इमारती (व्यापारी व निवासी)</u>**					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					
	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय (होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत(जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकून, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी					

	एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्तेचे मूल्य					
४	**(ड) घर/सदनिका इत्यादी**					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					
	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत (जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकून, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्ताचे मुल्य					
५	इतर (संपत्तीमधील हक्क यासारखे)					
६	१ ते ५ मधील सदय बाजारमुल्याची एकूण बेरीज					

३. मी देय असलेल्या सार्वजनिक वित्तीय संस्था यांच्याकडील व शासकीय/निमशासकीय संस्थाकडील दायित्वे/थकीत रकमा यांचा तपशील (प्रत्येक बाबींचा तपशील स्वतंत्रपणे दयावा.)

अ. क्र.	वर्णन	स्वत: नाव	पती/पत्नीचे नाव	अवलंबित १ चे नाव	अवलंबित २ चे नाव	अवलंबित ३ चे नाव
अ	१. बँकेकडून घेतलेले कर्ज किंवा बँकेला असलेली देणी					
	२. वित्तीय संस्थाकडून घेतलेले कर्ज किंवा वित्तीय संस्थाला असलेली देणी					
	३. बँक/वित्तीय संस्था यांचे नाव					
	४. शिल्लक रक्कम					
	५. कर्जाचा प्रकार (तारणी/बिनतारणी)					
ब	१. वरील अ व्यतिरिक्त इतर व्यक्तीकडून/संस्थेकडून घेतलेले कर्ज/उधार/देणी					
	२. कर्ज/उधार/देणी देणाऱ्याचे नाव व पत्ता					
	३. कर्ज/उधार/देणी देणे रक्कम					
	४. कर्जाचा प्रकार (तारणी/बिगरतारणी)					
क	शासकीय /निमशासकीय देणी					
	१. गृह निर्माण विभागाकडील देणी					
	२. पाणीपुरवठा विभागाकडील देणी					
	३. विद्युत पुरवठा विभागाकडील देणी					
	४. दूरध्वनी /दुरसंचार यांचेकडील देणी					
	५. सार्वजनिक वाहतूक विभागाकडील देणी, (विमान/हेलिकॉप्टर सह)					
	६. इतर सर्व शासकीय विभागाकडील देणी, निमशासकीय विभागाकडील देणी, स्थानिक स्वराज्य संस्था, यांची देणी					
	७. आयकर					
	८. संपत्तीकर					

	९. सेवाकर					
	१०. महानगरपालिका/मालमत्ताकर					
	११. विक्रीकर					
	१२. वस्तु व सेवा कर					
	१३. इतर सर्व देणी					
	१४. वरील सर्व शासकीय/ निमशासकीय देण्याची रक्कम एकूण					
	१५. शासकीय देणेसंदर्भातील विवाद प्रलंबित असल्यास त्याचा तपशील					

११. (अ) उमेदवाराचा स्वतः चा कराराचा तपशील (मागील ३ वर्षांचा)

अ. क्र.	कराराचे स्वरुप	कराराचे विषयाचा तपशील	कराराचा कालावधी		कराराची रक्कम	आज रोजी कराराची सद्य:स्थिती पुर्णत्वास/अपूर्ण	कराराबाबत विवादाचा तपशील
			पासून	पर्यंत			
१	शासकीय						
२	निम्न शासकीय						
३	स्थानिक स्वराज्य संस्था						
४	सार्वजनिक उपक्रम						
५	सहकारी संस्था						

(ब) उमेदवाराचे पती/पत्नी चा कराराचा तपशील (मागील ३ वर्षांचा)

अ. क्र.	कराराचे स्वरुप	कराराचे विषयाचा तपशील	कराराचा कालावधी		कराराची रक्कम	आज रोजी कराराची सद्य:स्थिती पुर्णत्वास/अपूर्ण	कराराबाबत विवादाचा तपशील
			पासून	पर्यंत			
१	शासकीय						
२	निम्न शासकीय						
सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३३, दि.१० जानेवारी, २०११ अन्वये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत तर सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९, दि.०७ मे, २०१६ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमामध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अपात्रतेबाबतच्या कलमामध्ये शौचालयाचा नियमितपणे वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करेल अशा व्यक्ती निवडून येण्यास व सदस्य होण्यास निरर्ह ठरेल अशी तरतूद समाविष्ट करण्यात आली. सदर अधिनियमानुसार नामनिर्देशन पत्रासोबत शौचालय वापराबाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्याबाबतीत "सहायक आयुक्त/ प्रभाग अधिकारी यांचे प्रमाणपत्र" तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्याबाबतीत "ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र" सादर करण्याची तरतूद करण्यात आली होती.

कृ.मा.प...

३. तथापि, संदर्भाकीत अ.क्र. ३ व ४ समोरील दि.१५/०४/२०१७ व दि.०१/०९/२०१७ रोजीच्या अधिनियमान्वये उक्त संदर्भांकित अ.क्र.१ व २ समोरील अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून शौचालय वापरासंदर्भात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकरिता "सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी" किंवा "अशा व्यक्तीचे स्वयंप्रमाणपत्र" तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेकरिता "मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे किंवा त्याने पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा स्वयंप्रमाणपत्र" सादर करण्याबाबतची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे.

४. उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत शौचालय वापराचे प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. जर नामनिर्देशनपत्र छाननीच्यावेळी नामनिर्देशनापत्रासोबत सदरचे प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्र सादर न केल्याचे आढळल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास संबंधित नामनिर्देशनपत्र या कारणास्तव अवैध ठरविता येईल.

५. उक्त सुधारीत तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्याकरिता उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत द्यावयाच्या शौचालय वापराबाबतच्या प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्राचा नमूना सोबत जोडला आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

आपला

(सुरेश काकाणी) १८/०७/२०२४

सचिव

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याने दयावयाचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी----------, वय-----वर्षे, हे/हया ---------- या पत्त्यावर राहतात.

* (१) वरील पत्त्यावरील नमूद घर हे त्यांच्या स्वत:च्या मालकीचे असून त्या घरामध्ये शौचालय आहे व ते त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहेत.

किंवा

* (२)(अ) वरील पत्त्यावरील नमूद घर हे त्यांच्या स्वत:च्या मालकीचे नसून त्या घरामध्ये शौचालय आहे व ते त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहेत.

किंवा

* (२)(ब) वरील पत्त्यावरील नमूद घर हे त्यांच्या स्वत:च्या मालकीचे नसून त्या घरामध्ये शौचालय नाही, मात्र ते सामुदायिक/सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहेत.

ठिकाण :

दिनांक :

सही/-

सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी/
मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा
त्यांनी पदनिर्देशित केलेला अधिकारी

*लागू नसेल ते खोडावे.

उमेदवाराने दयावयाचे स्वयंप्रमाणपत्र

मी, श्री./श्रीमती/कुमारी----------(स्वत:चे नाव) श्री.----------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय-----वर्षे, राहणार----------पत्ता खालीलप्रमाणे प्रमाणित करतो/करते की,

(१) मी ---------- महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती / जिल्हा परिषदा / पंचायत समिती/ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरत आहे.

* (२) मी स्वत:च्या मालकीच्या घरात रहात असून त्या घरामध्ये शौचालय आहे व मी त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे.

किंवा

* (३)(अ) मी स्वत:च्या मालकीच्या घरात रहात नसून त्या घरामध्ये शौचालय आहे व मी त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे.

किंवा

* (३)(ब) मी स्वत:च्या मालकीच्या घरात रहात नसून त्या घरामध्ये शौचालय नाही, मात्र मी सामुदायिक/सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे.

२. मी वर नमूद केलेली माहिती सत्य व अचूक असून यातील माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण : उमेदवाराची सही

दिनांक : उमेदवाराचे नाव

*लागू नसेल ते खोडावे.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका-२०१७
बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने
मतपत्रिकेचा नमुना.

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२. दिनांक : ०३ जानेवारी, २०१७

आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ०८ /का.५ ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी, शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश २०१६ (२०१६ चा अध्या. १६)" दिनांक १३ मे २०१६ व ३० ऑगस्ट २०१६ अन्वये महानगरपालिकांमध्ये (बृहन्मुंबई वगळून) एक सदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली असून त्या अनुषंगाने मतपत्रिका व इतर अनुषंगिक बाबींकरिता नव्याने आदेश पारित करणे आवश्यक झाले आहे.

३. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४ (४) अन्वये तसेच आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन व आदेश क्रमांक रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.८/का.५, दि. २० सप्टेंबर, २०११ अधिक्रमीत करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे नव्याने आदेश देत आहे :-

३.१ **प्रभागातील जागांना क्रमांक देणे** – महानगरपालिका सदस्य पदाच्या निवडणुकांकरिता प्रत्येक प्रभागातील प्रत्येक सदस्य पदाच्या जागेला प्रभागाच्या क्रमांकासोबत यथास्थिती "अ" , "ब", "क" "ड" किंवा "इ" अशा रितीने क्रमांक देण्यात येतील. उदा. प्रभाग क्र. १० मध्ये ३ जागा असतील तर त्या प्रभागातील जागांना १०अ, १०ब, व १०क असे संबोधण्यात येईल.

३.२ **नामनिर्देशनपत्र सादर करणे** – महानगरपालिका सदस्य पदाच्या प्रत्येक जागेसाठी वेगवेगळे नामनिर्देशनपत्र भरणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील. एका जागेसाठी एका व्यक्तीकडून जास्तीत जास्त ४ नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. एकाच जागेसाठी नामनिर्देशनपत्र स्वीकारताना अनामत रक्कम एकदाच स्वीकारण्यात येईल.

४. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास, छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवायची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्ती न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे

५. **मतपत्रिकेचा रंग** – बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदान यंत्रावर लावण्यात येणाऱ्या विविध जागांच्या मतपत्रिका मतदारांच्या चटकन लक्षात येण्यासाठी प्रत्येक प्रभागातील प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका लावणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक जागेच्या मतपत्रिकेचा रंग खालीलप्रमाणे राहील :–

१) प्रत्येक प्रभागातील "अ" जागेची मतपत्रिका - पांढरा रंग.

२) प्रत्येक प्रभागातील "ब" जागेची मतपत्रिका - फिका गुलाबी रंग.

३) प्रत्येक प्रभागातील "क" जागेची मतपत्रिका - फिका पिवळा रंग.

४) प्रत्येक प्रभागातील "ड" जागेची मतपत्रिका - फिका नीळा रंग.

५) प्रत्येक प्रभागातील "इ" जागेची मतपत्रिका - फिका हिरवा रंग.

६. मतपत्रिकेचा नमुना - महानगरपालिका निवडणुकांकरिता मतपत्रिकेचा नमुना परिशिष्ट- १ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे राहील.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. बागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन.
३) सर्व महानगरपालिका आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
६) निवड नस्ती.

परिशिष्ट-१
(प्रभागातील "अ" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (पांढरा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "अ" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) /सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१
(प्रभागातील "ब" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका गुलाबी रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "ब" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१

(प्रभागातील "क" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका पिवळा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "क" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१

(प्रभागातील "ड" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका नीळा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ..... जागा क्र. "ड" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) /सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-१

(प्रभागातील "इ" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका हिरवा रंग)

क्र..... .....महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०----

प्रभाग क्र. ....., जागा क्र. "इ" (पद *)----------

१. आसरे विलास अनंत	चिन्ह
२. आसरे विलास अनंत	चिन्ह
३. आसरे विलास अनंत	चिन्ह
४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA)	(NOTA)

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण /सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ०१/०४/२०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्राथमिक तपासणीच्यावेळी नामनिर्देशनपत्रातील त्रुटी दूर करण्याची उमेदवारांना संधी देण्याबाबत...

महोदय/महोदया,

माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये राज्यात मोठया प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांनी छाननीमध्ये उमेदवारांची काही नामनिर्देशनपत्रे राज्य निवडणूक आयोगाच्या सध्याच्या सूचनांच्या आधारावर अवैध ठरविली. या निर्णयाविरुध्द व तांत्रिक अडचणींमुळे विहित कालावधीत नामनिर्देशनपत्र दाखल करु शकले नाहीत अशा उमेदवारांनी उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल केल्या. निवडणूक प्रक्रिया सुरु झालेली असल्याने मा. उच्च न्यायालयाने यामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. मात्र, उमेदवारांच्या तक्रारीमध्ये लक्ष घालून निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शक होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने सुधारात्मक उपाययोजना कराव्यात, असे मत व्यक्त केलेले आहे.

२. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, पारंपारिक पध्दतीने नामनिर्देशनपत्र भरताना त्यामध्ये अनेकवेळा चुका अथवा त्रुटी रहात असत. अशा चुका होऊ नये यादृष्टीने राज्य निवडणूक

आयोगाने महाऑनलाईनच्या मदतीने नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरण्यासाठी एक संगणकीय प्रणाली विकसित केलेली आहे. नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी विहित करण्यात आलेल्या कालावधीमध्ये केव्हाही इच्छुक उमेदवार संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्र तसेच शपथपत्रातील माहिती भरु शकतो. याचा फायदा असा आहे की, उमेदवार त्याने भरलेली माहिती अचूक आहे याची खात्री करु शकतो. काही चुका राहून गेल्या असल्यास त्या दुरुस्त करु शकतो व त्यानंतर त्याची प्रिंट घेऊन त्यावर स्वाक्षरी करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करु शकतो. नामनिर्देशनपत्र भरण्यास उमेदवारांना सहाय्य व्हावे यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक मदत कक्षांची स्थापना करण्यात येते. याव्यतिरिक्त जिल्ह्यातील सेतू, ई-सेवा केंद्र, इ. जास्त क्षमतेची इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी तसेच सायबर कॅफे व सीएफसी (Community Facilitation center) इ. ठिकाणी नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

३. अलिकडेच माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये राज्यात मोठया प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकांमध्ये जवळजवळ सर्व उमेदवारांनी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरुन ती निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर केलेली आहेत. यावरुन स्पष्ट होत आहे की, नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी विकसित करण्यात आलेली संगणकीय प्रणाली निर्दोष असून तिचा सहजरित्या वापर केला जाऊ शकतो. मात्र असे असूनही काही उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्रातील माहिती भरताना त्रुटी राहून गेल्यामुळे छाननीमध्ये त्यांची नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात आली. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने वरीलप्रमाणे मत व्यक्त केलेले आहे.

४. वरील पार्श्वभूमीवर यापुढे नामनिर्देशनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरताना अपवादात्मक परिस्थितीत काही त्रुटी राहून गेल्यास त्या दूर करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे आदेशित करण्यात येत आहे :-

(i) इच्छुक उमेदवाराने सादर केलेल्या नामनिर्देशनपत्राची निवडणूक निर्णय अधिकारी अथवा त्यांच्या हाताखालील कर्मचाऱ्यांमार्फत प्राथमिक तपासणी करण्यात यावी.

प्राथमिक तपासणीत लक्षात आलेल्या त्रुटी उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व त्रुटी दूर करण्याची त्यांना संधी देण्यात यावी. जेणेकरुन नामनिर्देशनपत्रावर उमेदवार, सूचक, अनुमोदक यांनी स्वाक्षरी करावयाचे राहून गेले असल्यास अथवा इतर काही त्रुटी असल्यास त्या दुरुस्त करण्याची संधी मिळू शकेल. मात्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आल्यानंतर त्यामध्ये दुरुस्ती करता येणार नाही. त्यासाठी उमेदवारास नव्याने नामनिर्देशनपत्र दाखल करावे लागेल.

(ii) उमेदवाराने नामनिर्देशनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे असल्याने संगणक प्रणालीमध्ये माहिती भरुन त्याचे प्रिंट आऊट घेतल्यानंतर त्यामध्ये काही दुरुस्ती करणे उमेदवारास आवश्यक वाटल्यास त्यांना त्यामध्ये हाताने दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी दुरुस्ती ज्याठिकाणी केली जाईल त्याठिकाणी उमेदवाराने दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अशारितीने हाताने दुरुस्ती केली असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यानुसार संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक दुरुस्त्या कराव्यात.

(iii) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी वेबसाईट हँग झाल्यामुळे उमेदवार संगणकीय प्रणालीमध्ये नामनिर्देशनपत्र तसेच शपथपत्रातील माहिती भरुन त्याची प्रिंट आऊट घेऊ शकणार नाही याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची खात्री झाल्यास त्यांनी राज्य निवडणूक आयोगाशी तात्काळ संपर्क साधून आयोगाचे निर्देश प्राप्त करुन घ्यावेत

(iv) उमेदवारांना वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची संधी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम वेळेपर्यंतच देण्यात यावी.

५. राज्य निवडणूक आयोगाच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवरुन निवडणूक लढविण्यासाठी स्त्री उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत तिच्या विवाहापूर्वीच्या नावाने मिळालेले जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास, नाव जुळत नाही या कारणास्तव त्यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात

येते. त्यामुळे इच्छुक स्त्री उमेदवारास निवडणूक लढविण्याच्या हक्कापासून वंचित रहावे लागते. याबाबत सूचित करण्यात येते की, विवाहित स्त्रीने नामनिर्देशनपत्रासोबत विवाहापूर्वीच्या नावाने मिळविलेले जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र, तिच्या नावात बदल झाल्याच्या पुराव्यासह अथवा नावात बदल झाला असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केल्यास ते स्विकारण्यात यावे.

६. तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात ही विनंती.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
सर्व विभागीय आयुक्त
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
निवड नस्ती

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता तृतीयपंथी व्यक्तीने स्वत: घोषित केलेल्या लिंगाच्या पर्यायानुसार निवडणूक लढविण्याचा हक्क देणेबाबत.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापनि-२०२१/प्र.क्र. ०७/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑगस्ट, २०२१

आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए नुसार राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, घटना (७३ वी) दुरुस्ती अधिनियम, १९९२ आणि घटना (७४ वी) दुरुस्ती अधिनियम, १९९२ च्या हेतूने ठरविल्यानुसार पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुका नियमित, विहित मुदतीत, मुक्त आणि स्वच्छ वातावरणात पार पाडण्याकरिता अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) ४००/२०१२ मध्ये दिलेल्या महत्वपूर्ण निवाड्यामध्ये असे निरीक्षण नोंदविले आहे की, एखाद्या व्यक्तीच्या अस्तित्वाकरिता त्याच्या लिंगाची ओळख हा अविभाज्य भाग असून "व्यक्तिगत स्वायत्तता" आणि "आत्मनिर्णय" याचा गाभा विचारात घेऊन तृतीयपंथीयांचा तृतीय लिंग (Third gender) यामध्ये विचार करण्याचे निर्देश दिले.

आणि ज्याअर्थी, तृतीयपंथी व्यक्तींच्या (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ च्या कलम ४ उपकलम २ मधील तरतुदीनुसार उपकलम १ अंतर्गत तृतीयपंथी म्हणून ओळखल्या गेलेल्या व्यक्तीला स्वत:ची लिंग ओळख करुन देण्याचा अधिकार असेल.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल झालेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) १०४/२०२१ (अंजली गुरु संजना जान विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर (reported at 2021(1) ALL MR 422)) मध्ये दि. २ जानेवारी, २०२१ रोजी दिलेल्या आदेशात असे निरीक्षण नोंदविले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे आणि सन २०१९ च्या कायद्यातील संबंधित तरतुदींचे पालन करणे आवश्यक असून त्यानुसार तृतीयपंथी उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र हे त्याने स्वसमजानुसार घोषित केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे स्विकारणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, तृतीयपंथी व्यक्तीस कोणत्या लिंगाच्या आधारे कोणत्या जागेवरुन निवडणूक लढविता येईल याबाबत अधिनियमात तरतूद नसल्यामुळे संभ्रम निर्माण होऊ शकतो आणि त्याकरिता तरतूद करण्याची आवश्यकता आहे

आणि म्हणून तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ मधील तरतुदीनुसार तृतीयपंथी व्यक्तीच्या निवडणूक लढविण्याच्या मुलभूत अधिकारांचा विचार करण्यासाठी आणि संभ्रम टाळण्यासाठी त्याने स्वसमजानुसार केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे त्याच्या नामनिर्देशनपत्राचा निर्णय घेण्याकरिता तरतूद करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८अ (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०अ(४), महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

आदेश

१) सर्व तृतीयपंथींना त्यांनी स्वसमजानुसार केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याचा अधिकार असेल.

२) अशा निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने इतर सर्व हेतूंसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर केलेला असावा.

३) अशी निवडणूक लढविणारी व्यक्ती इतर सर्व कारणांसाठी त्याच निवडलेल्या लिंगाचा वापर करेल, आणि तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ मध्ये दिलेल्या योग्य प्रक्रियेचे पालन केल्याशिवाय केवळ संधी आहे म्हणून लिंगाची ओळख बदलणार नाही असे शपथपत्र देईल.

४) राज्य निवडणूक आयोगाने दि. २४ नोव्हेंबर, २०११ अन्वये यासंदर्भात दिलेले निर्देश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
५. नगरपरिषदा / नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
६. सर्व तहसिलदार
७. राज्य निवडणूक आयोगाचे तिनही खंडपीठावरील वकील
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती

२०७

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१५ /प्र.क्र. २४/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ सप्टेंबर, २०२३

आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(१) अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिकांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम यामध्ये जर एखाद्या नगरसेवकाने त्याच्या पदाचा वापर करून त्याने अथवा त्याच्या पती/पत्नी/अवलंबित व्यक्ती यांनी बेकायदा बांधकाम केले असेल अथवा बेकायदा बांधकामावर कारवाई करताना अडथळा निर्माण केला असेल तर अशा नगरसेवकास त्याच्या उर्वरित कालावधीकरिता अनर्ह ठरविण्याची तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, नगरसेवकाने अनधिकृत बांधकाम केले असल्यास तो जाहीर करण्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्याचे निर्देश द्यावेत अशी विनंती मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या PIL NO. ४५/२०२२ मध्ये करण्यात आली होती. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६/९/२०२३ रोजी दिलेल्या आदेशात निवडणूक लढविताना उमेदवाराकडून दाखल करण्यात येणाऱ्या शपथपत्रामध्ये त्याने / तिने अथवा पती / पत्नी अथवा अवलंबित व्यक्ती यांनी अनधिकृत बांधकाम केले आहे किंवा करो याबाबतची माहिती उघड करता येणे शक्य आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० नुसार व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदीनुसार दोन प्रकारच्या अनर्हता नमूद करण्यात आल्या आहेत व त्यानुसार काही व्यक्ती पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास व काही व्यक्ती पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह होऊ शकतात.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१ड) / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१ड) अनुसार निवडून आलेल्या पालिका सदस्याला पालिका सदस्य म्हणून त्याचा पदावधी शिल्लक असेपर्यंत अनर्ह करण्याची तरतूद आहे, मात्र अशा व्यक्तीस पालिका सदस्य म्हणून पुढील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडून येण्यास अनर्ह करण्याची तरतूद सध्या नाही.

आणि ज्याअर्थी, जर एखाद्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबतच्या शपथपत्रात अनधिकृत बांधकामाबाबत चुकीची माहिती सादर केल्याचे निष्पन्न झाल्यास, त्या उमेदवारावर राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ११ ऑगस्ट, २००५ च्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्याबाबत तरतूद आहे, आणि तसे केल्यावर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांच्या कृतीवर आळा बसण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने दि. ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी महानगरपालिका निवडणुकांकरिता नामनिर्देशनपत्र व शपथपत्र यांचा नमुना विहित केला आहे आणि दि. १३ ऑगस्ट, २०१८ रोजी त्यासोबतच्या शपथपत्राचा नमुना सुधारीत केला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत द्यावयाच्या सदर शपथपत्रामध्ये सुधारणा करणे उपयुक्त ठरणार आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए (४) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या

कलम १४ (४) अन्वये मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४/का.५, दि. १३ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशातील मुद्दा क्र. १६ . ५ खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे :-

"१६.

५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १० / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही. मी स्वत: अथवा माझी पत्नी / माझे पती / माझे अवलंबित यांनी कोणतेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१ड) / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ (१ड) मधील तरतुदीनुसार जर मी निवडून आल्यावर अनधिकृत बांधकाम केले असल्याचे सिद्ध झाल्यास मी नगरसेवक पदावर रहाण्यास अनर्ह ठरेन, याची मला जाणीव आहे."

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
उपसचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत -

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
३) संगणकीकरण शाखा -

ऑनलाईन नामनिर्देशन प्रक्रियेच्या आज्ञावलीतील शपथपत्रामध्ये योग्य त्या सुधारणा करण्यासाठी अग्रेषित.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये विवाहित महिला उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्र व मतपत्रिकेवरील नावाबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०१/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १३ मार्च, २०२५

संदर्भ:-१.क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का.५, दि.०१/०४/२०१७.

भारतीय संविधानातील कलम २४३-के व २४३-झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधीक्षण, संचालन व नियंत्रण करणे यासोबतच निवडणुका मुक्त, निर्भय व शांत वातावरणात पार पाडणे तसेच निवडणूक प्रक्रियेची शुद्धता अथवा पावित्र्य राखणे याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

ज्याअर्थी, निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या विवाहित महिलांनी नामनिर्देशन पत्रांवर विवाहापूर्वीचे नाव किंवा विवाहानंतरच्या नावांपैकी नेमके कोणते नाव नमूद करावे, याबाबत संभ्रम असल्याचे निदर्शनास आणण्यात आले;

ज्याअर्थी, निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिलांचे बाबतीत त्या यथोचितरित्या नामनिर्देशित झाल्यानंतर, संबंधित मतपत्रिकेवर त्यांचे विवाहापूर्वीचे नाव असावे अगर विवाहानंतरचे नाव असावे याबाबत कोणत्याही सूचना/ आदेश नसल्याबाबत निदर्शनास आणण्यात आले;

त्याअर्थी निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिलांच्या बाबतीत नामनिर्देशनपत्र तसेच मतपत्रिकेवर नाव कशा प्रकारे असावे याबाबत पुढील प्रमाणे आदेशित करण्यात येत आहे....

आदेश

१. निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक उमेदवाराचे नाव संबंधित मतदार यादीमध्ये असणे ही आवश्यक अर्हता आहे. त्यामुळे नामनिर्देशनपत्र सादर करताना अशा इच्छूक उमेदवारांना (महिला उमेदवारांसह), त्यांचे संबंधित मतदार यादीमध्ये असलेल्या नावानेच नामनिर्देशन पत्र दाखल करणे आवश्यक आहे.

२. निवडणूक लढविण्यासाठी नामनिर्देशन पत्र सादर केलेल्या विवाहित महिला उमेदवारास, मतदार यादीमध्ये व नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद असलेल्या नावाखेरीज त्यांना मतपत्रिकेवर इतर नावाचा उल्लेख करण्याची इच्छा असेल तर सदर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी तसा विनंती अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करता येईल.

३. सदर अर्जासोबत त्यांनी ज्या नावाचा उल्लेख मतपत्रिकेवर करावयाचा आहे त्या पूष्ठर्थ आवश्यक पुरावे उदा. विवाह नोंदणी प्रमाणपत्र, राजपत्रात प्रसिध्द केलेले विवाहानंतरचे नाव इ., सादर करणे अनिवार्य असेल. उक्त नमूद प्रमाणपत्र तसेच राजपत्र उपलब्ध नसल्यास, मतदाराने

मतदान करण्यापुर्वी आपली ओळख पटविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का.५ दि.०८/११/२०११ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या १७ पुराव्यांपैकी, अशा उमेदवाराचे त्यास हवे असलेल्या नावांसहीत छायाचित्र असलेला कोणताही एक पुरावा सादर करणे आवश्यक असेल.

४. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवाराने सादर केलेले पुरावे लक्षात घेऊन वैधरित्या नामनिर्देशित व अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करतांना व पर्यायाने मतपत्रिका तयार करतांना या सुधारित नावाचा समावेश करण्याबाबत निर्णय घ्यावा.

५. वैधरित्या नामनिर्देशित व निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिला उमेदवाराने विवाहापूर्वीचे तसेच विवाहानंतरचे नाव मतपत्रिकेवर जोडून छापण्याची विनंती केली तर अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करतांना मतदार यादीतील नावापुढे विवाहानंतरचे/ पूर्वीचे नाव देखील कंसात छापण्याची परवानगी देता येईल. मात्र अशी अनुमती देताना ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर, नाव मुद्रीत करण्यासाठी मुक्रर करण्यात आलेल्या जागेचाच व विहीत फॉंटचा वापर होईल, याची दक्षता घ्यावी (संदर्भ राज्य निवडणूक आयोगाचे दि.०३/०२/२०१७ रोजीचे आदेश).

६. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अंतिम यादीत व मतपत्रिकेवर उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे घेतांना, ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असेल त्या स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत लागू असलेल्या तरतुदीनुसार सदर यादीत व मतपत्रिकेवर नावाचा क्रम लावण्यात यावा.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) 23.03.2017
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
३. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त,
५. सर्व जिल्हाधिकारी,
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
७. सर्व महानगरपालिका आयुक्त
८. सर्व प्रादेशिक संचालक व विभागीय आयुक्त, नगरपालिका प्रशासन
९. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती
१०. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
११. निवड नस्ती.

प्रकरण — १४

राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्ह वाटप संदर्भातील आदेश व सूचना

RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ३८] शनिवार, नोव्हेंबर ०८, २०२५/कार्तिक १७, शके १९४७ [पृष्ठे ८७, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ७२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ नोव्हेंबर २०२५.

अधिसूचना

क्रमांक रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र.५४/का.११.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचलन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे ;

२. आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षांच्या नोंदणीसंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करताना होणारा संभ्रम दूर करण्याकरिता, आदेशांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' दिनांक ५ मे २०२५ रोजीचा आदेश **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आला आहे;

३. आणि ज्याअर्थी, उक्त आदेशाच्या 'भाग चार' मधील परिच्छेद २३ नुसार राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष ,महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष, इतर राज्यांतील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांच्याकरिता राखून ठेवण्यात आलेली चिन्हे ; तसेच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचा तपशील व मुक्त चिन्हे प्रसिद्ध करण्याची तरतूद करण्यात आली आहे;

४. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या अधिसूचना क्रमांक रानिआ/रापनों-२०१९/प्र.क्र.२२/का.११, दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ व दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ अन्वये नमूद मान्यताप्राप्त पक्ष व त्यांच्यासाठी राखीव चिन्ह आणि अमान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्ष तसेच मुक्त चिन्हांची यादी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली होती;

५. आणि ज्याअर्थी, शिवसेना व नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी यांच्या पक्षांतर्गत विभाजनानंतर पक्षाचे नाव व चिन्ह याबाबतचा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालय यांच्याकडे प्रतिक्षाधिन असल्याने सदर पक्षांची नावे व त्यांच्यासाठी राखीव असलेले चिन्ह मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून समाविष्ट करणे आवश्यक आहे;

६. आणि ज्याअर्थी, दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ व दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या **शासन राजपत्रांनंतर** राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडे दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ या दिनांकापर्यंत नोंदणी झालेल्या एकूण ४३५ राजकीय पक्षांची नावे त्यांच्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्यासह प्रसिद्ध करणे आवश्यक झाले आहे.

७. त्याअर्थी, 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' दिनांक ५ मे ,२०२५ च्या 'भाग चार' मधील परिच्छेद २३ आणि 'भाग ६' मधील परिच्छेद २७ (१) चा वापर करून दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ व दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजी प्रसिद्ध केलेली अधिसूचना अधिक्रमित करून नव्याने अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे. म्हणून दिनांक **०७ नोव्हेंबर २०२५** रोजीपर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या / झालेल्या पक्षांची यादी (एकूण ४३५) (राखून ठेवलेल्या व मुक्त चिन्हांसह) आणि त्यांच्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्यांसह, खालीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे.

परिशिष्ट - (क) : राष्ट्रीय पक्ष (एकूण ००५)

परिशिष्ट - (ख) : महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय पक्ष (एकूण ००५)

परिशिष्ट - (ग) : इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष (एकूण ००९)

परिशिष्ट - (घ) : आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष (एकूण ४१६)



परिशिष्ट - (ड़) : मुक्त चिन्हांची यादी (एकूण १९४)

परिशिष्ट- (क)

दि.०७/११/२०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षांचे नाव व त्यांच्या मुख्यालयांचे पत्ते

भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त पक्ष (राखीव चिन्हासह)

राष्ट्रीय पक्ष (एकूण-५)

अ. क्र	पक्षाचे नाव	नोंदणीचा दिनांक	चिन्ह	मुख्यालयाचा पत्ता
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	भारतीय जनता पार्टी **SEC/NP/BJP/05/02**	३०/०३/२००५	कमळ 	११, अशोक रोड, न्यू दिल्ली ११० ००१. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** सी.डी.ओ., बरॅक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२०.
२	भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) **SEC/NP/BCP(M)/05/04**	१६/०५/२००५	हातोडा विळा आणि तारा 	ए.के.गोपालन भवन २७-२९, भाई वीरसिंह मार्ग, गोल मार्केट, न्यू दिल्ली ११० ००१. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** जनशक्ती, पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई १३.
३	बहुजन समाज पार्टी **SEC/NP/BSP/05/05**	०८/१०/२००५	हत्ती 	१२, गुरु रकाबगंज रोड, नवी दिल्ली ११० ००१. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** बी.एस.पी.भवन, प्लॉट नं.८३,-ए, कलेक्टर कॉलनी, चेंबूर मुंबई- ४०००७४.
४	भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस **SEC/NP/BRC/05/06 नावाची दुरूस्ती करावी***	०५/१२/२००५	हात 	२४, अकबर रोड, न्यू दिल्ली ११० ०११. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०००२५. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** गांधी भवन, फ्री प्रेस जनरल मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०२१.
५	आम आदमी पार्टी **SEC/OSP/AAP/18/1**	२३/१०/२०१८	झाडू 	६१०-ए, कॉर्मस हाऊस, नगिनदास मास्टर रोड, फोर्ट रोड, मुंबई, पिन कोड-४०० ००१.

परिशिष्ट- (ख)

दि. ०७/११/२०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षांचे नाव व त्यांच्या मुख्यालयांचे पत्ते

भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त पक्ष (राखीव चिन्हासह)


महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय पक्ष (एकूण-५)

अ.क्र	पक्षाचे नाव	नोंदणीचा दिनांक	चिन्ह	मुख्यालयाचा पत्ता
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी **SEC/SP/NCP/05/03**	२९/०४/२००५ (मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालास अधिन राहून)	घड्याळ 	मुंबई कार्यालयाचा पत्ता:अ-४, राजगड, मादाम कामा रोड, मंत्रालया समोर, मुंबई-४०००३२
२	शिवसेना SEC/SP/SS/**05/01**	१६/०५/२००५ (मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालास अधिन राहून)	धनुष्यबाण 	कार्यालयाचा पत्ता: आनंद आश्रम, श्री.भवानी चौक, टेंभी नाका, ठाणे (प.)४००६०१
३	महाराष्ट्र नवनिर्माण सेना **SEC/SP/MNS/06/01**	२०/०५/२००६	रेल्वे इंजिन 	राजगड, मातोश्री टॉवर, बी विंग, दुसरा मजला, रुम नं २०२, पदमाबाई ठक्कर मार्ग, मुंबई ४०० ०१६
४	शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)	मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालास अधिन राहून	मशाल # 	शिवसेना भवन, राम गणेश गडकरी चौक, दादर (प.), मुंबई ४०० ०२८. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** शिवालय, बरॅक क्र.७, फ्री प्रेस रोड, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
५	नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार	मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालास अधिन राहून	तुतारी वाजवणारा माणूस # 	१०, बिशंभर दास मार्ग,नवी दिल्ली ११० ००१. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** ठाकरसी हाऊस, जे.एन. हेरेडिया मार्ग, बलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई ३८.

परिशिष्ट-(ग)

दि. ०७/११/२०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षांचे नाव व त्यांच्या मुख्यालयांचे पत्ते

भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त पक्ष (राखीव चिन्हासह) इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष (एकूण- ०९)

अ. क्र	पक्षाचे नाव	नोंदणीचा दिनांक	चिन्ह	मुख्यालयाचा पत्ता
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	भारतीय कम्युनिस्ट पक्ष **SEC/NP/BCP/05/01**	२८/०३/२००५	कणीस आणि विळा 	मुंबई कार्यालयाचा पत्ता : ३१४, राजभुवन सरदार वल्लभभाई पटेल रोड, खेतवाडी, सातवी गल्ली मुंबई, -४०० ००४.
२	जनता दल (सेक्यूलर) **SEC/OSP/JD(S)/05/01**	३१/०५/२००५	डोक्यावर भारा घेतलेली स्त्री 	३, रेसकोर्स रोड, बंगलोर ५६० ००९ **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** १०, सी.डी.ओ.बरॅक, योगक्षेम, एल.आय.सी.बिल्डिंग, जीवनबीमा मार्ग, चर्चगेट,मुंबई ४०० ०२०.
३	समाजवादी पार्टी **SEC/OSP/SP/05/02**	१३/०६/२००५	सायकल 	१८, कोपरनिकस लेन, न्यू दिल्ली ११० ००१. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** कमाल मॅन्शन, ४था मजला, हाजी नियाज अहमद मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००५.
४	इडियन युनियन मुस्लिम लीग **SEC/OSP/IUML/06/01**	११/१२/२००६	शिडी 	महाराष्ट्र राज्य मुख्य कार्यालय, मांडवी टेलिफोन एक्सचेंज जवळ, रुम नं.९, दुसरा मजला, ४३ मिया अहमद छोटानी मार्ग, मुंबई- ४०० ००३
५	ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कझगम **SEC/OSP/AIADMK/07/01**	२६/०१/२००७	दोन पाने 	२२६/२७५, अवाई शनमुगम सलाई, रोयापेठा, चेन्नई ६०० ०१४. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** व्ही.ओ.सी.टॉवर, डी विंग, रुम नं ७०४, ९० फीट रोड, धारावी, मुंबई ४०० ०१७.
६	जनता दल -(युनायटेड) **SEC/OSP/JD(U)/11/01**	१५/११/२०११	बाण 	७ जंतर-मंतर रोड, नवी दिल्ली ११० ००१. **मुंबई कार्यालयाचा पत्ता:** २/११, उन्नत नगर नं. ४, एम.जी रोड, गोरेगाव(प), मुंबई ४००१०४.
७	ऑल इंडिया मजलिस इत्तेहदूल मुस्लिमीन **SEC/OSP/AIMEM/12/01**	१२/०१/२०१२	पतंग 	रा.पा. पत्ता : ५-६-१, दरुस सलाम,अघापूरा, हैद्राबाद ५०० ००१ **महाराष्ट्रातील कार्यालयाचा पत्ता :** द्वारा श्री. सबेरी सय्यद इब्बतेझम असद , प्लॉट नं. १६, दिलरस कॉलनी, अरेफ कॉलनी, औरंगाबाद-४३१००१. महाराष्ट्र.
८	ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक SEC/OSP/AIFB/२३/०१	११/१/२०२३	सिंह 	दुकान क्र.१ व २, सुरज, प्लाझा चांदूर रेल्वे मार्ग, नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती-४४४७०८
९	भारत राष्ट्र समिथी **SEC/OSP/BRS/23/02**	२३/३/२०२३	कार 	व्दारा श्री.एम.बी.पाटील, प्लॉट नं.२, तळ मजला, स्वाधिन सदन बिल्डींग, "सी" रोड,गव्हमेंट बाइज हॉस्टेलसमोर, चर्चगेट रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई-४०००२०

परिशिष्ट-(घ)			
राज्य निवडणूक आयोगाकडे महाराष्ट्र येथे नोंदणीकृत झालेल्या पक्षांच्या नावांची यादी व मुख्य कार्यालयाचे पत्ते			
क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
सन २००५			
१	आष्टा शहर विकास आघाडी SEC/UPP/ASVA/०५/०१	१०/२/२००५	शिवम बंगला, मुंबई तलावाजवळ, आष्टा, जि.सांगली ४१६३०१.
२	रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) SEC/UPP/RPI(A)/०५/०२	७/५/२००५	प्लॉट नं.९४,लक्ष्मी बंगलो,छेडा नगर,चेंबूर,मुंबई८९.
३	जन सुराज्य शक्ती SEC/UPP/JSS/०५/०३	२५/५/२००५	वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६११३.
४	राष्ट्रीय समाज पक्ष SEC/UPP/RSP/०५/०४	२५/५/२००५	१/बी/३५, हमाम स्ट्रीट, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट,मुंबई ४०० ०२३
५	समाजवादी गणराज्य पार्टी SEC/UPP/LB/०५/०५	३१/५/२००५	ए/७०२, वेदांत बिल्डिंग, उन्नत नगर नं.२, गोरेगांव (प.), जिल्हा मुंबई उपनगर ४०० ०६२.
६	नेताजी कॉंग्रेस सेना SEC/UPP/NCS/०५/०६	२३/६/२००५	रंगा बिल्डिंग, सर्व्हे नं.१२३, संतोष नगर, कात्रज, जिल्हा पुणे ४११ ०४६
७	पीपल्स रिपब्लिकन पार्टी SEC/UPP/PRP/०५/०७	७/१/२००५	जय भिम विकली, जय भिम टॉवर, सिताबर्डी, जिल्हा नागपूर ४४० ०१२
८	भारतीय शेतकरी कामगार पक्ष SEC/UPP/BSKP/०५/०८	६/८/२००५	सीपीएस क्र. शेकाप भवन ,माहिम सी फेजसमोर, स्वामी विवेकानंद गार्डनच्यामागे, माहिम कॉज वे, एस.व्हि.रोड, माहिम (प.) मुंबई १६
९	स्वाभिमानी पक्ष SEC/UPP/SP/०५/०९	८/८/२००५	राधाबाई रोड, ९वी लेन, जयसिंगपूर, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर ४१६१०१.
१०	जनता आघाडी SEC/UPP/JA/०५/१०	१२/८/२००५	पुण्याई, यशवंतराव नगर, विटा, जिल्हा सांगली ४१५ ३११.
११	रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया SEC/UPP/RPI/०५/११	२५/८/२००५	हन्सा हटमेंट, आय ब्लॉक, महानगर पालिका मार्ग,आझाद मैदान, कामा हॉस्पिटल समोर,मुंबई-०१
१२	भारिप बहुजन महासंघ SEC/UPP/BBM/०५/१२	२४/१०/२००५	शासकीय कुटीर क्र.८, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, जिल्हा मुंबई ४०० ०२१.
१३	रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोरिपा) SEC/UPP/RPI(K)/०५/१३	२१/१२/२००५	८/९, एन्सा हटमेंटस, आझाद मैदान, मुंबई महानगरपालिकेसमोर, फोर्ट, मुंबई १.
सन २००६			
१४	बहुजन रिपब्लिकन एकता मंच SEC/UPP/BREM/०६/०१	१५/२/२००६	हरदास नगर, कामठी, जिल्हा- नागपूर ४४१ ००२
१५	सर्व प्रांतीय सेना SEC/UPP/SPS/०६/०२	१०/४/२००६	४०७-बी, आकांक्षा अपार्टमेंट, मनीषा नगर, मुंबई-पुणे रोड, कळवा, जि.ठाणे- ४०० ६०५.
१६	श्री. छत्रपती शाहू आघाडी SEC/UPP/SCSA /०६/०३	६/१२/२००६	कागल सिनियर ऑफीस, २४९-ई, पागा बिल्डिंग, नागाळा पार्क, जिल्हा कोल्हापूर ४१६००३.

क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
१७	युवक क्रांती आघाडी SEC/UPP/YKA/०६/०४	५/७/२००६	श्री. राजाराम चित्र मंदिर, एस. टी. स्टँडसमोर, वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा-कोल्हापूर ४१६ ११२.
१८	पंढरपूर - मंगळवेढा विकास आघाडी SEC/UPP/PMVA/०६/०५	१०/८/२००६	३२३५, विजापूर गल्ली, पंढरपूर,जिल्हा- सोलापूर ४१३३०४.
१९	डेमोक्रेटीक सेक्युलर पार्टी SEC/UPP/ DSP/०६/०६	३०/८/२००६	कोहिनूर बेकरी, उमरेड रोड, ताजआबाद,औलियानगर, जिल्हा नागपूर ४४००२४.
२०	मानव एकता पार्टी SEC/UPP/MEP/०६/०७	१७/१०/२००६	द्वारा: प्लॉट नं.५३, मानव गड, दादूसिंग कॉलनी शिरपूर, जि.धुळे, महाराष्ट्र -४२५४०५
२१	यादव पॅनल आघाडी SEC/UPP/ YPA/०६/०८	१९/१०/२००६	मु.पो. पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर ४१६ ११२.
२२	नगर विकास आघाडी, सातारा SEC/UPP/NVAS/०६/०९	३०/१०/२००६	सुरु बंगला, ११८, शुक्रवार पेठ, सातारा, जिल्हा- सातारा ४१५००२.
२३	लोकमित्र जनसेवा आघाडी, महाबळेश्वर SEC/UPP/LJAM/०६/१०	१४/११/२००६	द्वारा हॉटेल सनी इंटरनॅशनल, स्टेट बँकेसमोर, मस्जिद रोड, महाबळेश्वर, जि.सातारा ४१२८०६.
२४	सातारा विकास आघाडी SEC/UPP/SVA/०६/११	१४/११/२००६	१, जलमंदिर पॅलेश, जिल्हा-सातारा ४१५००२.
२५	विकास आघाडी, विटा SEC/UPP/VAV/०६/१२	१५/११/२००६	मु.पो.विटा (शिवाजीनगर) ता.खानापूर, जिल्हा- सांगली ४१५३११.
२६	जनशक्ती विकास आघाडी, शेवगांव SEC/UPP/JVAS/०६/१३	२/१२/२००६	पेट्रोल पंपासमोर, मिरीरोड, शेवगांव, ता. शेवगांव, जिल्हा अहिल्यानगर- ४१४५०२
२७	नगर विकास पार्टी, बाळापूर SEC/UPP/NVPB/०६/१४	६/१२/२००६	सय्यदपुरा, मु.पो.बाळापूर, ता.बाळापूर, जिल्हा -अकोला ४४४३०२.
२८	अखिल भारतीय सेना SEC/UPP/ABS /०६/१५	६/१२/२००६	गीताई सहकारी गृहनिर्माण संस्था, तळमजला, दगडी चाळ कंपाउंड, बापूराव जगताप मार्ग, भायखळा (प),जिल्हा मुंबई ४०० ०११.
२९	पाटण तालुका विकास आघाडी SEC/UPP/PTVA /०६/१६	६/१२/२००६	मु.पो.मरळी, ता. पाटण. जिल्हा- सातारा ४१५ २०६.
३०	शिरुर शहर विकास आघाडी (शिरुर) SEC/UPP/ SSVA(S)/०६/१७	११/१२/२००६	द्वारा सचिव मनसुखलाल शांतीलाल गुगळे,२२०८,मुंबई बाजार, शिरुर (घोडनदी),ता.शिरुर,जि.पुणे ४१२२१०.
३१	लोकशाही आघाडी, कराड शहर SEC/UPP/LAKS/०६/१८	११/१२/२००६	अनंत कॉम्प्लेक्स ५८, मंगळवार पेठ, कराड, ता.कराड, जिल्हा- सातारा ४१५ ११०.

क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
३२	आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टी SEC/UPP/ARP /०६/१९	२६/१२/२००६	श्रीमती निर्मलाताई श्रीकृष्ण उबाळे, द्वारा सरस्वतीबाई गाडगे ,जुन्या तहसिल कार्यालयाजवळ तिवसा,ता. तीवसा, जिल्हा अमरावती,४४४ ९०३.
सन २००७			
३३	खान्देश विकास आघाडी SEC/UPP/KVA /०७/०१	१०/१/२००७	६/३, खान्देश मिल शॉपिंग कॉम्प्लेक्स, जिल्हा जळगांव ४२५००१
३४	जन विकास आघाडी, कोपरगाव SEC/UPP/JVAK /०७/०२	२२/१/२००७	गौतम नगर, पो. कोळपेवाडी, ता. कोपरगाव, जिल्हा - अहिल्यानगर- ४२३६०१.
३५	शहर विकास आघाडी, चोपडा SEC/UPP/SVAC /०७/०३	२३/१/२००७	शरद चंद्रिका अक्का मॅटर्निटी व सर्जिकल हॉस्पिटल, चोपडा, जिल्हा जळगाव. ४२५१०७
३६	नगर सुधार (समिती) आघाडी SEC/UPP/NVS(S)A /०७/०४	८/२/२००७	द्वारा- श्री विक्रमसिंह परशरामसिंह परीहार, राजपुतपुरा दर्यापूर, जिल्हा अमरावती ४४४८०३.
सन २००८			
३७	बहुजन विकास आघाडी SEC/UPP/BVA /०८/०१	२८/६/२००८	ठाकूर निवास , दत्त मंदिर रोड, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर ४०१३०३.
३८	बहुजन भिमसेना SEC/UPP/BB /०८/०२	२२/७/२००८	सर्व्हे नं.२४, बोपोडी, जिल्हा पुणे - ४११ ००३.
३९	श्री लक्ष्मी डोंगराई देवी नगर विकास आघाडी मलकापूर SEC/UPP/SLDDNVAM /०८/०३	६/८/२००८	मलकापूर - लक्ष्मीनगर, तालुका-कराड, जिल्हा सातारा ४११ ५३९.
४०	मलकापूर शहर विकास आघाडी SEC/UPP/MSVA /०८/०४	१/१०/२००८	यादव आर्केड, पुणे-बेंगलोर रोड, मलकापूर, ता.कराड, जिल्हा सातारा ४१५११०.
४१	रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे) SEC/UPP/RPI(K)/०८/०५	१४/१०/२००८	द्वारा- श्री योगेश जांभूळकर, १७९, कपील नगर, नागपूर, जिल्हा नागपूर ४३३०२६
सन २००९			
४२	लोकसंग्राम SEC/UPP/L/०९/०१	१/१/२००९	घ.नं.१३२१, लेन नं.४,धुळे,जिल्हा-धुळे ४२४००१.
४३	कोणार्क विकास आघाडी SEC/UPP/KVA/०९/०२	१९/१/२००९	कोणार्क विकास आघाडी, पहिला माळा, मनोहर पॅलेस, सपना टॉकीजच्यामागे, उल्हासनगर,जिल्हा ठाणे ४२१ ००३.
४४	मा. यशवंतराव चव्हाण कृष्णा विकास आघाडी SEC/UPP/MYCKVA/०९/०३	१०/२/२००९	कृष्णा महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, ४३८, शनिवार पेठ, अनु एजन्सीसमोर, कराड, जिल्हा सातारा ४१५००२.
४५	रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (S) SEC/UPP/RPI(S)/०९/०४	७/७/२००९	ई/१०, धम्मगंगा हौसिंग सोसायटी, पिंपरी, जिल्हा पुणे- ४११०१७.

क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
४६	आदिम संविधान संरक्षण समिती SEC/UPP/ASSS/०९/०५	१०/७/२००९	प्लॉट नं.६५, पराते लेन, धरमपेठ, जि.नागपूर ४४० ०१०
४७	ब्लॅक पँथर SEC/UPP/BP/०९/०६	१/९/२००९	५२६/१, सायली पार्क, सम्राटनगर, टेलिफोन ऑफिसजवळ, जिल्हा कोल्हापूर ४१६००१.
४८	समानता काँग्रेस पार्टी SEC/UPP/SCP/०९/०७	१४/९/२००९	त्रिमूर्ती बुक डेपो बिल्डिंग, परंडा रोड, भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर ४१३२२३.
	सन २०१०		
४९	युवा स्वाभिमान पार्टी SEC/UPP/YSP/१०/०१	२७/८/२०१०	राजापेठ ते राजकमल रोड, भोंगाडे कॉम्प्लेक्स, जिल्हा अमरावती ४४४६०१.
५०	महाराष्ट्र परिवर्तन सेना SEC/UPP/MPS/१०/०२	१/९/२०१०	५ जे १०१/१०२,जयहिंद को-ऑप हौ.सोसा., पहिला मजला, संघर्ष नगर, चांदिवली, अंधेरी (पूर्व), जिल्हा मुंबई उपनगर ४०० ०७२.
५१	ताराराणी आघाडी पक्ष SEC/UPP/TAP/१०/०३	४/११/२०१०	कोल्हापूर मोटारमालक संघ प्रा.लि., ताराराणी चौक, जिल्हा कोल्हापूर ४१६००३.
५२	तीर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर SEC/UPP/TVAP/१०/०४	१८/११/२०१०	हुंदेकरी चेंबर्स, महावीरनगर, पंढरपूर, जिल्हा सोलापूर-४१३ ३०४
५३	गर्जना लोकराज्य चळवळ (महाराष्ट्र) SEC/UPP/GLC(M)/१०/०५	१८/१२/२०१०	गट नं. ११२, निमखेडी शिवार, प्लॉट नं. ९, हिरागौरी पार्कजवळ, जिल्हा जळगाव ४२५ ००१.
	सन २०११		
५४	ओबीसी एनटी पार्टी ऑफ इंडिया SEC/UPP/OBCNTPI/११/०१	३१/१/२०११	के- ७/१०, बर्वेनगर कॉलनी, घाटकोपर (प.) जिल्हा मुंबई उपनगर ४०० ०८४.
५५	भारतीय क्रांती सेना SEC/UPP/BKS/११/०२	२१/२/२०११	बी. आर. पाटील, राजे संभाजी कॉलनी, २३/१, सुरेवाडी, हर्सुल, जि.छत्रपती संभाजीनगर- ४३१ ११९.
५६	हिंदुस्तान जनता पार्टी SEC/UPP/HJP/११/०३	३०/४/२०११	फ्लॅट नं.८, विशाल सागर अपार्टमेंट, प्लॉट नं ३३, नूतन कॉलनी, जिल्हा छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००१.
५७	अखिल भारतीय सम्राट सेना SEC/UPP/ABSS/११/०४	४/६/२०११	मु.पो.पिंपरी खुर्द, ता.इंदापूर, जि.पुणे ४१३१०६
५८	गेवराई विकास आघाडी SEC/UPP/GVA/११/०५	४/६/२०११	भगवती निवास, कोल्हेर रोड, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड ४१३ १२७.
५९	पश्चिम महाराष्ट्र स्वतंत्र राज्य पक्ष SEC/UPP/PMSRP/११/०६	१०/६/२०११	ग्रा.पं.मिळकत नं. १३५२, मु. पो. गोटखिंडी, ता. वाळवा, जि. सांगली ४१६ ३०१.
६०	नागोबा विकास आघाडी, म्हसवड SEC/UPP/NVAM/११/०७	१०/६/२०११	मौजे म्हसवड, येथील सि.स.नं., खोली नं.१५६, ता.माण, जिल्हा सातारा ४१५५०८.

क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
६१	भारतीय मायनॉरिटीज सुरक्षा महासंघ SEC/UPP/BMSM/११/०८	७/७/२०११	रा.पा.पत्ता : ४१०,आर्केड बिल्डिंग, सर जे. जे रोड, जे.जे हॉस्पिटलसमोर, जिल्हा मुंबई ४००००८.
६२	स्वाभिमानी परिवर्तन आघाडी SEC/UPP/SPA/११/०९	३०/७/२०११	घर नं. ४२६७, दाळे गल्ली, पंढरपूर, जि. सोलापूर ४१३ ३०४.
६३	भारतीय मानवतावादी पार्टी SEC/UPP/BMP/११/१०	२०/८/२०११	अहिरे चाळ, हिंगवाला क्रॉस लेन, जनता सोसायटी, घाटकोपर पुर्व, मुंबई-४०००७४.
६४	राजर्षि शाहू विकास आघाडी जयसिंगपूर SEC/UPP/RSVAJ/११/११	२०/९/२०११	लेन नं ६, यड्रावकर चेंबर्स, नेहरु रोड, जयसिंगपूर, ता.शिरोळ,जिल्हा कोल्हापूर ४१६१०३.
६५	जनक्रांती आघाडी SEC/UPP/JA/११/१२	२०/९/२०११	ब-१, समर्थ कॉलनी, देवाचा मळा, मेडीकल हॉस्पीटलसमोर,संगमनेर, ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर-४२२६०५
६६	जनमत विकास आघाडी, सासवड SEC/UPP/JVAS/११/१३	२०/९/२०११	मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जिल्हा पुणे ४१२१०४.
६७	पुणे विकास आघाडी SEC/UPP/PVA/११/१४	२०/९/२०११	व्दारा. श्री. चंदन किसनराव सोंडेकर.मौजे पिंपळे जगताप, ता. शिरुर, जिल्हा. पुणे ४१२२१०.
६८	लोकशाही क्रांती आघाडी SEC/UPP/LKA/११/१५	१४/१०/२०११	३०-अ, यशवंत वसाहत, मु.पो.ता.शिरुर, जिल्हा पुणे ४१२ २१०.
६९	पीस पार्टी SEC/UPP/PP/११/१६	१४/१०/२०११	८७ वा लेव्हल १, डीन सेंटर, एस.व्ही.रोड, जोगेश्वरी(प),जिल्हा मुंबई उपनगर ४००१०२.
७०	वाशिम जिल्हा विकास आघाडी, वाशिम SEC/UPP/WZVAW/११/१७	३१/१०/२०११	सुखानंद पन्नालाल पटणी ऑफीसची इमारत, जवाहर कॉलनी, पुसद नाका, वाशिम, ता. जिल्हा वाशिम ४४४५०५.
७१	जनराज्य आघाडी SEC/UPP/JA/११/१८	३१/१०/२०११	मधुरम एन-४२, एसी-२/४/५, सप्तश्रृंगी चौकासमोर, पवन नगर, जिल्हा नाशिक ४२२ ००९.
७२	स्वावलंबी SEC/UPP/S/११/१९	१/११/२०११	१०, ग्रीन रुफ्स सोसायटीजवळ, सारडा सर्कल, जिल्हा नाशिक ४२२ ००१.
७३	शहर सुधारणा आघाडी, कुरुंदवाड SEC/UPP/SSAK/११/२०	१/११/२०११	द्वारा अध्यक्ष, श्री.रावसाहेब ऊर्फ दा.आ.पाटील, रा.राजवाड्याजवळ, पाटील वाडा, कुरुंदवाड, ता.शिरोळ, जिल्हा कोल्हापूर ४१६१०६.
७४	स्वाभिमानी विकास आघाडी, सांगली SEC/UPP/SVAS/११/२१	१/११/२०११	९९६/ब, चितळे डेअरीसमोर,आवटीवाडा चव्हाणवाडी, आष्टा,ता. वाळवा, जि. सांगली ४१६३०१

क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
७५	सन्मान SEC/UPP/S/११/२२	११/११/२०११	द्वारा: श्री.हिरालाल कचरुजी गायकवाड, घर नं.४१२, वॉर्ड ६, प्लॉट नं.५६, लोहारा, जिल्हा यवतमाळ ४४५ ००१.
७६	धरणगांव शहर विकास आघाडी, धरणगाव SEC/UPP/DSVAD/११/२३	१४/११/२०११	शिवाजी शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं २९, धरणगांव, ता.धरणगांव, जिल्हा जळगांव ४२५ १०५.
७७	विकास आघाडी SEC/UPP/VA/११/२४	१४/११/२०११	द्वारा श्री. विक्रम अशोकराव पाटील, शिवाजी चौक, उरूण-इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली ४१५ ४०९.
७८	अमळनेर तालुका शहर विकास आघाडी SEC/UPP/ATSVA/११/२५	१८/११/२०११	सिध्दिविनायक कॉलनी ,धुळे रोड, अंमळनेर, ता.अमळनेर, जि.जळगाव ४२५४०१.
७९	सेक्युलर अलांयन्स ऑफ इंडिया SEC/UPP/SAI/११/२६	१९/११/२०११	पहिला मजला, केसवानी कॉम्प्लेक्स, नवजीवन को.ऑ.बँकेच्यावर, चोपडा कोर्टसमोर,उल्हासनगर, जिल्हा ठाणे ४२१ ००३.
८०	राष्ट्रीय क्रांती सेना SEC/UPP/RKS/११/२७	१९/११/२०११	मु.पहाडी दहिफळ, पोस्ट पारगाव,ता.धारुर, जि.बीड ४३११२४.
८१	जनविकास काँग्रेस SEC/UPP/JC/११/२८	३/१२/२०११	श्रीराम मार्केट, राजापेठ, जिल्हा अमरावती ४४४६०१.
८२	मा.लोकनेते अनिलदादा देशमुख शहर विकास आघाडी चाळीसगाव SEC/UPP/MLADSVAC/११/२९	२०/१२/२०११	शॉप नं.ए-२७, पहिला मजला, गायत्री प्लाझा शॉपिंग कॉम्पलेक्स, भडगांव रोड,छत्रपती शिवाजी महाराज चौक, चाळीसगांव जि. जळगांव-४२४१०१
सन २०१२			
८३	महाराष्ट्र विकास आघाडी SEC/UPP/MVA/१२/०१	४/१/२०१२	द्वारा ॲड. अण्णाराव पाटील, गोविंदाग्रज सदन, पहिला मजला, एस.एस.सी. बोर्डाशेजारी, शामनगर, ता. जि.लातूर ४१३ ५३१
८४	आकोट विकास आघाडी, आकोट SEC/UPP/AVAA/१२/०२	६/१/२०१२	पोपटखेड रोड, आकोट, ता. आकोट, जि. अकोला ४४४१०१.
८५	वरुड विकास आघाडी SEC/UPP/VVA/१२/०४	६/१/२०१२	द्वारा: उमेश आत्मारामजी यावलकर, वॉर्ड नं.९, रिंग रोड, वरुड, ता.वरुड, जिल्हा अमरावती ४४४९०६.
८६	मायानॉरिटीज डेमोक्रॅटिक पार्टी SEC/UPP/MDP/१२/०५	६/१/२०१२	१३, हैदरी रोड कॉम्प्लेक्स, मोमीनपुरा, जिल्हा नागपूर - ४४० ०१८.
८७	राष्ट्रीय संत संदेश पार्टी SEC/UPP/RSSP/१२/०६	७/१/२०१२	२६३, वनारसे निवास, मित्र नगर, ता.जि.लातूर ४१३ ५१२.
८८	रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सेक्युलर) SEC/UPP/RPI(S)/१२/०७	१०/१२/०१२	रा.पा. पत्ता : द्वारा लेबर फ्रंट, डॉ.छाया हॉस्पिटलशेजारी, अंबरनाथ (प) जिल्हा ठाणे-४२१ ५०१.

क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
८९	भ्रष्टाचार विरोधी जन-क्रांती आघाडी SEC/UPP/BVJKA/१२/०८	११/१/२०१२	घर नं. ११३, वॉर्ड नं. १८, द्वारा सत्यनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड, आंबेडकर पुतळयाजवळ, गजराज पेट्रोल पंपामागे, इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर -४१६ ११५.
९०	आंबेडकर नॅशनल कॉंग्रेस SEC/UPP/ANC/१२/०९	१२/१/२०१२	डॉ. आंबेडकर नगर, आय.टी.आय. कॉर्नर जिंतूर रोड,परभणी ता. जिल्हा परभणी ४३१४०१
९१	धर्मराज्य पक्ष SEC/UPP/DP/१२/१०	६/२/२०१२	दुकान नं ए/ए-२०३, पंचजन्य-२, रिगल प्लाझा, लोकपूरम प्रिमाइसेस, श्रीमती ग्लॅडजे अलवरीस मार्ग, पोखरण रोड नं.२ माजीवडा, ठाणे (पश्चिम) , जिल्हा ठाणे ४००६०१.
९२	रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी SEC/UPP/RSP/१२/११	६/२/२०१२	मिळकत नं.५/८९२, मु.पो.लोणी, काळभोर ता.हवेली, जिल्हा पुणे ४१२२०५.
९३	स्वाभिमानी शेतकरी विकास आघाडी SEC/UPP/SSVA/१२/१२	७/२/२०१२	शिवछत्र, छत्रपती संकुल, सुभाष रोड , जि. बीड-४३१ १२२.
९४	रयत विकास आघाडी SEC/UPP/RVA/१२/१३	७/२/२०१२	रा. कणदूर, ता. शिराळा, जि. सांगली ४१५ ४०८
९५	संकल्प विकास आघाडी,अकोला SEC/UPP/AVAA/१२/१४	१५/२/२०१२	लँडमार्क बिल्डिंग, कृष्णा मंदिराजवळ, रामनगर, जिल्हा अकोला - ४४४ ००५.
९६	गोंडवाना गणतंत्र पार्टी SEC/UPP/GGP/१२/१५	१५/२/२०१२	शिवशक्ती नगर, तपस्या विद्यालयाजवळ,मानेवाडा,रिंग रोड, नागपूर ४४०००१.
९७	रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (एकतावादी) SEC/UPP/RPI(E)/१२/१६	९/३/२०१२	इंदिसे निवासासमोर, शास्त्री नगर, दादासाहेब गायकवाड मार्ग, पोखरण रोड नं.१, जिल्हा- ठाणे (प)-४०० ६०६
९८	जिल्हा विकास आघाडी, नंदूरबार SEC/UPP/ZVAN/१२/१७	२/४/२०१२	३५, वृंदावन नगर, शहादा, ता.शहादा, जिल्हा नंदूरबार ४२५४०९.
९९	शहर विकास आघाडी, पारोळा SEC/UPP/SVAP/१२/१८	१३/६/२०१२	महानुभव गल्ली, पारोळा, ता. पारोळा, जिल्हा- जळगांव ४२५१११.
१००	जयहिंद नवनिर्माण सेना SEC/UPP/JNS/१२/१९	२८/९/२०१२	केशवकुंज, शनी मंदिर गल्ली, न्यू प्लॉट, अंमळनेर, जि.जळगाव ४२५४०१.
१०१	जनकल्याण सेना SEC/UPP/JS/१२/२०	२८/९/२०१२	ए/१, जय भारत हौ.सो., इंदिरानगर, सुंदरबाग लेन, कमानी, कुर्ला (प), जिल्हा मुंबई उपनगर ४०० ०७०.
सन २०१३			
१०२	परिवर्तन समता पार्टी SEC/UPP/PSP/१३/०१	१७/१/२०१३	क्रांतीरत्न ,घर नं. ३७, राजीव गांधी नगर, भवानी पेठ, जिल्हा सोलापूर ४१३ ००२

क्र	पक्षाचे नाव	नोंदणी दिनांक	मुख्य कार्यालयाचा पत्ता
१	२	३	४
१०३	खोपोली शहर विकास आघाडी SEC/UPP/KSVA/१३/०२	१२/३/२०१३	पंचरत्न निवास, वासरंग (खोपोली), पो. जगदीश नगर, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०२.
१०४	संभाजी सेना SEC/UPP/SS/१३/०३	१२/३/२०१३	सिध्दिविनायक अपार्टमेट, गाळा नं. ३०४, कन्हेरी चौक, रिंग रोड, लातूर.४१३५१२
१०५	ऋषीवट विकास आघाडी, रिसोड SEC/UPP/RVAR/१३/०४	६/७/२०१३	हिंगोली रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाजवळ,पोस्ट रिसोड, जिल्हा वाशिम ४४४ ५०६
परंतु, असे की, परिच्छेद ४ मधील तरतुदींशी राजकीय पक्षाची घटना जुळत नसल्यास राज्य निवडणूक आयोगाकडे प्रस्तावित राजकीय पक्षाची राजकीय पक्ष म्हणून नोंदणी केली जाणार नाही.

(६) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी होणाऱ्या राजकीय पक्षांना कायम स्वरुपी नोंदणी क्रमांक (Permanent Registration Number- PRN) देण्यात येईल. या क्रमांकात पाच बाबींचा समावेश असेल. सुरुवातीला SEC (राज्य निवडणूक आयोग) असेल. नंतर राजकीय पक्षाच्या वर्गवारीनुसार संक्षिप्त स्वरुपात NP (राष्ट्रीय पक्ष)/ SP (राज्यस्तरीय पक्ष)/ OSP (इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष)/ UPP (राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष) असेल. त्यानंतर पक्षाच्या नावातील शब्दांची लघुरुपे (राज्य निवडणूक आयोग ठरवेल त्याप्रमाणे) असतील. त्यानंतर पक्षाचे नोंदणीचे वर्षे आणि त्या नोंदणी वर्षातील पक्षाचा अनुक्रमांक असेल. उदा. SEC/ UPP/XYZ/२०२५/०१.

८. राजकीय पक्ष म्हणून नोंदणी झाल्यानंतर करावयाची पूर्तता

(१) राजकीय पक्षाची नोंदणी झाल्यानंतर ६ महिन्यांच्या आत त्या पक्षाने पक्षाच्या नावे उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्याचा तपशील आणि पक्षाच्या नावे आयकर विभागाकडून प्राप्त पॅन (PAN) कार्डची स्वसाक्षांकित प्रत आयोगास सादर करावी लागेल.

(२) राजकीय पक्षाने त्यांची मिळकत व खर्च यांचे हिशोब इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्न्स ऑफ इंडिया यांनी निश्चित केलेल्या निकषानुसार व रितीने ठेवावेत. (अधिक माहितीसाठी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्न्स ऑफ इंडियाचे संकेतस्थळ www.icai.org)

(३) राजकीय पक्षाने वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची (Audited Accounts) एक प्रत आणि संबंधित वित्तीय वर्षात भरलेल्या आयकर विवरणपत्राची (रिटर्नची) एक प्रत वित्तीय वर्ष संपल्यापासून ७ महिन्यांच्या आत आयोगाच्या कार्यालयात दरवर्षी नियमितपणे सादर करावी. संबंधित आर्थिक वर्षात कुठलाही आर्थिक व्यवहार झाला नसला तरीही निरंक म्हणून वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची प्रत आणि निरंक म्हणून भरलेल्या आयकर विवरण पत्राची (रिटर्नची) प्रत देणे बंधनकारक आहे.

(४) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आयोगाकडून वेळावेळी निर्गमित करण्यात आलेल्या/ येणाऱ्या आदर्श आचारसंहितेमधील तरतुदींचे पालन करणे राजकीय पक्षास बंधनकारक असेल.

(५) सर्वसाधारण जनतेच्या व प्रामुख्याने मतदारांच्या हिताच्यादृष्टीने किंवा निवडणुका मुक्त, पारदर्शक व शांततापूर्ण वातावरणात निःपक्षपातीपणे पार पाडण्यासाठी आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे व सूचनांचे पालन करणे राजकीय पक्षास बंधनकारक असेल.

(६) या आदेशाच्या दिनांकापूर्वी नोंदणी झालेल्या राजकीय पक्षांकडून सदर आदेशाच्या दिनांकापासून पुढील ५ वर्षांच्या कालावधीत राज्यात होणाऱ्या कोणत्याही एका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (ग्रामपंचायत वगळून) सार्वत्रिक निवडणुकीत किमान ५ उमेदवार अंतिमतः निवडणूक लढविणे आवश्यक असेल. त्याचबरोबर जो राजकीय पक्ष या आदेशाच्या दिनांकानंतर नोंदणीकृत होईल, त्यांच्या नोंदणीच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीमध्ये त्या राजकीय पक्षाने राज्यात होणाऱ्या कोणत्याही एका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (ग्रामपंचायत वगळून) सार्वत्रिक निवडणुकीत किमान ५ उमेदवार अंतिमतः निवडणूक लढविणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे ही अट त्या पुढील प्रत्येक ५ वर्षांसाठी (गट वर्षाप्रमाणे) कायमस्वरूपी लागू असेल. (अंतिमतः निवडणूक लढविणे, याचा अर्थ संबंधित राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी निवडणुकीसाठीचा आपला अर्ज मागे न घेता प्रत्यक्ष निवडणूक लढविणे असा समजण्यात यावा.)

९. पक्षाच्या सदस्यांची यादी, कार्यकारिणी/ पदाधिकारी, पक्षाचे नाव किंवा पत्त्यातील बदलः

(१) राजकीय पक्षाची आयोगाकडे नोंदणी झाल्यानंतर मूळ सदस्यांच्या यादीत भविष्यात काही बदल झाल्यास आवश्यक कागदपत्रांसह अद्ययावत यादी पक्षाच्या मुख्य कार्यालयात ठेवावी; तसेच त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सदस्य बदलाची नोंद घेऊन सदस्य यादी अद्ययावत ठेवावी. पक्षाचे किमान १५० सदस्य कायम असणे आवश्यक आहे. आयोगाने मागणी केल्यास सदस्यांची अद्ययावत यादी देणे अनिवार्य असेल.

(२) राजकीय पक्षाच्या कार्यकारणीत पदाधिकारी/ सदस्याचे निधन, राजीनामा किंवा पक्षांतर्गत निवडणूक इ. कारणांमुळे बदल झाल्यास, त्याबाबतचा अहवाल आयोगास विनाविलंब कळविणे आवश्यक असेल. असा अहवाल आयोगास सादर करताना पक्षाच्या सर्वसाधारण सभेमध्ये पक्षाच्या सदस्यांमधून व पक्षाच्या सदस्यांनी लोकशाही पद्धतीने नवीन कार्यकारिणी/ पदाधिकारी यांच्या निवडीबाबत मंजूर झालेल्या ठरावाची (सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरीसह) नोटराईज्ड प्रत देणे अनिवार्य असेल.

(३) राजकीय पक्षाने त्याच्या मुख्य कार्यालयाच्या पत्यात बदल केल्यास, त्याबाबत आयोगास सूचित करताना परिच्छेद ३(५)(घ) व ३(५)(ङ) प्रमाणे कार्यवाही करणे अनिवार्य असेल. पत्त्यात बदलाबाबतच्या ठरावास पक्षाच्या सभेमध्ये मंजुरी घ्यावी लागेल. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे आणि जागा मालकाच्या ना- हरकत प्रमाणपत्रासह पत्त्यात बदल करण्याबाबत मंजूर झालेल्या ठरावाची (सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरीसह) नोटराईज्ड प्रत आयोगास देणे अनिवार्य असेल.

(४) राजकीय पक्षाच्या संपर्क क्रमांकात किंवा ई-मेल आयडीत बदल झाल्यास तो विनाविलंब राज्य निवडणूक आयोगास कळवावा.

(५) राजकीय पक्षाची राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झाल्यानंतर पक्षाच्या नावात बदल करावयाचा असल्यास तसा प्रस्ताव आयोगाकडे सादर करावा लागेल. आयोगाकडे तसा प्रस्ताव सादर करताना त्यासोबत पक्ष कार्यकारिणीच्या बैठकीत नाव बदलण्याबाबत मंजूर झालेल्या ठरावाची नोटराईज्ड प्रत आणि पक्षाच्या घटनेत नावासंदर्भातील कलमात बदल करून परिच्छेद ४(६) प्रमाणे पदाधिकाऱ्यांची स्वाक्षरी असलेली पक्षाच्या घटनेची सुधारित प्रत देणे आवश्यक राहील.

परंतु, असे नाव आयोगाकडून नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी रद्द झालेल्या पक्षांच्या नावाशी साधर्म्य असलेले असू नये.

(६) राजकीय पक्षाकडून नाव बदलण्याबाबतचा विनंती प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्याच्या नावातील बदलाबाबत परिच्छेद ७(२) नुसार सर्वसाधारण जनतेकडून ३० दिवसांच्या मुदतीत हरकती मागविण्याबाबत अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. त्याचबरोबर संबंधित राजकीय पक्षाला परिच्छेद ७(३) नुसार कार्यवाही करावी लागेल आणि त्यासाठी परिशिष्ट १०अ प्रमाणे जाहिरात प्रसिद्ध करावी लागेल.

(७) राजकीय पक्षाचे नाव बदलण्यासंदर्भात परिच्छेद ९(५) आणि ९(६) नुसार कार्यवाही केल्यानंतर आयोग परिच्छेद ७(५) आणि ९(६) नुसार पक्षाचे नाव बदलण्यासंदर्भात परवानगी देण्याबाबतचा निर्णय घेईल.

(८) भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अथवा मान्यताप्राप्त आणि ज्या पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडेही नोंदणी केलेली आहे, अशा राजकीय पक्षाच्या नावात अथवा निवडणूक चिन्हात कोणत्याही कारणास्तव बदल झाल्यास त्याची माहिती राज्य निवडणूक आयोगास त्वरित द्यावी, जेणेकरून आयोगास त्यावर उचित निर्णय घेता येईल.

परंतु, मान्यताप्राप्त पक्षाच्या नावात भारत निवडणूक आयोगाच्या मान्यतेने किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार बदल झाल्यास त्यासंदर्भात परिच्छेद ९(५) नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नसेल; परंतु बदलाबाबत राज्य निवडणूक आयोगास लेखी स्वरुपात अवगत करण्याची जबाबदारी संबंधित राजकीय पक्षाची असेल.

(९) राजकीय पक्षाची नोंदणी झाल्यानंतर वेळोवेळी किंवा दरवर्षी करावयाची पूर्तता/ कार्यवाहीबाबतची माहिती परिशिष्ट- १२ मध्ये संक्षिप्त स्वरुपात दिली आहे; परंतु सविस्तर माहितीसाठी हा संपूर्ण आदेश व संबंधित परिच्छेद बारकाईने वाचणे आश्यक आहे.

१०. नोंदणीकृत राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करणेः

(१) या आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या आदेशातील तरतुदींन्वये नोंदणीकृत झालेल्या एखाद्या राजकीय पक्षांकडून,

(क) या आदेशातील तरतुदींची विशेषतः परिच्छेद ८ मधील नमूद अटींची किंवा त्यापैकी कोणत्याही एका अटींची पूर्तता होत नसल्यास, किंवा

(ख) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील आदर्श आचारसंहितेचे पालन होत नसल्यास, किंवा

(ग) जनतेच्या हिताच्यादृष्टीने विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, निःपक्षपातीपणे व शांततेने पार पाडण्यासाठी आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे व सूचनांचे पालन होत नसल्यास, किंवा

(घ) आयोगाने मागणी केलेल्या कागदपत्रांची किंवा अन्य माहितीची पूर्तता होत नसल्यास, आणि सक्षम प्राधिकाऱ्याकडून तसे सिद्ध झाल्यास, किंवा

(ङ) राजकीय पक्षाची पाच वर्षांतून किमान एकदा पक्षाच्या सदस्यांमधून व पक्षाच्या सदस्यांकडून लोकशाही पद्धतीने पदाधिकारी/ कार्यकारिणीची निवडणूक न झाल्यास,

संबंधित राजकीय पक्षाची नोंदणी निलंबित किंवा कायमस्वरूपी रद्द करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला असतील.

(२) परिच्छेद १०(१) मधील बाबी तक्रारीद्वारे अथवा राज्य निवडणूक आयोगास स्वतःहून निदर्शनास आल्यास, अशा प्रकरणी सर्व उपलब्ध मुद्दे किंवा परिस्थितीचा विचार करून सदर पक्षाची नोंदणी निलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकार आयोगास असेल. अशा प्रकरणी सबंधित राजकीय पक्षाला खुलासा करण्यासाठी पुरेशी संधी व अवधी दिला जाईल. आवश्यकतेनुसार सुनावणी घेण्यात येईल. अशा नैसर्गिक न्याय तत्वांच्या अवलंबनानंतरही कारणे/ खुलासा योग्य अथवा समर्थनीय न वाटल्यास, अशा पक्षांची नोंदणी रद्द करून त्या पक्षाचे नाव राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्षाच्या सूचीतून काढण्यात येईल.

(३) राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत एखाद्या राजकीय पक्षास स्वतःहून पक्ष विसर्जित करता येईल किंवा अन्य राजकीय पक्षात विलिन करता येईल. त्यासाठी पक्षाने वार्षिक/ विशेष/ सर्वसाधारण सभेत दोन तृतीयांश बहुमताने तसा ठराव मंजूर करणे आवश्यक राहील.

(४) वरील परिच्छेद १०(३) प्रमाणे ठराव मंजूर झाल्यानंतर पक्षाची नोंदणी रद्द करण्यासाठी आयोगाकडे अर्ज सादर करावा लागेल. त्या अर्जासोबत तशा ठरावाची (सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरीसह) नोटराईज्ड प्रत जोडणे अनिवार्य असेल.

(५) तसा ठराव (पक्ष विसर्जित करण्याबाबत) मंजूर केल्याची आयोगाची खात्री पटल्यास, आयोग अशा पक्षाची नोंदणी रद्द करू शकेल.

(६) कोणत्याही कारणास्तव राजकीय पक्षाची आयोगाने नोंदणी रद्द केल्यानंतर त्या राजकीय पक्षाची पुन्हा नोंदणी कायम करता येणार नाही किंवा त्याच नावाने नवा पक्ष नोंदविता येणार नाही,

भाग चार
निवडणूक चिन्ह आरक्षण व वाटप

११. आरक्षित चिन्ह आणि मुक्त चिन्हे:

(१) महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या आदेशातील तरतुदीनुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना, नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना आणि नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

(२) या आदेशातील चिन्हांची वर्गवारी खालीलप्रमाणे असेल.

(क) **'आरक्षित चिन्हे'** राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी आरक्षित असतील.

(ख) **'मुक्त चिन्हे'** राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार व अपक्ष उमेदवार यांच्यासाठी असतील.

(ग) **'तात्पुरते आरक्षित चिन्ह'** परिच्छेद १७ मधील अटींची पूर्तता करणाऱ्या राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी एक चिन्ह तात्पूरत्या स्वरुपात आरक्षित असेल.

१२. नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षास आरक्षित चिन्हांचे वाटप:

(१) राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठी भारत निवडणूक आयोगाने त्या पक्षाकरिता आरक्षित केलेलेच चिन्ह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतसुद्धा आरक्षित असेल. अशा पक्षाच्या उमेदवारांना त्या चिन्हाची निवड करता येईल व त्यास त्या चिन्हाचे वाटप केले जाईल. अशा उमेदवारास इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

(२) जर महाराष्ट्र राज्याबाहेरील विविध राज्यांतील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांकरिता त्या त्या राज्यात भारत निवडणूक आयोगाने एकच समान चिन्ह आरक्षित केले असल्यास, अशा राज्यस्तरीय पक्षांपैकी ज्या पक्षाची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे प्रथम झाली आहे, त्या पक्षाला राज्य निवडणूक आयोग त्या आरक्षित चिन्हांचे वाटप करेल. त्यानंतर नोंदणी झालेल्या इतर राज्यस्तरीय पक्षांना त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या चिन्हांव्यतिरिक्त परिच्छेद २३(१)(ङ) नुसार प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या मुक्त चिन्हांच्या सूचीतील एका चिन्हाची निवड करता येईल व ते चिन्ह राज्य निवडणूक आयोगाकडून त्या राजकीय पक्षासाठी आरक्षित करण्यात येईल आणि ते चिन्ह मुक्त चिन्हांच्या यादीतून वगळण्यात येईल.

परंतु असे की, एखाद्या राजकीय पक्षास भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता दिल्यास आणि तो पक्ष यापूर्वीच राज्य निवडणूक आयोगाकडे अमान्यताप्राप्त पक्ष म्हणून नोंदणीकृत असल्यास किंवा मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षाचा दर्जा मिळाल्यानंतर त्या पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्यास, त्या पक्षासाठी राज्य निवडणूक आयोगाकडूनदेखील भारत निवडणूक आयोगाने आरक्षित केलेले चिन्ह प्राधान्याने आरक्षित करण्यात येईल; परंतु ते चिन्ह आणि राज्य निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी असलेल्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षाचेही चिन्ह समान असल्यास, महाराष्ट्रातील राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्षास ते चिन्ह प्राधान्याने देण्यात येईल. इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षास परिच्छेद २३(१)(ङ) नुसार प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या मुक्त चिन्हांच्या सूचीतील एका चिन्हाची निवड करावी लागेल व ते चिन्ह राज्य निवडणूक आयोगाकडून त्या राजकीय पक्षासाठी आरक्षित करण्यात येईल आणि ते चिन्ह मुक्त चिन्हांच्या यादीतून वगळण्यात येईल.

(३) नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्ष/ इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढवित नसला तरी त्याच्यासाठी आरक्षित असलेल्या चिन्हाची इतर कोणासही निवड करता येणार नाही किंवा त्या चिन्हांचे वाटप केले जाणार नाही.

(४) जर मान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवाराने सादर केलेले नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी अवैध ठरले किंवा त्याने निवडणुकीतून माघार घेतली तर, पक्षाने दिलेल्या 'नमुना २-ब'/ 'जोडपत्र-२' मधील नमूद बदली उमेदवाराने त्या पक्षाने दिलेला 'नमुना २-अ' व 'नमुना २-ब'/ 'जोडपत्र-१' 'जोडपत्र-२' आणि पक्षाचा उमेदवार म्हणून नामनिर्देशनपत्र सादर केले असल्यास, त्या उमेदवारास त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात यावा.

१३. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांबाबतः

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे उमेदवार व अपक्ष उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करताना परिच्छेद २३(१)(ङ) नुसार मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्टित केलेल्या चिन्हांपैकी जास्तीत जास्त कोणत्याही तीन चिन्हांची प्राधान्यक्रमानुसार मागणी करता येईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी हा राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यानंतर अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप करेल.

(३) जर अनेक उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची निवड केली आणि जर या अनेक उमेदवारांपैकी एक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचा असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल, इतर कोणासही देणार नाही.

(४) जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवार नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे असल्यास आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी फक्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकून (सोडतीद्वारे) निर्णय घेईल. ज्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्याने मागणी केलेल्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही.

(५) जर अशा निवडणुकीत अनेक अपक्ष उमेदवारांनी प्राधान्यक्रमानुसार एकाच मुक्त चिन्हाची निवड केली असल्यास संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यासाठी सोडत पद्धतीने निर्णय घेईल. ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल. या पद्धतीचा अवलंब करून व प्राधान्यक्रम विचारात घेऊन सर्व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

(६) प्राधान्यक्रम किंवा सोडतीनंतरही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमदेवारास चिन्ह वाटप होऊ न शकल्यास, मुक्त चिन्हांच्या सूचीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल त्या चिन्हाचे संबंधित उमेदवारास वाटप केले जाईल.

१४. यथास्थिती महापौर व नगरपरिषद, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीबाबतः

(१) यथास्थिती महापौर किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत असल्यास, सुरुवातीला महापौर/ अध्यक्षपदाच्या उमेदवारांना प्राधान्याने चिन्ह वाटप केले जाईल. त्यांना वाटप केलेली चिन्हे मुक्त चिन्हांपैकी असल्यास त्या मुक्त चिन्हांचे वाटप सदस्यपदाच्या इतर कोणत्याही उमेदवारांना केले जाणार नाही.

परंतु, एखादा उमेदवार महापौर/ अध्यक्षपदासोबत सदस्यपदाची निवडणूक लढवत असल्यास, त्या उमेदवारास महापौर/ अध्यक्षपदाकरिता वाटप करण्यात आलेले चिन्ह त्याने मागणी केल्यास, तो निवडणूक लढवत असलेल्या प्रभागांतील सदस्यपदांकरितादेखील देण्यात येईल.

१५. बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीत (ग्रामपंचायत वगळून) चिन्ह वाटपः

(१) परिच्छेद १३ मध्ये काहीही नमूद असले तरी बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीमध्ये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षांकडून निवडणूक लढवू इच्छिणारे उमेदवार व अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप करताना प्रभागनिहाय चिन्हांचे वाटप होईल. एका प्रभागातील सर्व जागांकरिता चिन्हांचे वाटप एकाच वेळी सुरू होईल.

(२) एका प्रभागातील विविध जागांवर एकापेक्षा जास्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी प्राधान्यक्रमानुसार एकच चिन्ह मागितले असेल तर, त्या चिन्हाचे वाटप कोणत्या पक्षाच्या उमेदवारास करावे हे सोडत पद्धतीने निश्चित करण्यात येईल.

(क) त्यानुसार एखाद्या प्रभागात एखादे मुक्त चिन्ह एका नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास वाटप केल्यानंतर ते चिन्ह त्याच प्रभागातील अन्य जागेवरील त्याच राजकीय पक्षाच्या अन्य उमेदवारास नामनिर्देशनपत्रातील त्याच्या मागणीनुसार वाटप करता येईल. मात्र अन्य नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास अथवा अपक्ष उमेदवारास ते चिन्ह त्याच प्रभागात देता येणार नाही.

(ख) नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना चिन्ह वाटपानंतर अपक्ष उमेदवारांना चिन्हाचे वाटप करताना एका प्रभागातील जागांवर प्राधान्यक्रमानुसार एकच चिन्ह एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांनी मागितले असल्यास त्या चिन्हाचे सोडतीद्वारे वाटप केले जाईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत एक चिन्ह एकाच प्रभागात एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांना दिले जाणार नाही.

१६. मुक्त चिन्हे कमी पडल्यास:

नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अथवा अपक्ष उमेदवारांना मुक्त चिन्हे वाटप करण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने परिच्छेद २३(१)(ड) नुसार प्रसिद्ध केलेले मुक्त चिन्हे कमी पडत असतील तर अशा परिस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी गरजेनुसार नवीन चिन्हांचा अंतर्भाव करून त्या चिन्हाचे उमेदवारांना वाटप करेल व तसे राज्य निवडणूक आयोगास कळवेल. मात्र राष्ट्रीय मानचिन्हे, पक्षी व प्राण्यांची चित्रे, धार्मिक प्रतीके इत्यादी चिन्हांचे उमेदवारांना वाटप करता येणार नाही; तसेच इतर राजकीय पक्षाच्या/ उमेदवारांच्या चिन्हाशी साधर्म्य असलेले चिन्ह कोणत्याही उमेदवारास दिले जाणार नाही.

१७. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करणे:

(१) एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांना एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत वेगवेगळ्या चिन्हांचे वाटप होते; परंतु जो नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष परिच्छेद १७(३) मधील अटींची पूर्तता करीत असल्यास आणि त्या पक्षाने विनंती अर्ज केल्यास परिच्छेद १७(२) मध्ये नमूद सक्षम प्राधिकारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जाहीर झालेल्या निवडणुकीसाठी त्या पक्षाकरिता मुक्त चिन्हापैकी एक चिन्ह तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करेल.

(२) उक्त परिच्छेद १७(१) मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा परिषद, नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी सक्षम प्राधिकारी 'जिल्हाधिकारी' असेल आणि महानगरपालिकांसाठी 'महानगरपालिका आयुक्त' असेल.

(३) एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने जर एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (पंचायत समिती वगळता) लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत एकूण जागांपैकी किमान पाच टक्के जागा जिंकल्या असतील किंवा त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण जागांच्या पाच टक्के जागा ह्या एका जागेपेक्षा कमी येत असतील तर किमान एका जागेवर त्या पक्षाचा उमेदवार विजयी झालेला असल्यास, त्या पक्षासाठी त्यांच्या विनंतीवरून त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जाहीर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुक्त चिन्हांपैकी एक चिन्ह तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित असल्याचे घोषित केले जाईल. त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत त्या मुक्त चिन्हाचे अन्य उमेदवारास वाटप केले जाणार नाही.

परंतु, महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती व जिल्हा परिषदा या सर्व वेगवेगळ्या व स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था आहेत, म्हणून उक्त तरतूद त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेला स्वतंत्रपणे व तात्पुरत्या स्वरुपात लागू असेल.

(क) एखाद्या पंचायत समितीच्या लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने एकूण जागांपैकी किमान पाच टक्के जागा जिंकल्या असल्या तरी त्यासाठी हा परिच्छेद १७ लागू असणार नाही. मात्र संबंधित जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित करण्यात आलेले मुक्त चिन्ह त्या जिल्हा परिषद अंतर्गतच्या सर्व पंचायत समितीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकीसाठीदेखील त्या राजकीय पक्षाकरिता तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित असेल. त्या चिन्हाचे वाटप त्या जिल्हा परिषदांतर्गतच्या पंचायत समितींच्या निवडणुकीत अन्य कुठल्याही उमेदवारास केले जाणार नाही.

(ख) स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पाच टक्के जागांची संख्या निश्चित करताना, ती जवळच्या पूर्णांक संख्येने पूर्णांकित केली जाईल. हे पाच टक्के निश्चित करताना, जर X.A मध्ये अपूर्णांक 'A' हा ०.५ पेक्षा कमी असेल; तर संख्या 'X' मानली पाहिजे आणि 'A' हा ०.५ च्या समान किंवा त्यापेक्षा जास्त अपूर्णांकांसाठी, X+१ ही संख्या विचारात घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत, या सूत्राद्वारे मिळवलेल्या जागांची संख्या १ पेक्षा कमी नसावी.

(४) एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एका निवडणुकीसाठी एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी परिच्छेद १७(३) नुसार तात्पुरत्या स्वरूपात चिन्ह आरक्षित केल्याचे घोषित करण्यात आले असल्यास, अशा पक्षाच्या उमेदवारांना त्याच्या पक्षाकरिता तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित केलेल्या मुक्त चिन्हाची निवड करावी लागेल. अशा उमेदवारांना संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित केलेले चिन्ह वाटप करेल.

(क) तात्पुरत्या स्वरूपात चिन्ह आरक्षित करण्यात आलेल्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षास व त्याच्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासंदर्भात पुढील परिच्छेद २० नुसार कार्यवाही करावी लागेल. अन्यथा त्या राजकीय पक्षाचा उमेदवार हा अपक्ष उमेदवार म्हणून समजण्यात येईल.

(५) तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करण्यासाठी नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच आणि नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात होण्यापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवस आधी परिच्छेद १७(२) मध्ये विनिर्दिष्टीत सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे अनिवार्य राहील. सदर अर्जात मुक्त चिन्हांपैकी तीन चिन्हे प्राधान्य क्रमानुसार ठळकपणे नमूद करावी लागतील.

(६) सक्षम प्राधिकारी सदर अर्जावर नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात होण्याच्या १ दिवस आधी निर्णय घेईल व तात्काळ संबंधित राजकीय पक्षाला आणि सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवेल.

(७) तात्पुरत्या स्वरूपात चिन्ह आरक्षित करण्यासाठी नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षास प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकांसाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल.

(क) जर एकापेक्षा जास्त नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी विहित मुदतीत सक्षम प्राधिकाऱ्याकडे एकच मुक्त चिन्ह तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करण्यासाठी अर्ज केल्यास व एकापेक्षा जास्त नोंदणीकृत राजकीय पक्ष, परिच्छेद १७(३) च्या तरतुदीप्रमाणे पात्र आढळल्यास, त्यापैकी ज्या राजकीय पक्षाने लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणुकीत जास्त जागा जिंकल्या असतील त्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी मागणी केलेले मुक्त चिन्ह सक्षम प्राधिकाऱ्याकडून तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करण्यात येईल.

परंतु, अशा नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी जिंकलेल्या जागांची संख्या समान असल्यास, सक्षम प्राधिकारी सोडतीद्वारे निर्णय घेईल. ज्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या नावाची चिठ्ठी येईल, त्या राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात ते मुक्त चिन्ह आरक्षित करेल. उर्वरित नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी मुक्त चिन्हांच्या यादीमधून त्यांच्या मागणीनुसार एक चिन्ह तात्पुरत्या स्वरूपात आरक्षित करेल.

(ख) सक्षम प्राधिकाऱ्याकडे करावयाच्या अर्जासोबत नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मागील लगतच्या निवडणुकीत सदर पक्षातर्फे निवडून आलेल्या उमेदवारांची यादी जोडावी; तसेच अर्जासोबत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सचिवांचे/ संबंधित अधिकाऱ्याचे निवडून आलेल्या उमेदवारांबाबतचे प्रमाणपत्रही जोडावे.

(८) सक्षम प्राधिकारी सबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लगतच्या मागील निवडणुकीत संबंधित नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून निवडून आलेल्या उमेदवारांबाबत खात्री करेल.

परंतु, मागील लगतच्या सार्वत्रिक निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांना त्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने त्यावेळी उमेदवारी दिलेली असणे अनिवार्य राहील. केवळ आज रोजी अर्ज करण्याच्या दिवशी सदर उमेदवार पक्षाचे सदस्य आहेत, म्हणून त्यांना मागील निवडणुकीत पक्षातर्फे निवडून आल्याचे समजले जाणार नाही.

(९) तात्पुरते आरक्षित घोषित झालेल्या चिन्हाबाबत,

(क) सक्षम प्राधिकारी ज्या मुक्त चिन्हास तात्पुरते आरक्षित चिन्ह घोषित करेल, ते चिन्ह संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी त्या निवडणुकीपुरते मुक्त चिन्हांच्या सूचीतून तात्पुरत्या स्वरुपात वगळल्याचे समजण्यात येईल.

(ख) असे तात्पुरते आरक्षित म्हणून घोषित केलेले मुक्त चिन्ह इतर कोणत्याही नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा उमेदवारास त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या त्या निवडणुकीसाठी वाटपासाठी उपलब्ध असणार नाही.

(ग) घोषित करण्यात आलेले तात्पुरते आरक्षित चिन्ह सदर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पुढल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकीसाठी मात्र मुक्त चिन्ह असेल. म्हणजे, तात्पुरत्या स्वरुपातील आरक्षित चिन्ह हे पाच वर्षे किंवा त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची कुठल्याही कारणास्तव मुदत संपेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील. त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या आत पोटनिवडणूक झाल्यास त्यासाठीदेखील संबंधित पक्षाकरिता तात्पुरते आरक्षित चिन्ह कायम असेल.

१८. उमेदवाराने चिन्हाची मागणी केलेली नसल्यास:

(१) नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या किंवा तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करण्यात आलेल्या पक्षाच्या उमेदवाराने चिन्हाची मागणी केली नसली तरी त्याला जर अशा पक्षाने 'नमुना २-अ'/ 'नमुना २-ब'/ 'जोडपत्र-१'/ 'जोडपत्र-२' ही लेखी सूचनापत्रे दिली असल्यास, त्याला त्याच्याच पक्षाच्या आरक्षित चिन्हाचे वाटप केले जाईल. त्यास अन्य कुठलेही चिन्ह दिले जाणार नाही.

परंतु अशा उमेदवाराने अशा पक्षाच्या नावाने नामनिर्देशनपत्र दाखल केले असल्यास; परंतु पक्षाने उपरोक्त नमूद लेखीसूचनापत्रे दिली नसल्यास, अन्य सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर मुक्त चिन्हांच्या यादीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल ते चिन्ह त्यास देण्यात येईल.

(२) नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या किंवा अपक्ष उमेदवाराने चिन्हाची मागणी केली नसल्यास संबंधित प्रभागातील अन्य सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर अथवा महापौरपदाच्या थेट किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीसाठीच्या सर्व उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर मुक्त चिन्हांच्या यादीतील शिल्लक मुक्त चिन्हांपैकी जे चिन्ह अनुक्रमानुसार उपलब्ध असेल ते चिन्ह देण्यात येईल.

१९. ग्रामपंचायत निवडणुकांसाठी उमेदवारांना चिन्ह वाटप:

ग्रामपंचायतीच्या निवडणुका राजकीय पक्षविरहित पद्धतीने घेतल्या जातात. ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांतील थेट सरपंचपदासह सदस्यपदाच्या उमेदवारांसाठी परिच्छेद २३(१)(ङ) नुसार प्रसिद्ध केलेल्या किंवा करण्यात येणाऱ्या मुक्त चिन्हांच्या सूचीतील मुक्त चिन्हांचेच वाटप केले जाईल. ग्रामपंचायत निवडणुकांसाठी चिन्ह वाटपाबाबत राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र आदेश लागू आहेत.

२०. एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षाचा उमेदवार केव्हा समजले जाईल:

(१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ उमेदवारास राजकीय पक्षाचा उमेदवार तेव्हा समजले जाईल जेव्हा,

(क) उमेदवाराने त्याबाबत नामनिर्देशनपत्रात तशी घोषणा केलेली असेल आणि,

(ख) ज्या राजकीय पक्षाच्या वतीने संबंधित उमेदवार निवडणूक लढविणार असेल, त्या उमेदवाराच्या नावाचे लेखी सूचनापत्र परिच्छेद २०(२) व २०(५) मध्ये नमूद केल्यानुसार त्या राजकीय पक्षाने संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त आणि निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांना मूळ प्रतीच्या स्वरुपात दिलेली असेल.

(२) **राजकीय पक्षाने द्यावयाचे लेखी सूचनापत्र:**

(क) **जिल्हा परिषद निवडणुकांबाबत**- जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी 'महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२' च्या 'नियम १५अ' नुसार विहित केलेले 'नमुना २-अ' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर नमुना २-ब' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे. ही लेखीसूचनापत्रे संबंधित जिल्हाधिकारी व निर्वाचन अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

(ख) **पंचायत समिती निवडणुकांबाबत-** पंचायत समिती निर्वाचक गणाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ 'महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२' च्या 'नियम १५अ' नुसार विहित केलेले 'नमुना २-अ' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर 'नमुना २-ब' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे. ही लेखी सूचनापत्रे संबंधित जिल्हाधिकारी व निर्वाचन अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

(ग) **महानगरपालिका निवडणुकांबाबत-** महानगरपालिका निवडणुकांदर्भात या आदेशान्वये विहित केलेले 'जोडपत्र-१' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर 'जोडपत्र-२' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे.

(एक) ही लेखी सूचनापत्रे बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता उर्वरित सर्व महानगरपालिका निवडणुकांसाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

(दोन) बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी ही लेखीसूचनापत्रे महानगरपालिका आयुक्त व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी सायं. ५.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

(घ) **नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकांबाबत-** नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकांदर्भात या आदेशान्वये विहित केलेले 'जोडपत्र-१' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करावयाच्या व्यक्तीची माहिती देण्याकरिता आहे; तर 'जोडपत्र-२' हे लेखी सूचनापत्र राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी आहे. ही लेखी सूचनापत्रे संबंधित जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

(३) राजकीय पक्षांनी विहित मुदतीत संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे 'नमुना २-अ' आणि 'जोडपत्र-१' सादर केले असल्यास, संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्या प्रती प्रमाणित करून ती लेखीसूचनापत्रे संबंधित निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी तात्काळ पाठवावेत.

(४) संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त आणि निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उक्त लेखी सूचनापत्र प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवार राजकीय पक्षाचे चिन्ह मिळविण्यास पात्र राहणार नाहीत.

(५) उक्त लेखी सूचनापत्रावर, राजकीय पक्षाचे अध्यक्ष/ सचिव किंवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्याने काळ्या/ निळ्या शाईने अथवा बॉलपेनने स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे. प्रतिरूप स्वाक्षरी असलेले/ रबर स्टॅम्पची स्वाक्षरी असलेले किंवा अन्यप्रकारे स्वाक्षरी असलेले लेखी सूचनापत्र चालणार नाही; तसेच फॅक्सने/ ई-मेलद्वारे अथवा अन्य कोणत्याही प्रकारे लेखी सूचनापत्र पाठविता येणार नाही. मूळ प्रतिशिवाय अन्य कुठल्याही प्रकारे पाठविलेली लेखीसूचनापत्रे जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त अथवा निर्वाचन अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी स्वीकारणार नाहीत.

२१. उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास:

(१) एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास व त्यामध्ये एकापेक्षा जास्त राजकीय पक्षाचा उमेदवार म्हणून घोषणा केली असल्यास; तसेच त्यासोबत एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांचे लेखी सूचनापत्र ('नमुना २-अ', 'नमुना २-ब', 'जोडपत्र- १' आणि 'जोडपत्र- २') विहित मुदतीत सादर केली असल्यास किंवा अपक्ष उमेदवार म्हणून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास, पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबविली जाईल-

(क) एकाच उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षांचे लेखी सूचनापत्र दाखल केले असल्यास नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेत अशा उमेदवाराच्या बाबतीत एक राजकीय पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षांनी लेखी कळवून त्यांच्यासाठी दिलेले 'नमुना २-ब' अथवा 'जोडपत्र-२' मागे घेतले असल्यास त्या उमेदवारास ज्या पक्षाने 'नमुना २-ब' अथवा 'जोडपत्र-२' मागे घेतलेले नाही, त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे समजण्यात येईल.

(ख) जर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विहित कालावधीनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त राजकीय पक्षाने दिलेला 'नमुना२-ब' अथवा 'जोडपत्र-२' शिल्लक राहिले असल्यास, त्या उमेदवाराने तो कोणत्या राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी कळविल्यास, त्याला त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे समजण्यात येईल.

(ग) जर उक्त परिच्छेद २१(१)(ख) मध्ये नमूद केल्याप्रमाणे एखाद्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी न कळविल्यास त्याने प्रथम ज्या पक्षाच्या वतीने नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्या राजकीय पक्षाचा तो अधिकृत उमेदवार आहे, असे समजण्यात येईल.

(२) एखाद्या उमेदवाराने अपक्ष उमेदवार म्हणून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास चिन्ह वाटप करताना त्याने प्रथम दाखल केलेल्या वैध नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेऊन चिन्ह वाटप करण्यात येईल.

२२. राजकीय पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखी सूचनापत्र दिले असल्यास:

एकाच राजकीय पक्षाने एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक उमेदवारांना पक्षाचे लेखी सूचनापत्र ('नमुना २-ब', 'जोडपत्र २') दिले असल्यास, त्यावेळी जर त्या पक्षाने नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० (बृहन्मुंबईसाठी सायंकाळी ५.००) वाजेपर्यंत नेमक्या कोणत्या उमेदवाराला पक्षाची उमेदवारी द्यावयाची आहे, असे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास लेखी कळविले असल्यास त्या उमेदवारास त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल. जर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी विहित वेळेत लेखी कळविले नसल्यास ज्या उमेदवाराने सर्वप्रथम नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्यालाच पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल.

२३. राजकीय पक्षांची व चिन्हांची सूची; तसेच मुक्त चिन्हांची सूची असलेली अधिसूचना:

(१) **शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या एका किंवा अधिक अधिसूचनांद्वारे राज्य निवडणूक आयोग खालील माहिती (सूची) विनिर्दिष्टित करेल-

(क) आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षांचा तपशील व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे

(ख) आयोगाकडील महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांचा तपशील व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे.

(ग) आयोगाकडील नोंदणीकृत इतर राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्षांचा तपशील व त्यांच्याकरिता राखून ठेवलेली चिन्हे.

(घ) आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचा तपशील.

(ड़) मुक्त चिन्हे.

भाग पाच

राजकीय पक्षांना प्राप्त होणारा निधी व पक्षांकडून होणारा खर्च

२४. राजकीय पक्षांना प्राप्त होणारा निधी:

(१) राजकीय पक्षाला एका आर्थिक वर्षात कोणतीही व्यक्ती/ संस्था/ कंपनी इत्यादींकडून प्राप्त होणारा रोख निधी अथवा देणगीचा स्वीकार किंवा विनियोग आयकर कायद्यातील तरतुदीनुसार करावा.

(२) पक्षाला एका आर्थिक वर्षात कोणतीही व्यक्ती/ संस्था/ कंपनी इत्यादींकडून देणगी/ निधी रोख स्वरूपात किंवा धनादेश, धनाकर्ष, ऑनलाईन अथवा भेट/ देणगी इ. प्राप्त झालेल्याच्या नोंदी पक्षाने आपल्या स्तरावर ठेवाव्यात. त्याची नोंद परिच्छेद ८(३) मध्ये नमूद वार्षिक लेखापरिक्षित लेख्यात घ्यावी. सदर कागदपत्रांची राज्य निवडणूक आयोगाने मागणी केल्यास राजकीय पक्षांना ती सादर करणे आवश्यक राहील.

२५. राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्ये करण्यात येणारा खर्च:

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्ष आणि नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी केलेला खर्च हा आयोगाच्या निर्देशानुसार (निश्चित केलेल्या मर्यादेत) असायला हवा; तसेच राजकीय पक्षाने आपल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी केलेला थेट खर्च हा त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित उमेदवाराच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये खालील परिच्छेद २५(१)(क) प्रमाणे दर्शविण्यात यावा अथवा एकापेक्षा जास्त उमेदवारांवर एकत्रित खर्च केला असल्यास तो त्या उमेदवारांमध्ये खालील परिच्छेद २५(१)(ख) प्रमाणे समप्रमाणात विभागण्यात यावा.

(क) **उमेदवारावर केलेला थेट खर्च:** उदा. उमेदवाराला दिलेला पक्ष निधी, उमेदवारासाठी छापलेले प्रचार साहित्य, उमेदवाराला पुरविलेली वाहने इ. ज्याचा संबंध त्या उमेदवाराशी थेट जोडता येतो, तो खर्च त्या उमेदवारांच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

(ख) **उमेदवारांमध्ये विभाजित करता येणारा खर्चः** उदा. राजकीय पक्षाने घेतलेली जाहीर सभा/ रॅली, पोस्टर्स/ बॅनर्स, जाहिराती, प्रचारफेरी, रोड शो इ. ज्यामुळे एकापेक्षा अधिक उमेदवारांचा प्रचार होतो, असा खर्च त्या सर्व उमेदवारांमध्ये समप्रमाणात विभाजित करण्यात यावा. हा खर्च त्या उमेदवारांच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

(२) सर्व व्यवहार धनादेशाद्वारे (Cheque) अथवा ऑनलाईन पध्दतीने करावेत. रोखीने करावयाचे व्यवहार प्राप्तीकर कायद्यातील तरतुदी आणि मर्यादेनुसार असावेत. अशा सर्व व्यवहारांची देयके, व्हॉऊचर्स, पावत्या इत्यादी राजकीय पक्षाने जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रांची राज्य निवडणूक आयोग किंवा आयोगाने प्राधिकृत केलेला अधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयाकडून मागणी झाल्यास, राजकीय पक्षांना ती सादर करणे आवश्यक राहील.

(३) उमेदवारांमध्ये विभागून देण्यात आलेला खर्च टप्प्याटप्याने पुढील वेळापत्रकानुसार संबंधित राजकीय पक्षाने त्यांच्या उमेदवारांना लेखी स्वरुपात कळवावा,

(क) पहिल्या टप्प्याचा खर्च नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम तारखेपर्यंत.

(ख) दुसऱ्या टप्प्याचा खर्च मतमोजणीच्या तारखेपर्यंत.

(ग) तिसऱ्या टप्प्याचा व अंतिम एकूण खर्च निवडणूक निकाल लागल्यानंतर १० दिवसांपर्यंत.

(४) राजकीय पक्षाने त्यांच्या उमेदवारांमध्ये विभागून दिलेला खर्च त्या उमेदवारांनी, त्यांच्या एकूण निवडणूक खर्चामध्ये दर्शविणे बंधनकारक आहे.

२६. 'प्रमुख प्रचारक' (Star Campaigner) आणि त्यांचा खर्चः

(१) निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या 'प्रमुख प्रचारकांची' (Star Campaigners) यादी महानगरपालिका निवडणुकीसाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त; तसेच नगरपरिषद/ नगरपंचायती आणि जिल्हा परिषदा/ पंचायत समिती निवडणुकीसाठी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यावी.

(२) सर्वसाधारणतः सर्व राजकीय पक्षांना २० प्रमुख प्रचारकांची यादी सादर करता येईल. राज्य निवडणूक आयोगास प्रमुख प्रचारकांच्या संख्येत परिस्थितीनुरूप बदल करण्याचा अधिकार असेल.

(३) राजकीय पक्षांच्या प्रमुख प्रचारकांचा निवडणुकीच्या प्रचाराकरिता जाण्याचा आणि परतीच्या प्रवासाच्या खर्चास संबंधित उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये समावेश करण्यापासून सूट असेल.

(४) परंतु, कोणत्याही उमेदवारास स्वतःच्या मतदारसंघामध्ये (प्रभाग, निवडणूक विभाग, निर्वाचक गण इ.) स्वतःचे नाव प्रमुख प्रचारक म्हणून घोषित करता येणार नाही. प्रत्येक उमेदवाराने त्याच्या स्वतःच्या मतदारसंघामध्ये (प्रभाग, निवडणूक विभाग, निर्वाचक गण इ.) प्रचाराकरिता केलेल्या सर्व प्रवासखर्चाचा समावेश त्याच्या निवडणूक खर्चात होईल.

भाग सहा

संकीर्ण

२७. सूचना देण्याबाबत आयोगाचे अधिकारः

(१) संविधानिक जबाबदारी योग्यरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोग खालील बाबतीत सूचना व निर्देश देऊ शकेल-

(क) या आदेशातील कोणत्याही तरतुदींबाबतच्या स्पष्टीकरणाकरिता;

(ख) अशा कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात उत्पन्न झालेल्या कोणत्याही अडचणी अथवा संभ्रम दूर करण्याकरिता;

(ग) राजकीय पक्षांची नोंदणी, निवडणूक चिन्ह आरक्षण व वाटप, राजकीय पक्षाला प्राप्त होणारा निधी व निवडणुकीसाठी किंवा उमेदवारावर राजकीय पक्षाने केलेला खर्च, यासंबंधात या आदेशात तरतूद करण्यात आली नसेल किंवा करण्यात आलेली तरतूद अपूर्ण असेल तेव्हा त्यासंबंधात योग्य ती तरतूद करणे, आणि निवडणुका सुरळीत व सुव्यवस्थित पार पाडण्याच्यादृष्टीने योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत झाल्यास.

(२) राज्य निवडणूक आयोग संबंधित राजकीय पक्षासंदर्भातील अधिकची माहिती/ तपशील/ कागदपत्रे आवश्यतेनुसार मागू शकेल.

(३) राजकीय पक्षांना पक्ष नोंदणीच्या वेळी किंवा नोंदणी झाल्यानंतरही वेळोवेळी आवश्यकतेनुसार मागितलेली मूळ कागदपत्रे सादर करावी लागतील.

(४) राज्य निवडणूक आयोगाशी पत्रव्यवहार करताना राजकीय पक्षांनी प्रत्येक वेळी आपला कायम नोंदणी क्रमांक (PRN) व नोंदणी दिनांक संदर्भ म्हणून नमूद करावा.

(५) राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत सर्व राजकीय पक्षांना या आदेशातील तरतुदी आणि या पुढे वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा/ बदल लागू असतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

सुरेश काकाणी,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

३२५

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

परिशिष्ट- १

राजकीय पक्ष नोंदणीसाठीच्या अर्जाचे प्रारूप

(भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसाठी)

[कृपया परिच्छेद ३(१)(क) पहावा]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

महोदय,

आमचा..... हा राजकीय पक्ष भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत/ मान्यताप्राप्त पक्ष असून, या पक्षाच्या वतीने मी श्री/ श्रीमती..... 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' अन्वये राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याची विनंती करित आहे. सदर आदेशान्वये आवश्यक असलेला तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेः

अ. क्र.	बाब	तपशील
१.	राजकीय पक्षाचे नाव *(मराठीत)*:	
२.	Name of Political Party *(In English)*:	
३.	पक्ष स्थापनेच्या ठरावाचा दिनांक:	
४.	भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणी क्रमांक आणि दिनांक:	
५.	मान्यताप्राप्त असल्यास त्याबाबतचे आदेश आणि निवडणूक चिन्हाचा तपशील:	
६.	पक्षाच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता *(मराठीत)*:	
७.	Address of headquarters of Political Party *(In English)*:	
८.	पक्षाच्या राज्यस्तरीय कार्यालयाचा पत्ता *(मराठीत)*:	
९.	Address of state headquarters of Political Party *(In English)*:	
१०.	संपर्कासाठी पक्षाच्या राज्यस्तरीय कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:	
११.	संपर्कासाठी पक्षाच्या राज्यस्तरीय कार्यालयाचा ई-मेल आयडी *(पक्षाच्या नावे असावा)*:	

अ. क्र.	बाब	तपशील
१२.	पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचे नाव:	
१३.	पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचा पत्ता:	
१४.	पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षाचे नाव:	
१५.	पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षाचा पत्ता:	
१६.	परिशिष्ट-३ मध्ये नमूद घोषणापत्र जोडले आहे का?	
१७.	किमान १५० सदस्यांची नावे व मतदार यादीतील त्यांच्या नावाबाबतचा अद्ययावत प्रमाणित तपशील/ उतारा जोडला आहे का? *(केवळ इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांसाठी) [परिच्छेद ३(५)(झ) कृपया पहावा]*	
१८.	महाराष्ट्र राज्यातील किमान १५० पक्ष सदस्यांच्या मतदान ओळखपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती जोडल्या आहेत का? *(केवळ इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांसाठी) [परिच्छेद ३(५)(ट) कृपया पहावा]*	
१९.	पक्षाच्या पाच पदाधिकाऱ्यांची पदनामासह सही असलेली पक्षाची घटना जोडली आहे का?	
२०.	पक्षाच्या घटनेत या आदेशाच्या परिच्छेद ४ प्रमाणे सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख आहे का?	
२१.	पक्षाची राज्य कार्यकारिणी/ पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा ठराव, घटना मंजुरीची/ स्वीकारल्याच्या ठरावाची नोटराईझ्ड प्रत जोडली आहे? *[परिच्छेद ३(५)(च) कृपया पहावा]*	
२२.	पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयाची जागा/ इमारत मालकाचे परिशिष्ट- ४ नुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(घ) कृपया पहावा]*	
२३	परिशिष्ट- ५ नुसार राजकीय पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयासंदर्भात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(ङ) कृपया पहावा]*	
२४.	प्रक्रिया शुल्क धनाकर्ष/ ऑनलाईनद्वारे भरल्याचा तपशील *(रक्कम, बँकेचे नाव, दिनांक, क्रमांक, इ.) [परिच्छेद ६(१) कृपया पहावा]*	

या अर्जासोबत दिलेली सर्व माहिती व तपशील खरा असून, तो सर्व सदस्यांच्या संमतीने देण्यात येत आहे. त्याबद्दल काही वाद उद्‌भवल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार असेल. नोंदणी शुल्कापोटी एकदा जमा केलेली रक्कम कुठल्याही कारणास्तव परत मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

दिनांक:.....

ठिकाण:.....

आपला/ आपली विश्वासू

(सही)

(पक्ष अध्यक्ष/सचिवाचे नाव-.....)

(पक्षाचे नाव-.....)

३२७

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

परिशिष्ट- २

राजकीय पक्ष नोंदणीसाठीच्या अर्जाचे प्रारूप

(नव्याने नोंदणी करू इच्छिणाऱ्या राजकीय पक्षांसाठी)

[कृपया परिच्छेद ३(१)(ख) पहावा]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.

महोदय,

..... (प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव) वतीने मी श्री/ श्रीमती..... 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' अन्वये राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याची विनंती करत आहे. सदर आदेशान्वये आवश्यक असलेला तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेः

अ. क्र.	बाब	तपशील
१.	राजकीय पक्षाचे नाव *(मराठीत)*:	
२.	Name of Political Party *(In English)*:	
३.	पक्ष स्थापनेच्या ठरावाचा दिनांक:	
४.	पक्षाच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता *(मराठीत)*:	
५.	Address of headquarters of Political Party *(In English)*:	
६.	संपर्कासाठी पक्षाचा दूरध्वनी क्रमांक:	
७.	संपर्कासाठी पक्षाचा ई-मेल आयडी *(पक्षाच्या नावाचा)*:	
८.	पक्ष अध्यक्षाचे नाव:	
९.	पक्ष अध्यक्षाचा पत्ता:	
१०.	परिशिष्ट-३ मध्ये नमूद घोषणापत्र जोडले आहे का?	
११.	पक्षाच्या पाच पदाधिकाऱ्यांची सही असलेली पक्षाची घटना जोडली आहे का?	
१२.	पक्षाच्या घटनेत या आदेशाच्या परिच्छेद ४ प्रमाणे सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख आहे का?	

अ. क्र.	बाब	तपशील
१३.	पक्ष स्थापना, कार्यकारिणी/पदाधिकाऱ्यांची निवड, पक्ष घटना इ. बाबतच्या ठरावाची नोटराईज्ड प्रत जोडली आहे का? *[परिच्छेद ३(५)(च) कृपया पहावा]*	
१४.	किमान १५० सदस्यांची नावे व मतदार यादीतील त्यांच्या नावाबाबतचा अद्ययावत प्रमाणित तपशील/ उतारा जोडला आहे का? *[परिच्छेद ३(५)(झ) कृपया पहावा]*	
१५.	किमान १५० सदस्यांच्या मतदान ओळखपत्राच्या स्वसाक्षांकित प्रती जोडल्या आहेत का? *[परिच्छेद ३(५)(ट) कृपया पहावा]*	
१६.	राजकीय पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयाच्या जागा/ इमारत मालकाचे परिशिष्ट-४ नुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(घ) कृपया पहावा]*	
१७.	राजकीय पक्षाच्या राज्यस्तरीय मुख्य कार्यालयासंदर्भात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे परिशिष्ट-५ नुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' जोडले आहे का? *[परिच्छेद ३(५)(ङ) कृपया पहावा]*	
१८.	प्रक्रिया शुल्काच्या धनाकर्षाचा/ ऑनलाईन भरल्याचा तपशील (रक्कम, बँकेचे नाव, दिनांक, क्रमांक, इ.) *[परिच्छेद ६(१) कृपया पहावा]*	

या अर्जासोबत दिलेली माहिती व तपशील खरा असून, तो सर्व सदस्यांच्या संमतीने देण्यात येत आहे. त्याबद्दल काही वाद उद्‌भवल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार असेल.

दिनांकः .....

स्थळः .....

आपला/ आपली विश्वासू

(सही)

पक्ष अध्यक्ष/ सचिवाचे नाव-.....)

(पक्षाचे नाव-.....)

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

परिशिष्ट- ३

घोषणापत्र

[कृपया परिच्छेद ३(३) पहावा, सदर घोषणापत्र नोटराईज्ड केलेले असावे]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

महोदय,

मी ..... (अर्जदाराचे नाव) ..... या राजकीय पक्षाच्या वतीने घोषणा करतो/ करते की, 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' यातील सर्व तरतुदींचे वाचन केले असून, ते मला समजले आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त पक्ष राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडून नोंदणीकृत झाल्यास, सदर पक्ष-

(१) भारतीय संविधानावर दृढ विश्वास, निष्ठा राखून आणि समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही, भारतीय सार्वभौमत्व, एकता व एकात्मता या तत्वांना बांधिल राहील;

(२) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वेळोवेळी आदर्श आचारसंहितेसंदर्भात दिलेल्या किंवा देण्यात येणाऱ्या आदेशांचे आणि 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' यातील तरतुदींचे पालन करील;

(३) निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक वातवरणात पार पाडण्यासाठी आणि सर्वसाधारण जनतेच्या व विशेषतः निवडणूक क्षेत्राच्या हिताच्यादृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे व सूचनांचे पालन करील;

(४) पक्षाच्या नावामधील बदल, मुख्य कार्यालय/ राज्यस्तरीय कार्यालयाचा पत्ता, पक्षाच्या राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील पदाधिकाऱ्यांची नावे किंवा इतर कोणताही बदल विनाविलंब आयोगाला कळवेल; परंतु पक्षाच्या नावामधील बदल करण्यापूर्वी पक्ष राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेईल;

(५) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची नावे आयोग व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांची नावे व सहीचा नमुना संबंधितास कळवेल.

मी असेही घोषित करतो/ करते की, या घोषणापत्रातील मजकूर; तसेच राजकीय पक्ष नोंदणीसाठी दिलेल्या अर्जातील तपशील व सोबतची कागदपत्रे माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहेत. यातील कोणताही भाग खोटा नसून, आयोगापासून कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती/ माहिती लपविण्यात आलेली नाही.

दिनांकः .....
स्थळः .....

आपला/ आपली विश्वासू

(सही)
(पक्ष अध्यक्ष/सचिवाचे नाव-.....)
(पक्षाचे नाव-.....)

330

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

परिशिष्ट- ४

राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयाच्या जागा/इमारत मालकाचे 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा नमुना

(पक्ष नोंदणीसाठी प्रस्ताव सादर करताना किंवा पक्षाच्या मुख्य कार्यालयात बदल झाल्यास
पक्ष कार्यालयाच्या जागा मालकाचे द्यावयाच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा विहित नमुना)
[कृपया परिच्छेद ३(५)(घ) पहावा, सदर 'ना हरकत प्रमाणपत्र' नोटराईज्ड केलेले असावे]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

महोदय,

मी/ आम्ही ---------- राहणार ---------- याद्वारे असे जाहीर करतो/ करते की, माझ्या/ आमच्या मालकीची ---------- ही जागा मी/ आम्ही---------- या राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयासाठी वापरण्याकरिता देत आहे/आहोत. यासंदर्भात काही वादविवाद झाल्यास किंवा कायदेशीर प्रश्न उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी/ आमची राहील, याची जाणीव ठेवून सदर जागेबाबत 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात येत आहे.

दिनांकः .....
स्थळः .....

आपला/ आपली विश्वासू

(जागा मालकाची सही)

***टिप** : राजकीय पक्षाच्या मुख्य कार्यालयासाठी देण्यात येणारी जागा संबंधित मालकाची असल्यासंदर्भातील पुरावा या आदेशाच्या परिच्छेद ३(५)(घ) नुसार सादर करणे आवश्यक आहे. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि जागा मालकाच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'वरील पत्ता अचूक आणि एकसमान असणे आवश्यक आहे.*

३३१

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षणs व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

परिशिष्ट- ५

स्थानिक स्वराज्य संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा नमुना

(संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेटरहेडवर घेणे)

पक्ष नोंदणीसाठी प्रस्ताव सादर करताना त्यासोबत जोडावयाच्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा 'ना हरकत प्रमाणपत्रा'चा विहित नमुना

[कृपया परिच्छेद ३(५)(ङ) पहावा]

जावक क्रमांकः ----------

दिनांकः ----------

प्रति,

श्री./श्रीमती----------

अध्यक्ष/सचिव/सरचिटणीस,

---------- (प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव व कार्यालयाचा संपूर्ण पत्ता)

विषय : प्रस्तावित राजकीय पक्षाचे कार्यालय सुरू करण्यासाठी 'ना- हरकत प्रमाणपत्र' देण्याबाबत...

संदर्भ : ---------- या प्रस्तावित राजकीय पक्षाचा दिनांक----------रोजीचा विनंती अर्ज.

महोदय,

वरील विषयाबाबत आपल्या संदर्भांकित दिनांक---------- रोजीच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त विनंती अर्जात नमूद केलेल्या---------- (इमारत/ घर क्रमांक, प्रभाग/ परिसर, तालुका, जिल्हा व पीन कोडसह प्रस्तावित पक्ष कार्यालयाचा पत्ता) या जागी---------- या प्रस्तावित पक्षाच्या नावे राज्यस्तरावरील मुख्य कार्यालय सुरू करण्यासंदर्भात ---------- (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) यांची कुठलीही हरकत नसल्यामुळे सदर 'ना- हरकत प्रमाणपत्र' देण्यात येत आहे.

सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी

(नाव व पदनाम)

स्थानिक स्वराज्य संस्थेचा शिक्का

टिप : *ग्रामपंचायतीच्या बाबतीत सक्षम प्राधिकारी म्हणजे ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी, नगरपरिषद व नगरपंचायतीच्या बाबतीत संबंधित मुख्याधिकारी आणि महानगरपालिकेच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त/ संबंधित प्रभाग अधिकारी होय.*

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५ चे सहपत्र]

परिशिष्ट- ६

..... या राजकीय पक्षाच्या सदस्यांची यादी

(किमान १५० आवश्यक)

[कृपया परिच्छेद ३(५)(ञ) पहावा]

अ.क्र.	सदस्याचे नाव	मतदार ओळखपत्र क्रमांक	विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव	मतदार यादी भाग क्रमांक	मतदार यादीतील अनुक्रमांक

..... या राजकीय पक्षाच्या सदस्यांची उपरोक्त यादी व त्यातील तपशील खरा असून, तो सर्व सदस्यांच्या संमतीने देण्यात येत आहे. त्याबद्दल काही वाद उद्‌भवल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार असेल.

दिनांकः .....

स्थळः .....

आपला/ आपली विश्वासू

(सही)

(पक्ष अध्यक्ष/ सचिवाचे नाव-.....)

(पक्षाचे नाव-.....)

(टीपः प्रत्येक पृष्ठावर अर्जदाराची सही असावी.)

३३३

[महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५चे सहपत्र]

परिशिष्ट- ७

प्रतिज्ञापत्राचा नमुना

(कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही व इतर बाबींविषयीचे)

[कृपया परिच्छेद ३(५)(ठ) पहावा, सदर प्रतिज्ञापत्र नोटराईज्ड केलेले असावे.]

प्रति,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

महोदय,

मी श्री/ श्रीमती..... अध्यक्ष/ सचिव, ... (प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव) राहणार..... (संपूर्ण पत्ता) असे जाहीर करतो की,

१. नोंदणीसाठी प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेल्या यादीतील सर्व एकूण सदस्य ..... (किमान १५०) हे इतर कुठल्याही राजकीय पक्षाचे सदस्य अथवा पदाधिकारी नाहीत.

२. पक्षाच्या कुठल्याही सदस्याला फरार घोषित करण्यात आलेले नाही.

३. पक्षाच्या सर्व सदस्यांचे अर्जासोबत दिलेले मतदार ओळखपत्र व त्यावरील त्यांची स्वाक्षरी खरी व त्यांनी स्वखुशीने केलेली आहे.

४. जी जागा पक्षाचे कार्यालय म्हणून निवडण्यात आली आहे, त्या ठिकाणी सर्व सामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही.

६.५ **निवडणूक खर्चाचा हिशोब कोणी सादर करावा-** निवडणूक लढविणाऱ्या (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांसह) प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करावा. उमेदवाराने एकापेक्षा अधिक प्रभाग/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणातून निवडणूक लढविल्यास त्या- त्या प्रभाग/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणाकरिता भरण्यात आलेल्या निवडणूक खर्चाचा प्रभागनिहाय तपशील विहित नमूने क्र.१ ते ३ मध्ये स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक राहील. **मात्र ज्या प्रभाग / निवडणूक विभाग / निर्वाचक गणातून उमेदवारी मागे घेतली असेल, त्या प्रभाग/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणाकरिता निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची आवश्यकता नाही.**

७. **निवडणूक खर्च स्वीकारणारे अधिकारी (परिच्छेद क्र.०४ मधील तक्त्यातील रकाना क्र.०४) यांनी करावयाची कार्यवाही:-**

७.१ **खर्चाचा हिशोब सादर केल्यानंतर पोहोच देणे-** उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब (नमुना क्र.१ ते ३ सोबत) सादर केल्यानंतर संबंधित कार्यालयाने सदर उमेदवारास विहित नमुना क्र.४ नुसार पोहोच देणे बंधनकारक असेल. उमेदवार आणि संबंधित कार्यालयाने सदर कागदपत्रे व पोहोच व्यवस्थित जतन करणे आवश्यक आहे.

७.२ **किती उमेदवारांनी खर्च सादर केला याचा आढावा घेणे-** उमेदवारांनी निवडणुकीत केलेल्या खर्चाचा हिशोब सादर करण्याची मुदत संपल्यानंतर संबंधित अधिकारी यांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी किती उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर केला आहे व किती उमेदवारांनी केला नाही, याचा आढावा घ्यावा.

७.३ **उमेदवारांच्या खर्च तपशिलात त्रुटी असल्यास करावयाची कार्यवाही-** विहित मुदतीत निवडणूक खर्च सादर केलेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासून त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्याची पूर्तता करण्याबाबत सदर उमेदवारास, संबंधित अधिकारी यांनी निवडणूक खर्चाची कागदपत्रे सादर करण्यासाठी परिच्छेद ६.३ अथवा ६.४ मध्ये विहित केलेली मुदत संपल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत नोटीस द्यावी. संबंधित उमेदवारास सदरची नोटीस गिळाल्यानंतर त्या पुढील १५ दिवसांत त्रुटींची पूर्तता करण्याची संधी देण्यात यावी.

७.४ **उमेदवारांनी विहित मुदतीत हिशोब सादर न केल्यास-** ज्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा कोणताही हिशोब (नमुना क्र.१ ते ३) सादर केलेला नाही अशा उमेदवारांना, खर्च स्वीकारणाऱ्या संबंधित अधिकारी यांनी खर्चाचा हिशोब सादर करण्यासाठी **"खर्चाचा हिशोब विहित नमुन्यात व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा"** अशा आशयाची नोटीस परिच्छेद ६.३ अथवा ६.४ मध्ये नमूद केलेली विहित मुदत संपल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसात काढावी. संबंधित उमेदवाराने नोटीस मिळाल्यापासून पुढील १५ दिवसांच्या आत विलंबाच्या खुलाशासह सदर हिशोब सादर करण्यासाठी कळवावे.

७.५ **उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची माहिती तपासणी अधिकारी यांना सादर करणे-** वरील प्रमाणे वाजवी संधी देवूनही निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या आणि त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या उमेदवारांचे अनर्हतेचे प्रस्ताव तयार करण्यासाठी सर्व कागदपत्रे यथास्थिती परिच्छेद ६.३, ६.४, ७.३ व ७.४ मध्ये नमूद केलेली विहित मुदत संपल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत संबंधित तपासणी अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावीत.

८. **तपासणी अधिकारी (परिच्छेद क्र.०४ मधील तक्त्यातील रकाना क्र.०५) यांनी करावयाची कार्यवाही:-**

८.१ **उमेदवाराचा खर्च सूचना फलकावर प्रसिद्ध करणे-** उमेदवाराने सादर केलेला निवडणूक खर्च परिच्छेद-०४ मधील रकाना क्र.०५ मध्ये दर्शविलेल्या प्राधिकृत तपासणी अधिकारी यांनी सूचना

फलकावर प्रसिद्ध करावा. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा निवडणूक संनियत्रण यंत्रणेने काही आक्षेपार्ह बाबी नजरेस आणल्या तर तपासणी अधिकारी यांनी याबाबत संबंधित उमेदवारांना नोटीस देऊन, त्याची बाजू ऐकून, जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त यांनी परिच्छेद ३.१ नुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दरपत्रकाशी तुलना करून, झालेला खर्च योग्य आहे किंवा कसे, याची चौकशी / खात्री करून निर्णय घ्यावा. दरपत्रकापेक्षा कमी खर्च दाखविण्यात आला असेल किंवा खर्च लपविण्यात आला असेल तर दरपत्रकाप्रमाणे खर्च ग्राह्य धरण्यात यावा.

८.२ **अनर्हतेचे प्रस्ताव सादर करणे-** तपासणीअंती ज्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नाही अथवा सूचना दिल्यानंतरदेखील त्रुटींची पूर्तता केली नाही, अशा सर्व उगेदवारांच्या बाबतीत संबंधित तपासणी अधिकारी यांनी अभिप्रायासह परिच्छेद क्र.०४ मधील रकाना क्र.०६ मध्ये दर्शविलेल्या प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे अनर्हतेचा प्रस्ताव सादर करावा. या प्रस्तावासोबत निवडणूक लढविणारे सर्व उमेदवार (बिनविरोधसह), त्यापैकी निवडणूक खर्च सादर करणारे, सादर न करणारे अथवा हिशोबात त्रुटी असणारे अशा सर्व उमेदवारांची नमुना क्र. ०६ नुसार प्रमाणित यादी जोडावी.

८.३ **प्राप्त प्रस्ताव सादर करण्याकरिता तपासणी अधिकारी यांच्यासाठी मुदत-** संबंधित प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तपासणी अधिकारी यांनी शक्यतो ३० दिवसांत, राज्य निवडणूक आयोगाने अनर्हतेबाबत निर्णय घेण्यासाठी परिच्छेद क्र.०४ मधील रकाना ०६ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे प्रस्ताव सादर करावेत.

९. **अनर्हतेबाबत निर्णय घेण्याकरिता प्राधिकृत अधिकाऱ्यांनी (परिच्छेद क्र.०४ मधील तक्त्यातील रकाना क्र.०६) करावयाची कार्यवाही:-**

९.१ **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्च सादर न केल्यास-** निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने विहित केलेल्या मुदतीत व रितीने निवडणूक खर्च सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्याबाबत खालील प्रक्रियेचे पालन करुन योग्य निर्णय घ्यावा.

९.२ **अनर्हतेच्या प्रस्तावाची छाननी करणे-** अनर्हता आदेश काढण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने परिच्छेद क्र.०४ मधील रकाना ०६ मध्ये नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याची पूर्तता करण्यासाठी तपासणी अधिकाऱ्यांना कळवावे.

९.३ **सुनावणी घेणे-** तपासणी अधिकाऱ्यांकडून आवश्यक ती पूर्तता होताच प्रकरण दाखल करून घेऊन सुनावणीची तारीख निश्चित करावी. ज्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नाही, अशा प्रत्येक उमेदवाराच्या अनर्हतेबाबत निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांनी व्यक्तिश: सुनावणी घ्यावी. सुनावणी घेण्याचे अधिकार इतर अधिकाऱ्यांना प्रदान करता येणार नाहीत.

९.४ **नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन करणे-** प्राधिकृत अधिकारी (जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त) यांनी अनर्हतेचे निर्णय घेण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्वाचे (Principles of Natural Justice) पालन करावे.

९.५ **अनर्हतेचे आदेश-** प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अशी प्रकरणे दाखल झाल्यापासून शक्यतो ६० दिवसांत संबंधितांना सुनावणी देऊन व यथायोग्य आदेश पारित करून ती निकाली काढावीत. सदर आदेश बोलके (Speaking Order) व स्वयंस्पष्ट असावेत. प्राधिकृत अधिकारी यांनी सुनावणीअंती अनर्ह ठरणाऱ्या प्रत्येक उमेदवारासाठी स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. **"सदर आदेशाने व्यथित झालेल्या उमेदवारास, आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे विशेष अर्ज दाखल करता येईल"** ही बाब आदेशात स्पष्टपणे नमूद करावी.

९.६ **अनर्ह ठरणाऱ्या उमेदवारांची नावे शासन राजपत्रात प्रसिध्द करणे-** एखाद्या उमेदवाराला अनर्ह ठरविल्याबाबत आदेश पारित केल्यानंतर, असे अनर्ह ठरणाऱ्या सर्व उमेदवारांची नावे संबंधित विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी शासन राजपत्रात ७ दिवसांत प्रसिध्द करावित.

९.७ **खर्चाचा हिशोब सादर करण्यात आले नसल्याबाबतची तक्रार-** निवडणूक खर्च सादर केले नसल्याची तक्रार प्राप्त झाल्यास, सदर तक्रारीची संबंधित तपासणी अधिकारी यांच्यामार्फत तातडीने प्राथमिक चौकशी पूर्ण करून त्यात तथ्य आढळल्यास वर नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१०. अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याचे अधिकार:-

१०.१ **आयोगाचे अधिकार-** मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १६ (१फ), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०(१फ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १६ (१ ई), महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १५-ब (२) व ५८ (१ई) आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४-ब (२) मधील तरतूदीनुसार अनर्हता दूर करणे, अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे विशेषाधिकार आहेत. सदर अधिकार हे राज्य निवडणूक आयोगास स्वतःहून अथवा अनर्ह झालेल्या उमेदवाराच्या विशेष अर्जावरुन वापरता येतात.

१०.२ **विशेष अर्ज-** सदर अधिकार हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमांमध्ये एखाद्या उमेदवाराला अनर्ह ठरविण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याने (वरील परिच्छेद क्र.०४ रकाना क्र.०६ नुसार अधिकार प्रदान केलेले प्राधिकारी) पारित केलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीने दाखल करावयाचा 'विशेष अर्ज' व 'अपील' हे संपूर्णपणे भिन्न आहेत. सबब, खर्चाचा हिशोब सादर न केल्यामुळे अनर्ह झालेल्या उमेदवाराने राज्य निवडणूक आयोगाकडे केवळ 'विशेष अर्ज' दाखल करणे आवश्यक आहे.

१०.३ **विशेष आदेश**- राज्य निवडणूक आयोगाकडे अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबत केलेल्या विनंती अर्जास 'विशेष अर्ज' आणि त्यावर देण्यात आलेल्या आदेशास 'विशेष आदेश' असे संबोधण्यात येईल.

१०.४ **राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय अंतिम**- अनर्हता दूर करणे अथवा अनर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित आहेत. राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त विशेष अर्जावर घेण्यात येणाऱ्या सुनावणीच्या वेळी संबंधित कार्यालयाने/ उमेदवाराने खर्च दाखल करतेवेळी दिलेली कागदपत्रे व त्याची पोहोच तसेच उमेदवाराला वेळोवेळी दिलेल्या नोटीस इ. कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. राज्य निवडणूक आयोगाने सदर विशेषाधिकार वापरुन पारित केलेले आदेश अंतिम असतील.

१०.५ **सदर आदेश हे या आदेशाच्या दिनांकानंतर होणाऱ्या सर्व सार्वत्रिक व पोटनिवडणुकांकरिता लागू असतील.**

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१५.०२.२०२४

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
२. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
४. विभागीय आयुक्त (सर्व)
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
७. नगरपरिषदा/ नगर पंचायतींचे संबंधित मुख्याधिकारी (सर्व)/ प्रशासक तथा तहसीलदार
८. राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनेलवरील सर्व वकील
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती

नमुना - १

उमेदवाराला प्राप्त निधी / देणगी बाबतचा तपशील (स्वनिधी, पक्ष निधी, भेट, कर्ज, इ.)

उमेदवाराचे नाव :
जिल्हयाचे नाव :
पक्षाचे नाव :
सार्वत्रिक /पोट निवडणूक :
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
निकाल घोषित केल्याचा दिनांक :
प्रभाग/गण/ गट क्रमांक
जागा/ seat क्र.

अ. क्र.	निधी / देणगी देणाऱ्याचे नाव व पत्ता	निधी / देणगी देणाऱ्याचा संपर्क क्रमांक	दिनांक	रोख/ चेक/ डीडी/ इतर प्रकारे	देणाऱ्याच्या बँकेचे नाव व शाखा	निधी / देणगीचा प्रकार	रक्कम
						एकूण	

(निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करावा.)

स्वाक्षरी

दिनांक:-
उमेदवाराचे नाव

टीप:

यामध्ये पुढील बाबींचा समावेश करावा-

१) रोख रक्कम, धनादेश, ऑनलाईन इत्यादी स्वरुपाचा स्वपक्ष, इतर पक्ष, हितचिंतक आदींकडून प्राप्त झालेला निधी.

२) वस्तु रूपाने उदा. बॅनर्स, पोस्टर्स, झेंडे, ध्वनिचित्रफिती इत्यादी स्वरुपात स्वपक्ष, इतर पक्ष, हितचिंतक आदींकडून प्राप्त वस्तू.

३) प्रसार माध्यमांवरील उदा. मुद्रित, दृकश्राव्य, डिजिटल, सोशल मीडिया इत्यादींद्वारे स्वपक्ष, इतर पक्ष, हितचिंतक आदींकडून एकत्रितरीत्या करण्यात आलेल्या जाहिरातींवरील खर्च.

४) सेवा स्वरूपात उदा. पक्षातर्फे एकत्रितपणे मिरवणुका, रोड शो, प्रचार सभा, वाहनांवरील व्यवस्था, खानपान व्यवस्था इत्यादींसाठी करण्यात येणारा खर्च.

नमुना - २

उमेदवाराने केलेल्या खर्चाचा तपशील

उमेदवाराचे नाव :
जिल्ह्याचे नाव:
पक्षाचे नाव :
सार्वत्रिक /पोटनिवडणूक:
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव:
निकाल घोषित केल्याचा दिनांक:
प्रभाग/ गण/ गट क्रमांक
जागा/ seat क्र.

अ.क्र.	दिनांक	खर्चाची बाब	देयक/ पावती/ व्हाऊचर क्रमांक	रक्कम कोणास अदा केली	रक्कम
				एकूण	

(निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करावा.)

स्वाक्षरी
दिनांक:-
उमेदवाराचे नाव

राजकीय पक्षातर्फे निवडणुकीत उमेदवारांसाठी एकत्रित खर्च करण्यात येतो. सदर खर्च संबंधित उमेदवारांमध्ये विभाजित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र आदेश आहेत. त्यानुसार तो खर्च संबंधित उमेदवाराने आपल्या एकूण खर्चामध्ये समाविष्ट करणे बंधनकारक आहे.

नमुना -३

उमेदवाराचे शपथपत्र

मी (नाव).....वडिलाचे/ आईचे/ पतीचे नाव ..... वय ..... वर्ष ....., राहणार ..... पुढीलप्रमाणे या शपथपत्राद्वारे जाहीर करतो/ करते की,

१. मी ..... महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत/ जिल्हापरिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायतीच्या ..... - प्रभाग क्रमांक/ गट/ गण ..... मधून सार्वत्रिक/ पोटनिवडणूक ..... मधून..... या जागेसाठी निवडणूक लढविली होती व तिचा निकाल दिनांक .....रोजी घोषित करण्यात आला होता. सदर निकालानुसार मी विजयी / पराभूत झालो आहे/ मी बिनविरोध निवडून आले/आलेलो आहे. (लागू नसेल ते खोडावे)

२. मी/ माझ्या प्रतिनिधीने नामनिर्देशन दिनांक..... ते निकाल घोषित करण्यात आलेल्या दिनांक .....(दोन्ही दिवस धरुन) या काळात केलेले सर्व निवडणूक खर्चाचे खरे व बिनचूक हिशोब ठेवलेले आहेत; तसेच खर्चाचे पूरक पुराव्याचे कागददेखील जतन केले आहेत.

३. मी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशातील सर्व निदेशाचे तंतोतंत पालन केलेले आहे, अशी खात्री देतो.

४. मी सादर केलेल्या खर्चामध्ये कोणतीही बाब लपवून ठेवलेली नाही किंवा रोखून ठेवलेली नाही.

५. मी स्वतः केलेला खर्च, पक्षाने माझ्यासाठी केलेला खर्च व इतर व्यक्तींनी माझ्यासाठी केलेला खर्च संपूर्णपणे खरा व अचुकपणे मी माझ्या एकूण खर्चात अंतर्भूत केलेला आहे.

६. मी निवडणुकीकरिता देणगी, भेटी, कर्ज, पक्ष निधी इत्यादी स्वरुपात गोळा केलेल्या निधीचा अचूक तपशील सादर केला आहे. हा सर्व निधी स्वखुशीने देण्यात आलेला आहे.

७. मी ठेवलेली हिशोबाची पुस्तके व त्यासंबंधातील खर्चाच्या पृष्ठ्यर्थ ठेवलेली पावती/ बील/ व्हाऊचर इ. यांच्या मूळ प्रती, मी निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मागणीनुसार पडताळणीसाठी न चुकता व विनाविलंब सादर करील.

८. मी पेड न्यूजचा अवलंब केलेला नाही.

मी शपथेवर सांगतो की, वर वर्णन केलेली माहिती खरी असून कोणतीही माहिती खोटी व लपवून ठेवलेली नाही.

उमेदवाराची स्वाक्षरी:-.....

नाव:- .....

दिनांक:- .....

टिप:- शपथपत्र स्टँप पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नसून साध्या कागदावर तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन सादर करावे.

नमुना -४

उमेदवारांनी सादर केलेल्या खर्चाचा हिशोब स्वीकारतांना उमेदवाराला द्यावयाची पोच पावती

कार्यालयीन वापराकरिता:-

उमेदवाराचे नाव:- ----------
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव:- ---------- . प्रभाग क्र:-
तालुका:- जिल्हा:-
निकाल घोषित केल्याचा दिनांक:-
खर्चाचा हिशोब सादर केल्याचा दिनांक:-
नमुना क्र १ -- जोडला आहे/ नाही
नमुना क्र २ -- जोडला आहे/ नाही
नमुना क्र ३ -- जोडला आहे/ नाही
उमेदवार/ प्रतिनिधी यांची स्वाक्षरी:-
खर्चाचा हिशोब स्वीकारणाऱ्या प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी याचे नाव:- ----------
पद:-
प्राधिकृत अधिकारी/ कर्मचारी यांची दिनांकासह स्वाक्षरी:-
कार्यालयीन शिक्का

उमेदवारास द्यावयाची पोहोच:

उमेदवाराचे नाव:- ----------
स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव:- ---------- प्रभाग क्र:-
तालुका:- जिल्हा:-
निकाल घोषित केल्याचा दिनांक:-
खर्चाचा हिशोब सादर केल्याचा दिनांक:-
नमुना क्र १ -- जोडला आहे/ नाही
नमुना क्र २ -- जोडला आहे/ नाही
नमुना क्र ३ -- जोडला आहे/ नाही
उमेदवार/ प्रतिनिधी यांची स्वाक्षरी:-
खर्चाचा हिशोब स्वीकारणाऱ्या प्राधिकृत अधिकारी/ कर्मचारी याचे नाव:- ----------
पद:-
प्राधिकृत अधिकारी/ कर्मचारी यांची दिनांकासह स्वाक्षरी:-
कार्यालयीन शिक्का

नमुना - ५

स्थानिक प्रचलित दर

जिल्ह्याचे / महानगरपालिकेचे नाव -

सार्वत्रिक/ पोटनिवडणूक -

मतदानाचा दिनांक -

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव -

जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने व राजकीय पक्षांच्या उपस्थितीत; तसेच मान्यतेने निश्चित केलेले स्थानिक प्रचलित दर

अ.क्र.	खर्चाची मुख्य बाब	खर्चाची आंतर बाब	तपशील /voucher	स्थानिक प्रचलित दर
१	२	३	४	५
१	प्रचारादरम्यान भाडे खर्च	प्रचार कार्यालय		
		प्रचार मैदाने		
		प्रचारातील वाहने		
		उमेदवाराची वाहने		
		कार्यालयीन वाहने		
		विविध प्रतिनिधींना दिलेले वाहने		
		जाहिरातीची ठिकाणे		
		व्यासपीठ		
		मंडप		
		बुथ		
		खुर्ची, टेबल इ.		
		विविध इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रीकल उपकरण		
		इतर अनुषंगिक खर्च		
२	प्रचार कार्यालयावरील खर्च	प्रचारकांचा भत्ता		
		प्रतिनिधी भत्ता		
		मतदान प्रतिनिधी भत्ता		
		मतमोजणी प्रतिनिधी भत्ता		
		दूरध्वनी/ भ्रमणध्वनी खर्च		
		वीज/ पाणी/ चहा खर्च		
		इतर कार्यालयीन खर्च		
३	प्रचार साहित्यावरील खर्च	जाहीरनामा छपाई व वितरण		
		वैयक्तिक माहिती पुस्तिका		
		पोस्टर छपाई व वितरण		
		हॅन्डबील छपाई व वितरण		
		भिंतीवरील प्रचाराचे लिखाण		
		व्होटर स्लिप		
		इतर साहित्य खर्च		

अ.क्र.	खर्चाची मुख्य बाब	खर्चाची आंतर बाब	तपशील /voucher	स्थानिक प्रचलित दर
१	२	३	४	५
४	प्रसार माध्यमावरील खर्च	वर्तमान पत्रातील जाहिरात खर्च		
		होर्डिंग खर्च		
		ऑडिओ जाहिरात		
		व्हिडिओ जाहिरात		
		एसएमएस		
		केबल टीव्ही		
		संकेत स्थळ इ. इंटरनेट माध्यम		
		सोशल मीडिया		
		रेडिओ /एफएम		
		प्रवेशद्वाराची कमान		
		टीव्ही चॅनेल		
		इतर प्रचार माध्यम		
५	प्रचारावरील खर्च	मिरवणूक/रोड शो (रॅली)		
		जनसभा/प्रचारसभा		
		व्हीआयपीवरील खर्च		
		सजावट खर्च		
		इतर खर्च		
६	खानपान	प्रचारातील खानपान		
		मतदान प्रतिनिधी खानपान		
		मतमोजणी प्रतिनिधी खानपान		
		कार्यकर्ता खानपान		
		इतर खर्च		
७	इतर खर्च (जे वरील बाबीत मोडत नाहीत)			

जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांची स्वाक्षरी

दिनांक

टीप -

१. सदर दर हा समितीचे सदस्य व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत निश्चित करण्यात आलेले आहेत.

२. उमेदवाराने जर स्थानिक प्रचलित दरापेक्षा कमी दराने खर्च केला तर त्या उमेदवाराला प्रचलित दरापेक्षा कमी दर का दाखविण्यात आले आहेत यांच्या कागदपत्रांच्या पुराव्यासह योग्य कारण देणे आवश्यक राहील.

नमुना - ६

तपासणी अधिकारी यांनी प्राधिकृत अधिकारी यांना अनर्हतेच्या प्रस्तावासोबत सादर करावयाच्या यादीचा नमुना

जिल्ह्याचे/ महानगरपालिकेचे नाव -

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव -

सार्वत्रिक/ पोटनिवडणूक -

निकाल घोषित केल्याचा दिनांक -

अ.क्र.	उमेदवाराचे नाव	निवडणूक खर्च सादर केल्याचा दिनांक	निवडणूक खर्च दाखल न केलेल्या उमेदवाराला नोटीस दिल्याचा दिनांक	हिशोबात त्रुटी असल्यास नोटीस दिल्याचा दिनांक	निवडणूक खर्च विहित कालावधीत सादर न केल्यास अनर्ह ठरतो किंवा नाही
१	२	३	४	५	६

स्वाक्षरी

तपासणी अधिकाऱ्याचे नाव

पदनाम

टिप - अनर्हतेच्या प्रस्तावासोबत उपरोक्त नमुन्यातील यादी जोडावी.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
सार्वत्रिक निवडणूका-२०२५
उमेदवाराने निवडणुकांमध्ये करावयाच्या
खर्चाची मर्यादा निश्चित करण्याबाबत....

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ४५/का-५
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
ई मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२५

संदर्भ :- १. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४६/का-५, दि.३१ जानेवारी, २०१७.
२. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३७/का-६, दि.२१ ऑक्टोबर, २०१६,
२४ ऑक्टोबर, २०१६ व १७ नोव्हेंबर, २०१७.
३. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.११/का-८, दि. २१ ऑगस्ट, २०१७.

आ दे श

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब आयोगाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये आणि विहित केलेल्या रितीने सादर करण्यात कसूर करणाऱ्या उमेदवारास अनर्ह ठरविण्याची तरतूद मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६(१), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०(१ई), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६(१ड), महाराष्ट्र जिल्हा परिषद

आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १५-ब(१) आणि ५८(१ई) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४ ब(१) मध्ये करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त तरतुदीस अनुसरून राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२०२३/उनिख/ प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष (ब), दि. १५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार राहिल असे विहित केले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये सन २०१६-१७ मध्ये विहित केलेली निवडणूक खर्चाची मर्यादा निश्चित करुन सुमारे ८ वर्षाचा कालावधी झाला असून, आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने सदर मर्यादा सुधारीत करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए; तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ अ(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-अ (४), महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९ अ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ (४) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून संदर्भाधिन सर्व आदेश अधिक्रमित करुन, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे. :-

अ.क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	सुधारीत खर्चाची मर्यादा (रुपये)	
महानगरपालिका सदस्य			
१	बृहन्मुंबई	१५,००,०००	
२	अ वर्ग (पुणे व नागपूर)	१५,००,०००	
३	ब वर्ग (पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे)	१३,००,०००	
४	क वर्ग (कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व वसई-विरार)	११,००,०००	
५	ड वर्ग (उर्वरित १९ महानगरपालिका)	९,००,०००	
नगरपरिषद / नगरपंचायत			
		थेट नगराध्यक्ष	सदस्य
६	अ वर्ग नगर परिषद (न.प.)	१५,००,०००	५,००,०००
७	ब वर्ग (न.प.)	११,२५,०००	३,५०,०००
८	क वर्ग (न.प.)	७,५०,०००	२,५०,०००
९	नगर पंचायत	६,००,०००	२,२५,०००
जिल्हा परिषद / पंचायत समिती			
	जिल्हे	जिल्हा परिषद सदस्य	पंचायत समिती सदस्य
१०	७१ ते ७५ निवडणूक विभाग	९,००,०००	६,००,०००
११	६१ ते ७० निवडणूक विभाग	७,५०,०००	५,२५,०००
१२	५० ते ६० निवडणूक विभाग	६,००,०००	४,५०,०००
ग्रामपंचायत			
	सदस्य संख्या	थेट सरपंच	सदस्य
१३	७ ते ९ सदस्य	७५,०००	४०,०००
१४	११ ते १३ सदस्य	१,५०,०००	५५,०००
१५	१५ ते १७ सदस्य	२,६५,०००	७५,०००

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये विहित केल्यानुसार उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब वेळोवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ३२

२. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
७. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
८. आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती.

RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ३२] गुरुवार, ऑक्टोबर ९, २०२५/आश्विन १७, शके १९४७ [पृष्ठे ४८, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ६१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.

अधिसूचना

निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५.

संदर्भ :

१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित करण्यात येणाऱ्या मुलाखती इ. बाबतः स्थास्वसं-११०३/प्र.क्र. ३२/का-५, दि. १७ मार्च २००५.

२) इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांवर प्रसारित/ प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या प्रस्तावित जाहिरातींच्या प्रमाणनाबाबतः क्र. रानिआ/मनपा/२००९/प्र. क्र. १/का.५, दि. ०६ जानेवारी २००९.

३) जाहिरात प्रमाणनासाठी समिती स्थापन करण्याबाबतः क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र. क्र. १/का.५, दि.२२ डिसेंबर २०११.

४) पेड न्यूजसंदर्भात कार्यवाही करण्याविषयी कार्यपद्धती ठरविणे आणि समिती गठित करण्याबाबतः क्र. रानिआ/मनपा/२००९/प्र. क्र. १/का.५, दि. १६ जानेवारी २०१२.

५) वृत्तवाहिन्यांवरील चर्चात्मक कार्यक्रमांच्या परवानगीबाबतः दि. १८ जानेवारी २०१२.

६) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी घेणे, निष्कर्ष प्रसिद्ध करण्याबाबत निर्बंधः क्र. रानिआ/मनपा/२०१२/प्र.क्र.१३/का-५, दि. ०२ फेब्रुवारी २०१२.

७) आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रामधील शासनाच्या जाहिरातींबाबतः क्र. रानिआ/मनपा-२०१७/ प्र. क्र. ५/का.५, दि. १६ जानेवारी २०१७.

५३३

क्रमांक रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र. ५/ का. १०, दि. ०९ ऑक्टोबर २०२५.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ ट' (243K) आणि '२४३ यक' (243ZA) अन्वये; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यांतील तरतुदींन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झाले आहेत ;

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. ५७५६/२००५, श्री. किसनसिंग तोमर वि. अहमदाबाद महानगरपालिका व इतर मध्ये दि. १९ ऑक्टोबर २००६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व जबाबदाऱ्या भारत निवडणूक आयोगाशी समतुल्य आहेत, असे नमूद केले आहे;

ज्याअर्थी, प्रत्येक राजकीय पक्ष/ उमेदवार/ गट/ संस्था/ संघ किंवा व्यक्तीने दूरदर्शन वाहिन्या आणि केबल नेटवर्कवर द्यावयाच्या सर्व प्रस्तावित राजकीय जाहिराती भारत निवडणूक आयोगाने विविध स्तरांवर स्थापन करावयाच्या निर्देशित प्रमाणन समितीद्वारे पूर्वप्रमाणित केलेल्या असल्या पाहिजेत, असे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १३ एप्रिल २००४ रोजी {एसएलपी (सी) क्र. ६६७९ मध्ये माहिती व प्रसारण मंत्रालय विरुद्ध मे. जेमिनी टीव्ही प्रा. लि.} दिले आहेत;

ज्याअर्थी, सुदृढ लोकशाहीच्यादृष्टीने 'पेड न्यूज' हा प्रकार मोठे आव्हान ठरू शकते. त्यातून निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेत अडथळा येऊ शकतो आणि सर्वसामान्य मतदारांच्या मतावर अनुचित प्रभाव पडू शकतो. हे धोके टाळण्यासाठी दि. ०४ ऑक्टोबर २०१० व दि. ०९ मार्च २०११ रोजी भारत निवडणूक आयोग व राजकीय पक्षांची एकत्रित बैठक झाली होती. त्यात विविध उपाययोजना करण्याचा निर्णय झाला होता;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक, निःपक्षपातीपणे व कार्यक्षमतेने पार पाडण्याच्यादृष्टीने पेड न्यूजला आळा घालणे, सर्व माध्यमांवर जाहिरात प्रसारण/ प्रसिद्धी/ प्रचार व त्या अनुषंगिक बाबींसंदर्भात कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक झाल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने विविध आदेश निर्गमित केले आहेत;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भांकित आदेशांची अंमलबजावणी करताना होणारा संभ्रम दूर करणे, त्यांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता व सुलभता आणणे; तसेच प्रसारमाध्यमांच्या बदलत्या स्वरुपाची नोंद घेणे इत्यादी बाबी विचारात घेऊन काही सुधारणा करणे आवश्यक आहे, अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे;

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ट' व '२४३यक'; मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम १८अ(४); महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४); महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५चे कलम १०-अ (४); महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ; महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ (४) अन्वये; तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र उपरोक्त संदर्भांकित सर्व आदेश अधिक्रमित करून खालीलप्रमाणे आदेश देत आहेः—

आदेश

भाग एक

आदेशाचे नाव आणि व्याप्ती

१. नाव व्याप्ती आणि प्रारंभ :

(१) या आदेशाला 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५' असे संबोधण्यात येईल.

(२) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्र. ६६७९/२००४ संदर्भातील दि. १३ एप्रिल २००४ रोजीच्या आदेशानुसार निवडणूकविषयक इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करणे आवश्यक आहे.

(३) सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांना समान स्पर्धेची संधी मिळावी, 'पेड न्यूज'मुळे होणारी मतदारांची दिशाभूल टळावी, त्यांच्यावर गैरवाजवी दडपण येऊ नये, या दृष्टीने सर्व प्रसारमाध्यमांचे/ समाजमाध्यमांचे संनियंत्रण होणे आवश्यक आहे.

(४) या आदेशाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यभर राहील व तो राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता लागू राहील.

(५) हा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येईल.

भाग दोन

व्याख्या

२. व्याख्या: या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(१) **'आयोग'** म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ट' व '२४३यक' अन्वये गठित राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

(२) **'जाहिरात पूर्वप्रमाणन'** म्हणजे सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/ प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकविषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणन करून घेणे.

(३) **'प्रसारमाध्यमे'** म्हणजे मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल, समाजमाध्यमे इ.

(४) **'मुद्रित माध्यमे' (प्रिंट मीडिया)** म्हणजे वृत्तपत्रे, नियतकालिके, भित्तिपत्रिका, हस्तपत्रके, होर्डिंग्स, बॅनर्स इ.

(५) **'इलेक्ट्रॉनिक माध्यमे' (इलेक्ट्रॉनिक मीडिया)** म्हणजे दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खाजगी एफएम वाहिन्या, सिनेमागृह, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडिओ व्हिज्युअल डिसप्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हॉईस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे इ.

(६) **'समाजमाध्यमे' (सोशल मीडिया)** म्हणजे महाजालाद्वारे (इंटरनेट) वापरली जाणारी संवादाची आणि माहितीची अशी व्यासपीठे (platforms) की, ज्याद्वारे लोक एकमेकांशी संवाद साधतात, माहिती शेअर करतात, प्रतिक्रिया व्यक्त करता, मते किंवा विचार मांडतात, आणि विविध प्रकारची सामग्री (फोटो, व्हिडीओ, लेख, बातम्या) इतरांपर्यंत पोहोचवतात. उदाहरणार्थ सोशल नेटवर्किंग साईट्स (उदा. फेसबुक, लिंक्डइन इ.), मायक्रोब्लॉगिंग साईट्स (उदा. ट्विटर, एक्स इ.), व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म्स (उदा. इन्स्टाग्राम, यूट्यूब इ.), इंस्टंट मेसेजिंग ॲप्स (उदा. व्हॉट्सॲप, टेलिग्राम इ.); तसेच कोलॅबोरेटिव्ह टूल्स (उदा. विकी, डिस्कशन फोरम्स इ.) इत्यादींचा समावेश होतो.

(७) **'पेड न्यूज'** म्हणजे कोणत्याही प्रसारमाध्यमांत (मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व समाजमाध्यमे) पैशाच्या मोबदल्यातून अथवा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रतिलाभातून किंवा वस्तूच्या मोबदल्यात प्रसिद्ध होणारी कोणतीही बातमी किंवा विश्लेषण.

(८) **'हेट स्पीच'** म्हणजे कोणत्याही व्यक्ती किंवा संस्था अथवा राजकीय पक्ष यांच्या विरोधातील द्वेषपूर्ण वक्तव्य मग ते उच्चारलेले असो, लिखित असो, प्रतिकात्मक चिन्हाच्या स्वरुपात असो अथवा वर्तनात्मक असो इत्यादी.

(९) **'प्रसारमाध्यम संनियंत्रण'** म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकविषयक इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करणे, पेड न्यूजसंदर्भातील राज्यस्तरीय तक्रारी/ प्रकरणांची चौकशी करणे, त्यांचे निराकरण करणे; तसेच विविध प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि समाजमाध्यमांसंदर्भात देखरेख करणे.

(१०) **'जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती'** म्हणजे (परिशिष्ट- १ प्रमाणे) नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या व ग्रामपंचायत निवडणुकांकरिता इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण; तसेच विविध प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि समाजमाध्यमांसंदर्भात देखरेख करणारी जिल्हास्तरीय समिती.

(११) **'महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती'** म्हणजे (परिशिष्ट- २ प्रमाणे) महानगरपालिका निवडणुकांकरिता इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण; तसेच विविध प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि समाजमाध्यमांसंदर्भात देखरेख करणारी महानगरपालिकास्तरीय समिती.

(१२) **'राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती'** म्हणजे (परिशिष्ट- ३ प्रमाणे) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकविषयक इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित राज्यस्तरीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील राज्यस्तरीय तक्रारी/ प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय समित्यांच्या निर्णयाविरुद्धच्या अपिलांवर कार्यवाही; तसेच विविध प्रसारमाधमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि समाजमाध्यमांसंदर्भात देखरेख करणारी राज्यस्तरीय समिती.

(१३) **'जनमत किंवा मतदानोत्तर चाचण्या'** म्हणजे विशिष्ट नमुन्यांच्या आधारावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक निकालांबाबत वर्तविले जाणारे संभाव्य अंदाज किंवा निष्कर्ष.

(१४) **'स्थानिक स्वराज्य संस्था'** म्हणजे-

(क) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम अन्वये गठित ग्रामपंचायत किंवा,

(ख) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये गठित जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती किंवा,

(ग) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये गठित नगरपरिषदा, नगरपंचायती अथवा औद्योगिक नगरी किंवा,

(घ) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अन्वये गठित महानगरपालिका.

(१५) सदर आदेशात वापरलेले; परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि वाक्यप्रयोग यांना राज्यातील सध्या अस्तित्वात असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित अधिनियमांत किंवा त्याखालील नियमांद्वारे जे अर्थ दिले असतील तेच अर्थ प्राप्त होतील, अन्य कोणतेही नाही.

भाग तीन

माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती

३. विविध स्तरांवरील माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या:

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांना समान संधी मिळण्याकरिता

निवडणूकविषयक सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण; तसेच विविध प्रसारमाधमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि समाजमाध्यमांसंदर्भात देखरेख करण्यासाठी विविध स्तरांवर समित्या कार्यरत असतील.

(क) संबंधित नगरपरिषद/ नगरपंचायत/ जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकीसाठी जिल्हास्तरीय समिती कार्यरत असेल. सदर निवडणुका जाहीर झाल्यानंतर संबंधित जिल्हाधिकारी **परिशिष्ट- १** प्रमाणे लगेचच या समितीची स्थापना करतील.

(ख) संबंधित महानगरपालिकेच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकीसाठी महानगरपालिकास्तरीय समिती असेल. सदर निवडणुका जाहीर झाल्यानंतर संबंधित महानगरपालिका आयुक्त **परिशिष्ट- २** प्रमाणे लगेचच या समितीची स्थापना करतील.

(ग) सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांसंदर्भातील राज्यस्तरीय प्रकरणांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर **परिशिष्ट- ३** प्रमाणे राज्यस्तरीय समिती असेल. ती स्थायी स्वरूपाची असेल.

भाग चार

जाहिरात प्रमाणन

४. इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/ प्रसिद्ध करावयाच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन:

(१) सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/ प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकविषयक जाहिरातींचे माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक आहे.

(२) खालील स्वरूपाच्या आशयाचा समावेश असलेल्या जाहिराती प्रसारित/ प्रसिद्ध करता येणार नाहीत व अशा स्वरुपाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणनही केले जाणार नाही,

(क) भारतीय संविधानाची पायमल्ली, केंद्र/ राज्य शासनाच्या कायद्यांचे उल्लंघन,

(ख) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांची पायमल्ली,

(ग) धर्म, वंश, जात, लिंग, भाषा, पेहराव इत्यादींच्या आधारे तेढ अथवा शत्रुत्वाची शक्यता,

(घ) प्रार्थना स्थळांचे छायाचित्र/ छायाचित्रणाचा समावेश,

(ङ) कायदा व सुव्यवस्थेला आव्हान, हिंसेला प्रोत्साहन, शांततेचा भंग,

(च) न्यायालयाचा अथवा एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची बदनामी,

(छ) देशाच्या ऐक्याला, सार्वभौमत्वाला आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा,

(ज) अन्य कुठल्याही देशावर टिका, अवमानजनक टिप्पणी अथवा तिरस्कारपूर्ण विधान,

(झ) संरक्षण दलाच्या अधिकारी/ कर्मचारी अथवा संरक्षण दलाचे छायाचित्र/ छायाचित्रण,

(ञ) राजकीय पक्ष, राजकीय नेता किंवा अन्य कोणावरही खोटे आरोप,

(ट) कुठल्याही राजकीय नेत्याच्या अथवा व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात हस्तक्षेप,

(ठ) नीतिमत्ता व सभ्यतेचे उल्लंघन,

(ड) अश्लिलतेला प्रोत्साहन,

(३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांसंदर्भातील प्रस्तावित जाहिरातीचे संबंधित समितीने पूर्वप्रमाणन केले नसल्यास, अशा जाहिरातीचे प्रसारमाध्यमांना प्रसारण/ प्रसिद्धी करता येणार नाही.

(४) निवडणूकविषयक जाहिरातींवर राजकीय पक्षाने खर्च केला असल्यास त्याचा समावेश पक्षाच्या; तर उमेदवाराने खर्च केला असल्यास त्याचा समावेश उमेदवाराच्या निवडणूक खर्चात करणे आवश्यक आहे.

(५) एखाद्या व्यक्तीस किंवा मतदारास आपल्या वैयक्तिक सोशल मीडिया हँडलवरून राजकीय मत व्यक्त करण्यास साधारणत: कुठलेही बंधन नाही. (मात्र, त्यातून कायदा- सुव्यवस्था, सभ्यता/ नीतिमत्ता, निवडणुकीत अडथळा, अपराधास चिथावणी इत्यादींसंदर्भात प्रश्न उपस्थित होता कामा नये. त्याचबरोबर अब्रुनुकसान किंवा न्यायालयाचा अवमान होणार नाही, याबाबत दक्षता घेणे आवश्यक राहील.) त्यास राजकीय जाहिरात म्हणून समजले जाणार नाही. त्यामुळे त्यास पूर्वप्रमाणनाची आवश्यकता नाही; परंतु निवडणुकीची आचार संहिता लागू झाल्यापासून कुठल्याही व्यक्ती/ मतदारास एखाद्या राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या प्रचारार्थ त्या राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या लेखी परवानगीशिवाय परस्पर जाहिरात किंवा प्रचार करता येणार नाही. तशी जाहिरात किंवा तसा प्रचार करावयाचे असल्यास तिचे पूर्वप्रमाणन करणे बंधनकारक असेल व त्या प्रस्तावित जाहिरातीचा किंवा प्रचाराचा खर्च यथास्थिती संबंधित राजकीय पक्ष किंवा उमेदवाराच्या/उमेदवारांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करणे आवश्यक राहील.

५. प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी अर्ज:

(१) प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी विविध स्तरांवर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या कार्यरत असतील, त्यासाठी **परिशिष्ट- ४** नुसार अर्ज करता येईल.

(क) प्रस्तावित जाहिरात विशिष्ट नगरपरिषद/ नगरपंचायत/ जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकीसाठी एखाद्या राजकीय पक्षाची अथवा या निवडणुकांतील एक किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारांसाठी असल्यास, अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी संबंधित जिल्हास्तरीय समितीकडे अर्ज करावा लागेल.

(ख) प्रस्तावित जाहिरात विशिष्ट महानगरपालिकेच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकीसाठी एखाद्या राजकीय पक्षाची अथवा या निवडणुकीतील एक किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारांसाठी असल्यास, अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी संबंधित महानगरपालिकास्तरीय समितीकडे अर्ज करावा लागेल.

(ग) प्रस्तावित जाहिरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० किंवा त्यापेक्षा कमी जिल्ह्यातील नगरपरिषद/ नगरपंचायत/ जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांसाठी किंवा १० पेक्षा कमी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी संबंधित समित्यांकडे स्वतंत्र अर्ज करावे लागतील.

(घ) प्रस्तावित जाहिरात संपूर्ण राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी असल्यास किंवा १० पेक्षा अधिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करावा लागेल. (प्रस्तावित जाहिरात दहापेक्षा अधिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असल्यास संबंधित दहा स्थानिक स्वराज्य संस्थांची नावे त्या प्रस्तावित जाहिरातीमध्ये असणे आवश्यक असेल.)

(ङ) प्रस्तावित जाहिरात संपूर्ण राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नसल्यास किंवा १० पेक्षा अधिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नसल्यास अथवा अन्य कारणासाठी अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी राज्यस्तरीय समितीकडे आलेला अर्ज संबंधित जिल्हास्तरी किंवा महानगरपालिकास्तरीय समितीकडे अग्रेषित करण्याचा अधिकार राज्यस्तरीय समितीला/ राज्य निवडणूक आयोगाला असेल.

(२) प्रस्तावित जाहिरात प्रसारित/ प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या किमान ५ दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्वप्रमाणनासाठी अर्ज करावा लागेल.

(३) पूर्वप्रमाणनाच्या अर्जासोबत प्रस्तावित जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती (प्रिंट) जोडाव्यात.

(४) "जाहिरात प्रसारण/ प्रसिद्धीसाठी येणाऱ्या खर्चाची सर्व देयके, धनादेश/ धनाकर्ष/ ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. कुठल्याही परिस्थितीत ही देयके रोकड स्वरूपात अदा करण्यात येणार नाहीत," असे पूर्वप्रमाणनासाठीच्या अर्जात (**परिशिष्ट- ४**) नमूद करणे बंधनकारक राहील.

(५) मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेव्यतिरिक्त अन्य भाषेतील प्रस्तावित जाहिरातीचे पूर्वप्रमाणन करण्यासाठी अर्ज सादर करताना संबंधित भाषेतील जाहिरातीच्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील दोन प्रती द्याव्यात. त्याचबरोबर त्या जाहिरात संहितेचा मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत अनुवाद करून राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती (प्रिंट) जोडाव्यात. त्यासोबत "सदर प्रस्तावित जाहिरातीचा मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेत यथार्थ अनुवाद करण्यात आला असून, कोणत्याही चुकांकरिता अर्जदार जबाबदार असेल, असे निश्चियपूर्वक कथन करण्यात येत आहे," असे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र **परिशिष्ट- ५** प्रमाणे सादर करणे आवश्यक असेल.

६. प्रस्तावित जाहिरात पूर्वप्रमाणनाचा अर्ज निकाली काढणे:

(१) प्रस्तावित जाहिरात पूर्वप्रमाणनाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसांच्या आत संबंधित समिती निकालात काढेल.

(२) अर्ज निकाली काढताना समिती, जाहिरातीचा कोणताही भाग वगळेल अथवा फेरबदल करेल किंवा दुरूस्ती सूचवेल त्यानुसार कार्यवाही करणे संबंधित राजकीय पक्ष/ उमेदवार/ अर्जदारावर बंधनकारक असेल.

(३) समितीने पूर्वप्रमाणन मंजूर केल्यास प्रस्तावित जाहिरातीच्या प्रसारण/ प्रसिद्धीसाठी **परिशिष्ट- ६** प्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येईल.

७. प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासंदर्भातील समितीच्या निर्णयाविरुद्ध अपील:

(१) प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासंदर्भात जिल्हास्तरीय/ महानगरपालिकास्तरीय समितीचा निर्णय मान्य नसल्यास संबंधित राजकीय पक्ष/ उमेदवार/ अर्जदारास त्याबाबत कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसांच्या आत राज्यस्तरीय समितीकडे अपील दाखल करता येईल.

(२) राज्यस्तरीय समिती नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे अवलंब करुन गुणवत्तेच्या आधारे अपिलावर निर्णय घेऊन संबंधितास अवगत करेल.

८. पूर्वप्रमाणन केलेल्या जाहिरातींचे प्रसारण/ प्रसिद्धी थांबविणे:

(१) प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनानंतर ती जाहिरात प्रसारित/ प्रसिद्ध झाल्यावर या आदेशाचे किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास, राज्य निवडणूक आयोग अथवा राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा सक्षम प्राधिकारी सदर जाहिरातीचे प्रसारण/ प्रसिद्धी थांबविण्याचे आदेश देईल व संबंधित साहित्य जप्त करण्याबरोबरच सर्व संबंधितांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याचा मार्ग अनुसरेल.

९. मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जाहिराती:

(१) मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही; परंतु अशा माध्यमातून जाहिराती प्रसिद्ध करताना आचारसंहिता किंवा संबंधित कायद्यांचे उल्लंघन होता कामा नये.

(२) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. एसईसी- १०९५/सीआर७७/९५/डेस्क-३, दि. २८ ऑगस्ट १९९५ अनुसार प्रचारासाठी मुद्रित करण्यात येणाऱ्या साहित्याबाबत विहित केलेली कार्यपद्धती अनुसरणे आवश्यक आहे. प्रचार साहित्यावर प्रतींची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव व पत्ता असणे आवश्यक आहे. या आदेशांचे पालन न झाल्याचे आढळल्यास 'प्रेस ॲक्ट' व वेळोवेळी करण्यात आलेल्या इतर अधिनियमांनुसार कार्यवाही केली जाईल.

भाग पाच
पेड न्यूज

१०. पेड न्यूजचे प्रकार रोखण्यासाठी:

(१) काही उमेदवार किंवा राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये प्रसारमाध्यमांत बातम्यांच्या स्वरूपात आपली जाहिरात करतात. या जाहिरातीचे दृश्य स्वरूप बातमीसारखे असले तरी, प्रत्यक्षात विविध स्वरूपात किंमत मोजून प्रसारमाध्यमांमध्ये अशा बातम्या छापून आणतात. त्याला आळा घालणे आवश्यक आहे.

(२) एखादा उमेदवार/ राजकीय पक्ष किंवा निवडणुकी दरम्यानच्या घटनांसंदर्भात अतिशयोक्तिपूर्ण अहवाल देणे या गोष्टीत प्रसारमाध्यमांनी सहभागी होणे अपेक्षित नसते.

(३) प्रसारमाध्यमांनी एखाद्या विशिष्ट उमेदवाराच्या/ पक्षाच्या प्रचारात गुंतणे अपेक्षित नाही. अशा प्रकरणात दुसरा उमेदवार/ राजकीय पक्षालासुद्धा त्यांची बाजू मांडण्याची किंवा उत्तर देण्याचा हक्क शाबूत राखला पाहिजे.

(४) एखादी बातमी/ वृत्तांत 'पेड न्यूज' असल्याचे सिद्ध झाल्यास, त्याचा खर्च यथास्थिती उमेदवाराच्या किंवा राजकीय पक्षाच्या खर्चात समाविष्ट केला जाईल.

(५) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाच्या खर्चाबाबत राज्य निवडणूक आयोग स्वतंत्र आदेशाद्वारे वेळोवेळी तशी मर्यादा निश्चित करेल.

११. पेड न्यूज ओळखण्यासंदर्भातील कसोट्या:

(१) एखादी बातमी/ वृत्तांत/ विश्लेषण पेड न्यूज असल्याचे सिद्ध करण्यासाठी साधारणत: पुढील कसोट्या महत्वाच्या आहेत:

(क) साधारणत: एकाच वेळी निरनिराळ्या लेखकांची नामपंक्ती (बायलाईन) असणाऱ्या किंवा लेखकांच्या नावांशिवाय स्पर्धात्मक प्रसारमाध्यमांत दिसून येणाऱ्या चित्रफिती/ छायाचित्रे/ शीर्षके आदींबाबत बहुतांश प्रमाणात जुळणारा वृत्तांत,

(ख) एखाद्या वृत्तपत्राच्या एकाच पृष्ठावर एकाच जागेवरील दोघेही उमेदवार जिंकण्याच्या शक्यतेचा दावा करणाऱ्या व प्रतिस्पर्धी (Contesting) उमेदवारांची स्तुती करणारे लेख,

(ग) एखाद्या उमेदवाराला समाजाच्या प्रत्येक घटकाचा पाठिंबा मिळत आहे आणि तो उमेदवार विजयी होईल, असे ठळकपणे नमूद करणारी बातमी,

(घ) अतिशय छोट्या घटना, घडामोडींच्या अनुषंगाने एखाद्या उमेदवाराला अतिशयोक्तिपूर्ण/ वारंवार अधिकची प्रसिद्धी देणे आणि त्याच वेळेस विरोधी उमेदवार किंवा बातम्यांना अजिबात स्थान न देणे,

(ङ) निवडणूक असलेल्या क्षेत्रात प्रसिद्ध होणाऱ्या/ वितरित होणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये येणाऱ्या बातम्या विशिष्ट पक्षाशी/ उमेदवाराशी संबंधित असणे व त्याची वारंवारता जास्त प्रमाणात असणे,

(च) एखाद्या प्रसारमाध्यमामार्फत विशिष्ट पक्षाची अथवा उमेदवाराची प्रचारसभा, भाषणे किंवा इतर कार्यक्रमाला अवास्तव प्रसिद्धी देणे.

(२) पेड न्यूजसंदर्भातील वर दिलेल्या कसोट्या ढोबळ स्वरुपाच्या असल्या तरी इतरही विविध स्वरुपाने पेड न्यूजचे प्रकार समोर येऊ शकतात, त्याबाबत माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने सजग राहणे आवश्यक आहे.

(३) निवडणुका आणि पेड न्यूजच्या अनुषंगाने मीडिया कौन्सिल ऑफ इंडियाने वृत्तांकनासंदर्भात निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे महत्वाची आहेत. ती **परिशिष्ट- ७** मध्ये माहितीसाठी दिली असून, त्यांचे अवलोकन करणे अपेक्षित आहे. त्यात वेळोवेळी बदल किंवा दुरुस्त्या झाल्यास त्याचेही अवलोकन होणे अपेक्षित आहे.

१२. पेड न्यूजसंदर्भात माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समित्यांचे कार्य:

(१) स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर संबंधित जिल्हा किंवा महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती आपल्या स्तरावर पत्रकार

परिषद घेईल व त्यात पेड न्यूजबाबत सर्व सविस्तर माहिती देईल. पेड न्यूजसंदर्भातील तक्रारींचे निवारण करण्याकरिता समितीचे गठन करण्यात आले असल्याचे प्रसारमाध्यमांच्याद्वारे सर्वांच्या निदर्शनास आणून दिले जाईल आणि सदर आदेशानुसार कार्यपद्धती अनुसरून कार्यवाही करेल.

(२) आपल्या कार्यक्षेत्रात प्रसारित/ प्रसिद्ध/ वितरित होणाऱ्या प्रसारमाध्यमांमध्ये 'पेड न्यूज' प्रसारित/ प्रसिद्ध होत असल्याच्या तक्रारी आल्यास, संबंधित माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती तक्रारींची शहानिशा करेल. त्यानंतर "पेड न्यूजवर झालेला खर्च आपल्या निवडणूक खर्चात का समाविष्ट करण्यात येऊ नये?" अशी नोटीस संबंधित पक्ष/ उमेदवार आणि प्रसारमाध्यमास शक्यतोवर ३ दिवसांच्या आत देईल.

(३) समितीकडे संबंधित राजकीय पक्ष, उमेदवार आणि प्रसारमाध्यमाने आपली बाजू लेखी स्वरूपात मांडल्यानंतर सदर समिती अंतिम निर्णय घेईल. एखादी बातमी 'पेड न्यूज' असल्याचे समितीचे मत झाल्यास, त्यावर झालेला खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास समिती कळवेल.

(४) समितीने पेड न्यूजसंदर्भात आपली बाजू मांडण्यासाठी नोटीस मिळाल्यानंतर त्यास संबंधित पक्ष किंवा उमेदवार अथवा प्रसारमाध्यम संस्थेने २ दिवसांच्या आत उत्तर न दिल्यास, अशा प्रकरणी समितीचा निर्णय अंतिम असेल.

(५) संबंधित बातमी 'पेड न्यूज' असल्याचा निष्कर्ष समितीने काढला असल्यास, संबंधित राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने तिच्या स्वत:च्या निवेदनानुसार प्रसारमाध्यम संस्थेला किती रक्कम प्रदान केली आहे किंवा नाही, हे समिती लक्षात घेणार नाही. त्याऐवजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने (डीजीआयपीआर) निश्चित केलेल्या दरानुसार किंवा त्यांनी दर निश्चित केले नसल्यास सेंट्रल ब्यूरो ऑफ कम्युनिकेशन (जुने नाव डीएव्हीपी) निश्चित केलेल्या दरानुसार सदर पेड न्यूजच्या खर्चाचा उमेदवार अथवा राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चामध्ये समावेश करण्यात येईल.

(६) पेड न्यूजच्या खर्चाचा समावेश राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चात झाल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या राजकीय पक्ष नोंदणीसंदर्भातील दि. ५ मे २०२५ रोजीच्या आदेशानुसार अशा पक्षाने सदर खर्च संबंधित उमेदवारांमध्ये विभाजित करून, त्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये दर्शविणे बंधनकारक आहे.

(७) संबंधित बातमी पेड न्यूज असल्याचा समितीने निष्कर्ष काढला असल्यास, मुद्रित माध्यमांसंदर्भातील माहिती सदर समिती प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाला; तर इलेक्ट्रॉनिक माध्यमांसंदर्भातील माहिती राष्ट्रीय प्रसारण मानक प्राधिकरणाला कळवेल व त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत शिफारस करेल.

१३. पेड न्यूजसंदर्भातील माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या निर्णयाविरुद्ध अपील:

(१) पेड न्यूजसंदर्भातील जिल्हास्तरीय/ महानगरपालिकास्तरीय समितीचा निर्णय मान्य नसल्यास संबंधित राजकीय पक्ष किंवा उमेदवारास त्याबाबत ३ दिवसांच्या आत राज्यस्तरीय समितीकडे अपील दाखल करता येईल.

(२) राज्यस्तरीय समिती अशा अपील प्रकरणी नैसर्गिक न्यायानुसार सर्व बाजू तपासून यथोचित निर्णय घेईल आणि तो सर्व संबंधितांना कळवेल. सदर आदेश सर्व संबंधितांना बंधनकारक असेल.

भाग सहा
समाजमाध्यमे (सोशल मीडिया)

१४. समाजमाध्यमांसंदर्भातील सनियंत्रण:

(१) नागरिक व मतदारांमध्ये समाजमाध्यमांद्वारे विविध प्रकारच्या माहितीची देवाण- घेवाण होत असते. त्यावरून ती आपली मते बनवितात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही त्यातून प्रभाव पडतो. त्यामुळे माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने समाजमाध्यमांचे सनियंत्रण करणे आवयक आहे.

(२) समाजमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या खोट्या बातम्यांना (फेक न्यूज) किंवा चुकीच्या माहितीला आळा घालण्यासाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने नेहमीच सजग राहणे आवश्यक आहे.

(३) खोट्या बातम्यासंदर्भात वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी (फॅक्ट चेक) पत्र सूचना कार्यालय (पीआयबी), माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे (डीजीआयपीआर) किंवा पोलिस यंत्रणेकडे सुविधा उपलब्ध असल्यास, त्या सुविधेचा आधार किंवा संबंधितांची मदत घेता येईल.

(४) समाजमाध्यमांवरील खोट्या बातम्या किंवा चुकीची माहिती निदर्शनास आल्यास किंवा ती अन्य कुणी निदर्शनास आणून दिल्यास त्याबाबत तातडीने उचित कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(५) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश असल्यास किंवा तसे आदेश दिल्यास उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे दाखल करताना आपल्या अधिकृत समाजमाध्यम खात्यांचा (सोशल मीडिया हँडल्स्) तपशील देणे आवश्यक असेल. त्यात ई-मेल आयडीसह अन्य तपशील नमूद करणे बंधनकारक राहील.

(६) समाजमाध्यमांचा समावेश इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या श्रेणीत करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील सोशल मीडियासाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचेसुद्धा परिच्छेद- ४(१) नुसार पूर्वप्रमाणन करणे आवश्यक आहे.

परंतु, अन्य इलेक्ट्रॉनिक मीडियासाठी प्रस्तावित जाहिरातीचे पूर्वप्रमाणन केले असल्यास, सदर जाहिरात सोशल मीडियावरदेखील प्रसारीत/ प्रसिद्ध करता येईल. त्यासाठी पुन्हा पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही.

(७) निवडणुकीच्या प्रचारासाठी समाजमाध्यमांचा वापर केला असल्यास त्यासाठी आलेल्या खर्चाचा (उदा. मजूकर तयार करणे, क्रिएटिव्हज् तयार करणे, समाजमाध्यमे हाताळणाऱ्यांचा मोबदला इ.) समावेश संबंधित उमेदवार किंवा राजकीय पक्षाने आपल्या निवडणूक खर्चात करणे आवश्यक आहे.

(८) प्रसारमाध्यमांच्या विविध संस्था/ संघटनांनी स्वेच्छेने तयार केलेल्या आचारसंहितेचे किंवा मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगाने स्वतंत्र आदेशाद्वारे निर्गमित केलेल्या सर्वसमावेशक आचारसंहितेबाबतही दक्षता घेणे आवश्यक आहे.

भाग सात

जनमत आणि मतदानोत्तर चाचणी

१५. जनमत आणि मतदानोत्तर चाचण्यांसंदर्भातील दक्षता:

(१) जनमत चाचण्या (ओपिनियन पोल) आणि मतदानोत्तर चाचण्याबाबत (एक्झिट पोल) प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने असा सल्ला दिला आहे की, वृत्तपत्रांनी बहुमूल्य मंचाचा वापर, निवडणुकांचा विपर्यास आणि त्यात ढवळाढवळ करण्यासाठी केला जाऊ नये म्हणून खबरदारी घ्यावी.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातही नमुन्याच्या (सॅम्पल) आधारावर विविध चाचण्या घेतल्या जातात. त्यातून निवडणुकांच्या निकालांबाबत वर्तविल्या जाणाऱ्या अंदाजांचा/ निष्कर्षांचा लोकमतावर/ मतदारांवर प्रभाव पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) विविध चाचण्यांच्या निष्कर्षांचा मतदारांवरील संभाव्य प्रभाव टाळण्यासाठी, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा जाहीर प्रचाराचा कालावधी समाप्तीपासून ते मतदानाची वेळ संपल्याच्या पुढील एक तासापर्यंत अशा चाचण्यांचे निष्कर्ष जाहीर करता येणार नाहीत.

(४) मतदान प्रक्रिया विविध टप्प्यांत पार पडणार असल्यास, पहिल्या टप्प्याच्या मतदानाचा जाहीर प्रचाराचा कालावधी समाप्तीपासून ते शेवटच्या टप्प्याचे मतदान संपल्याच्या पुढील एक तासापर्यंत कोणत्याही अशा चाचण्यांचे निष्कर्ष जाहीर करता येणार नाहीत.

(५) आवश्यकता भासल्यास राज्य निवडणूक आयोगाकडून यथोचित प्रासंगिक स्वरूपात स्वतंत्रपणे या चाचण्यांसंदर्भात स्पष्टीकरण करण्यात येईल.

भाग आठ

जाहिरात प्रसिद्धीचा कालावधी

१६. जाहीर प्रचाराची समाप्ती व जाहिरातींची प्रसिद्धी:

(१) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे इत्यादी माध्यमाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा जाहीर प्रचार समाप्तीच्या कालावधी संबंधित विविध कायद्यांमध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे-

(क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम '२७अअ' अन्वये, "कोणत्याही व्यक्तीला एखाद्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही निवडणुकीतील मतदान समाप्तीच्या

अठ्ठेचाळीस तास अगोदर, त्या मतदान क्षेत्रात सार्वजनिक सभा बोलविता, भरविता येणार नाही किंवा तिला हजर राहता येणार नाही."

(ख) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४) द्वारे राज्य निवडणूक आयोगास बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांसंदर्भात समर्थ करणाऱ्या तरतुदीन्वये प्राप्त अधिकारानुसार आयोगास आदेश निर्गमित करण्याचे अधिकार आहेत.

(ग) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २३(१) अन्वये, "कोणत्याही व्यक्तीने एखाद्या प्रभागामध्ये ज्या तारखेस किंवा तारखांस त्या प्रभागातील एखाद्या निवडणुकीकरिता मतदान घेण्यात येईल, त्या तारखेस किंवा तारखांस कोणतीही जाहीर सभा बोलविता, भरविता किंवा सभेला हजर राहता कामा नये."

(घ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम २८ब(१) अन्वये, "कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदार विभागामध्ये, मतदानास सुरुवात होण्याच्या दिनांकापूर्वी चोवीस तासांमध्ये किंवा त्या मतदार विभागात निवडणुकीसाठी ज्या दिनांकास किंवा दिनांकास मतदान घेण्यात येईल. त्या दिनांकास किंवा दिनाकांस कोणतीही सार्वजनिक सभा बोलविणार नाही, भरविणार नाही किंवा अशा सभेस हजर राहणार नाही.

(ङ) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ (४) अन्वये, द्वारे राज्य निवडणूक आयोगास ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात समर्थ करणाऱ्या तरतुदीन्वये प्राप्त अधिकारानुसार आयोगास आदेश निर्गमित करण्याचे अधिकार आहेत.

(३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यातील जाहीर प्रचारासंदर्भातील उपरोक्त तरतुदी लक्षात घेता, जाहीर प्रचार समाप्तीनंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि समाजमाध्यमांद्वारे खाली नमूद केलेल्या कालावधीनंतर कोणत्याही व्यक्तीस, उमेदवारास, राजकीय पक्षास प्रचार करता येणार नाही किंवा प्रचाराच्या जाहिराती प्रसिद्ध/ प्रसारित करता येणार नाहीत,

(क) **महानगरपालिकेच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांबाबत**, मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर निर्बंध असतील. उदा. १० तारखेस सायंकाळी ५.३० वाजता मतदानाची मुदत संपत असल्यास ८ तारखेला सायंकाळी ५.३० वाजता प्रचारासोबत जाहिरात प्रसिद्धी/ प्रसारणदेखील बंद होईल.

(ख) **नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांबाबत**, मतदान सुरू होण्याच्या दिनांकास निर्बंध असतील. उदा. १० तारखेस मतदान असल्यास ९ तारखेला रात्री १२.०० वाजता प्रचारासोबत जाहिरात प्रसिद्धी/ प्रसारणदेखील बंद होईल. मात्र ९ तारखेला रात्री १०.०० नंतर प्रचलित अधिनियम/ नियमानुसार सभा/ प्रचारफेऱ्या/ ध्वनिवर्धकाचा वापर करता येणार नाही.

(ग) **जिल्हा परिषद/ पंचायत समितीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांबाबत**, मतदान सुरू होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर निर्बंध असतील. उदा. १० तारखेस मतदान

असल्यास ८ तारखेला रात्री १२.०० वाजता प्रचारासोबत जाहिरात प्रसिद्धी/ प्रसारणदेखील बंद होईल. मात्र ८ तारखेला रात्री १०.०० नंतर प्रचलित अधिनियम/ नियमानुसार सभा/ प्रचारफेऱ्या/ ध्वनिवर्धकाचा वापर करता येणार नाही.

(घ) **ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांबाबत**, मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर निर्बंध असतील. उदा. १० तारखेस सायंकाळी ५.३० वाजता मतदानाची मुदत संपत असल्यास ८ तारखेला सायंकाळी ५.३० वाजता प्रचारासोबत जाहिरात प्रसिद्धी/ प्रसारणदेखील बंद होईल.

१७. आचारसंहितेच्या कालवधीतील शासनाच्या जाहिराती:

(१) केंद्र, राज्य, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय- निमशासकीय संस्था, सार्वजनिक उपक्रम इत्यादींना आचारसंहितेच्या कालावधीत विविध कल्याणकारी योजना, विविध सवलती; तसेच शासनाच्या कामगिरींबाबत कोणत्याही प्रकारे सार्वजनिक पैशातून जाहिराती प्रसारित/ प्रसिद्ध करण्यावर बंदी असेल.

(२) सार्वजनिक पैशातून स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन इत्यादी राष्ट्रीय सण-उत्सवांच्या दिवशी केवळ शुभेच्छांपर जाहिराती प्रसिद्ध करता येतील; परंतु त्यातून कुठल्याही योजनेचा किंवा सवलतीचा प्रचार- प्रसार करता येणार नाही आणि मतदारांवर प्रभाव पडेल, असे कुठलेही कृत्य करता येणार नाही. त्याचबरोबर त्या जाहिरातींवर पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री व अन्य पदाधिकाऱ्यांची छायाचित्रे वापरता येणार नाहीत.

(३) आचारसंहितेच्या कालावधीत राज्य शासकीय व इतर सेवा, निमशासकीय संस्था, शासकीय मंडळे/ महामंडळे, सार्वजनिक उपक्रमे इ. संस्थांमध्ये भरती करण्याच्यादृष्टीने जाहिराती प्रसारित/ प्रसिद्ध करता येणार नाहीत.

(४) आचारसंहितेच्या कालावधीत राज्य शासन, निमसरकारी संस्था, शासकीय मंडळे/ महामंडळे, सार्वजनिक उपक्रमे इत्यादींना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेसंदर्भातील निविदेच्या जाहिराती प्रसारित/ प्रसिद्ध करता येणार नाहीत.

१८. राजकीय स्वरुपाच्या मुलाखती व चर्चात्मक कार्यक्रम:

(१) आचारसंहितेच्या कालावधीत राजकीय स्वरुपाच्या मुलाखती किंवा चर्चात्मक कार्यक्रम मुद्रित/ इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून प्रसिद्ध/ प्रसारित करण्यास मनाई नाही; तसेच त्यासाठी पूर्वप्रमाणन किंवा परवानगीची आवश्यकता नाही. मात्र, मुलाखती/कार्यक्रम/चित्रण (फुटेज) जुने असल्यास त्यावर तसा उल्लेख करणे आवश्यक राहील.

परंतु, राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आचारसंहितेच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी अशा मुलाखती/ चर्चात्मक कार्यक्रम प्रसिद्ध/ प्रसारित करणाऱ्या प्रसारमाध्यमांची आणि त्यात सहभागी होणारे राजकीय पक्षाचे नेते/ प्रतिनिधी/ उमेदवारांची जबाबदारी असेल. सदर मुलाखत किंवा कार्यक्रम पेडन्यूजच्या स्वरुपात असल्याचे सिद्ध झाल्यास परिच्छेद १२(५) व (६) नुसार सदर आदेशात नमूद संबंधित समितीकडून कार्यवाही केली जाईल.

(२) आचारसंहितेच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर चर्चात्मक कार्यक्रमात आणि त्याच्या प्रसारण/ प्रसिद्धीमुळे धार्मिक किंवा जातीय तेढ; तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित प्रसारमाध्यम/ आयोजक आणि त्यात सहभागी नेते/ राजकीय पक्षाचे प्रतिनिधी/ उमेदवारांची राहील. त्याचबरोबर कार्यक्रमासाठी विविध विभागांकडून/ यंत्रणांकडून आवश्यक परवानग्या घेण्याचीही जबाबदारी आयोजकांची असेल.

(३) जाहीर किंवा स्टुडिओतील चर्चात्मक कार्यक्रमाद्वारे कुठल्याही एका पक्षाचा किंवा उमेदवाराचा प्रचार होणार नाही, याचीही दक्षता घेणे आवश्यक आहे.

भाग नऊ

प्रसारमाध्यमांसाठी सुविधा

१९. माध्यम कक्ष (मीडिया सेंटर)

(१) प्रसारमाध्यमांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात एकत्रित स्वरूपात माहिती उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर आणि महानगरपालिकास्तरावर अनुक्रमे संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त माध्यम कक्षाची स्थापना करतील.

(२) माध्यम कक्षाद्वारे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना वेळोवेळी निवडणूकविषयक अद्ययावत माहिती वेळोवेळी मिळेल, याची संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त विशेष दक्षता घेतील.

(३) माध्यम कक्षामध्ये प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी पुरेशी आसन व्यवस्था, इंटरनेटची सुविधा इत्यादी बाबी असतील, याची दक्षता घेतील.

(४) माध्यम कक्षाची जबाबदारी सांभाळण्यासाठी महानगरपालिका निवडणुकांकरिता संबंधित महानगरपालिकेचे संबंधित जनसंपर्क अधिकारी आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संबंधित जिल्हा माहिती अधिकारी किंवा अन्य अधिकाऱ्याची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

(५) संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांनी प्रसंगी स्वत: वेळोवेळी पत्रकार परिषदा घेऊन किंवा प्रसिद्धिपत्रकाद्वारे प्रसारमाध्यमांना निवडणूकविषयक माहितीबाबत अवगत करावे आणि मतदार जागृतीसाठी प्रसारमाध्यमांनीदेखील स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेण्याचे आवाहन करावे.

२०. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी:

(१) कायदा व सुव्यवस्थेच्यादृष्टीने संबंधित मतदार, अधिकारी, कर्मचारी व इतरांना परवानगीशिवाय मतदान केंद्रात किंवा मतमोजणी केंद्रात प्रवेश करण्यास मनाई असते. त्यामुळे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनादेखील प्रवेशिकेशिवाय प्रवेश करता येणार नाही.

(२) नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या यांच्या मान्यतेने प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान व मतमोजणी केंद्रांवर प्रवेशासाठी प्रवेशिका देण्यात येतील.

(३) महानगरपालिकेच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांसाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्या किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या मान्यतेने प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान व मतमोजणी केंद्रांवर प्रवेशासाठी प्रवेशिका देण्यात येतील.

(४) ऐनवेळी होणारी धावपळ व गोंधळ टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रावर प्रवेशासाठी द्यावयाच्या प्रवेशिकांकरिता प्रसारमाध्यम संस्थेकडून पुरेशा वेळेपूर्वी अर्ज मागविण्यात येतील. अर्जासोबत पासपोर्ट आकाराच्या छायाचित्राच्या दोन प्रती देणे आवश्यक राहील.

(५) प्रसारमाध्यम संस्थेकडून प्राप्त झालेल्या अर्जांची योग्यरीत्या छाननी करून पात्र प्रतिनिधीलाच प्रवेशिका देण्यात येईल.

(६) पुढीलप्रमाणे प्रवेशिका देण्यात येतील:

(क) राज्य शासनाच्या यादीवरील 'अ' (मोठे), 'ब'(मध्यम) आणि 'क'(लघू) वर्गातील दैनिक वृत्तपत्राच्या प्रत्येकी दोनच प्रतिनिधींना प्रवेशिका दिल्या जातील.

(ख) राज्य शासनाच्या यादीवरील साप्ताहिकाच्या एका प्रतिनिधीलाच प्रवेशिका देण्यात येईल.

(ग) उपग्रह वाहिन्यांच्या प्रत्येकी दोन प्रतिनिधींना आणि एका कॅमेरामनला प्रवेशिका देण्यात येईल

(घ) भारतीय टपाल खात्याचा परवाना असलेल्या केबल वाहिनीच्या एका प्रतिनिधीला आणि एका कॅमेरामनलाच प्रवेशिका दिली जाईल.

(ङ) प्रवेशिकांची ही संख्या प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र 'युनिट' म्हणून विचारात घेतली जाईल.

(च) प्रवेशिकांची संख्या कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार अपवादात्मक स्थितीत आणि सबळ कारणांच्या आधारे संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांना असेल.

(छ) वर नमूद व्यतिरिक्त (उदा. यूट्यूब चॅनल, ऑनलाईन वृत्तपत्र, संकेतस्थळ, सोशल मीडिया हँडल इ.) कुठल्याही प्रतिनिधीला किंवा कॅमेरामनला प्रवेशिका देण्यात येणार नाही.

(७) कुठल्याही मतदान केंद्रावर किंवा मतमोणजी केंद्रावर प्रवेशासाठी शासकीय प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनादेखील (उदा. पीआयबी, डीजीआयपीआर इ.) प्रवेशिकेशिवाय प्रवेश करता येणार नाही.

(८) 'मतदान केंद्र आणि मतमोजणी केंद्रावरील प्रवेशासाठी' असा स्पष्ट उल्लेख प्रवेशिकेवर असेल.

(९) प्रवेशिका देताना नोंदवहीत (रजिस्टर) संबंधित प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्या नावाची आणि संपर्क क्रमांकासह संपूर्ण पत्त्याची नोंद घेतल्याची खात्री करणे, हे संबंधित अधिकाऱ्यास अनिवार्य असेल; तसेच भविष्यातील संदर्भासाठी नोंदवहीवर (रजिस्टर) संबंधित प्रतिनिधीचे छायाचित्रदेखील चिकटवावे.

(१०) प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना दिलेली प्रवेशिका रद्द करण्याचे अधिकार यथास्थिती संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त/ अथवा निवडणूक निर्णय अधिकारी अथवा राज्य निवडणूक आयोगास असतील.

(११) कुठल्याही माध्यम प्रतिनिधीने प्रवेशिकेसाठी थेट राज्य निवडणूक आयोगाकडे अर्ज करू नये. अशा अर्जांचा राज्य निवडणूक आयोग विचार करणार नाही. ते अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील.

२१. मतदान व मतमोजणी केंद्रावरील दक्षता:

(१) संबंधित अधिकारी/ कर्मचारी प्रवेशिकेची उचित पडताळणी करूनच प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान/ मतमोजणी केंद्रावर प्रवेश देतील.

(२) प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना थेट मतदान केंद्रावरील मतदान कक्षाजवळ जाऊन पाहणी किंवा छायाचित्रण करता येणार नाही; तसेच मतदान कक्षाचे छायाचित्रेही घेता येणार नाही. शांततापूर्ण व शिस्तबद्ध मतदान प्रक्रियेत बाधा पोहचेल, असे कुठलेही वर्तन करता कामा नये.

(३) मतदार मतदान करतानाचे छायाचित्र किंवा छायाचित्रण पुरेशा अंतरावरून करणे बंधनकारक असेल. ते करतानाही मतदानाच्या गोपनियतेच्या हक्काचे उल्लंघन होता कामा नये.

(४) कुठल्या मतदाराने कोणत्या उमेदवाराला मतदान केले आहे, हे मतदानाच्या वेळी किंवा मतमोजणीप्रसंगी अपघाताने चित्रित झाल्यास किंवा त्याचे छायाचित्र काढल्यास त्याचे प्रसारण किंवा प्रसिद्धी करता येणार नाही.

(५) प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान/ मतमोजणी केंद्रावर छायाचित्रासाठी किंवा छायाचित्रणासाठी कॅमेराचे स्टँड नेता येणार नाही.

(६) राज्य निवडणूक आयोग/ संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त/ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी नेमलेल्या अधिकृत छायाचित्रकार किंवा कॅमेरामन यांनाच मतदान केंद्रात व मतमोजणी केंद्रात कॅमेराचे स्टँड नेता येईल.

(७) मतदान किंवा मतमोजणी केंद्रावर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींची एकाच वेळी होणारी गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार गटागटाने सर्वांना आत सोडण्याबाबतचे किंवा परिस्थितीनुरुप नियोजन करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त/ निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांना असतील.

२२. मतमोजणी केंद्रावरील सुविधा:

(१) जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे असलेल्या यादीतील अधिकृत प्रवेशपत्रधारक प्रसारमाध्यम प्रतिनिधीलाच मतमोजणी केंद्रात प्रवेश दिला जाईल.

(२) प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी मतमोजणी केंद्रातच स्वतंत्र पत्रकार कक्षाची व्यवस्था केली जाईल. त्यांना इतरत्र कुठेही फिरण्याची अनुमती नसेल.

(३) मतमोजणी केंद्रावरील गोंधळ टाळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ किंवा सुरक्षा व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त अथवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असेल.

(४) पत्रकार कक्षामध्ये फेरीनिहाय मतमोजणीचे तपशील प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतील. मतमोजणी केंद्राच्या बाहेरदेखील कर्णाच्या (लाऊड स्पीकर) माध्यमातून किंवा मोठ्या पडद्यावर (स्क्रीन) फेरीनिहाय तपशील आणि अंतिम स्वरुपाचे निकाल सर्वांच्या माहितीसाठी शक्य असेल तिथे उपलब्ध करून दिले जातील.

भाग दहा
संकीर्ण

२३. सूचना देण्याबाबत आयोगाचे अधिकार:

(१) संविधानिक जबाबदारी योग्यरीत्या पार पाडण्याच्यादृष्टीने राज्य निवडणूक आयोग खालील बाबतीत सूचना व निर्देश देऊ शकेल-

(क) या आदेशातील कोणत्याही तरतुदींबाबतच्या स्पष्टीकरणाकरिता;

(ख) अशा कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात उत्पन्न झालेल्या कोणत्याही अडचणी अथवा संभ्रम दूर करण्याकरिता;

(ग) प्रस्तावित जाहिरातीचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजला आळा घालणे, खोट्या, दिशाभूल करणाऱ्या बातम्यांबाबत स्पष्टीकरण करणे, प्रसारमाध्यमांसह इतर विविध माध्यमांचे संनियंत्रण करणे इत्यादींबाबत या आदेशात तरतूद करण्यात आली नसेल किंवा करण्यात आलेली तरतूद अपूर्ण असेल, तेव्हा त्यासंबंधात योग्य ती तरतूद करणे आणि निवडणुका सुरळीत व सुव्यवस्थित पार पाडण्याच्यादृष्टीने योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे, असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाल्यास.

(२) या आदेशाच्या इंग्रजी अनुवादातील एखाद्या मुद्याचा अर्थ अथवा अन्वयार्थ याबाबत काही मुद्दे उद्‌भवल्यास मराठी भाषेतील आदेशामधील अर्थ अथवा अन्वयार्थ अंतिम असेल.

(निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ चे सहपत्र)

परिशिष्ट- १

जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती

नगरपरिषद/ नगरपंचायत, जिल्हा परिषदा/ पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी

(कृपया परिच्छेद ३(१)(क) पाहावा)

अ.क्र.	पदाधिकारी	पद
१.	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२.	जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
३.	जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अपर जिल्हाधिकारी अथवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी	सदस्य
४.	संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी	सदस्य
५.	संबंधित तहसीलदार अथवा नगरपरिषद/ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी	सदस्य
६.	जिल्हा माहिती अधिकारी	सदस्य सचिव

टिप:

१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील प्रस्तावित जाहिरात एखाद्या विशिष्ट जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी एखाद्या राजकीय पक्षाची अथवा या निवडणुकांतील एखादा उमेदवार किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारांसाठी असल्यास, अशा प्रस्तावित जाहिरातीचे प्रमाणन सदर जिल्हस्तरीय समितीकडून करण्यात येईल. {कृपया परिच्छेद ५(१)(क) पाहावा}

२) प्रस्तावित जाहिरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० किंवा त्यापेक्षा कमी जिल्ह्यातील नगरपरिषद/ नगरपंचायत/ जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी संबंधित समित्यांकडे स्वतंत्र अर्ज करावे लागतील. {कृपया परिच्छेद ५(१)(ग) पाहावा}

३) पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरण एखाद्या विशिष्ट जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या निवडणुकीसंदर्भातील एखाद्या राजकीय पक्षाबाबत किंवा त्यातील उमेदवाराबाबत असल्यास, अशा तक्रारी/ प्रकरणांची चौकशी आणि त्यांचे निराकरण सदर जिल्हास्तरीय समिती करेल. त्याचबरोबर समाजमाध्यमांवरील मजकूर/ पोस्ट यावरही देखरेख ठेवेल. {कृपया परिच्छेद ११ आणि १२ पाहावा}

(निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ चे सहपत्र)

परिशिष्ट- २

महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती

महानगरपालिका निवडणुकीसाठी

(कृपया परिच्छेद ३(१)(ख) पाहावा)

अ.क्र.	पदाधिकारी	पद
१.	महानगरपालिका आयुक्त	अध्यक्ष
२.	जिल्हा पोलीस अधीक्षक/ पोलीस आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
३.	महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला महानगरपालिकेचा अतिरिक्त आयुक्त अथवा उपायुक्त दर्जाचा अधिकारी	सदस्य
४.	संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी किंवा आचारसंहिता कक्ष प्रमुख	सदस्य
५.	महानगरपालिकेचा जनसंपर्क अधिकारी	सदस्य सचिव

टिप:

१) महानगरपालिका निवडणुकांसंदर्भातील प्रस्तावित जाहिरात एखाद्या विशिष्ट महानगरपालिका निवडणुकीसाठी एखाद्या राजकीय पक्षाची अथवा एक किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारांसाठी असल्यास, अशा प्रस्तावित जाहिरातीचे प्रमाणन सदर महानगरपालिकास्तरीय समितीकडून करण्यात येईल. {कृपया परिच्छेद ५(१)(ख) पाहावा}

२) प्रस्तावित जाहिरात १० पेक्षा कमी महानगरपालिकांच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी संबंधित समित्यांकडे स्वतंत्र अर्ज करावे लागतील. {कृपया परिच्छेद ५(१)(ग) पाहावा}

३) पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरण एखाद्या विशिष्ट महानगरपालिका निवडणुकीसंदर्भातील एखाद्या राजकीय पक्षाबाबत किंवा त्यातील उमेदवाराबाबत असल्यास, अशा तक्रारी/ प्रकरणांची चौकशी आणि त्यांचे निराकरण सदर महानगरपालिकास्तरीय समिती करेल. त्याचबरोबर माजमाध्यमांवरील मजकूर/ पोस्ट यावरही देखरेख ठेवेल. {कृपया परिच्छेद ११ आणि १२ पाहावा}

(निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ चे सहपत्र)

परिशिष्ट- ३

राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती

राज्यस्तरीय प्रकरणांसाठी

(कृपया परिच्छेद ३(१)(ग) पाहावा)

अ.क्र.	पदाधिकारी	पद
१.	सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र	अध्यक्ष
२.	उपसचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र	सदस्य
३.	उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र	सदस्य
४.	विधी अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र	सदस्य
५.	संबंधित अवर सचिव/ सहायक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र	सदस्य
६.	सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र	सदस्य सचिव

टिप:

१) प्रस्तावित जाहिरात संपूर्ण राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी असल्यास किंवा १० पेक्षा जास्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करावा लागेल. {कृपया परिच्छेद ५(१)(घ)}

२) प्रस्तावित जाहिरात संपूर्ण राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नसल्यास किंवा १० पेक्षा जास्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नसल्यास अथवा अन्य कारणासाठी अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी राज्यस्तरीय समितीकडे आलेला अर्ज संबंधित जिल्हास्तरीय किंवा महानगरपालिकास्तरीय समितीकडे अग्रेषित करण्याचा अधिकार राज्यस्तरीय समितीला असेल. {कृपया परिच्छेद ५(१)(ङ)}

३) पेड न्यूजसंदर्भातील राज्यस्तरीय तक्रारी/ प्रकरणांची चौकशी आणि त्यांचे निराकरण राज्यस्तरीय समिती करेल. या व्यतिरिक्त तक्रारी/ प्रकरणांची चौकशी संबंधित समिती करेल. त्याचबरोबर समाजमाध्यमांवरील मजकूर/ पोस्ट यावरही देखरेख ठेवेल. {कृपया परिच्छेद ११ आणि १२ पाहावा}

४) जिल्हास्तरीय व महानगरपालिकास्तरीय समितीच्या निर्णयाविरुद्धच्या अपिलांसंदर्भात राज्यस्तरीय समिती नैसर्गिक न्यायानुसार सर्व बाजू तपासून यथोचित निर्णय घेईल आणि तो सर्व संबंधितांना कळवेल. सदर आदेश सर्व संबंधितांना बंधनकारक असेल. कृपया परिच्छेद १३ (२) पाहावा}

(निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ चे सहपत्र)

परिशिष्ट- ४

प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनाकरिता अर्जाचा नमुना

(कृपया परिच्छेद ५ पाहावा)

अ.क्र.	बाब	तपशील
१.	स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव:	
२.	अर्जदाराचे नाव:	
३.	अर्जदाराचा संपूर्ण पत्ता:	
४.	अर्जदाराचा संपर्क क्रमांक:	
५.	अर्जदाराचा ई-मेल आयडी:	
६.	ज्याचा प्रचार करावयाच्या आहे, त्या राजकीय पक्षाचे नाव:	
७.	प्रस्तावित जाहिरात राजकीय पक्षाव्यतिरिक्त एक किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारांसाठी असल्यास त्यांची नावे (जास्त असल्यास स्वतंत्र पृष्ठावर देणे):	
८.	प्रस्तावित जाहिरात राजकीय पक्षाव्यतिरिक्त असल्यास उमेदवार किंवा उमेदवारांच्या प्रभागांची/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणांची नावे व क्रमांक (जास्त असल्यास स्वतंत्र पृष्ठावर देणे):	
९.	जाहिरात प्रसारित/ प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या प्रसारमाध्यमाचे स्वरुप/ प्रकार:	
१०.	जाहिरातीचे शीर्षक:	
११.	जाहिरातीचा कालावधी (सेकंद/ मिनिट्स):	
१२.	जाहिरातीमध्ये वापरण्यात आलेली भाषा (परिच्छेद ५(३) प्रमाणे प्रत्येक भाषेतील जाहिरातीच्या दोन इलेक्ट्रॉनिक प्रती व त्यासोबत साक्षांकित केलेली जाहिरात संहिता):	
१३.	जाहिरात प्रसारणाचा/ प्रसिद्धीचे एकूण दिवस व कालावधी:	
१४.	जाहिरात तयार/ निर्मिती करण्यासाठीचा खर्च:	
१५.	जाहिरातीच्या प्रसारणाचा एकूण अंदाजित खर्च:	

मी, श्री. / श्रीमती ---------- राहणार ---------- अशी हमी देतो/ देते की, या अर्जसोबत देण्यात आलेली प्रस्तावित जाहिरात तयार/ निर्मिती करण्यासाठी व प्रसारण/ प्रसिद्धीसाठी येणारा खर्च धनादेश/ धनाकर्ष/ ऑनलाईन पद्धतीने करण्यात आला आहे किंवा करण्यात येईल.

ठिकाण:

दिनांक:

अर्जदाराची स्वाक्षरी

(निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ चे सहपत्र)

परिशिष्ट- ५

प्रतिज्ञापत्राचा नमुना

(नोटराईज्ड करणे आवश्यक)

मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेव्यतिरिक्त अन्य भाषेतील प्रस्तावित जाहिरातीचे पूर्वप्रमाणन करण्यासाठी

(कृपया परिच्छेद ५(५) पाहावा)

मी, श्री./ श्रीमती ---------- राहणार---------- अशी हमी देतो/ देते की, ---------- या भाषेतील प्रस्तावित जाहिरातीचा मराठी/ हिंदी/ इंग्रजी भाषेत यथार्थ अनुवाद करण्यात आला असून, कोणत्याही चुकांकरिता अर्जदार जबाबदार असेल, असे निश्चियपूर्वक कथन करण्यात येत आहे.

ठिकाण:

दिनांक:

अर्जदाराची स्वाक्षरी

(निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ चे सहपत्र)

परिशिष्ट- ६

जाहिरात पूर्वप्रमाणन पत्राचा नमुना

(कृपया परिच्छेद ६(३) पाहावा)

.....स्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती

पत्ता: .....

जावक क्रमांक: .....

दिनांक: .....

प्रस्तावित जाहिरात प्रसारण/ प्रसिद्धीसाठी पूर्वप्रमाणन प्रमाणपत्र

अ.क्र.	बाब	तपशील
१.	अर्जदाराचे नाव:	
२.	अर्जदाराचा पत्ता:	
३.	अर्जाचा दिनांक:	
४.	जाहिरात ज्याच्यासाठी आहे त्या राजकीय पक्षाचे/ उमेदवाराचे/ उमेदवारांची नावे:	
५.	संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाचे नाव, प्रभाग/ निवडणूक विभाग/ निर्वाचक गणांचे क्रमांक व नावे:	
६.	जाहिरातीचे शीर्षक:	
७.	जाहिरातीचा कालावधी:	
८.	जाहिरातीमध्ये वापरलेली भाषा:	

प्रमाणित करण्यात येते की, वरील जाहिरात प्राथमिक तपासणीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रसारणाकरिता योग्य आहे; परंतु सदर जाहिरातीच्याबाबतीत भविष्यात कोणताही वाद उद्‌भवल्यास त्यात सदर समिती जबाबदार नसेल. सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची असेल.

ठिकाण:

दिनांक:

प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी

(नाव----------)

कार्यालयाचा शिक्का

(निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ चे सहपत्र)

परिशिष्ट- ७

निवडणुकांसंदर्भात प्रसारमाध्यमांसाठी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची मार्गदर्शक तत्वे

(कृपया परिच्छेद ११(३) पाहावा)

(१) निवडणुकांबद्दल आणि उमेदवारांबद्दल वस्तुनिष्ठ वृत्तांत देणे हे प्रसारमाध्यमांचे कर्तव्य आहे. निवडणुकांदरम्यान कोणताही उमेदवार/ पक्ष किंवा घटनेविषयी सदोष निवडणूक प्रचार, अतिशयोक्तिपूर्ण वार्तांकन यात वृत्तपत्रांनी सहभागी होणे अपेक्षित नाही. प्रत्यक्षात दोन किंवा तीन अतिनिकटचे प्रतिस्पर्धी उमेदवार हे सर्व प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेतात. प्रत्यक्ष प्रचाराचे वार्तांकन करताना एखाद्या वृत्तपत्राने, एखाद्या उमेदवाराने उपस्थित केलेला कोणताही महत्वाचा मुद्दा आणि त्यांच्या किंवा/ तिच्या प्रतिस्पर्ध्यांवर केलेली कडक टिका या बाबी सोडून देऊ नये.

(२) निवडणूक नियमान्वये वर्ण अथवा जातीय आधारावर प्रचार करण्यास बंदी आहे म्हणून प्रसारमाध्यमांनी धर्म, वंश, जात, जमात किंवा भाषा यांच्या आधारावर लोकांमध्ये आपसात शत्रुत्वाची किंवा द्वेषभावना पसरविण्याचा संभव असणारे वृत्त देणे टाळावे.

(३) प्रसारमाध्यमांनी कोणत्याही उमेदवाराचे वैयक्तिक चारित्र्य किंवा वागणूक किंवा कोणत्याही उमेदवाराच्या किंवा त्याच्या उमेदवारीच्या किंवा त्याच्या उमेदवारी परत घेण्याच्या संबंधात निवडणुकांमध्ये त्या उमेदवाराच्या भवितव्याला बाधा पोहचेल, अशा प्रकारच्या खोट्या अथवा गंभीर विधानांना प्रसिद्धी देण्यापासून दूर रहावे. प्रसारमाध्यमांनी कोणताही उमेदवार/ पक्ष यांच्याविरुद्धची शहानिशा न केलेले आरोप प्रसिद्ध करु नये.

(४) प्रसारमाध्यमांनी एखादा उमेदवार/ पक्ष यास पुढे आणण्याकरिता आर्थिक किंवा इतर प्रकारे कोणत्याही तऱ्हेचे प्रलोभन स्वीकारू नये. कोणताही उमेदवार/ पक्ष यांच्याकडून अथवा त्यांच्यावतीने देऊ केलेले कोणतेही आतिथ्य किंवा इतर सुविधा यांचा स्वीकार करु नये.

(५) प्रसारमाध्यमांनी कोणताही विशिष्ट उमेदवार/ पक्ष यांच्या प्रसारास वाव देणे अपेक्षित नाही. तर तसे करावयाचे झाल्यास, इतर उमेदवार/ पक्ष यांना त्यावर उत्तर देण्याची मूभा देण्यात यावी.

(६) प्रसारमाध्यमांनी एखादा सत्ताधारी पक्ष/ शासन यांच्या कामगिरीसंबंधातील सरकारी राज्य कोषातील खर्चाने दिलेली कोणतीही जाहिरात स्वीकारु नये/ प्रसिद्ध करु नये.

(७) वृत्तपत्रे, राज्य निवडणूक आयोगाने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी किंवा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी वेळोवेळी काढलेल्या निदेशांचे/ आदेशांचे/ अनुदेशांचे पालन करतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

सुरेश काकाणी,
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

First Floor, New Administrative Building, Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Road, Mumbai 400032

NOTIFICATION

Order on Regulation of Media and Certification of Advertisements for Election Purposes, 2025

Reference :

1) Regarding interviews, etc., to be broadcast by political parties/candidates through electronic media during the Model Code of Conduct period of local self-government elections: LSGB-1103/ CR. 32/Desk-5, dated 17 March 2005.

2) Regarding certification of proposed advertisements to be broadcast/published in electronic media: No. SEC/MNC/2009/CR. 1/Desk-5, dated 06 January 2009.

3) Regarding establishment of Committees for certification of advertisements: No. SEC/MNC-2009/ CR. 1/Desk-5, dated 22 December 2011.

4) Regarding procedure to be followed and constitution of Committees for taking action concerning Paid News: No. SEC/MNC/2009/ CR. 1/Desk-5, dated 16 January 2012.

5) Regarding permission for discussion programs on broadcast media: dated 18 January 2012.

6) Regarding prohibition of conducting opinion polls and exit polls and publishing their results during local self-government elections: No. SEC/MNC/2012/ CR.13/Desk-5, dated 02 February 2012.

7) Regarding government advertisements in areas where Model Code of Conduct is in force: No. SEC/MNC-2017/CR. 5/Desk-5, dated 16 January 2017.

Number SEC/IPR/2025/C.R. 5/ Desk- 10, Date: 09th October 2025.—Whereas, under Articles 243K and 243ZA of the Constitution of India, as well as the provisions contained in laws relating to local self-government institutions, the powers of superintendence, direction, and control of the conduct of elections to such institutions in the State are vested in the State Election Commission.

Whereas, the Hon'ble Supreme Court, in Civil Appeal No. 5756/2005, Kishansing Tomar V/s. Ahmedabad Municipal Corporation & Others, by its Judgement dated 19th October, 2006, has declared that the status, powers, and responsibilities of the State Election Commission are equal to those of the Election Commission of India.

Whereas, the Hon'ble Supreme Court, by its order dated 13th April, 2004 in SLP (Civil) No. 6679 (Ministry of Information & Broadcasting V/s. Gemini TV Pvt. Ltd.), has directed that all proposed political advertisements to be given by political parties/ candidates/ groups/ organizations/ associations / persons on Doordarshan and cable networks shall be pre-certified by the Committees constituted at various levels by the Election Commission of India.

Whereas, "Paid News" poses a serious challenge to healthy democracy. It can obstruct the free and fair election process and may unduly influence the opinion of ordinary voters. To

avert such dangers, meetings were held on 04th October, 2010 and 09th March, 2011 between the Election Commission of India and political parties, wherein various remedial measures were decided upon.

Whereas, to ensure that elections to local self-government institutions are conducted in a free, fair, transparent, impartial, and efficient manner, it has become necessary to curb Paid News, and to prescribe procedures regarding broadcast of advertisement / publicity/ campaigning and other related aspects in all media and related matters, the State Election Commission has from time to time issued various orders.

And whereas, during the implementation of the above-mentioned orders, it is desirable to remove confusion that may arise, ensure uniformity and simplicity in enforcement and keeping in view the changing nature of media, the State Election Commission has come to the conclusion that certain amendments are required to be made in this regard.

Therefore, in exercise of the powers vested in it under Articles 243K and 243ZA of the Constitution of India; Section 18A(4) of the Mumbai Municipal Corporation Act, 1888; Section 14(4) of the Maharashtra Municipal Corporations Act; Section 10A(4) of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965; Section 9A of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961; Section 10A(4) of the Maharashtra Village Panchayats Act; and other enabling provisions, the State Election Commission, Maharashtra, hereby annuls all previous orders relating to the above matters and issues the following Order:

Order

Part One

Title and Scope of the Order

1. Title, Scope, and Commencement:

(1) This order shall be called the "Order on Regulation of Media and Certification of Advertisements for Election Purposes, 2025."

(2) In accordance with the Hon'ble Supreme Court's order dated 13th April, 2004 in Petition No. 6679/2004, pre-certification of election-related electronic media advertisements is mandatory.

(3) With a view to ensuring equal opportunity for all political parties and candidates, preventing voters from being misled due to "Paid News," and avoiding undue coercion/pressure on them, regulation of all broadcast media/social media is necessary.

(4) This order shall apply throughout the State of Maharashtra and shall be applicable to elections of all local self-government institutions in the State.

(5) This order shall come into immediate effect from the date of its issuance.

Part Two

Definitions

2. Definitions – Unless the context otherwise requires:

(1) **"Commission"** means the State Election Commission, Maharashtra, constituted under Articles 243K and 243ZA of the Constitution of India.

(2) **"Pre-Certification of Advertisements"** means obtaining prior certification from the Media Certification and Monitoring Committee for all proposed election-related advertisements of local self-government institutions to be broadcast/published through electronic media.

(3) **"Media"** includes print, electronic, digital, and social media.

(4) **"Print Media"** includes newspapers, periodicals, bulletins, leaflets, handbills, hoardings, banners, etc.

(5) **"Electronic Media"** includes Doordarshan, satellite channels, cable channels, YouTube channels, cable networks, All India Radio (Akashvani), private FM channels, cinema halls, public places' audio-visual displays, e-newspapers, bulk SMS, voice SMS, social media, websites, etc.

(6) **"Social Media"** means platforms of communication and information sharing used through the internet, where people interact with each other, exchange information, express opinions, share ideas, and disseminate various forms of content (photos, videos, articles, news). Examples: Social networking sites (Facebook, LinkedIn, etc.), microblogging sites (Twitter, X, etc.), video-sharing platforms (Instagram, YouTube, etc.), instant messaging apps (WhatsApp, Telegram, etc.), collaborative tools (wikis, discussion forums, etc.).

(7) **"Paid News"** means any news or analysis appearing in any media (print, electronic, or social media) in consideration of monetary payment, material benefit, or any other quid pro quo whether implicit or explicit.

(8) **"Hate Speech"** includes any speech oral, written, symbolic, action, etc. which creates hatred against any person or institution.

(9) **"Media Regulation"** means pre-certification of proposed campaign material and advertisements for local self-government elections in electronic media; inquiry and disposal of state-level complaints/cases relating to Paid News; monitoring compliance of reporting norms in various media; and supervision relating to social media.

(10) **"District Level Media Certification and Monitoring Committee (MCMC)"** means the committee constituted as per **Annexure–1** for the purpose of pre-certification of proposed advertisements in electronic media for municipal councils/nagar panchayats, zilla parishads/panchayat samitis, and village panchayats; inquiry and disposal of complaints/cases relating to Paid News; monitoring compliance of reporting norms in various media; and supervision relating to social media.

(11) **"Municipal Corporation Level Media Certification and Monitoring Committee (MCMC)"** means the committee constituted as per **Annexure–2** for the purpose of pre-certification of proposed advertisements in electronic media for municipal corporation elections; inquiry and disposal of complaints/cases relating to Paid News; monitoring compliance of reporting norms in various media; and supervision relating to social media.

(12) **"State Level Media Certification and Monitoring Committee (MCMC)"** means the committee constituted as per **Annexure–3** at the State Election Commission level for the purpose of pre-certification of proposed advertisements

for state-level campaigns of local self-government elections; inquiry and disposal of complaints/cases relating to Paid News at the state level; hearing appeals against decisions of District/Corporation Committees; monitoring compliance of reporting norms in various media; and supervision relating to social media.

(13) **"Opinion Polls or Exit Polls"** mean surveys conducted on a sample basis to predict or project possible results of elections to local self-government institutions.

(14) **"Local Self-Government Institutions"** mean:

(a) Village Panchayat constituted under the Maharashtra Village Panchayats Act.

(b) Zilla Parishad or Panchayat Samiti constituted under the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

(c) Municipal Council, Nagar Panchayat, or Industrial Township constituted under the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.

(d) Municipal Corporation constituted under the Mumbai Municipal Corporation Act, 1888, or the Maharashtra Municipal Corporations Act.

(15) Words and expressions used in this Order but not defined herein shall have the meanings assigned to them in the relevant Acts relating to local self-government institutions in force in the State or in the rules framed thereunder.

Part Three
Media Certification and Monitoring Committees (MCMCs)

3. Media Certification and Monitoring Committees at various levels:

(1) For the purpose of conducting elections to local self-government institutions in a free, fair, and transparent atmosphere, and to ensure equal opportunity to all political parties and candidates, the following functions shall be carried out by Committees at different levels: Pre-certification of proposed election-related campaign material/advertisements in all electronic media, Inquiry and disposal of complaints / cases relating to Paid News, Monitoring compliance of reporting norms in various media, Supervision relating to social media. Accordingly, the Committees shall function at the following levels:

(a) District Level Committee – For general elections and bye-elections to Municipal Councils/Nagar Panchayats, Zilla Parishads/Panchayat Samitis, and Village Panchayats, a District Level Committee shall function. After the election is announced, the concerned District Collector shall immediately constitute this Committee as per **Annexure–1.**

(b) Municipal Corporation Level Committee – For general elections and bye-elections to Municipal Corporations, a Municipal Corporation Level Committee shall function. After the election is announced, the concerned Municipal Commissioner shall immediately constitute this Committee as per **Annexure–2.**

(c) State Level Committee – For state-level cases concerning general elections and bye-elections to all local self-government institutions, a State Level

Committee shall function at the level of the State Election Commission as per **Annexure–3.** This shall be a permanent committee.

Part Four
Certification of Advertisements

4. Pre-certification of proposed advertisements to be broadcast/published through electronic media:

(1) All proposed advertisements relating to elections of local self-government institutions to be broadcast / published through any type of electronic media shall be pre-certified by the concerned Media Certification and Monitoring Committee.

(2) Advertisements containing the following types of content shall not be broadcast/published, nor shall they be granted pre-certification:

(a) Violation of the Constitution of India or laws made by the Central/State Government.

(b) Violation of orders of the State Election Commission.

(c) Content likely to promote enmity or hatred on grounds of religion, caste, community, gender, language, attire, etc.

(d) Inclusion of photographs or filming of places of worship.

(e) Content challenging law and order, promoting violence, or disturbing peace.

(f) Defamation of any court, person, or institution.

(g) Content detrimental to the unity, sovereignty, or integrity of the country.

(h) Criticism, derogatory remarks, or insult against any other country.

(i) Use of photographs/filming of officers or staff of the defence forces or of the defence forces themselves.

(j) False allegations against political parties, political leaders, or any other person.

(k) Invasion of the privacy of any political leader or individual.

(l) Violation of decency or morality.

(m) Promotion of obscenity.

(3) If the concerned Committee has not pre-certified a proposed advertisement for general/bye-elections of local self-government institutions, such advertisements shall not be broadcast or published by media outlets.

(4) Where expenditure on an election-related advertisement is borne by a political party, it shall be accounted for in the party's election expenses. Where the expenditure is borne by a candidate, it shall be accounted for in the candidate's election expenses.

(5) Any individual or voter expressing political opinions on their personal social media handles shall ordinarily not be restricted. However, such opinions must not; create law-and-order issues, breach decency/morality, obstruct elections, or incite offences. Care shall also be taken to avoid defamation or contempt of court. Such expression shall not be considered a "political advertisement," and therefore does not require pre-certification. However, once the model code of conduct comes into effect, no individual/voter shall campaign or publish advertisements

on behalf of any political party or candidate for campaigning purposes without prior written permission of the concerned political party or candidate. If such an advertisement/campaign is proposed to be published/conducted, it shall mandatorily undergo pre-certification, and its expenditure shall be included in the election expenses of the concerned political party or candidate or candidates as applicable.

5. Application for Pre-Certification of Proposed Advertisements:

(1) Applications for pre-certification of proposed advertisements shall be submitted to the Media Certification and Monitoring Committees functioning at various levels, in the prescribed form **(Annexure–4)**.

(a) If the proposed advertisement is for a political party or for one or more candidates contesting general/bye-elections to any Municipal Council/Nagar Panchayat/Zilla Parishad/Panchayat Samiti/Village Panchayat, the application shall be made to the District Level Committee.

(b) If the proposed advertisement is for a political party or for one or more candidates contesting general/bye-elections to any Municipal Corporation, the application shall be made to the Municipal Corporation Level Committee.

(c) If the proposed advertisement is for general elections/bye-elections to Municipal Councils/Nagar Panchayats/Zilla Parishads/Panchayat Samitis/Village Panchayats in 10 or fewer districts, or 10 or fewer Municipal Corporations, separate applications shall be made to the concerned Committees at those levels.

(d) If the proposed advertisement is for statewide general elections to all local self-government institutions, or for elections in more than 10 local bodies, the application shall be made to the State Level Committee. (In such cases, the advertisement must clearly specify the names of the ten concerned local self-government institutions).

(e) If an application for pre-certification of an advertisement not falling under state-wide/general elections or for elections to not more than 10 local self-government institutions is mistakenly submitted to the State Level Committee, the State Level Committee/ State Election Commission shall have the authority to forward it to the relevant District or Municipal Corporation Level Committee.

(2) Applications shall be submitted at least 5 working days prior to the date of proposed broadcast/publication of the advertisement.

(3) Along with the application, the following must be submitted: an electronic copy of the proposed advertisement, and two printed copies (hard copies) of the advertisement duly signed by the political party's office bearer or the candidate.

(4) The application must mandatorily include a declaration **(as per Annexure–4)** stating: *"All payments relating to expenses for broadcast/publication of advertisements shall be made only through cheque/demand draft/online transfer. Under no circumstances shall payments be made in cash."*

(5) For advertisements proposed in languages other than Marathi, Hindi, or English, two electronic copies in the concerned language shall be submitted. In addition, a translation of the advertisement into Marathi, Hindi, or English, duly signed by the political party's office bearer or candidate, along with two printed copies, shall also be attached. Further, a notarized affidavit in the format of **Annexure–5** must be submitted, stating: *"The proposed advertisement has been accurately translated into Marathi/Hindi/English, and the applicant shall be responsible for any errors."*

6. Disposal of Applications for Pre-Certification of Proposed Advertisements:

(1) Upon receipt of an application, the concerned Committee shall dispose of it within 3 working days.

(2) While disposing of the application, the Committee may: delete or modify any portion of the advertisement, or suggest necessary corrections.

(3) Compliance with such directions shall be mandatory for the concerned political party/candidate/applicant. If the Committee grants pre-certification, a certificate in the format of **Annexure–6** shall be issued to permit broadcast/publication of the proposed advertisement.

7. Appeals Against Decisions of the Committee on Pre-Certification:

(1) If a political party/candidate/applicant is not satisfied with the decision of the District Level or Municipal Corporation Level Committee regarding pre-certification of a proposed advertisement, an appeal may be filed before the State Level Committee within three working days.

(2) The State Level Committee shall consider such appeal and after following the principles of natural justice pass an order on merits, and shall duly communicate the decision to the concerned party.

8. Suspension of Certified Advertisements:

(1) Even after pre-certification, if an advertisement is broadcast/published and is subsequently found to be in violation of this Order or any law, the State Election Commission, or any officer authorized by it, or the competent authority, shall order suspension of broadcast/publication of such advertisement. Along with this, the related material may be seized, and legal proceedings shall be initiated against all concerned persons.

9. Advertisements in Print Media:

(1) Pre-certification is not required for advertisements published in print media. However, such advertisements must not violate the Model Code of Conduct or any related law.

(2) As per the State Election Commission's order No. SEC-1095/CR.77/95/DESK-3 dated 28 August 1995, the prescribed procedure regarding campaign material must be followed. Campaign literature must contain: number of copies, serial number of the material, name and address of the printer, and name and address of the publisher. Non-compliance with these provisions shall attract action under the *Press Act* and other relevant statutes as enacted from time to time.

Part Five
Paid News

10. Measures to Curb Paid News:

(1) Certain candidates or political parties publish their advertisements in the form of news during elections. Although such material appears to be news in form, in reality these are paid insertions in the media, directly or indirectly, in various ways. It is necessary to curb this practice.

(2) Media houses are not expected to indulge in exaggerated or distorted reporting of incidents/events during an election campaign in favour of any candidate or political party.

(3) Media houses are not expected to participate in or align themselves with the propaganda of any particular candidate/party. In cases where such reporting occurs, the rival candidate/party must be given a fair opportunity to present their side or to respond.

(4) If any news/report is determined to be "Paid News," the expenditure thereon shall be added to the election expenses of the candidate or the political party concerned as the case may be.

(5) For general/bye-elections to local self-government institutions, the expenditure limit prescribed by the State Election Commission by separate orders shall be applicable.

11. Tests for Identifying Paid News:

(1) To establish whether a particular news item/report/analysis constitutes "Paid News" the following broad tests shall be applied:

(a) Reports with broadly identical photographs, captions, headlines, or write-ups appearing simultaneously in competing media outlets, often with different bylines or without any author's name.

(b) Reports appearing on the same page of a newspaper where both contesting candidates claim strong chances of winning, and both are praised simultaneously.

(c) News items explicitly stating that a particular candidate has the support of every section of society and will certainly win.

(d) Giving undue, repeated, or exaggerated publicity to minor events/incidents of a candidate while giving no coverage at all to rival candidates.

(e) Excessive frequency of news items about a particular party/candidate in newspapers published/distributed in the concerned constituency.

(f) Unjustified publicity of a party/candidate's rallies, speeches, or programs in specific media outlets.

(2) Though the above tests are indicative and broad, other forms of Paid News may also arise in practice. Committees must remain vigilant to detect such instances.

(3) In this context, the guidelines issued by the Press Council of India on reporting and Paid News are of great importance. These guidelines are reproduced in Annexure–7 for reference, and Committees are expected to be conversant with them, including subsequent amendments or revisions.

12. Functions of Media Certification and Monitoring Committees Regarding Paid News:

(1) Once elections to local self-government institutions are announced, the concerned District or Municipal Corporation Level Committee shall hold a press conference and provide detailed information about Paid News. It shall also announce that complaints regarding Paid News shall be addressed by the Committee, as per the prescribed procedure.

(2) If complaints are received regarding Paid News being published/ broadcast/ distributed in the jurisdiction of the Committee, the Committee shall examine the matter. Thereafter, it shall issue a notice, preferably within 3 days, to the concerned political party/candidate and the media outlet, asking: *Why should the expenditure incurred on Paid News not be included in your election expenses?"*

(3) After receiving written submissions from the concerned political party/ candidate and media outlet, the Committee shall give its final decision. If it concludes that the report constitutes "Paid News," it shall inform the Election Returning Officer concerned that the expenditure thereon be added to the candidate's election expenses.

(4) If the party/candidate/media outlet fails to respond within 2 days of receiving the notice, the Committee's decision shall be final.

(5) If the Committee concludes that a news item constitutes Paid News, it shall not consider whether or not any payment has actually been made by the political party/candidate to the media outlet. Instead, the expenditure shall be calculated as per the rates fixed by the Directorate General of Information and Public Relations (DGIPR). If such rates are not fixed, the rates prescribed by the Central Bureau of Communication (CBC) (formerly DAVP) shall be applied. The expenditure shall then be added to the election expenses of the concerned candidate/party.

(6) If such expenditure is added to the election expenses of a political party, then as per the State Election Commission's order dated 5th May, 2025 regarding registration of political parties, the concerned party must apportion such expenditure among its candidates and reflect the same in their individual election expenses.

(7) If the Committee concludes that a report in print media constitutes Paid News, the matter shall be reported to the Press Council of India. If it concerns electronic media, the matter shall be reported to the National Broadcasting Standards Authority (NBSA), with recommendations for further action.

13. Appeals Against Committee Decisions on Paid News:

(1) If a political party/candidate is not satisfied with the decision of the District Level or Municipal Corporation Level Committee regarding Paid News, an appeal may be filed before the State Level Committee within 3 days.

(2) The State Level Committee shall examine all aspects of the appeal in accordance with principles of natural justice, and shall take an appropriate decision, which shall be binding on all concerned.

Part Six
Social Media

14. Regulation of Social Media:

(1) Citizens and voters exchange various types of information through social media platforms, and such exchanges influence the formation of their opinions. Elections to local self-government institutions are also affected thereby. Hence, monitoring of social media by the Media Certification and Monitoring Committees is necessary.

(2) The Committees must remain vigilant at all times to curb false news (fake news) and misinformation spread through social media.

(3) For fact-checking and verification of suspected fake/false information on social media, assistance may be sought from Press Information Bureau (PIB), Directorate General of Information and Public Relations (DGIPR), or police authorities, wherever such facilities are available.

(4) If false news or misinformation on social media is noticed, or brought to the Committee's attention by any person, immediate and appropriate action must be taken.

(5) If directed by the State Election Commission, or if so ordered, candidates shall, at the time of filing nomination papers, provide details of their official social media accounts/handles, including email IDs and other particulars.

(6) Social media has been included within the category of "electronic media." Hence, all proposed advertisements for elections on social media shall also be subject to pre-certification, as per Paragraph 4(1).

However, if an advertisement has already been pre-certified for broadcast/publication on other electronic media, the same may also be disseminated on social media without seeking fresh certification.

(7) If social media is used for election campaigning, the related expenditure (e.g., preparing content, designing creatives, payments to social media handlers, etc.) must be included in the election expenses of the concerned candidate or political party.

(8) Media organizations/associations are expected to voluntarily comply with any codes of conduct or guidelines they have prepared for social media. In addition, due attention must be paid to comprehensive codes of conduct separately issued by the State Election Commission.

Part Seven
Opinion Polls and Exit Polls

15. Safeguards Relating to Opinion Polls and Exit Polls:

८. टपाली मतपत्रिका पुन्हा देणे:- (१) काही कारणांमुळे एकदा पाठविण्यात आलेली टपाली मतपत्रिका व त्यासोबतचे इतर कागदपत्र मतदारास न मिळता परत आल्यास निवडणूक निर्णय अधिकारी अशी कागदपत्रे संबंधित मतदारास टपालाने पुन्हा पाठविण्याची किंवा त्याने विनंती केल्यास त्यास व्यक्तीशः देण्याची व्यवस्था करील.

(२) एखाद्या मतदाराने त्यास देण्यात आलेली टपाली मतपत्रिका व इतर कागदपत्र चुकीने हाताळल्यास व परिणामी त्यांचा योग्यरीतीने वापर करणे शक्य नसल्यास निवडणूक निर्णय अधिकारी अशा मतदारास टपाली मतपत्रिका व अन्य कागदपत्रांचा दुसरा संच देण्याबाबत विचार करु शकेल.

(३) निवडणूक निर्णय आधिकारी अशात-हचा परत करणेची [illegible]
व अन्य कागदपत्रे रद्द करील व तीं एका वेगळया लखोटयात ठेवून लखोटयावर टपाली मतपत्रिका ज्या निवडणुकीतील आहे त्याचे विवरण व रद्द झालेल्या टपाली मतपत्रिकेचा अनुक्रमांक त्यावर नमूद करील.

९. **टपाली मतपत्रिका परत करणेः-** (१) मतदाराने टपाली मतपत्रिकेवर आपले मत नोंदविल्यानंतर तसेच नियम ६ अथवा ७ मध्ये नमूद केलेले घोषणापत्र तयार केल्यानंतर सदर मतपत्रिका व घोषणापत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे प्रपत्र पीबी-७ मध्ये नमूद केलेल्या सूचनानुसार मतमोजणी सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी परत केले पाहिजे.

(२) वरील नियम ९ (१) मध्ये नमूद केलेल्या वेळेनंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे टपाली मतपत्रिका असलेला एखादा लखोटा प्राप्त झाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी त्यावर लखोटा प्राप्त झाल्याची तारीख आणि वेळ नमूद करील व असे उशिरा प्राप्त झालेले लखोटे एकत्र वेगळया पाकिटात ठेवील.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी त्यांच्याकडे मतमोजणी सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी प्राप्त होणारे टपाली मतपत्रिकांचे सर्व लखोटे सुरक्षित ठेवील.

१०. **टपाली मतपत्रिकांची मतमोजणीः-** (१) निवडणूक निर्णय अधिकारी प्रथमतः टपाली मतपत्रिकांच्या मतमोजणीसाठी खाली नमूद केलेली पध्दती अनुसरील.

(२) मतमोजणी सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर प्राप्त झालेला प्रपत्र पीबी-६ मधील कोणताही लखोटा उघडण्यात येणार नाही व त्यामध्ये असलेल्या मतपत्रिकेची मोजणी करण्यात येणार नाही.

(३) विहित कालावधीत प्राप्त झालेले टपाली मतपत्रिका असलेले लखोटे एका पाठोपाठ एक उघडण्यात येतील व प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी प्रथमतः प्रपत्र पीबी-४ मधील घोषणपत्राची तपासणी करील.

(४) वरील नमूद लखोटा उघडल्यानंतर त्यामध्ये विहित घोषणापत्र न आढळून आल्यास, अथवा त्यावर सही तसेच साक्षांकन नसल्यास, अथवा ते मोठया प्रमाणावर सदोष असल्यास, अथवा घोषणापत्रात नमूद केलेला टपाली मतपत्रिकेचा अनुक्रमांक व नमुना पीबी-५ मधील लखोटयावर नमूद केलेल्या टपाली मतपत्रिकेचा अनुक्रमांक यामध्ये फरक असल्यास सदर लखोटा उघडण्यात येणार नाही आणि त्यावर योग्य तो शेरा लिहून निवडणूक निर्णय अधिकारी त्यामधील मतपत्रिका रद्द करील.

(५) वरीलप्रमाणे शेरा लिहिलेले लखोटे आणि त्यासोबत प्राप्त झालेली घोषणापत्र प्रपत्र पीबी-६ मधील लखोटयात परत ठेवण्यात येतील व प्रपत्र पीबी-६ मधील अशात-हेचे सर्व लखोटे एका वेगळ्या पाकिटात मोहोरबंद करुन ठेवण्यात येतील. सदर लखोटयावर मतदार संघाचे नाव निवडणूकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व लखोटयामध्ये काय ठेवले आहे त्याचा थोडक्यात तपशील लिहिण्यात येईल.

(६) प्रपत्र पीबी-५ मधील कोणताही लखोटा उघडण्यांपूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मते योग्य असलेली प्रपत्र पीबी-४ मधील सर्व घोषणापत्रे एका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येतील व सदर पाकीट मोहोरबंद करण्यात येईल. तसेच त्यावर मतदार संघाचे नाव, निवडणूकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व लखोटयामध्ये काय ठेवले आहे, त्याचा थोडक्यात तपशिल लिहिण्यात येईल.

(७) वरील पोटनियमातील तरतुदीनुसार आतापर्यन्त न उघडण्यात आलेले प्रपत्र पीबी-५ मधील लखोटे एका पाठोपाठ एक उघडण्यात येतील आणि निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक टपाली मतपत्रिकेची तपासणी करील व त्यावर नोंदविलेल्या मतांची वैधता ठरवील.

(८) टपाली मतपत्रिका रद्द ठरविण्यात येईल, जर-

(ए) टपाली मतपत्रिकेवर एखादी अशी खूणी करण्यात आली असेल (मत नोंदविण्याच्या खुणेव्यतिरिक्त) ज्यावरुन मतदाराची ओळख पटू शकेल, अथवा

(बी) टपाली मतपत्रिकेवर मत नोंदविण्यात आले नसेल, अथवा

(सी) एकापेक्षा जास्त उमेदवारांसमोर मत नोंदविण्यात आले असेल, अथवा

(डी) टपाली मतपत्रिका नकली/बनावट असेल तर अथवा

(ई) टपाली मतपत्रिकेस इतक्या मोठया प्रमाणावर हानी पोहोचली असेल अथवा ती छिन्न-विछिन्न झाली असेल की, ज्यायोगे मतपत्रिका खरी आहे किंवा कसे, हे ओळखता येणार नाही, अथवा

(एफ) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी टपाली मतपत्रिकेसोबत जो लखोटा पाठविला असेल, त्या लखोटयात ती परत करण्यात आली नसेल.

परंतु असे की,टपाली मतपत्रिका ग्रामपंचायत निवडणुकीची असल्यास एकापेक्षा जास्त उमेदवारांसमोर मत नोंदविले आहे, या कारणासाठी ती रद्द करण्यात येणार नाही.

(९) टपाली मतपत्रिकेवर अशारीतीने मत नोंदविले असेल की ज्यायोगे ते कोणत्या उमेदवारास दिले आहे हे ओळखता येत नसेल तर अशी मतपत्रिका रद्द ठरविण्यात येईल.

(१०) टपाली मतपत्रिकेवर नोंदविलेले मत अस्पष्ट असेल अथवा मत नोंदविण्याची खूण एकापेक्षा जास्त वेळा केली असेल व जर त्यावरुन मतदाराची कोणत्या उमेदवारास मत देण्याची इच्छा आहे हे पुरेसे स्पष्ट होत असल्यास केवळ त्या कारणासाठी मतपत्रिका रद्द करण्यात येणार नाही.

(११) निवडणूक निर्णय अधिकारी सर्व वैध टपाली मतपत्रिकांवरील मते कोणत्या उमेदवारांना देण्यात आली आहेत त्याची मोजणी करील व त्यांची बेरीज संबंधित निवडणूकीसाठी विहित करण्यात आलेल्या प्रपत्रात नोंदवील व ती जाहीर करील.

(१२) तद्नंतर, सर्व वैध टपाली मतपत्रिका आणि अवैध ठरलेल्या टपाली मतपत्रिकांचे वेगवेगळे गठ्ठे बांधून एका पाकिटात ठेवण्यात यावेत व ते पाकीट निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मोहरेने मोहोरबंद करण्यात यावे.सदर पाकिटावर सही करण्याची ज्या उमेदवारांची, निवडणूक व मतमोजणी प्रतिनिधींची इच्छा असेल त्यांना सहया करण्याची अनुमती देऊन सदर पाकिटावर मतदार संघाचे नाव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व पाकिटात काय आहे, त्याचे थोडक्यात विवरण लिहिण्यात येईल.

११. निवडणूक कार्य प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेल्या लोकसेवकांनी मतदान करणे:-

(१) निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेले मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी तसेच अन्य लोकसेवक त्यांचे नाव ज्या मतदार संघाच्या मतदार यादीत समाविष्ट आहे, त्याच मतदार संघात निवडणूक कामावर नियुक्त असल्यास ते ज्या मतदान केंद्रावर नियुक्त आहेत त्याच मतदान केंद्रात मतदान करु शकतात. अशा व्यक्तींना अशाप्रकारे मतदान करावयाचे असल्यास त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पीबी-२ या प्रपत्रात अर्ज केला पाहिजे आणि निवडणूक निर्णय अधिकारी अशा अर्जदारांना प्रपत्र पीबी-३ मध्ये नियम ३ (२) मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार निवडणूक कार्य प्रमाणपत्र देतील.

(२) निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेल्या ज्या मतदारांना निवडणूक कार्य प्रमाणपत्र प्रपत्र पीबी-३ मध्ये प्राप्त झालेले आहे, त्यांना ते ज्या मतदान केंद्रावर नियुक्त आहेत, त्याच मतदान केंद्रावर खाली नमूद केलेल्या पध्दतीनुसार मतदान करु देण्यात यावे:-

१. निवडणूक कार्यप्रमाणपत्र सादर केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष यांनी ते सादर करणाऱ्या व्यक्तीची सही निवडणूक कार्य प्रमाणपत्रावर घ्यावी.

२. मतदान केंद्राध्यक्ष चिन्हांकीत मतदार यादीच्या शेवटी निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव व त्यावरील मतदार यादीतील त्याचा अनुक्रमांक नमूद करतील.

३. मतदान केंद्राध्यक्ष संबंधित व्यक्तीस त्या मतदान केंद्रावरील अन्य मतदाराने ज्याप्रकारे मतदान केले असते त्याचप्रकारे निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीस मतदान करु देईल.

१२. या आदेशात नमूद केलेले सर्व प्रपत्रांचे नमुने अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे असतील.

प्रपत्र पीबी-१
(पहा नियम ३)
निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचनापत्र

प्रति,
निवडणूक निर्णय अधिकारी,
----------जिल्हा परिषद/पंचायत समिती/
ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूक

महोदय,
मी ---------- मतदार गट / मतदार गण / प्रभाग (क्रमांक व नाव असल्यास नमूद करावे) च्या निवडणूकीमध्ये टपालाने मतदान करु इच्छितो.

माझे नाव ---------- मतदार गटाच्या / मतदार गणाच्या / प्रभागाच्या मतदान केंद्र क्रमांक ------ च्या मतदार यादीत अ.क्र.----------वर समाविष्ट आहे.

टपाली मतपत्रिका मला खालील पत्त्यावर कृपया पाठविण्यात यावी:-

स्थळ:----------
दिनांक:- ----------

आपला विश्वासू,

प्रपत्र पीबी-२
(पहा नियम ३(२))
निवडणूक कार्य प्रमाणपत्रासाठी अर्ज

प्रति,
निवडणूक निर्णय अधिकारी,
मतदार गट/मतदार गण/प्रभाग क्र.-------नाव----------
----------जिल्हा परिषद/पंचायत समिती/
ग्रामपंचायत/ महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूक

महोदय,
मी ---------- मतदार गटाच्या/ मतदार गणाच्या/ प्रभागाच्या निवडणुकीमध्ये व्यक्तिशः मतदान करु इच्छितो.

मला ----------जिल्हा परिषदेच्या / पंचायत समितीच्या / ग्रामपंचायतीच्या / महानगर पालिकेच्या/ नगरपरिषदेच्या/नगरपंचायतीच्या निवडणूकीमध्ये ---------- मतदार गट/ मतदार गण / प्रभागामधील मतदान केंद्र क्रमांक ------ येथे निवडणूक कामावर नियुक्त करण्यात आले आहे. तथापि, माझे नाव वरील नमूद ------- मतदार गट/मतदार गण/ प्रभागामधील मतदान केंद्र क्रमांक------च्या मतदार यादीत अ.क्र.--------येथे समाविष्ट आहे.

मी अशी विनंती करतो की, मला कृपया प्रपत्र-पीबी-३ मध्ये निवडणूक कार्य प्रमाणपत्र देण्यात यावे, जेणेकरुन मला ज्या मतदान केंद्रावर निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आले आहे. त्या मतदान केंद्रावर मी मतदान करु शकेन. निवडणूक कार्य प्रमाणपत्र मला खालील पत्त्यावर कृपया पाठविण्यात यावे.

ठिकाण:----------
दिनांक:- ----------

आपला विश्वासू,

प्रपत्र ५।४।-२

(पहा नियम ३(२))

निवडणूक कार्य प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री---------- हे ----------जिल्हा परिषदेच्या/ पंचायत समितीच्या /ग्रामपंचायतीच्या /महानगर पालिकेच्या/नगरपरिषदेच्या /नगरपंचायतीच्या निवडणूकीतील ---------- मतदार गट/मतदार गणामधील /प्रभागामधील मतदार असून, त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक ---------- असून त्यांना निवडणूक कर्तव्यार्थ नेमण्यात आले असल्यामुळे त्यांचा ज्या मतदान केंद्रामध्ये मतदान करण्याचा हक्क आहे, त्या मतदान केंद्रावर ते मतदान करण्यास असमर्थ असल्यामुळे त्यांना उपरोक्त नमूद मतदार गट/ मतदार गण/ प्रभागामधील मतदान केंद्रापैकी ते ज्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी निवडणूक कामावर असतील त्या मतदान केंद्रावर त्यांना मतदान करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ठिकाण:----------

दिनांक:- ----------

सही ----------

निवडणूक निर्णय अधिकारी

प्रपत्र पाच-ठ

(पहा नियम ५)

मतदाराचे घोषणापत्र

----------जिल्हा परिषद/पंचायत समिती /ग्रामपंचायत/महानगर पालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत मधील ---------- मतदार गट/मतदार गण/प्रभागाची निवडणूक.

(ही बाजू मतदार जेव्हा घोषणापत्रावर स्वतः सही करणार असेल तेव्हा उपयोगात आणावी.)

मी याद्वारे असे घोषित करतो की, उपरोक्त निवडणुकीतील-------- अनुक्रमांकाची टपाली मतपत्रिका देण्यात आली आहे, असा मी मतदार आहे.

मतदाराची सही----------

दिनांक----------

पत्ता:----------

सहीचे साक्षांकन

श्री---------- हे माझ्या वैयक्तिक ओळखीचे असून/मला त्यांची ओळख/माझ्या वैयक्तिक ओळखीचे श्री----------(ओळख पटवून देणारे) यांनी समाधानकारकरित्या पटवून दिली असून, त्यांनी माझ्या उपस्थितीत वरील सही केली आहे.

साक्षांकन करणाऱ्या अधिकाऱ्याची सही---------

पदनाम----------

पत्ता:----------

दिनांक----------

ओळख पटवून देणारे असल्यास

त्यांची सही----------

पत्ता:----------

(ही बाजू जेव्हा मतदार स्वतः सही करु शकत नसेल तेव्हा उपयोगात आणावी.)

मी याद्वारे असे घोषित करतो की, उपरोक्त निवडणुकीतील ----------अनुक्रमांकाची मतपत्रिका ज्यास देण्यात आली आहे, असा मी मतदार आहे.

मतदाराच्या वतीने साक्षांकन करणा-या अधिका-याची सही----------

मतदाराचा पत्ता----------

दिनांक:----------

प्रमाणपत्र

मी याद्वारे प्रमाणित करतो की-

(१) श्री---------- हे माझ्या वैयक्तिक ओळखीचे असून/ मला त्यांची ओळख/माझ्या वैयक्तिक ओळखीचे श्री----------(ओळख पटवून देणारे) यांनी समाधानकारकरित्या ओळख पटवून दिली आहे.

(२) मतदार अशिक्षित असून तो, स्वतःचे मत स्वतः नोंदवू शकत नाही अथवा घोषणापत्रावर सही करु शकत नाही, याबद्दल माझी खात्री पटली आहे.

(३) त्यांनी त्यांच्यावतीने मतपत्रिकेवर मत नोंदविण्याची तसेच वरील घोषणापत्रावर सही करण्याची मला विनंती केली आहे, आणि

(४) मतपत्रिकेवर मी त्यांच्यावतीने त्यांचे उपस्थितीत त्यांचे इच्छेनुसार मत नोंदविले असून, घोषणापत्रावर त्यांचे उपस्थितीत सही केली आहे.

साक्षांकन करणाऱ्या अधिकाऱ्याची सही---------

पदनाम----------

पत्ता:----------

दिनांक----------

ओळख पटवून देणारे असल्यास

त्यांची सही----------

पत्ता:----------

प्रपत्र पीबी-५
(पहा नियम ५)
(पाकीट-अ)

अ

मतमोजणीपूर्वी उघडू नये.

* ---------- जिल्हा परिषद/पंचायत समिती/ ग्रामपंचायत/महानगर पालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत मधील ---------- मतदार गट/मतदार गण/प्रभागाची निवडणूक

टपाली मतपत्रिका

अनुक्रमांक---------

* **निवडणूकीचा योग्य तो तपशील येथे भरावा.**

प्रपत्र पीबी-६
(पहा नियम ५)
(पाकीट-ब)

---------- जिल्हा परिषद/पंचायत समिती/ ग्रामपंचायत/महानगर पालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूकीत उपयोगासाठी

ब

ज्या अधिकाऱ्यावर ही टपाली मतपत्रिका पोहोचविण्याची जबाबदारी आहे अथवा ज्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही मतपत्रिका पोहोचती करावयाची आहे त्यांनी ती खालील नमूद पत्त्यावर विनाविलंब पोहोचती करावी.

निवडणूक तात्काळ
टपाली मतपत्रिका
मतदार गट/मतदार गण/प्रभाग क्रमांक-*--------
नाव:---------- ची निवडणूक
प्रति,
निवडणूक निर्णय अधिकारी**----------
पाठविणाऱ्याची सही----------

* निवडणूक निर्णय अधिकारी यांनी येथे योग्य त्या मतदार संघाचे नाव नमूद करावे.
** निवडणूक निर्णय अधिकारी यांनी येथे आपला पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता नमूद करावा.

प्रपत्र पीबी-७

(पहा नियम ५)

मतदारांसाठी मार्गदर्शक सूचना

(जिल्हा परिषद/पंचायत समिती/ ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकीमध्ये उपयोगासाठी)

----------जिल्हा परिषद/पंचायत समिती/ ग्रामपंचायत/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत मधील ----------मतदार गट/मतदार संघ /प्रभागांची निवडणूक

* सोबत पाठविण्यात येत असलेल्या मतपत्रिकेवर ज्यांची नावे छापलेली आहेत त्या व्यक्ती वरील निवडणुकीमध्ये मतदार आहेत. ज्या उमेदवारास आपण आपले मत देऊ इच्छिता त्या उमेदवाराच्या नावासमोर स्पष्ट दिसेल अशी खूण करा. अशी खूण स्पष्ट दिसून यावी, जेणेकरुन आपण मत देऊ इच्छिता त्या उमेदवारास मत दिले आहे किंवा कसे, याविषयी शंका घेण्यास वाव राहणार नाही, आपण केलेल्या खुणेवरुन कोणत्या उमेदवारास मत दिले आहे हे पुरेसे स्पष्ट होत नसेल तर आपले मत अवैध ठरेल.

* सदर निवडणुकीमध्ये केवळ एकच उमेदवार निवडून द्यावयाचा आहे. कृपया हे लक्षात ठेवा की, आपण फक्त एकच मत देऊ शकता. त्या अनुषंगाने आपण एकापेक्षा जास्त उमेदवारास मत देऊ नये. असे केल्यास आपली मतपत्रिका रद्द करण्यात येईल. परंतु, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी एकापेक्षा जास्त उमदेवार एका प्रभागातून निवडून द्यावयाचे असतात.यास्तव प्रभागातून जितके उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत तितकी मते आपण देऊ शकता. तथापि, एका उमेदवारास एकापेक्षा जास्त मते देण्यात येऊ नयेत.

* मतपत्रिकेवर मत देण्यासाठी करावयाच्या खुणेव्यतिरिक्त आपण आपली सही करु नका. कोणताही शब्द लिहू नका अथवा कोणतीही अन्य खूण करु नका.

* आपणास सोबत पाठविलेल्या प्रपत्र-४ मधील घोषणापत्रावर राजपत्रित अधिकारी अथवा आपणास नियुक्त केलेल्या मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षांच्या उपस्थितीत सही करा.

* वरील बाबतीत आपण घोषणापत्र योग्य त्या सक्षम अधिकाऱ्याकडे घेऊन जाऊ शकता व तुमची ओळख पटविल्यानंतर व अधिकाऱ्याचे त्याविषयी समाधान झाल्यानंतर त्यावर त्यांचे उपस्थितीत सही करु शकता. सदर अधिकारी तुमच्या सहीचे साक्षांकन करुन घोषणापत्र तुम्हाला परत करील. तुम्ही तुमची मतपत्रिका साक्षांकन करणाऱ्या अधिकाऱ्यास कोणत्याही परिस्थितीत दाखवू नका अथवा तुम्ही कसे मतदान केले हे सांगू नका.

* तुम्ही अशिक्षित असल्यामुळे वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार मतपत्रिकेवर स्वत: खूण करण्यास आणि घोषणापत्रावर सही करण्यास असमर्थ असाल तर तुम्ही वर नमूद केलेल्या सक्षम अधिकाऱ्याकडून तुमचे मत नोंदवून घेऊ शकता. तसेच तुमच्या वतीने घोषणापत्रावर त्यांची सही घेऊ शकता. सदर अधिकारी तुमच्या विनंतीनुसार व तुमच्या उपस्थितीत तुमच्या इच्छेनुसार मतपत्रिकेवर खूण करील. तो त्या संदर्भातील दाखलाही लिहून पूर्ण करील.

* तुमचे घोषणापत्र त्यावर सही करुन झाल्यानंतर व तुमची सही साक्षांकित करुन झाल्यानंतर प्रपत्र-४ मधील सदर घोषणापत्र तसेच अ अशी खूण केलेले लहान पाकीट ज्यामध्ये मतपत्रिका ठेवलेली आहे हे सर्व ब अशी खूण केलेल्या मोठ्या पाकिटात ठेवा. मोठे पाकीट बंद केल्यानंतर ते निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पोस्टाने अथवा खास दूतासमवेत पाठवा. ब या पाकीटावर त्यासाठी नेमलेल्या ठिकाणी तुम्हास तुमची पूर्ण सही करावयाची आहे.

सदर पाकीट निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दिनांक ---------- रोजी----------पूर्वी (वेळ नमूद करावी) पोहोचते करण्याची दक्षता घ्यावी.

कृपया खालील बाबींची नोंद घ्यावी:-

(१) वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार आपण आपले घोषणापत्र साक्षांकित करुन घेण्यास अथवा प्रमाणित करुन घेण्यास असमर्थ ठरल्यास तुमची मतपत्रिका रद्द करण्यात येईल.

(२) दिनांक---------- रोजी --------- वेळेनंतर व त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पोचणाऱ्या पाकिटातील मतांची मतमोजणी करण्यात येणार नाही.

सही/-

(य.ल.राजवाडे)

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

D:\ETD\Ballot paper\doc\bcentre

४२५ ३७ २३.३८

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक महत्त्वाचे

क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.५/का-१०,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २६ एप्रिल, २००१.

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
आयुक्त,महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई शहर व उपनगर वगळून)

विषय:- पोस्टल बॅलट ऑर्डर- २००१
आदेशाचा मराठीमध्ये अनुवाद

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाकडील दिनांक २ फेब्रुवारी, २००१ चे समक्रमांकाचे पत्र व त्यासोबतचे दिनांक- १६ जानेवारी, २००१ चे राजपत्र

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या मतदानाचा अधिकार बजावता यावा, यादृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने पोस्टल बॅलट ऑर्डर, २००१ हे आदेश पारित केले असून, ते दिनांक- १६ जानेवारी, २००१च्या राजपत्रात प्रसिध्द झाले आहेत. त्याची प्रत सर्व संबंधितांना संदर्भाधीन दिनांक- २ फेब्रुवारी, २००१ च्या पत्रासोबत पाठविण्यात आली आहे. क्षेत्रीय अधिका-यांकडून सदर आदेशाचा मराठी अनुवाद उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात येत होती. त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने सदर आदेशाचा मराठीमध्ये अनुवाद केला असून, तो सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर आदेश कृपया सर्व संबंधितांच्या नजरेस आणावेत व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सदर आदेशांची अंमलबजावणी होईल, याची कृपया दक्षता घ्यावी.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

(बी. जी. वीर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

७९३

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.५/का-१०,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १७ जानेवारी, २००२.

प्रति,
आयुक्त,
महानगरपालिका (सर्व)
(बृहन्मुंबई वगळून)

जिल्हाधिकारी(सर्व)
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- टपाली मतपत्रिका आदेश- २००१
संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाकडील समक्रमांकाचे
दिनांक- १६/१/२००१ चे आदेश

महोदय,

संदर्भाधीन आदेशाद्वारे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या निवडणुकांमध्ये टपालाद्वारे मतदान नोंदविण्याची पध्दती विहित करण्यासंबंधातील आदेश काढण्यात आले आहेत.

२. सदर आदेशाच्या नियम क्रमांक-४ मध्ये टपाली मतपत्रिकेचा नमुना कसा असावा, याबद्दल सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार टपाली मतपत्रिका ही निवडणुकीत वापरल्या जाणा-या मतपत्रिकेसारखीच असेल. तथापि, सदर मतपत्रिकेवर अगदी वरच्या बाजूस "टपाली मतपत्रिका" (Postal Ballot Paper) असे छापलेले असेल, असे नमूद करण्यात आले आहे.

३. काही महानगरपालिका तसेच जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून झालेल्या विचारणेच्या अनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, पोस्टल बॅलेट पेपरवर फक्त उमेदवारांची नांवे छापण्यात यावीत, त्यांच्यासमोर त्यांचे चिन्ह व चिन्हाचे नांव छापण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भात विधानसभा/लोकसभा निवडणुकीसाठी ज्याप्रमाणे फक्त उमेदवारांची नांवे मतपत्रिकेवर छापण्यात येते, तशा मतपत्रिका छापण्यात याव्यात.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

(वी. जी. वीर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

एएबी/२०१

७६५

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- एसईसी/एमसी-२००३/प्र.क्र.७० /का.१०
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० सप्टेंबर, २००३

प्रति,
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी, (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यावरील माहिती राज्य निवडणूक आयोगास कळविणेबाबत..

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए मधील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थावर निवडून आलेल्या सदस्यांची मुदत संपण्यापूर्वी तसेच नवीन स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन झाल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत सार्वत्रिक निवडणूका घेण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रम देण्यात येतो. तसेच कोणत्याही कारणामुळे रिक्त झालेल्या जागेसंबंधी पोटनिवडणूक घेण्याचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येतो. अशा निवडणूकांच्या कार्यक्रमातील प्रत्येक टप्पा कोणत्या तारखेस पूर्ण करावयाचा आहे याचा सविस्तर कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येतो व प्रत्येक टप्पा पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविण्याबाबतच्या सूचना देखील सर्व संबंधितांना देण्यात येतात. असे असूनही निवडणूकीचा टप्पा पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास काही स्थानिक स्वराज्य संस्थाकडून वेळीच प्राप्त होत नाहीत. विशेषत: मतदान व मतमोजणीचे दिवशी राज्य निवडणूक आयोगाकडे वेळोवेळी माहिती पाठविणे अपेक्षित असते ती देखील योग्यवेळी पाठविली जात नाही असे

कृ.भा.प.

निदर्शनास आले आहे. तरी या संदर्भात आयुक्त महानगरपालिका तसेच जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे दक्षता घेण्यात याव्यात असे कळविण्यात येत आहे :-

१) निवडणूकीचा प्रत्येक टप्पा पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल फॅक्सद्वारे राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी.

२) मतदान व मतगोजणीच्या दिवशी राज्य निवडणूक आयोगास माहिती पाठविण्यासाठी एका समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. तसेच सदर अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, सतत व्यस्त राहणार नाही असा दूरध्वनी व फॅक्स क्रमांक राज्य निवडणूक आयोगास कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत व सदर अधिकाऱ्याने आयोगाशी सतत संपर्कात राहून मतदान व मतमोजणी याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगास कळविणे अपेक्षित आहे. मात्र असे आढळून आले आहे की, दूरध्वनी क्रमांक व्यस्त तर राहतातच तसेच माहिती पुरविणारे संबंधित अधिकारी देखील उपलब्ध नसतात व ते आयोगाच्या संपर्कातही राहत नाहीत या बाबी टाळणे आवश्यक आहे.

३) मतदानाचे दिवशी मतदान सुरु झाल्यानंतर प्रत्येक २ तासांनी झालेल्या मतदानाची आकडेवारी (स्त्री, पुरुष, एकूण मतदान व टक्केवारी) २ तास संपल्यानंतर एका तासात उदा. ७.३० ते ९.३० या २ तासांतील आकडेवारी १०.३० पर्यंत आयोगाच्या फॅक्सवर प्राप्त होणे आवश्यक आहे, अथवा दूरध्वनीवर माहिती कळविण्याची आवश्यकता आहे.

४) मतदान सुरु असतांना अथवा पूर्ण झाल्यांनतर मतदानाच्या प्रक्रियेमध्ये अथवा निवडणूका होत असलेल्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून कोणतीही घटना घडली असल्यास त्याबाबतचा अहवाल आयोगास त्याच दिवशी तात्काळ फॅक्सद्वारे कळविण्यात यावा.

५) मतदानाचेवेळी बोगस मतदान करतांना काही व्यक्तींना अटक झाली

...3/-

असल्यास व भारतीय दंड संहितेच्या कलम १७१-डी अन्वये पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असल्यास त्याबाबतची माहिती मतदानाच्या दिवशी सायंकाळपर्यंत आयोगाकडे प्राप्त होईल अशा रितीने पाठवावा.

६) मतमोजणीच्या दिवशी मतमोजणीची प्रत्येक फेरी संपल्यानंतर व त्या फेरीचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्या फेरीमध्ये कोणकोणत्या प्रभागात कोणत्या पक्षाचे किती उमेदवार निवडून आले याची राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या पक्षनिहाय स्थितीच्या नमुन्यात माहिती पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्या फेरीमध्ये निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव, त्याचा पक्ष, मिळालेली वैध मते तसेच दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराचे नाव, त्याचा पक्ष, त्यांस मिळालेली वैध मते ही माहिती राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात आयोगास प्राप्त होणे आवश्यक आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमातील प्रत्येक टप्प्याची माहिती राज्य निवडणूक आयोगास वेळीच कळविणे आवश्यक असून सदर माहिती आयोगास कळविली जात आहे किंवा कसे याविषयीची दक्षता घेण्याची जबाबदारी आयुक्त, महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांची राहील.

आयोगाच्या या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता घेण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(चाँद गोयल)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत- १) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) विभागीय आयुक्त (सर्व)

mssest727/4

५१५

निवडणुकीत झालेल्या सर्व महत्वाच्या घटना
अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला
ताबडतोब कळविण्याबाबत...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-मनपा-२००४/प्र.क्र.३५/का-०५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १ डिसेंबर, २००४.

प रि प त्र क

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, निवडणुकीच्यावेळी होणारे गैरप्रकार किंवा सर्व महत्वाच्या घटना राज्य निवडणूक आयोगाला तात्काळ कळविल्या जात नाहीत. यामध्ये खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्राचा ताबा घेणे, मतपेटयांत जबरदस्तीने मते टाकणे, गाळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे याचा समावेश होतो. मतमोजणीच्या वेळीदेखील होणा-या सगळया घटना राज्य निवडणूक आयोगास कळविण्यात याव्यात. तसेच निवडणूक प्रक्रिया सुरु असताना घडणा-या सर्व महत्वाच्या घटना राज्य निवडणूक आयोगास कळविणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच गैरप्रकार घडल्यास त्याबाबत पोलिसांकडे तक्रारसुध्दा ताबडतोब नोंदविण्यात यावी.

अशा घटना व निवडणुकीतील गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला कळवून त्यावर राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन मागविणे ही संबधित निवडणूक निर्णय अधिकारी/जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांची जबाबदारी असेल, याची कल्पना सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांना दयावी. असे न घडल्यास निवडणूक निर्णय अधिकारी तथा अन्य कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई होईल, याची कल्पना सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व अन्य निवडणूक कर्मचारी यांना दयावी.

(नंद लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व महानगरपालिका आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

६७१

(२०४)

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २३ डिसेंबर, २००४.

आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळी ब-याचदा नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या तारखेनंतर एकच उमेदवार शिल्लक राहिल्याने उमेदवार बिनविरोध निवडून आला असे जाहीर करण्यात येते. उमेदवार अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात परंतु, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य सर्व उमेदवार अर्ज मागे घेतात. अशा वेळी तो उमेदवार इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो, ही शक्यता नाकारता येत नाही. तरी यापुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगाला त्याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा व राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यात यावे.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति:-
१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

७७३

۶۶۹۶

निवडणूकीसंबंधी गुन्हयात तातडीने आरोपपत्र दाखल करण्याबाबत

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

परिपत्रक क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र. १४/का.०५
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १२/०४/२००५

प रि प त्र क

नुकत्याच पार पडलेल्या २ महानगरपालिकांच्या, ५ नगरपरिषदांच्या व १५९२ ग्रामपंचायतींच्या निवडणूकीच्या वेळी असे स्पष्ट झाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये अतिशय चुरस असते. या चुरसीचे पर्यावसन निवडणूक विषयक गुन्हयांमध्ये बरेचदा होते. यामध्ये प्रतिस्पर्धी उमेदवारांना आणि त्यांच्या समर्थकांना धमकावणे, त्यांना मारहाण करणे, त्यांच्या प्रचार साहित्याची नासधूस करणे, असे गुन्हे असतात. नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकांमध्ये एका समर्थकांचा खून देखील झाला. ही गुन्हेगारी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे. पोलिसांनी वेळीच कार्यवाही केल्यास गुन्हेगाराला जरब बसून गुन्हयांचे प्रमाण कमी होते व निवडणूका शांततेत पार पडण्यास मदत होते.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका शांततेत पार पाडण्यासाठी व त्यामध्ये हिंसाचार होवू नये यासाठी पोलिसांनी गुन्हयाची नोंद तात्काळ घ्यावी व अशा गुन्हयांमुळे ज्या अधिनियमांचा भंग झाला असेल, उदाहरणार्थ, मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा, भारतीय दंड संहिता अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांविषयक अधिनियम व त्या खालील नियमान्वये गुन्हे नोंदवावे. तसेच निवडणूकीच्या दिवशी घडणाऱ्या गुन्हयांबाबत देखील संबंधित अधिनियमाखाली तात्काळ कारवाई करावी. या गुन्हयांमध्ये बोगस मतदान करणे, मतदाराची ओळख पटविण्यासाठी बनावट कागदपत्रांचा

वापर करणे, मतदानाच्या दिवशी गोंधळ करणे, दंगल करणे किंवा जाहिर प्रचाराचा कालावधी संपला तरी जाहिर प्रचार चालू ठेवणे इत्यादी गुन्हा नोंदविल्यानंतर शक्यतो **३ महिन्यांच्या आत** त्या गुन्हयाची चौकशी करुन, संबंधित न्यायालयात गुन्हा दाखल होईल यासाठी प्रयत्न करावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमधील हिंसाचार कमी होण्यासाठी गुन्हयाची तात्काळ दखल घेवून, पोलिसांनी त्यावर कार्यवाही करणे व गुन्हया संबंधी आरोपपत्र संबंधित न्यायालयात तातडीने दाखल होणे, ही कार्यवाही अतिशय आवश्यक आहे. अन्यथा, जर वेळेवर कार्यवाही झाली नाही तर हिंसाचाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. पोलिस महासंचालक, मुंबई
६. सर्व पोलिस महानिरिक्षक
७. सर्व पोलिस कमिशनर
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक
१२. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती
१३. राज्य निवडणूक आयोगामधील सर्व अधिकारी
१४. निवड नस्ती

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.२५/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ११ ऑगस्ट, २००५.

प रि प त्र क

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन-२००२/प्र.क्र.८५/का-५, दिनांक-१५ मार्च, २००४ अन्वये महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे घोषणापत्र विहित करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, उमेदवार प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात संपूर्ण माहिती देतातच असे नाही. कधीतरी तर चुकीची माहितीसुध्दा देण्यात येते. निवडणुका झाल्यानंतर किंवा नामनिर्देशनपत्रांचा स्वीकार झाल्यानंतर असे लक्षात आले की, त्यांनी प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात अपूर्ण माहिती अथवा चुकीची माहिती दिली आहे, त्या उमेदवाराविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम १७१जी (निवडणुकीसंदर्भात खोटी माहिती देणे), कलम १७७ (कोणत्याही प्राधिकृत अधिका-यास खोटी माहिती देणे) व कलम १८१ (शपथेवर खोटी माहिती देणे) या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात यावा.

विशेषत: गुन्हेगारी पार्श्वभूमीबद्दल जी माहिती देण्यात येते त्यामध्ये ब-याचदा असे आढळून येते की, पूर्ण माहिती दिली जात नाही किंवा माहिती लपविण्यात येते. उमेदवाराच्या नांवावर दाखल असलेले दखलपात्र गुन्हे नमूद न करण्याकडे उमेदवारांचा कल असतो. अशा बाबतीत गुन्हा न चुकता दाखल करावा.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व महानगरपालिका आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सर्व नगर परिषदा/नगर पंचायर्तीचे मुख्याधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

كما ما

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ ऑक्टोबर, २००५.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाकडे अशा तक्रारी प्राप्त होतात की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघांच्या (महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, ग्रामपंचायती यांचे प्रभाग, जिल्हा परिषदांचे मतदार गट व पंचायत समित्यांचे मतदार गण) पुनर्रचनेच्या कामात राजकीय पुढा-यांचा हस्तक्षेप होतो. तरी असा हस्तक्षेप टाळण्यासाठी व प्रभाग रचना राजकीय प्रभावाखाली होऊ नये यासाठी मतदार संघांच्या पुनर्रचनेचे काम प्रारंभिक म्हणजे प्रारुप मतदार संघ तयार करण्याचे काम गोपनीय स्वरुपात हाताळण्यात यावे. कोणत्याही राजकीय पक्षाने अथवा पुढा-याने अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्याने त्याबाबतची माहिती मागितल्यास ती देण्यात येऊ नये, अशी सूचना सर्व मतदार संघांच्या पुनर्रचनेच्या कामकाजाशी संबंधित असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात याव्यात. अशी माहिती मिळाल्यास राजकीय पुढा-यांकडून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांकडून मतदार संघांची पुनर्रचना कशी करावी यासंबंधी सूचना देण्यात येतात व त्या सूचनांचे काही वेळा पालनही होते. मतदार संघाच्या रचनेवर ब-याचदा आरक्षण अवलंबून असते विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे. कोणत्याही अधिका-याने/कर्मचा-याने अशी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्वरीत सुरु करण्यात यावी. प्रारुप मतदार संघ ज्यावेळी जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात येतात त्यावेळी सर्व संबंधितांना प्रस्तावाची माहिती होतेच.

३९८

२. माहितीच्या अधिकाराखाली कोणत्याही नागरिकांने प्रभाग रचनेची माहिती मागितल्यास अशी माहिती देण्यात येऊ नये. कारण माहितीचा अधिकार अशा बाबींना लागू होतो की, ज्यात निर्णय झाला आहे.

492

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

८८०

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. :-रानिआ/मनपा२००५/प्र.क्र.१७/का.०५
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२/०७/२०१३

विषय - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघांची पुर्नरचना.
कामकाज गोपनीयरित्या हाताळण्याबाबत...
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.५, दिनांक २४ ऑक्टोबर, २००५.

आदेश

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेचा मसूदा जाहीर करण्याअगोदरच ही प्रभाग रचना हे कामकाज हाताळणा-या व्यक्तींव्यतिरिक्त अन्य व्यक्तींना तसेच प्रसिध्दी माध्यमांना माहित होते. महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने प्रभाग रचनेबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देताना यासंदर्भात नागरीक मोठया प्रमाणावर हरकत घेताना दिसून आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मतदारसंघांच्या (महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, ग्रामपंचायती यांचे प्रभाग, जिल्हा परिषद मतदार गट व पंचायत समिती मतदार गण) पुर्नरचनेच्या कामकाजामध्ये राजकीय व्यक्तींचा हस्तक्षेप टाळण्याकरिता हे कामकाज गोपनीय स्वरुपात हाताळण्यात यावे अश्या सूचना संदर्भाधिन आदेशान्वये दिलेल्या आहेत. मात्र या आदेशांकडे दुर्लक्ष करुन प्रभागरचनेची माहिती राजकीय व्यक्ती अथवा प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी यांना देण्यात येते. मतदारसंघांची माहिती प्रसिध्द होण्यापूर्वीच राजकीय व्यक्तींना माहित झाल्यास त्यांच्याकडून सोयीची प्रभाग रचना होण्याबाबत दबाव येऊ शकतो. ब-याचदा मतदारसंघांचे आरक्षण हे प्रभागांच्या रचनेवर अवलंबून असते. आरक्षणात बदल करण्याच्या दृष्टीनेही राजकीय व्यक्तींकडून दबाव येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील परिस्थितीत पुन्हा आदेशित करण्यात येते की, मतदारसंघांची पुनर्रचना करताना हे कामकाज अत्यंत गोपनीय स्वरुपात हाताळण्यात येईल याची दक्षता घ्यावी. राज्य निवडणूक आयोगाने अथवा प्राधिकृत अधिका-याने प्रथम प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर आरक्षित प्रभाग निश्चित करण्याकरिता सोडत काढण्यात येते आणि त्याच दिवशी प्रभागांची रचना नागरीकांच्या माहितीकरिता सोडतीच्या ठिकाणी प्रथम जाहीर करण्यात येते. त्यामुळे प्रभाग रचनेच्या कामकाजास सुरुवात केल्यापासून ते सोडतीच्या वेळी प्रभाग रचना जाहीर करेपर्यंतच्या कालावधीमध्ये प्रभाग रचनेचा तपशिल अनधिकृत व्यक्तींना अथवा प्रसिध्दी माध्यमांना माहित होणार नाही याबाबत पुरेशी खबरदारी घेण्यात यावी. कोणत्याही अधिका-याने / कर्मचा-याने अशी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्वरित सुरु करण्यात यावी. या आदेशाचे पुरेपूर पालन होईल अशा सक्त सूचना प्रभाग रचनेचे काम हाताळणा-या सर्व संबंधितांना वेळोवेळी देण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(पूनम शिरसोळकर)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :
१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व नगरपरिषदा, नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६. निवड नस्ती.

E:\ATUL PEN DR VEKI STM\s Dhe.sida- dha.doc\mahana

५८७

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २ ऑगस्ट, २००६.

परिपत्रक

भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के अन्वये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली आहे. त्या अनुच्छेदांतर्गत **सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे** अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ झेडए अन्वये **सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका** घेण्याचे अधिकार **राज्य निवडणूक आयोगाला** प्राप्त आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ अन्वये भारत निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. अनुच्छेद ३२४ व अनुच्छेद २४३ के मध्ये केवळ तीन फरक आहेत व त्यातील पहिला फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाकडून राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, संसदेची दोन्ही सभागृहे व राज्य विधानमंडळे यांच्या निवडणुका घेण्यात येतात तर राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका घेण्यात येतात. दुसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. राज्य निवडणूक आयुक्तांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत अवलंबावी लागते. तिसरा फरक म्हणजे भारत निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राष्ट्रपती उपलब्ध करुन देतात. राज्य निवडणूक आयोगाला जे अधिकारी/कर्मचारी लागतात ते राज्याचे राज्यपाल उपलब्ध करुन देतात. हे तीन फरक सोडल्यास या दोन्ही अनुच्छेदांमध्ये काहीही फरक नाही.

२. भारत निवडणूक आयोगाने भारत सरकार व इतर शासन यांच्याविरुध्द १९९३ साली एक रिट याचिका दाखल केली होती. (रिट याचिका क्रमांक-६०६/१९९३) या याचिकेमध्ये भारत निवडणूक आयोगाला विधानसभा व लोकसभा निवडणुकीत जे अधिकारी व कर्मचारी निवडणुकीचे काम करीत असतात, त्यांच्याविरुध्द कामात निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत की नाही असा मुद्दा उपस्थित झाला होता. सुरुवातीला केंद्र शासनाने व इतर राज्य शासनाने अशी भूमिका घेतली होती की, निवडणुकीत काम करणारे अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार केंद्र शासनातील अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत केंद्र शासनाला व राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्याबाबतीत राज्य शासनाला आहेत. केंद्र व राज्य शासन या भूमिकेविरुध्द भारत निवडणूक आयोगाने ही रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेत दिनांक-२६ जुलै, २००० रोजी भारत निवडणूक आयोग, केंद्र शासन व इतर राज्य शासन यांच्यामध्ये एक करार झाला. हा करार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद करण्यात आला आहे. या करारान्वये भारत निवडणूक

आयोगाला निवडणुकीत काम करणारे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी जे निवडणुकीच्या कामासाठी नेमलेले असतात त्यांच्याविरुध्द पुढील कारवाई करण्याचे अधिकार आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार भारत निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तींच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिका-यास एखादा अधिकारी किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणा-या अधिका-याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत कळविण्यात येईल.

३. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नमूद केलेल्या करारात केंद्र शासन व इतर राज्यांसोबत महाराष्ट्र शासनसुध्दा पक्षकार होते व त्यांनी या कराराप्रमाणे कार्यवाही करण्याचे मान्य केले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२४ व २४३ झेडए यांच्यामध्ये निवडणुकीच्या बाबतीत फरक नसल्याने हा करार राज्य निवडणूक आयोगातर्फे घेण्यात येणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्या बाबतीतही लागू होतो. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगास पुढीलप्रमाणे अधिकार प्राप्त आहेत:-

(१) निवडणुकीसाठी नेमलेले कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांना वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा त्यांनी नेमून दिलेल्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल निलंबित करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत.

(२) कोणतेही राज्य शासनाचे अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांच्याऐवजी दुसरा योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करणे व त्या व्यक्तींच्या जागी दुस-या अधिकारी/कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली असेल त्याला त्याच्या मूळ विभागात परत पाठविणे व त्यासोबत त्यांच्या वागणुकीबद्दल योग्य तो अहवालसुध्दा पाठविणे.

(३) सक्षम प्राधिका-यास एखादा अधिकारी किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल त्याने वरिष्ठांचे आदेश न मानण्याबाबत किंवा दिलेल्या निवडणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल शिफारस करणे. अशा शिफारशीवर शिस्तभंगाची कारवाई करणा-या अधिका-याकडून तात्काळ कार्यवाही होईल आणि निवडणूक आयोगास अशी कारवाई केल्याची माहिती शिफारस केल्याच्या तारखेपासून **सहा महिन्यांच्या आंत** कळविण्यात येईल.

४. निवडणुकीचे काम प्रभाग रचनेपासून सुरु होते. निवडणुकीच्या कामात प्रभाग रचना करणे, मतदार याद्या तयार करणे, मतपत्रिका छापणे, निवडणुकीच्यावेळी मतदान यंत्र अथवा मतपेट्या तयार करणे, मतदान यंत्रे अथवा मतपेट्या सील करणे, निवडणुकीचे साहित्य विकत घेणे, त्यांचे वाटप करणे, मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष काम करणे, मतमोजणी करणे, निवडणुकीनंतर कागदपत्रे, मतपेट्या व मतदान यंत्रे हे अधिनियमातील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाच्या अनुषंगिक आदेशानुसार व्यवस्थित ठेवणे, निवडणुकीच्या सर्व कामांची सुरक्षा ठेवणे इत्यादी कामांचा समावेश होतो. या सर्व कामात सहभागी असणारे अधिकारी/कर्मचारी तसेच निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून नेमलेले अधिकारी व पोलिस अधिकारी/पोलिस कर्मचारी यांनी हलगर्जीपणा दाखविल्याबाबत किंवा वरिष्ठांचे आदेश न पाळल्याबाबत परिच्छेद-३ प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतील.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रत:-
१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
३) सर्व विभागीय आयुक्त
४) पोलिस महासंचालक, मुंबई
५) सर्व महानगरपालिका आयुक्त
६) सर्व पोलिस आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस अधिक्षक
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) सर्व गट विकास अधिकारी
११) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायती
१२) सर्व तहसिलदार
१३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

निवडणूकविषयक गुन्हे

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.१०/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १४ मार्च, २००७.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये व पोटनिवडणुकांमध्ये समाजातील निरनिराळया व्यक्तींविरुध्द अनेक प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने आचारसंहिता भंगाच्या गुन्हयांचा समावेश असतो. त्याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतदान साहित्याची नासधूस करणे, मतदान अधिकाऱ्यांशी असभ्य व्यवहार करणे, त्यांना मारहाण करणे, समाजातील वेगवेगळया घटकांमध्ये वैर पसरविणे, राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे वक्तव्य अथवा लिखाण करणे, मतदानासाठी लाच देणे, निवडणुकीत दबाव टाकणे, दुसऱ्याच्या नांवाने मतदान करणे, निवडणुकीसंदर्भात बेकायदेशीर देयके देणे, निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब न देणे, लोकांमध्ये भ्रम निर्माण होईल असे निवेदन करणे व इतर प्रकारच्या गुन्हयांचा समावेश असतो. अशा प्रकारच्या गुन्हयांबाबत पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यक्तींविरुध्द न्यायालयात दावा दाखल करण्यात यावयास हवा. परंतु, बऱ्याचदा राज्य शासनाच्या परवानगीने असा दावा किंवा नोंदविलेला गुन्हा मागे घेण्यात येतो.

२. असा दावा किंवा गुन्हा मागे घेतल्याने निवडणुकीमध्ये काहीही केले तरी चालते, असा लोकांमध्ये समज पसरु शकतो. असा समज लोकांमध्ये पसरणे म्हणजे निवडणुकीचे महत्व कमी करण्यासारखे आहे. पर्यायाने लोकशाहीची ती एक प्रकारची

थट्टाच आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए खाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाच्या या अनुच्छेदांखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्र, निष्पक्ष वातावरणात व पारदर्शीपणे पार पाडाव्यात यासाठी राज्य निवडणूक आयुक्त या नात्याने असे आदेश देत आहे की, असा दावा किंवा गुन्हा मागे घेताना राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) महासंचालक, पोलिस, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व महानगरपालिका आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस आयुक्त
९) सर्व पोलिस अधिक्षक,
१०) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
११) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

६८८

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र.३६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २० डिसेंबर, २००५.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी

विषय:- व्हिडिओ कॅसेटसची विल्हेवाट लावण्याबाबत...

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकीमध्ये आचारसंहितेचे पालन काटेकोरपणे होते की नाही हे तपासण्यासाठी उमेदवारांच्या सभा किंवा उमेदवारांच्या मिरवणुका किंवा निवडणूक निर्णय अधिका-यांच्या कार्यालयांत घडणा-या निवडणूक विषयक सर्व कार्यवाहीचेदेखील व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येते. हे व्हिडिओ चित्रीकरण केल्यानंतर त्या सर्व व्हिडिओ कॅसेटस नंतर कार्यालयांत पडून असतात. त्याची विल्हेवाट कशी लावावी असा प्रश्न काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-यांनी उपस्थित केला आहे. या व्हिडिओ कॅसेटसची विल्हेवाट लावण्याबद्दल राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे सूचना देत आहे:-

(१) व्हिडिओ कॅसेटस निवडणुका झाल्यानंतर सहा महिन्यांपर्यंत सांभाळून ठेवण्यात याव्यात.

(२) निवडणुकीनंतर सहा महिन्यांचा कालावधी पार पडल्यानंतर ज्या प्रभागाबाबत निवडणूक याचिका प्रलंबित नसेल तेथील व्हिडिओ कॅसेटस पुसून (Erase) पुन्हा उपयोगात आणवी किंवा त्याची विक्री करण्यात यावी.

(३) ज्या व्हिडिओ कॅसेटस पुसून पुन्हा वापरण्याजोग्या नसतील त्या मोडण्यात (Crushed) याव्यात.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(महेन्द्र ब. वारभुवन)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

६८९

A:\aab९०.doc

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-मनप-२००७/प्र.क्र.१८/का-५
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ७ एप्रिल, २००७.

आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रमाच्या कालावधीत विविध राजकीय पक्ष, आघाडया व निवडणूक लढविणारे उमेदवार यांच्याकडून आचारसंहितेची अंमलबजावणी योग्य रितीने करण्यात येते की नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित क्षेत्रामध्ये निवडणूकविषयक कार्यवाहीचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. अशा व्हिडिओ चित्रीकरणाच्या चित्रफितीची तपासणी किंवा चित्रफितीच्या प्रमाणित प्रतीची मागणी संबंधित उमेदवारांकडून अनेकदा होत असते. अशा मागणीसंदर्भात व्हिडिओ चित्रफितीची (सीडी) तपासणी करणे अर्जदारांना उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरविली आहेत :-

(१) संबंधित व्हिडिओ चित्रफितीच्या तपासणीसाठी लेखी अर्ज करण्यात यावा. अर्जामध्ये, ज्या निवडणुकीसंबंधी सीडी पहावयाची असेल त्या निवडणुकीच्या दिनांकासहित संपूर्ण माहिती देण्यात यावी. पडताळणीसाठी दर तासाला रुपये २५/- याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. अर्ज केल्याच्या तारखेच्या लगतच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर पडताळणी करता येईल. संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात चित्रफित तपासणीसाठी उपलब्ध असेल. जर चित्रफितीची तपासणी तात्काळ करावयाची असेल तर पडताळणी शुल्क दर तासाला रुपये ५०/- याप्रमाणे अदा करावे लागेल.

(२) व्हिडिओ चित्रीकरणाची प्रमाणित सीडी हवी असल्यास वरील १ येथे नमूद केल्याप्रमाणे अर्जात संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे व त्याकरिता अर्जाचे शुल्क रुपये २५०/- (एका चित्रफितीसाठी) एवढे असेल.

(३) अर्जदारास व्हिडिओ चित्रीकरणाच्या तपासणीसाठी/ चित्रीकरणाची चित्रफित मागण्यासाठी स्पष्ट व निश्चित कारण देणे आवश्यक असेल व अर्जदाराचा त्या व्हिडिओ चित्रीकरणाशी व्यक्तिश: संबंध कसा आहे, हे दाखविणे आवश्यक असेल.

(४) शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयीन कामकाजासाठी जर व्हिडिओ चित्रफित आवश्यक असेल व अर्जात तसे नमूद केले असेल तर त्याकरिता शुल्क आकारण्यात येणार नाही.

(५) व्हिडिओ चित्रीकरणातील कोणत्याही सत्यतेबाबत आयोग कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही. चित्रफित (सीडी) "जसे आहे तसे" या तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(६) व्हिडिओ चित्रीफितीसाठी (सीडी) प्राप्त झालेल्या अर्जांबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून सर्व संबंधित राजकीय पक्षांना आणि निवडणूक लढविलेल्या उमेदवारांना अवगत करण्यात येईल.

(७) व्हिडिओ चित्रफितीच्या तपासणीसाठी किंवा प्रमाणित प्रतीसाठी करण्यात येणाऱ्या अर्जाची, माहितीच्या अधिकारान्वये करण्यात येणाऱ्या अर्जाशी सांगड घालू नये. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ अन्वये, केवळ अशी माहिती अर्जदारांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे की जी राज्य विधी मंडळाला देण्यास नकार देता येणार नाही. परंतु, राज्य निवडणूक आयोग सांविधानिक संस्था असल्यामुळे व राज्य विधान मंडळात राज्य निवडणूक आयोगाबद्दल प्रश्न विचारले जात नाही म्हणून कामकाजासंबंधी कुठलीही माहिती राज्य विधान मंडळाला देणे आयोगावर बंधनकारक नाही. राज्य निवडणूक आयोग याला नियमानुसार तपासून जे योग्य वाटेल अशा एखादया प्रकरणाबाबतची/प्रकरणांबाबतची माहिती अर्जदाराला/अर्जदारांना पुरविण्यास नकार देऊ शकेल.

(८) चित्रफितीसाठी तसेच चित्रफितीच्या तपासणीसाठी देण्यात आलेली शुल्काची रक्कम त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वतःच्या संबंधित लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(पी. एस. मीना)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

५८५

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १० एप्रिल, २००७.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निवडणुकीच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये होणाऱ्या कार्यवाहीची माहिती आधी मिळावी यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी यांच्यावर दबाव आणण्यात येतो. काही वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विशिष्ट पक्षाला अथवा गटाला रुचेल असाच निर्णय द्यावा यासाठीही दबाव आणण्यात येतो. दबाव आणणाऱ्यांमध्ये निवडणूक लढविणारे उमेदवार, पक्षाचे पदाधिकारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, खासदार, आमदार आणि इतर वरिष्ठ पदाधिकारी यांचाही समावेश असू शकतो.

२. नामनिर्देशनपत्रांची छाननी, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया व निवडणुकीचा निकाल यावेळी तर दबाव फार जास्त असतो. तसेच प्रभाग रचना सुरु असताना प्रभाग रचना कशी होणार आहे याची माहिती आधी प्राप्त होण्यासाठीही दबाव आणण्यात येतो. अशा दबावाला बळी पडल्यास निवडणूक प्रक्रिया स्वच्छ, मोकळ्या, स्वतंत्र आणि मार्गदर्शक वातावरणात पार पडणार नाही. येथे स्पष्ट करण्यात येते की, निवडणूक कार्यात हस्तक्षेप करण्याचे कोणालाही विशेष अधिकार नाही.

३. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए खाली प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन असे आदेश देत आहे की, निवडणूक प्रक्रियेदरम्यान अथवा प्रभाग रचने काम सुरु असताना कोणत्याही व्यक्तीने किंवा प्रस्तावित उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा पक्षाच्या पदाधिकाऱ्याने अथवा आमदार, खासदार यापैकी कोणीही निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी यांचेवर दबाव आणल्यास त्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाला सत्वर द्यावी व अशा दबावाला बळी न पडता स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा.

(नन्द लाल)
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार/राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab121.doc

महानगरपालिका आणि नगरपालिका/नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांमध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाच्या मानधनाबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२००६/५१२/प्र.क्र.८९/२००६/नवि-२०
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक:-१६ जुलै,२००७

वाचा:- शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२००६/५१२/प्र.क्र.८९/२००६/नवि-२०, दिनांक १० जानेवारी,२००७.

प्रस्तावना:- उपरोक्त शासन निर्णयाअन्वये महापालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकामध्ये काम करणा-या निवडणुक निर्णय अधिकारी व सहायक निवडणुक अधिकारी यांना द्यावयाच्या मानधनाबाबत आदेश काढले आहेत. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कित्येक निवडणुक अधिकारी व सहायक निवडणुक निर्णय अधिकारी यांनी मानधनाबाबत नाराजी व्यक्त केली असून, मानधन घेण्यास नकार दिलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, राज्य शासन ज्याप्रमाणे विधानसभा निवडणुकीसाठी मानधन/परिश्रमीक/अतिकालीक भत्ता मंजूर करते त्याप्रमाणेच त्यांना मानधन देण्यात यावे. दिनांक १० जानेवारी,२००७ च्या शासन निर्णयामध्ये इतर काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाच्या परिश्रमीकाबद्दल काहीच उल्लेख केलेला नाही.

प्रत्येक जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी झालेल्या निवडणुकीमध्ये राबविलेल्या नाविन्यपूर्ण योजना/ उचललेली नवीन पावले/राबविलेले उत्कृष्ट उपक्रम, इत्यादीसह एक सविस्तर माहिती पुस्तिका सर्वांच्या माहितीसाठी ६० दिवसांत प्रकाशित करावी.

३. वरील प्रमाणपत्रे व पुस्तक जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त <u>६० दिवसांमध्ये</u> राज्य निवडणूक आयोगास सादर करावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(एस.एम.चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति :- सर्व विभागीय आयुक्त
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती

- जिल्हयाचे नाव :
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना - १ (अ)

प्रमाणपत्र

(नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता)

निवडणुकीवर झालेल्या खर्चाची सर्व देयके अदा करणे व थकबाकी नसणे

(निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त २ महिन्याच्या आत

राज्य निवडणूक आयोगास सादर करणे आवश्यक)

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त सार्वत्रिक/पोट निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी नियमाप्रमाणे एकूण रक्कम रुपये--------- एवढा खर्च (प्रति मतदार रक्कम रुपये -----) झाला आहे. हयाचा तपशील सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आहे.

२. विवरणपत्रात नमूद सर्व बाबींवर झालेला खर्च योग्य व आवश्यक असून त्याची सर्व देयके स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून अदा करण्यात आली आहेत.

३. सदर निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या खर्चाची आजरोजी कोणतीही थकबाकी नाही.

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त मार्फत), किंवा
महानगरपालिका आयुक्त

- जिल्ह्याचे नाव :
- ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना - १(ब)

प्रमाणपत्र

(ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता)

निवडणुकीवर झालेल्या खर्चाची सर्व देयके अदा करणे व थकबाकी नसणे

(निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त २ महिन्याच्या आत राज्य निवडणूक आयोगास सादर करणे आवश्यक)

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त सार्वत्रिक/पोट निवडणका निर्भय, मुक्त, पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी नियमाप्रमाणे एकूण रक्कम रुपये ---------- एवढा खर्च (प्रति मतदार रक्कम रु. ----------) झाला आहे. त्याचा तपशिल सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आहे. २. वरील खर्चाची सर्व देयके ग्रामविकास विभागाने निश्चित केलेल्या निकषाच्या अधिन राहून अदा करण्यात आली आहेत. झालेल्या खर्चाची कोणतीही थकबाकी नाही; किंवा

३. वरील खर्चापैकी एकूण रक्कम रुपये---------- ची देयके ग्रामविकास विभागाने निश्चित केलेल्या निकषामधून अदा करण्यात आली असून, आजरोजी एकूण रुपये ..... खर्चाची देयके अदा करण्याचे शिल्लक आहेत. त्यासाठी ग्रामविकास विभागाकडे पत्र क्र.---------- दि.---------- ने अतिरिक्त अनुदानाची मागणी करण्यात आली आहे.

दिनांक :

ठिकाण : जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्तांमार्फत)

झालेल्या खर्चाचा तपशिल देण्यासाठी विवरणपत्र
(उदाहरण म्हणून)

- जिल्ह्याचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना १-अ/ १-ब सोबतचे

विवरणपत्र

(स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता)

निवडणुकीवर झालेल्या खर्चाची सर्व देयके अदा करणे व थकबाकी नसणे

एकूण प्रभागांची संख्या –

एकूण मतदान केंद्रांची संख्या –

अ.क्र.	विषय			झालेला खर्च
१	**निवडणूक अधिकारी / कर्मचारी यांचे मानधन**	एकूण संख्या	दर	
	निवडणूक निर्णय अधिकारी			
	सहायक निवडणूक निर्णय अधिकारी			
	मतदान केंद्रावरील कर्मचारी			
	मतमोजणीसाठीचा कर्मचारी वृंद			
	निवडणूक कार्यालयातील कर्मचारी वृंद			
	निवडणूक निरीक्षकांचे मानधन			
	पोलिस			
२	**मतदान साहित्यावरील खर्च**			
	मतदान केंद्रावरील साहित्य (टेबल, खुर्च्या, डोली, इ.)			
	पेंडॉलवरील खर्च			
	हमालीवरील खर्च (ई.व्ही.एम.व इतर निवडणूक साहित्य ने-आण करण्यासाठी)			
	मतदान साहित्य छपाई (मतपत्रिका व इतर साहित्य)			
	संगणकीकरण व इतर साहित्यावरील खर्च			
	ई.व्ही.एम. बॅटरी			
	मार्कर पेन			

३	**वाहनांवरील खर्च (संख्या) -**	
	ई.व्ही.एम.व इतर मतदान साहित्य यांची ने-आण	
	कर्मचारी वाहतूक खर्च	
	अधिकारी यांच्या वाहनांवरील खर्च	
	पेट्रोल, डिझेल वरील खर्च	
४	**प्रशिक्षणावरील खर्च**	
	प्रशिक्षण साहित्यावरील खर्च	
	प्रशिक्षण हॉल, खुर्च्या व इतर साहित्याचे भाडे	
५	**आचारसंहिता**	
	व्हिडीओग्राफी	
	कंट्रोल रुममधील व्यवस्था	
६	**कार्यालयीन खर्च**	
	इलेक्ट्रीसीटीवरील खर्च	
	टेलिफोन बिल	
	प्रिंटर्स, पेपर, स्टेशनरी, झेरॉक्स, इ.वरील खर्च	
	निवडणूक कार्यालयासाठी भाडे तत्वावर घेतलेल्या साहित्यावरील खर्च	
	इतर कार्यालयीन खर्च (बैठकीतील चहापानाचा खर्च)	
७	**मतदान जागृती अभियानावरील खर्च**	
८	**निवडणूक कामावरील कर्मचारी / अधिकारी यांचा मृत्यु वा दुखापत झाल्यास द्यावी लागणारी भरपाई**	
९	**इतर ***	

** याव्यतिरिक्त झालेला खर्च तपशिलनिहाय सादर करावा.*

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त मार्फत)
/ महानगरपालिका आयुक्त

- जिल्हयाचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना - २

प्रमाणपत्र

उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत

(निकाल लागल्यानंतर ६० दिवसांत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे आवश्यक)

प्रमाणित करण्यात येते की, विषयांकित निवडणुकीत सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे ----उमेदवार उभे होते. त्यापैकी ---------- एकूण उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब निकाल लागल्यानंतर ३० दिवसांत विहित पध्दतीने सादर केला आहे.

२. विहित मुदतीत व विहित पध्दतीने खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या ----------(अंकात) उमेदवारांना (यादी संलग्न) निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ६० दिवसांच्या आत प्राथमिक नोटीसा जारी करण्यात आल्या आहेत.

३. या सर्व उमेदवारांविरुध्द निकाल जाहीर झाल्यापासून जास्तीत जास्त ६ महिन्याच्या आत अनर्ह करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

दिनांक :

ठिकाण : जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त

- जिल्ह्याचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना - २ सोबतचे

विवरणपत्र

(उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत)

जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगर पालिका/नगर पंचायती यासाठी स्वतंत्रपणे अहवाल सादर करणे.

*** प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभाग/निवडणूक विभाग/निर्वाचक गणनिहाय माहिती सादर करावी.**

*** * उमेदवाराच्या नाव व पक्षासहीत यादी स्वतंत्रपणे जोडावी.**

एकूण प्रभाग/निवडणूक विभाग/निर्वाचक गणांची संख्या -

अ.क्र.	प्रभाग/निवडणूक विभाग/ निर्वाचक गणाचा क्र व नाव *	निवडणूक लढविणारे एकूण उमेदवार (राजकीय पक्षनिहाय)	खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर करणाऱ्या उमेदवारांची संख्या	खर्चाचा हिशोब विहित पध्दतीने व मुदतीत सादर न करणाऱ्या उमेदवारांची संख्या (राजकीय पक्ष निहाय) * *

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त

- जिल्हयाचे नाव :
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :
- सार्वत्रिक/पोट निवडणूक:
- मतदानाचा दिनांक :
- मतमोजणीचा दिनांक :

नमुना ३

प्रमाणपत्र

आयोगास सर्व अहवाल विहित मुदतीत सादर केलेबाबत

(निकाल जाहीर झाल्यानंतर जास्तीत जास्त ६० दिवसांत राज्य निवडणूक आयोगास सादर करणे)

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त निवडणुकीची सर्व निवडणूक प्रक्रिया निर्भय व मुक्त वातावरणात योग्यरितीने पूर्ण झाली असून राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.२०/का.७, दि.२४/१०/२०१६ अन्वये निश्चित केलेले सर्व अहवाल विहित मुदतीत आयोगाकडे पाठविले आहेत. त्यामधील माहिती योग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे.

तसेच माहिती पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे.

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/गनपा-२०१५/प्र.क्र.१/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
नादम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १६/१२/२०१६

प्रति,

सचिव (२),
नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ :- १. शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्र.एमसीओ-२०१६/प्र.क्र.४६/ नवि-१४, दि.२८/०३/२०१६
२. शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.ग्रापंनि-२०१४/प्र.क्र.१५९/पंरा-२, दिनांक ०४/०८/२०१६

महोदय/महोदया,

नगरविकास विभागाच्या संदर्भांकित दिनांक २८/०३/२०१६ च्या शासन परिपत्रकान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने सहा महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्दबातल झाली असल्याबाबतचे औपचारिक आदेश नगरविकास विभागाकडून निर्गमित करण्यात येतील अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. ग्रामविकास विभागाच्या संदर्भांकित दि.०४/०८/२०१६ च्या शासन निर्णयामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर निवडून आलेल्या सदस्याने सहा महिन्याच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्दबातल झाली असल्याबाबतचे औपचारिक आदेश जिल्हाधिकारी यांच्याकडून निर्गमित करण्यात येतील असे नमूद करण्यात आले आहे.

३. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या रिट याचिका क्र.१०४७८/२०१४ (Anant H. Ulahalkar & anr. Vs. Chief Election Commissioner and ors.) मध्ये उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने दि.०९/१२/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९-ए चे अर्थविवरण करण्यासंदर्भात उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाकडे संदर्भ करण्यात आला असता त्यावर न्यायालयाने पुढीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"In the result, we hold that the time limit of six months prescribed in the two provisos to Section 9A of the said Act, within which an elected person is required to produce the Validity Certificate from the Scrutiny Committee is mandatory.

Further, in terms of second proviso to Section 9A if a person fails to produce Validity Certificate within a period of six months from the date on which he is elected, his election shall be deemed to have been terminated retrospectively and he shall be disqualified for being a Councillor.

Such retrospective termination of his election and disqualification for being a Councillor would be automatic and validation of his caste claim after the stipulated period would not result in restoration of his election.

४. वरील परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या सदस्याने विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा सदस्याची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याबाबतचे औपचारिक आदेश तात्काळ निर्गमित करण्यात यावेत असे आपणास मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :- सर्व विभागीय आयुक्त
सर्व महानगरपालिका आयुक्त
कार्यासन ६, ७ व ८, राज्य निवडणूक आयोग

D:\MRC\Election Work\Letters\Letter.RSR

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.६/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १८/०१/२०१७

प्रति,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून)

विषय :- बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार महानगरपालिकांच्या निवडणुका
रिट याचिका क्र.३५४/२०१७

महोदय,

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेली रिट याचिका क्र.३५४/२०१७ (महेश मिराणी वि. उल्हासनगर महानगरपालिका व इतर) निकाली काढताना त्यामध्ये दि.१२/०१/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार मतदान करण्यासंदर्भात मतदारांना मतदानाची पध्दत, त्या अनुषंगाने संपूर्ण वस्तुस्थिती लक्षात आणून देण्याकरिता स्थानिक वृत्तपत्रांमधून किमान दोनवेळा प्रसिध्दी देण्याचे आदेश दिलेले आहेत. यासंदर्भातील आयोगाच्या वकीलांच्या दि.१३/०१/२०१७ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. उपरोक्त आदेशास अनुसरुन आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी महानगरपालिकांनी किमान दोनवेळा स्थानिक वृत्तपत्रांमधून जाहीरात देऊन व टीव्हीमध्ये स्ट्रीप देऊन पुढील बाबींची प्रसिध्दी द्यावी.

(i) बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदारांनी चार अथवा काही प्रभागांमध्ये तीन किंवा पाच मते कशाप्रकारे द्यावयाची आहेत.

(ii) प्रत्येक जागेची मतपत्रिका कोणत्या रंगाची असेल याचीही माहिती मतदारांना द्यावी.

<45

३. महानगरपालिकांनी यासंदर्भात सविस्तर माहिती देणारी व्हिडीओ क्लिप महानगरपालिकेच्या वेबसाईटवर मतदारांच्या माहितीकरिता उपलब्ध ठेवावी. तसेच याबाबत मतदारांना माहिती मिळण्याच्यादृष्टीने शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी बॅनर लावून प्रसिध्दी देण्यात यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

८५६

Shrikant B. Shetye
B.S.L., LL.B.
ADVOCATE, HIGH COURT

OFFICE : Chamber No.005AB, Ground
32, Rajabahadur Mansion,
Ambalal Doshi Marg, Near BSE
Fort, Mumbai - 400 023.
Tel. : 22 642494
Date : 13.01.2017

To,
The Secretary,
State Election Commission,
New Administrative Building,
Opp. Mantralaya, Mumbai.

Ref:- High Court, Appellate Side
Writ Petition No. 354 of 2017
Mahesh Mirani
Vs.
Ulhasnagar Municipal Corporation & Ors. ....Respondents

Respected Sir,

The abovementioned Petition was heard and disposed of by the Hon'ble Court on 12.01.2017. The challenge in the Petition was to the multimember constituency election to be held in Ulhasnagar Municipal Corporation.

It was pointed out to the Hon'ble Court that the similar challenge was turned down by Hon'ble Court in group of Petitions vide order dated 19.12.2011 passed by this Hon'ble Court (Coram:- Hon'ble S. A. Bobde and Hon'ble Smt. V. K. Tahilramani, JJ.) in Writ Petition No. 10354 of 2011 & Writ Petition No. 7567 of 2011.

Since the grievance was made by the Petitioner in this Petition that since the pattern of election has been changed it may create confusion in respect of pattern of voting in the mind of public at large. Considering the arguments advanced by the Petitioner, the Hon'ble Court, while disposing of the Petition has expressed that

since the pattern of election and voting has been change it will be appropriate to apprise the voters at large as to how the pattern of the voting would be ensuing corporation election. The Hon'ble Court has further expressed that the election Commission would take appropriate steps to make the voters aware of all relevant fact by giving vide publicity at least twice before the polling in local news paper.

The copy of the order would be forwarded to your office as the same is made available.

This is for your information and necessary action.

Thanking you.

Yours truly,

Sachindra B. Shetye
Advocate, High Court.

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ जानेवारी, २०१७.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय:- मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल झालेली जनहित याचिका क्रमांक-७८/२०१४, इंद्रधनु विरुध्द भारत सरकार व इतर.
संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.९/ प्रकल्प कक्ष, दिनांक २७/५/२०१५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील ॲड जे. बी कासट यांनी आयोगास पाठविलेले दिनांक १४/१/२०१७ चे पत्र व उच्च न्यायालयाने उपरोक्त याचिकेमध्ये दिनांक १२/१/२०१७ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. सदर याचिकेची पुढील सुनावणी दिनांक २/२/२०१७ रोजी होणार असून, त्यावेळी दिव्यांग मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा याहष्टीने मतदान केंद्रावर रॅम्प व हॅण्ड रेल्स यासारख्या कोणत्या सुविधा पुरविण्यात येतील, याबाबत आयोगाच्या वतीने भूमिका मांडावयाची आहे.

२. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकित अनुक्रमांक-१ येथे दिनांक २७/५/२०१५ च्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. सदर पत्रातील परिच्छेद-३(x)(a) व (b) मध्ये पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत :-

(a) मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावर ठेवावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असेल तर तेथे लिफ्टची सोय असावी वा मानवी डोलीची व्यवस्था करावी.

८५९

(b) मतदान केंद्रावर वृध्द/अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी.

३. राज्य निवडणूक आयोगाने माहे फेब्रुवारी-२०१७ मध्ये होणाऱ्या १० महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम दिनांक ११/१/२०१७ रोजी जाहीर केलेला आहे. तरी या निवडणुकांमध्ये दिव्यांग व्यक्तींना मतदानाचा हक्क सुलभ रितीने बजावता यावा यासाठी आवश्यक त्या सुविधा निश्चितपणे पुरविण्यात येतील याची कृपया दक्षता घेण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत:-
सर्व विभागीय आयुक्त

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २३/क.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,

विषय :- बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदान प्रतिनिधी नियुक्त करणेबाबत..

महोदय,

बहुसदस्यिय प्रभाग पध्दतीमध्ये प्रभागामधून साधारणपणे ४ उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत. त्यामुळे प्रभागामध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या जास्त राहील. परिणामी मतदान केंद्रावरील मतदान प्रतिनिधींच्या संख्येतही वाढ होईल. मान्यताप्राप्त राजकीय पक्ष तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले इतर राजकीय पक्ष यांनी प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांवर उमेदवार उभे केले असल्यास त्यांच्यावतीने एकाच मतदान प्रतिनिधीची नेमणूक केल्यास मतदान केंद्रावरील गर्दी कमी होऊ शकते. या अनुषंगाने काही महानगरपालिकांनी मार्गदर्शन मागितले आहे.

२. वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन मतदान प्रतिनिधी नेमताना प्रभागातील एका पक्षाच्या उमेदवारांच्यावतीने शक्यतो एका मतदान केंद्रावर एकच मतदान प्रतिनिधी नियुक्त करावा असे आवाहन उमेदवारांना करण्यात यावे. पक्षाच्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त प्रतिनिधी नियुक्त करण्याचा आग्रह धरल्यास एकावेळी त्या पक्षांच्या उमेदवारांचा एक प्रतिनिधी मतदान केंद्रात थांबेल व इतर प्रतिनिधी आळीपाळीने मतदान केंद्रामध्ये उपस्थित राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का.७,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १८/०२/२०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- दिव्यांग व्यक्तींना मतदान करता येणे शक्य व्हावे यासाठी मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत...

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/०५/२०१५.
२. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७२का.७, दिनांक २५/०१/२०१७.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भांकित अनुक्रमांक १ येथील दि.२७/०५/२०१५ च्या पत्रान्वये मतदान केंद्र निश्चितीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर पत्रातील परिच्छेद ३(x)(a) व (b) मध्ये पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(a) मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावर ठेवावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असेल तर तेथे लिफ्टची सोय असावी वा मानवी डोलीची व्यवस्था करावी.

(b) मतदान केंद्रावर वृध्द / अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी सोय नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी.

२. राज्य निवडणूक आयोगाने माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये होणाऱ्या १० महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम दि.११/०१/२०१७ रोजी जाहीर

केलेला आहे. या निवडणुकांमध्ये दिव्यांग व्यक्तींना मतदानाचा हक्क सुलभरितीने बजावता यावा यासाठी आवश्यक त्या सुविधा निश्चितपणे पुरविण्यात येतील याची दक्षता घेण्यात यावी असे आपणास आयोगाच्या संदर्भांकित अनुक्रमांक २ येथील पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

३. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र.७८/२०१४ मध्ये दि.०९/०२/२०१७ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. सदर आदेशामध्ये असे निर्देश देण्यात आले आहेत की, आयोगाच्या दि.२५/०१/२०१७ च्या पत्रात नमूद केलेल्या सुविधा सर्व मतदान केंद्रांवर परिणामकारकरित्या पुरविल्या जातील याची निवडणूक आयुक्तांनी खात्री करुन घ्यावी. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे सुविधा पुरविल्या न गेल्यास निवडणूक आयुक्तांविरुध्द न्यायालय योग्य ती कारवाई करेल असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

४. वरील परिस्थितीत आयोगाच्या दि.२५/०१/२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना तात्काळ देण्यात याव्यात. तसेच यामध्ये काही त्रुटी राहिल्यास त्यासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल ही बाबदेखील त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी ही विनंती.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH AT NAGPUR

P.I.L. NO.78 OF 2014

["Indradhanu" the non-Governmental Organization and others .vs. The Union of India and others]

Office Notes, Office Memoranda of Coram, appearances, Court's orders of directions and Registrar's orders	Court's or Judge's orders

Shri A.J. Gilda, Advocate for the petitioners,
Shri A.M. Joshi, Advocate for respondent nos.1, 2, 11 and 14,
Shri D.P. Thakre, Additional Government Pleader for respondent nos.5, 6, 12 and 13,
Shri J.B. Kasat, Advocate for respondent no.7.

.....

CORAM : B.R. GAVAI AND
KUM. INDIRA JAIN, JJ.

DATED : FEBRUARY 09, 2017.

In pursuance to our order dated 12.1.2017, pursis is filed on behalf of the Election Commissioner. Along with pursis, communication dated 25.1.2017 addressed to all the Collectors and the Municipal Commissioner has been annexed. The perusal of the said communication would reveal that directions have been issued to the Election Commissioner to provide facilities for different persons.

Shri Anup Gilda, the learned counsel for the petitioners, submits that though such circulars are issued, they are not followed.

We, therefore, direct the Election Commissioner to ensure that the facilities as provided in the communication dated 25.1.2017 are effectively provided by everybody.

KEY

Bombay High Court

We make it clear that in event the facilities as stipulated in the communication dated 25.1.2017 are not provided, this court may take such action against Election Commissioner as is found appropriate.

Stand over to 10.2.2017.

JUDGE JUDGE

Gulande, PA

Bombay High Court

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २९/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २९/०३/२०१७.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका.
मतदान केंद्राच्या ठिकाणी जमा झालेला कचरा उचलण्याबाबत...

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदान केंद्र म्हणून विविध शैक्षणिक संस्था, इ. ताब्यात घेण्यात येतात. अशा वास्तूंच्या ठिकाणी निवडणुकीसाठी मतदानाच्या कालावधीत बराच कचरा जमा होतो. मात्र सदर कचऱ्याची विल्हेवाट न लावता मतदान केंद्राचा ताबा सोडण्यात येतो.

मतदान केंद्राच्या ठिकाणी जमा झालेल्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावून त्यानंतरच त्या वास्तूचा ताबा संबंधित संस्थेला / कार्यालयाला परत देण्याच्या दृष्टीने संबंधित महानगरपालिका / जिल्हाधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

१. मतदान केंद्राच्या ठिकाणी जमा होणारा कचरा गोळा करण्याकरिता त्या संस्थेकडे योग्य त्या प्रमाणात डस्टबीनची सुविधा नसल्यास योग्य त्या प्रमाणात डस्टबीन अथवा डस्ट बॅग यांचा पुरवठा करण्यात यावा.

२. प्रत्येक मतदान केंद्राच्या खोलीमधील कचरा त्या केंद्रावरील शिपायामार्फत डस्टबीन / डस्ट बॅगमध्ये टाकणे आवश्यक राहील.

३. मतदान केंद्राच्या इमारतीमधील स्वच्छता करण्याकरिता योग्य त्या प्रमाणामध्ये स्वच्छता कामगारांच्या सेवा उपलब्ध कराव्यात.

४. मतदान केंद्राचा ताबा सोडण्यापूर्वी सर्व कचरा उचलून त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्याद्दष्टीने योग्य ती सर्व उपाययोजना करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि.ज.वागळे)
अवर सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ/नप-२०१७/प्र.क्र.२/का.६,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२/०६/२०१७.

विषय :- राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायत/जिल्हा परिषद/ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे कामकाज करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना मानधन/अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबत...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लोकसभा / विधानसभाप्रमाणे निर्भय, पारदर्शक वातावरणामध्ये व्हाव्यात याकरिता भारतीय घटनेमध्ये सन १९९२ साली दुरुस्ती करण्यात आली असून, प्रत्येक राज्यामध्ये एका स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्यामार्फत दर ५ वर्षांनी २८००० पेक्षा जास्त स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २,५०,००० लाखापेक्षा जास्त लोकप्रतिनिधी निवडून दिले जातात. या निवडणूकीची सर्व प्रक्रिया जवळजवळ लोकसभा/विधानसभेप्रमाणे असल्यामुळे, निवडणूकीमध्ये काम करणारे अधिकारी/ कर्मचारी यांना केलेल्या कामाचे मानधन व अतिकालिक भत्ता देणे आवश्यक आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, ब-याचदा ह्या अधिकारी / कर्मचारी यांना मानधन/ अतिकालिक भत्ते वेळेवर दिले जात नाहीत.

३. राज्यामध्ये नोव्हेंबर,२०१६ ते मे,२०१७ या कालावधीत खाली दर्शविल्याप्रमाणे मोठया प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात आल्या आहेत-

अ.क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	एकूण जिल्हे	एकूण स्थानिक स्वराज्य संस्था
i	नगरपरिषदा / नगरपंचायती	३३	२१४
ii	जिल्हा परिषदा / पंचायत समित्या	२५	२५ / २८४
iii	महानगरपालिका	१३	१६

४. या निवडणूकीत काम केलेल्या काही अधिकारी/ कर्मचारी यांना मानधन/ अतिकालिक भत्त्याचे वाटप झाले आहे. मात्र काही ठिकाणी तसे झाल्याचे दिसून येत नाही. तसेच मानधन/ अतिकालिक भत्ता दराबाबत काही महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या मनामध्ये साशंकता आहे. या विषयावर अभ्यास केल्यावर खालील प्रकारचे अधिकारी / कर्मचा-यांबाबत आदेश निर्गमित केल्याचे आढळून येत आहे:

अ.क्र.	तपशील	महानगरपालिका	न.प./ नगरपंचायत	जि.प./पं.स.
i	मतदान /मतमोजणी (प्रत्यक्ष)	रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२	रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२	रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२
ii	निवडणूक निर्णय अधिकारी/ सहा.निव.निर्णय अधिकारी	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	ग्रामविकास विभाग, दि.३१/०३/२०१२
iii	अराजपत्रित कर्मचारी अतिकालिक भत्ता	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	ग्रामविकास विभाग, दि.२४/०३/२०१७
iv	राजपत्रित - मानधन	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	ग्राम विकास विभाग, दि.३१/०३/२०१२

५. मानधन/ अतिकालिक भत्ता देण्याच्या पध्दतीत सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने व संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा विचार करुन राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

६. नोव्हेंबर १६ ते मे, २०१७ या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये (महानगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत/जिल्हा परिषद/ पंचायत समिती) काम करणा-या अधिकारी/ कर्मचारी यांना निवडणूकीच्या वेळी त्यांच्या वेतनावर आधारित खालील तक्त्यातील आदेशाप्रमाणे मानधन/ अतिकालिक भत्ता अनुज्ञेय राहील:

अ. क्र.	तपशील	महानगरपालिका	नगर परिषद/ नगरपंचायत	जिल्हा परिषद/ पंचायत समिती	सार्वत्रिक किंवा पोट निवडणूक दोन्हीकरिता
१	मतदान/मतमोजणी (प्रत्यक्ष)	रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२	रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२	रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२	
२	निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	ग्रामविकास विभाग, दि.३१/०३/२०१२	दोन्हीकरिता
३	अराजपत्रित	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	ग्रामविकास विभाग, दि.२४/०३/२०१६	फक्त सार्वत्रिककरिता
४	राजपत्रित - मानधन	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७	ग्राम विकास विभाग, दि.३१/०३/२०१२	फक्त सार्वत्रिककरिता

७. i) राज्य निवडणूक आयोग किंवा राज्य शासनाने या विषयावर (वरील तक्त्याशिवाय) जर इतर काही आदेश पारित केले असतील तर जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्तांनी तसे त्वरित राज्य निवडणूक आयोगाच्या नजरेस आणावे.

ii) जर एखाद्या अधिकारी/ कर्मचारी यांना परिच्छेद ७ (i) प्रमाणे वरील तक्त्यापेक्षा (परिच्छेद ६)जास्त मानधन/ अतिकालिक भत्ता अदा करण्यात आला असेल तर त्याची वसूली करण्यात येऊ नये. मात्र जर कमी मानधन/ अतिकालिक भत्ता देण्यात आला असेल तर अनुज्ञेय अधिकचे मानधन/ अतिकालिक भत्ता (परिच्छेद क्र.६) प्रमाणे देण्यात यावा.

८. i) वरील निवडणूकीमध्ये प्रत्यक्ष काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येक निवडणूकीसाठी स्वतंत्र मानधन/अतिकालिक भत्ता देण्यात यावा. (वरील तक्त्याचा १ व २ प्रमाणे मतदान प्रक्रिया / मतमोजणी, निवडणूक निर्णय अधिकारी/सहाय्यक निवडणूक अधिकारी)

ii) मात्र प्रत्यक्ष रुपात्त काम न करता, ज्या जिल्ह्यात दोन्ही सार्वत्रिक निवडणूकीत (नगरपरिषदा/ नगरपंचायत व जिल्हापरिषदा/ पंचायत समिती) पर्यवेक्षकीय पध्दतीने ज्या अधिकारी/कर्मचा-यांनी (वरील तक्त्याच्या ३ व ४ प्रमाणे अराजपत्रित / राजपत्रित अधिकारी / कर्मचारी) काम केले असेल त्यांना दोन्ही सार्वत्रिक निवडणूकीसाठी वेगवेगळे मानधन/अतिकालिक भत्ता अदा न करता एकदाच भत्ता देण्यात यावा.

९. मुख्य निवडणूक निरीक्षक/ निवडणूक निरीक्षक/सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांना मानधन:-

वरील निवडणूकीत खाली तक्त्याप्रमाणे ज्या अधिका-यांनी मुख्य निवडणूक निरीक्षक/निवडणूक निरीक्षक, आयकर निरीक्षक, सहाय्यक निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून काम केलेले असेल त्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे एकरकमी मानधन देण्यात यावे.

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	मुख्य निवडणूक निरीक्षक (रु.२०,०००/)	निवडणूक निरीक्षक (रु.१५,०००/)	आयकर निरीक्षक (रु.१५,०००/)	सहाय्यक निवडणूक खर्च निरीक्षक (रु.७५००/)
०१	०२	०३	०४	०५	०६
०१	महानगर पालिका	वरिष्ठ सचिव	अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी	आयकर अधिकारी	विक्रीकर अधिकारी
०२	नगर परिषद/ नगर पंचायत	मुख्य कार्यकारी अधिकारी	अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी	-	-
०३	जिल्हा परिषद / पंचायत समिती	मुख्य कार्यकारी अधिकारी	अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी	-	-

१०. वरील बाबींवर होणारा सर्व खर्च महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अदा करावे.

अ.क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	जबाबदार अधिकारी	निधीचा स्रोत
०१	महानगरपालिका	महानगरपालिका आयुक्त	महानगरपालिकेचा निधी
०२	नगर परिषद / नगर पंचायत	जिल्हाधिकारी	नगर परिषद / नगर पंचायतीचा निधी
०३	जिल्हा परिषदा/पंचायत समिती	जिल्हाधिकारी	शासनाने उपलब्ध करुन दिलेले अनुदान

११. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या गृह विभागाने मुंबई पोलिस कायदा, १९५१ मधील तरतुदीनुसार विशेष पोलिस अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यास अशा विशेष पोलिस अधिकाऱ्यांना मानधन मंजूर करण्यासंदर्भातील आदेश गृह विभागाने निर्गमित करावेत व त्यासाठी आवश्यक तो निधीही त्या विभागानेच उपलब्ध करुन द्यावा.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक, मुंबई.
५. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक, मुंबई
६. सर्व कार्यासने, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई
७. निवडनस्ती, कार्यासन ६, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र. रानिआ/मनपा २०१७/प्र.क्र. १२/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ५ जुलै, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका
निवडणुकीकरिता क्रीडा संकुलाच्या वापराबाबत...

महोदय,

मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे जनहित याचिका क्रमांक १२/२०१७ दाखल झाली होती. या याचिकेमध्ये क्रीडा संकुले ही नागरिकांच्या उपयोगासाठी असून, त्यांचा वापर निवडणुकीच्या कामासाठी करण्यात येऊ नये, असा मुद्दा मांडण्यात आला होता.

२. मा. उच्च न्यायालयाने दिनांक ७ जून, २०१७ रोजी सदर याचिका निकाली काढताना पुढील आशयाचे मत नोंदविले आहे.

निवडणुकीच्या कामकाजाच्यादृष्टीने क्रीडा संकुलांव्यतिरिक्त अन्य सोईस्कर जागा उपलब्ध आहे किंवा कसे, याची खात्री करावी. त्यानुसार जर अन्य जागा उपलब्ध नसेल तर निवडणुकीकरिता क्रीडा संकुलांचा वापर करणे हा अंतिम पर्याय राहील. मात्र, क्रीडा संकुले खराब होणार नाहीत, तसेच खेळाडूंच्या सरावामध्ये मोठा खंड पडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर आदेशाची प्रत सोबत कार्यवाहीकरिता सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,
(नि. ज. बागले)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

८६५

Order

070apil12.17

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH, NAGPUR.

PUBLIC INTEREST LITIGATION NO. 12/2017.
Parag Chandrashekhar Chimote
-VERSUS-
Election Commissioner, State of Maharashtra and others.

Office notes, Office Memoranda of Coram, appearances, Court's orders or directions and Registrar's orders.	Court's or Judge's Orders

CORAM : B. P. DHARMADHIKARI AND R.B. DEO, JJ.

DATE : JUNE 07, 2017.

Heard Shri S.G. Joshi, learned counsel for petitioner, Shri J.B. Kasat, learned Counsel for respondent nos.1 and 4 and Shri D.P. Thakare, learned A.G.P. for respondent nos.2 and 3 for some time.

2. Learned counsel for petitioner submits that fortunately on this occasion, when the Sports Complex was used for the purpose of counting after elections, no damage has been caused to the sports facilities or ground. He further makes a grievance that for about 2 months the complex could not be used by players.

3. According to him other alternatives like Bahat Bhavan, Nemani Godown and other open grounds were available and could have been used by

::: Uploaded on - 09/06/2017 ::: Downloaded on - 24/06/2017 17:30:54 :::

avoiding sports complex.

4. Learned counsel for respondents submit that sports complex was chosen after due application of mind. Learned counsel for respondent nos.1 and 4 submits that alternative place suggested by the petitioner were not convenient.

5. We do not wish to go into any disputed questions at this stage. Whenever occasion to use the sports complex again for such purpose arise, the Authorities shall first ascertain as to why other alternatives are not convenient. If the other alternatives are not feasible/convenient, then only they can think of using the sports complex. However, at that juncture full precaution should be taken to avoid any damage to the facilities and also to ensure user for a minimum period.

6. If the petitioner feels aggrieved after such a decision or any other cause arises, we grant leave to petitioner to approach this Court again. With these directions, we dispose of the present Public Interest Litigation. No costs.

JUDGE JUDGE

Rgd.

::: Uploaded on - 09/06/2017 ::: Downloaded on - 24/06/2017 17:30:54 :::

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल झालेली जनहित याचिका क्र. ७८/२०१७ इंद्रधनु विरुध्द भारत सरकार व इतर.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दि. २७/५/२०१५
२) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाची दि. २५/१/२०१७ व १८/२/२०१७ ची पत्र.
३) मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने जनहित याचिका क्र. ७८/२०१४ मध्ये दि. १३/९/२०१७ रोजी दिलेले आदेश. (प्रत सलग्न)

महोदय / महोदया,

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकीत पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी मतदान केंद्रावर उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधांबाबत सविस्तर सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र. ७८/२०१४ मध्ये दि. १३/९/२०१७ रोजी दिलेल्या आदेशान्वये या पुढील काळात होणाऱ्या निवडणुकांमध्ये मतदान केंद्रांची निश्चिती करताना: पुरेशी काळजी घ्यावी तसेच मतदान केंद्रावर लाकडी रॅम्प, व्हिलचेअर इ. सुविधा पुरविण्यात याव्यात असे आदेश दिलेले आहे. तरी या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील याची कृपया दक्षता घेण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\MAHALS\Wagale\इंद्रधनु याचिका.docx

To be Returned to this Court
immediately after compliance.

Civil C-II – 19009/2017
Nagpur, Dated : 03/11/2017

Directive Writ
E.F. 14/02/2018

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY,
NAGPUR BENCH, NAGPUR

PUBLIC INTEREST LITIGATION NO. 78 OF 2014.

"Indradhanu" the non-Governmental Organization through its Secretary Manohar Govind Urkude Nagpur and Another ... PETITIONERS

VERSUS

The Union of India through its Principal Secretary, Department of Urban Development, New Delhi and Others ...RESPONDENTS

To,

R – 1) The Union of India through its Principal Secretary, Department of Urban Development, Central Government, New Delhi.
R – 2) The Union of India through its Secretary, Department of Social Justice and Empowerment, Central Government, New Delhi.
R – 3) The Chief Commissioner of Disabilities, Sarojini House, 6, Bhagwan Dass Road, New Delhi – 1.
R – 4) The Indian Institute of Architects, through its Chairman, Nagpur Centre, Sriram Towers, Station Road, Nagpur.
R – 5) The State of Maharashtra through its Principal Secretary, Urban Development Department, Mantralaya, Mumbai – 400 032.
R – 6) The Public Works Department, through Chief Engineer, Nagpur.
R – 7) The Nagpur Municipal Corporation (NMC), through the Municipal Commissioner, Civil Lines, Nagpur.
R – 8) The Nagpur Improvement Trust (NIT) Nagpur through its Chairman, Station Road, Civil Lines, Nagpur.
R – 9) The Maharashtra State Road Development Corporation through its Chairman, Nepeansee Road, Mumbai.
R – 10) The Maharashtra State Road Transport Corporation, through its Chairman, "M.V. Bhavan", Mumbai.
R – 11) The Central Public Works Department, through Superintending Engineer, CGO Complex, Seminary Hills, Nagpur.
R – 12) The Commissioner of Police, Nagpur Division, Nagpur.
R – 13) The Collector, Nagpur Division, Nagpur.
R – 14) The Post Master General, Nagpur Region, Nagpur.
R – 15) The Election Commissioner, State of Maharashtra, Mumbai.

Whereas the above matter was listed before this Court on 13/09/2017. And upon hearing Shri Annop J. Gilda, learned counsel for the Petitioners, Shri D.P.Thakre, learned Additional Government Pleader for respondent nos. 5, 6, 12 and 13, Shri J.B.Kasat, learned counsel for respondent no. 7 and Shri S.M.Puranik, learned counsel for respondent no. 8 NIT. Ms. Bhagyashree Reddy, learned counsel h/f Shri V.H.Kedar, Advocate appeared for respondent no. 10.

The Court passes the following order :

CORAM : B.P.DHARMADHIKARI & ARUN D. UPADHYE, JJ.
DATED : 13/09/2017.


(Xerox copy of the Court's order dt. **13/09/2017** is enclosed herewith)

It is hereby accordingly ordered that the above Court's order be carried out & complied with scrupulously.

Witness DR. MANJULA CHELLUR, Chief Justice at Bombay, aforesaid this 13/09/2017.

By the Court,

14/11/17
Assistant Registrar
High Court of Bombay
Nagpur Bench, Nagpur



12/11/15/15)

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
: NAGPUR BENCH : NAGPUR.

PUBLIC INTEREST LITIGATION NO. 78 OF 2014

"INDRADHANU", THE N.G.O., NAGPR THRU, ITS SECRETARY AND ANOTHER

VERSUS

THE UNION OF INDIA, THRU. ITS PRI. SECY., DEPTT. OF URBAN DEVPT. AND OTHERS

Office Notes, Office Memoranda of Coram, appearances, Court's Orders or directions and Registrar's order	Court's or Judge's Order

CORAM: B. P. DHARMADHIKARI &
ARUN D. UPADHYE, JJ.

DATED : 13th SEPTEMBER, 2017.

1. Heard Shri Anoop J. Gilda, learned counsel for the petitioners, Shri D.P.Thakre, learned Additional Government Pleader for respondent nos.5, 6, 12 and 13, Shri J.B. Kasat, learned counsel for respondent no.7 and Shri S. M. Puranik, learned counsel for respondent no.8 NIT. Ms. Bhagyashree Reddy, learned counsel h/f Shri V.H. Kedar, Advocate appeared for respondent no.10.

2. We have perused the order dated 07.3.2013 disposing of earlier Public Interest Litigation bearing P.I.L. No.42 of 2010. We find that as per DCR published on 05.4.2005, the facilities like parking, lifts, special toilets, ramps, railings, suitable place for drinking water etc. have been made compulsory. Taking note of these requirements, P.I.L. No.42 of 2010 was disposed of, about more than five years back.

Branch Copy

3. Shri Gilda, learned counsel for the petitioners submits that the position then prevailing and now obtained, has not undergone much change. He states that under the scheme with logo *"Sugamya Bharat"*, some special efforts are being taken to see that specially abled persons are not discriminated and they can use all the facilities. He points out that after 07.3.2017 till date, no development or progress in the matter has been brought on record.

4. The learned counsel appearing for the respective respondents dispute this.

5. As this is not an adversary litigation, we do not wish to go into the correctness or otherwise of the contentions. The fact shows that about 51 buildings of the State Government have been identified, which need to be made accessible. The funds are already reserved therefor, but the Central Government has pointed out that it has received proposals only in respect of 36 buildings. In relation to remaining 15 buildings, therefore, the proposals are still not received by the Central Government. Whether this submission of the Central Government is correct or then the reply thereto by the State Government is right, again cannot be of much relevance in this Public Interest Litigation. The fact remains that 15 buildings again at least, as on today, are unattended.

Private Copy

5. Learned counsel for the Nagpur Municipal Corporation and Nagpur Improvement Trust are also seeking time to bring on record the progress made after 07.3.2013.

6. When D.C.R. is of 2005 and the orders of this Court in earlier P.I.L. No. 42 of 2010 are passed on 07.3.2013, we are not in a position to digest that even today the matter has remained unattended and we hold the respondents together responsible for the state of affairs.

7. We direct all the respondents to coordinate and to see that the facilities, as required by law, are placed / provided in all buildings within next four months i.e. in any case by 31st of January, 2018.

8. During arguments, Shri Gilda, learned counsel for the petitioners also pointed out that in current elections, at several polling centers, the specially abled persons could not cast their vote as they were not in a position to reach the place. Again, though the respondents want to refute this, we find that the respondents can, while selecting the buildings as polling booths in future, take necessary precaution and provide wheel chairs, wooden ramps and attendants to help such citizens. This arrangement shall also be made available in next ensuing elections in the State of Maharashtra, wherever it is needed.

Branch Copy

9. We also direct that if, after four months, we find that the facilities have not been made so available, we hold the Head of the concerned department of State Government or Central Government or then the Municipal Commissioner or Chairman of the Nagpur Improvement Trust or other similar / equivalent officer personally responsible for violation.

10. We list the matter for further consideration on 14th of February, 2018. Steno copy granted.

JUDGE JUDGE

Diwate

True Copy
Assistant Registrar
High Court of Bombay
Nagpur Bench, Nagpur

Branch Copy

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.२५/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ जुलै, २०१८.

प्रति,
आयुक्त,
सांगली-मिरज-कुपवाड व जळगाव शहर
महानगरपालिका

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१८
आदर्श मतदान केंद्र- त्रयस्थ संस्थेद्वारे सर्व मतदान केंद्रांची तपासणी
संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकांचे दिनांक १५/०६/२०१८ चे पत्र.

महोदय,

आदर्श मतदान केंद्रासाठी कोणकोणते निकष व सुविधा आवश्यक आहेत, याची एक विस्तृत प्रश्नावली राज्य निवडणूक आयोगाच्या संमतीने तयार करावी, असे आपणास संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने दोन्ही महानगरपालिकांनी सादर केलेली प्रश्नावली विचारात घेऊन आयोगाच्या कार्यालयाकडून एक प्रश्नावली उदाहरण म्हणून तयार करण्यात आली असून ती सोबत जोडली आहे. सदर प्रश्नावलीमध्ये आवश्यक असल्यास आपण योग्य ते फेरबदल करून ती त्रयस्थ संस्थेस अहवाल तयार करण्यासाठी देण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत : वरीलप्रमाणे

आदर्श मतदान केंद्र- त्रयस्थ संस्थेद्वारे मतदान केंद्राची तपासणी करणेची प्रश्नावली.

होय/नाही

१) मतदान केंद्र असलेली इमारत कायम स्वरुपी बांधकाम असलेली आहे का ?

२) मतदान केंद्र तात्पुरत्या स्वरुपात म्हणजेच तंबू, पत्र्याचे शेड, इत्यादी स्वरुपात आहे का ?

३) मतदान केंद्रे खाजगी मालकी असलेल्या इमारतीत आहे का ?

४) मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास आजुबाजुच्या परिसरात शासकीय इमारत आहे का ?

५) मतदान केंद्र (बहुमजली इमारत असेल तर) तळमजल्यावर आहे का?

६) मतदान केंद्र प्रभागातील मध्यवर्ती ठिकाणी आहे का?

७) मतदान केंद्र वरच्या मजल्यावर असल्यास लिफ्टची व्यवस्था आहे का?

८) मतदान केंद्र असलेल्या इमारतीपर्यंत पोहचण्याचा मार्ग अरुंद (बोळीतला) आहे का ?

९) मतदान केंद्र असलेल्या इमारतीमध्ये ४ पेक्षा जास्त मतदान केंद्र स्थापन करण्यात आली आहेत का ?

१०) मतदान केंद्र असलेली इमारत परिसरातील नागरिक व मतदार यांना परिचित व सुलभरित्या शोधता येईल अशी आहे का ?

११) मतदान केंद्र असलेल्या इमारतीत किंवा १०० मीटर परिसरात धार्मिक स्थळ आहे का ?

१२) मतदान केंद्र इमारत सुस्थितीत व सर्व ऋतुंमध्ये मतदानाच्या कामकाजासाठी वापरण्यायोग्य आहे का?

१३) मतदान केंद्राच्या खोलीचे क्षेत्रफळ अंदाजे किमान २०० चौ.फूट आहे का?

१४) आत जाणे व बाहेर येणे याकरीता स्वतंत्र दरवाजे आहेत का?

१५) मतदान केंद्राच्या खोलीत विद्युत व्यवस्था कार्यान्वित आहे का ?

१६) मतदान केंद्रावर फर्स्ट एड बॉक्स (प्रथमोपचार पेटी) ची व्यवस्था आहे का ?

१७) मतदान केंद्रावर मतदारांच्या संख्येशी सुसंगत मतदान अधिकारी / कर्मचारी आहेत का ?

१८) मतदान केंद्रावर मतदान सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून पुरेसा पोलीस बंदोबस्त आहे का ?

१९) मतदान केंद्राबाहेर २०० मी. परिसरात आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्या बाबी जसे – प्रचार फलक,पक्ष कार्यालय, प्रचार कार्यालय, प्रचार चिन्ह असलेल्या वस्तू, प्रतिनिधींचे कार्यालय आहे का ?

२०) मतदान केंद्र असलेल्या खोलीत खिडकीतून मतदान केंद्राची प्रक्रिया दिसून गोपनीयतेचा भंग होत आहे का ?

२१) मतदान केंद्रात मोबाईल फोन, लॅपटॉप व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांद्वारे मतदान केंद्रातील माहिती बाहेर जाईल अशी कुठलीही कृती होत आहे का ?

२२) मतदान केंद्रावर कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट यामधील केबलमुळे मतदारांना प्रवेश व बाहेर निघण्यामध्ये अडचण / अडथळा निर्माण होत आहे का ?

२३) मतदान केंद्रावर मतदान अधिकारी व कर्मचारी यांना मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याइतपत फर्निचर (टेबल, खुर्च्या, बाकडे) उपलब्ध आहे का ?

२४) मतदान केंद्राबाहेर दर्शनी भागावर आवश्यक सूचना, फलक, उमेदवाराविषयी आयोगाने विहित करुन दिलेली माहिती यांबद्दलचे फलक लागले आहेत का ?

२५) मतदान केंद्रावर ठळक ठिकाणी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमी, इत्यादीबाबतची माहिती देणारे फ्लेक्स लावण्यात आले आहेत का?

२६) मतदान केंद्रात पुरेसा प्रकाश आहे का व मतदान केंद्र हवेशीर आहे का ?

२७) मतदान केंद्रावर अपंग मतदारांसाठी रॅम्पची व्यवस्था आहे का?

२८) मतदान केंद्र वरच्या मजल्यावर असल्यास व लिफ्टची व्यवस्था नसल्यास डोलीची व्यवस्था करण्यात आली आहे का?

२९) मतदान केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे का ?

३०) मतदान केंद्रामध्ये स्त्री व पुरुष यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची व्यवस्था आहे का?

३१) प्रसाधनगृहामध्ये वापरासाठी नळाद्वारे वाहत्या पाण्याची (running water) व्यवस्था आहे का ?

३२) मतदान केंद्र असलेल्या इमारतीच्या प्रवेशदाराजवळ मतदार सहाय्य केंद्र स्थापन करण्यात आले आहे का?

३३) मतदार रांगेत उभे असताना त्यांचे पावसापासून संरक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे का?

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.७/का-६
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक: २० जून, २०२२

प्रति,
१) विभागीय आयुक्त (सर्व),
२) जिल्हाधिकारी (सर्व),
३) महानगरपालिका आयुक्त (सर्व),
४) उपविभागीय अधिकारी (सर्व)
व इतर अधिकार प्रदान केलेले अधिकारी.

विषय:- न्यायालयीन प्रकरणाचा योग्य व मुदतीत निपटारा होण्याबाबत...

महोदय,

निवडणूक प्रक्रियेमधील विविध टप्प्यांवरील राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार हे क्षेत्रिय अधिकारी जसे, विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी इत्यादी स्तरावर प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून घेतलेले काही निर्णय न्यायालयात आव्हानित होतात. तसेच त्या याचिकांमध्ये सदर अधिकाऱ्यांना प्रतिवादी केलेले असते.

अशा प्रकरणांमध्ये निवडणूक कामाचे महत्व व कालमर्यादा विचारात घेऊन, सदर अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत न्यायालयामध्ये बाजू मांडणे आवश्यक आहे. याकरिता सदर अधिकाऱ्यांनी त्यांची बाजू मांडण्याकरिता शासकीय अभियोक्ता नेमावा तसेच सदर अभियोक्तांना प्रकरणाची पूर्ण माहिती देण्याकरिता जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

८९३

अशा प्रकरणी नेमलेले शासकीय अभियोक्ता हे आयोगाच्या पॅनेलवरील नेमण्यात आलेले वकील यांच्याशी समन्वय साधून त्या प्रकरणात संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी / उपजिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांची बाजू मांडतील.

सदर क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी अशा प्रकरणांमध्ये स्वत: मार्गदर्शन करून सदर प्रकरणात त्यांची बाजू भक्कमपणे मांडली जाईल, याची दक्षता घ्यावी. तसेच सदर प्रकरणाचा निपटारा होईपर्यंत त्याचा नियमित आढावा घ्यावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रतिलिपी:- राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनेलवरील वकील

१) ॲड. मकरंद अडकर, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली.
२) ॲड. सचिंद्र शेट्ये, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
३) ॲड. अजित कडेठाणकर, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ.
४) ॲड. जे. बी. कासट, मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ.

महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.०९/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ जानेवारी,२०२३

आदेश

विषय :- महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.२४/का.०६, दि. २८ नोव्हेंबर, २०१६.
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र. सीईएल-२०१९/प्र.क्र.४७०/१९/३३, दि. ११ एप्रिल, २०१९ व दि. २ फेब्रुवारी, २०२१.

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २८ नोव्हेंबर, २०१६ च्या आदेशान्वये (संदर्भाधीन क्र. १) महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांनी संदर्भाधीन क्र. २ येथील दि. ११ एप्रिल, २०१९ च्या शासन निर्णयान्वये भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानामध्ये वाढ केली आहे. तसेच दि. २ फेब्रुवारी, २०२१ च्या शासन निर्णयानुसार निवडणूक

कर्तव्यार्थ असताना कोविड-१९ या आजारामध्ये मृत पावलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वारसांना रु.३०,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान देय आहे. तसेच मतदान यंत्र तयारीच्या प्रक्रियेमध्ये नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल अथवा ECIL च्या अधिकाऱ्यांना देखील सानुग्रह अनुदानाचा लाभ देय केला आहे. त्यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाचे दि. २८ नोव्हेंबर, २०१६ चे आदेश सुधारीत करणे आवश्यक आहे असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

२. वरील परिस्थिती महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानाचे दर खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत :-

अ. क्र.	तपशील	सानुग्रह अनुदानाचे सुधारीत दर
१	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना मृत पावलेले अधिकारी / कर्मचारी यांचे वारस	रु. १५,००,०००/-
